BHĀRATA ITIHĀSA SAMS[...]ALA

POONA

Vol. XXX } Quarterly { Nos. 3-4
" XXXI } { " 1

(119-120-121)

January-April-July 1950

पेशवे-कालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ३० वें] त्रैमासिक [अंक ३-४
" ३१ वें] [अंक १

(११९-१२०-१२१)

१८७१ पौष १८७२ चैत्र-आषाढ

श. १८७१-७२] [स. १९४९-५०

वार्षिक वर्गणी रु. ४ ट. ह. वगैरे निराळें. फुटकळ अंक १॥ रुपया

Annual Subscription Rs. 4 Postage &c. Extra. Each No. Rs. 1-8

☞ बदललेला पत्ता अगत्य कळवावा.

हें त्रैमासिक मुंबई इलाख्यांतील प्राथमिक व दुय्यम शाळा आणि शैक्षणिक (Training) संस्था व मध्यप्रांतांतील हायस्कुलें व नॉर्मल स्कुलें यांसाठीं मंजूर आहे.

Printed by Mr. Keshav Ganesh Sharangpani at the Aryabhushan Press, House No. 915/1 Shivaji-Nagar, Poona 4. and published by Mr. C. G. Karve, Hon. Secretary, B. I. S. Mandala, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

मंडळाचें प्रकाशन

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला

* ह्या खुणेचे ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर केले आहेत. † हें पुस्तक शैक्षणिक (training) संस्था व शिक्षकमेंधालयें यांसाठीं मंजूर झालें आहे. त्रैमासिकाच्या फुटकळ अंकास रु. १॥

*मंडळ-त्रैमासिक प्रत्येक पुस्तक रु. ५
१ अहवाल (शक १८३२) रु. ३
२ „ (शक १८३३) रु. ५
३ सुबंत विचार(कै.वि.का.राजवाडे)१०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै.वि.का.राजवाडे) रु. १
*६ प्रथम संमेलन वृत्त (शक १८३५)०१२
*७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६
*८ द्वितीय संमेलन वृत्त (शक १८३६)३
*९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३
*११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६
*१२ तृतीय संमेलन-वृत्त(शकं १८३७)३
*१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ०८
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०८
*१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला ०१२
*१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा ०१२
*१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३
१८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शक १८३८)३
*१९ राजवाडे-खंड-स्थलसूची ४
*२० पंचम संमेलन-वृत्त (शक १८३९)३
२२ चंद्रचूड–दप्तर–कला १ ३
२३ महाराष्ट्र–सारस्वत आ. १ ली १०
२४ षष्ठ संमेलन-वृत्त (१८४०) ४
२५ सप्तम संमेलन-वृत्त (१८४१) ३
२६ संशोधकाची छोटी जंत्री ०४
२७ प्रदर्शन परिचय ०४
*२८ फारसी पत्रव्यवहार ५
२९ फार्सी–मराठी कोश (कै. प्रा. मा. त्र्यं. पटवर्धन) ४
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १०८
३१ Historical Miscellany १
३२ पुरंदरे-दप्तर भाग १ ४
३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा ४
३४ द. मध्ययु. इ. साधनें खं. १ २
३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १, २
३६ राजाराम–चरितम् मूळ संस्कृत वा. सि. बेन्द्रे १०८
३७ मंडळांतील नाणीं १
†३८ शिवचरित्रसाहित्य खंड ४ १०८
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही रु. ४
†४० ऐतिहासिक फारसी साहित्य रु. १०८
†४१ द० मध्ययुगीन इ. सा. खंड २, २
†४२ ऐतिहासिक संकीर्ण सा. खंड २ २०८
४३ मंडळ चित्र ग्रंथ चित्रें २० ०९
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं. ३, २॥
†४५ विजयनगर स्मारकग्रंथ ४
†४६ ऐतिहासिक फारसी सा. खंड २, १०८
४७ शिवचरित्रसाहित्य खं. ६ १०८
†४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (कै. शं. पु. जोशी) ०१२
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह कानडी १
५० शिवचरित्रसाहित्य खंड ७ १०८
†५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य ३ १०८
५२ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ व ३
†५३ फार्सी विभाग, प्रत्येकीं १०४

पुणें भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ७९

पेशवे-कालीन
सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार

(इ. स. १७२२ ते इ. स. १८५४)

संपादक
राजाराम विनायक ओतूरकर, एम्. ए.
सर परशुरामभाऊ कॉलेजांतील इतिहासाचे प्राध्यापक

प्रकाशक
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें २.

श. १८७२]   [इ. स. १९५०

. किंमत ३ रुपये

अनुक्रमणिका

निवेदन

पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार हा २१८ लेखांकांचा खंड मंडळाचें त्रैमासिक वर्ष ३० अं. ३-४ म्हणून प्रसिद्ध होत आहे. याहि जोड अंकास अपेक्षेबाहेर उशीर लागला. प्रस्तुत खंडाचें संपादन प्रा. रा. वि. ओतुरकर यांनीं केलें आहे. आतांपर्यंत घराण्यांचे कागदपत्र किंवा विशिष्ट कालचे असे कागदपत्र प्रसिद्ध झाले, पण पत्रांतील विषयांची वर्गवारी लावून निव्वळ सामाजिक व आर्थिक विषयास वाहिलेला असा मंडळानें प्रकाशित केलेला हा पहिलाच खंड होय. या खंडाच्या प्रकाशनास मुंबई विद्यापीठानें रु. २०० ची देणगी दिली. ती लहान असली तरी विद्यापीठाकडून गुणग्रहण या दृष्टीनें तिचें महत्त्व आहे. पुणें विद्यापीठाचेंहि मंडळाच्या कार्याकडे लवकर लक्ष जाईल अशी आशा आहे. एका अर्थी मंडळ हें विद्यापीठाचेंच कार्य करीत आहे.

संपादक

पुरंदरे व्यक्ति-नांवनिशी

सदर्हु पत्रांतून पुरंद [ध] रे घराण्यांतील व्यक्तींचा वारंवार उल्लेख आला आहे. ' पुरंदरे दप्तर भाग १ ला ' या ग्रंथांत घराण्याची वंशावळ दिली आहे, तिच्या आधारें या पत्रांतून येणाऱ्या व्यक्तींची नांवनिशी व काळ देत आहे. पुरंदरे हे पेशवाईंत सासवड कर्यातीचे देशपांडे होते.

भास्कर
।
त्र्यंबक
।
१ अंबाजी त्र्यंबक ऊर्फ तात्या मृ. १७३४
२ तुको त्र्यंबक
३ सदाशिव अंबाजी
४ महादोबा अंबाजी ऊर्फ बाबा मृ. १७६०
५ त्र्यंबक सदाशिव ऊर्फ नाना मृ. १७६८
६ महिपत त्र्यंबकराव ऊर्फ बजाबा मृ. १७८५
७ त्र्यंबक महिपत ऊर्फ नाना मृ. १८२२
८ नीलकंठ महादोबा ऊर्फ आबा मृ. १७६५
९ महादाजी नीलकंठ ऊर्फ बाबा मृ. १७९१
१० नीलकंठ महादाजी ऊर्फ आबा मृ. १८२६
११ मल्हार तुकदेव ऊर्फ दादोबा मृ. १७४६
१२ धोंडो मल्हार ऊर्फ आप्पासाहेब मृ. १७८५
१३ मल्हार धोंडो ऊर्फ दादासाहेब
१४ सदाशिव धोंडो ऊर्फ पाटील
१५ चिमणाजी धोंडो ऊर्फ बापू
१६ विठ्ठल मल्हार ऊर्फ बाबा मृ. १८४०
१७ भगवंत सदाशिव.

ओझरता परिचय

'पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार' या नांवानें प्रसिद्ध करीत असलेल्या सोबतच्या २१८ पत्रांचा या प्रस्तावनेंत ओझरता परिचय करून देत आहे. शिवशाही व पेशवाई यांचा अभ्यास करतांना राजकीय घडामोडीप्रमाणें सामाजिक व आर्थिक व्यवहाराकडे लक्ष पुरविलें पाहिजे. त्यायोगें मराठेशाहीचें अंतरंगदर्शन होतें. कांहीं घड्याळाचे वरचे काटे किती वाजले हें दाखवितात, त्याबरोबरच बाजूच्या कांचेंतून आंत फिरणारीं चाकेंहि दिसतात. देशाच्या राजकीय घडामोडी ह्या तत्कालीन स्थितीचें बाह्य निदर्शन होय. ज्या समाजानें अटकेपार झेंडे लावल्याची करामत केली त्या समाजाची प्रकृति कशी होती हें कळून घेतल्यास विचारास चालना मिळते. ह्या दृष्टीनें प्रस्तुतच्या कागदपत्रांचें महत्त्व विशेष आहे. असा पत्रव्यवहार हा प्रथमच प्रसिद्ध होतो असें नाहीं. महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनास पूर्वसूरींनीं व्यापक अधिष्ठान घालून दिलें आहे. कै. न्या. रानडे यांनीं 'पेशवाज् डायरीज्' प्रसिद्ध करतांना त्यांतील माहितीच्या आधारें एक 'इंट्रोडक्शन टु पेशवाज् डायरीज्' हा उत्कृष्ट निबंध लिहून साठ वर्षांपूर्वीच इतिहासाच्या या बाजूकडे अभ्यासकांचें लक्ष वळविलें आहे. गेल्या पन्नास वर्षांत इतिहासांतील राजकीय घडामोडींच्या अभ्यासावर विशेष भर दिला गेला. यापुढें आपण समाजप्रकृतीच्या अभ्यासावर अधिक भर दिला पाहिजे असें माझें नम्र मत आहे.

प्रस्तुतसारख्या सामाजिक पत्रव्यवहाराचें आणखी एका दृष्टीनें महत्त्व आहे. समाजशास्त्र (Sociology) या विषयाचा उद्गमन रीतीनें (Inductive Method) अभ्यास करण्यासाठीं व निगमन पद्धतीनें बांधलेले सिद्धांत पडताळून पहाण्यासाठीं लागणारा कच्चा माल अशा पत्रव्यवहारांतून मिळेल. या शास्त्राचा अभ्यास करणारांनीं आजपर्यंत निगमन पद्धतीवर विशेष भर दिला. समाजशास्त्रविषयक उद्गमन पद्धतीचें संशोधन नुकतेंच कोठें महाराष्ट्रांत डॉ. सौ. इरावतीबाई कर्वे यांनीं सुरू केलें आहे. उद्गमन पद्धतीवर आधारलेले स्वतंत्र सिद्धांत बांधतां येण्यासाठीं अजून खूपच मजल गांठावयाची आहे. पण इतिहासाच्या अभ्यासकांनीं त्यासाठीं अवश्य अशा कच्च्या मालाची साफसफाई करून सामग्री करून ठेवणें हें त्यांचें काम आहे.

— २ —

प्रस्तुतचीं २१८ पत्रें माझे मित्र श्री. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांच्या कृपेनें दहा वर्षांपूर्वीं मिळालीं व त्याच्या बाळबोध नकलाही त्यांनींच करून दिल्या. त्याच्या

आधारें एक इंग्रजी टिपण दहा वर्षांपूर्वी अन्य प्रसंगानें लिहिलें, तेव्हांपासून हीं मूळ पत्रें प्रसिद्ध व्हावीं असें त्यांना व मला वाटे. आज त्याचा योग येत आहे. अशीं सुमारें शंभरावर आणखी पत्रें मजजवळ आहेत. परंतु विस्तारभयास्तव तीं मागें ठेवलीं. हा बहुतेक पत्रव्यवहार सासवडच्या पंचक्रोशींत राहणाऱ्या लोकांनीं केलेला आहे व श्री. पुरंदरे यांनीं तेथूनच हे कागद मिळविले. सासवड हा मराठी राज्याच्या अंमलाखालीं स्वराज्यांत मोडणारा परगणा होय. येथील पत्रव्यवहार मराठ्यांच्या अंमलाचें स्वरूप दिग्दर्शित करण्यास उपयुक्त आहे. सासवडच्या पंचक्रोशींत मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारें मराठ्यांच्या अंमलासंबंधीं केलेलें विधान अतिव्याप्तीच्या दोषास पात्र आहे. तसेंच याहून अधिक पुरावा मिळाल्यास येथें केलेल्या विधानांना अधिकच बळकटी येईल हेंहि मान्य आहे, परंतु आहेत त्या कागदांच्या आधारें तत्कालीन लोकस्थितीचें जें सर्वसामान्य दिग्दर्शन होऊं शकतें तेवढेंच करून देण्याचा येथें संकल्प आहे. या संग्रहांतील जुन्यांतला जुना कागद इ. स. १७२२ चा आहे व अलीकडील काळचा कागद अव्वल इंग्रजी अंमलांतील इ. स. १८५४ चा आहे. इ. स. १७२२ ते इ. स. १८१८ पर्यंत सासवडवर अंमल मराठ्यांचा होता. तदनंतर इंग्रजी अमदानी सुरू झाली. परंतु राज्याची घडी बसण्यास काळ लागतो तेथपर्यंत जुनीं वळणें रेंगाळत राहातात. म्हणून हीं इ. स. १८१८ नंतरचीं पत्रें मराठी अंमलांतच ज्यांच्या स्वभावाची घडण बनून गेलेली आहे अशा लोकांचीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे कागद हातीं आल्यावर त्यास स्थूल क्रमांक देऊन शंभर शंभराचे एक असे तीन गठ्ठे बांधले. त्यानंतर प्रत्येक कागद वाचून त्याचा विषय, काळ, पत्र कोणाचें, कोणास, स्थळ कोणतें व पत्रांत लक्षांत रहाण्याजोगी बाब कोणती या मुद्यावर चतकोर कागदाच्या चिठ्ठ्यावर सारांश लिहून काढले व प्रत्येक कागदास विषयनिदर्शक शीर्षकें दिलीं. नंतर त्यांचें विषयवार वर्गीकरण केलें व विषयवार एकत्र जमविलेले कागद कालवार अनुक्रमानें लाविले. ज्यांचा काल मला किंवा माझे मित्र श्री. शं. ना. जोशी यांना लागला नाहीं ते कागद तद्विषयक कालक्रमानें लावलेल्या कागदांच्या अखेरीस लावले. अशा रीतीनें १ ते २१८ पत्रें लावलीं. प्रत्येक लेखांकाच्या पुढें कंसांत दुसरा जो आकडा आहे तो मंडळांत मूळचीं मोडी पत्रें ठेविलीं आहेत त्या पत्रावरील अनुक्रमांक आहे. या योगानें प्रत्येक पत्राचें मूळ कोणासहि जरूर तर ताडून पहातां येईल. पत्रें छापावयास देण्यापूर्वी मुळाशीं रुजूं पाहाण्याचें व कित्येक मला न लागलेल्या पत्रांचा काळ ठरविण्याचें काम श्री. शं. ना. जोशी यांनीं केलें. या कागदपत्रांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें :

१ सार्वजनिक व सरकारी कामें	ले.	१ – ३४
२ वतन		३५ – ९६
३ बाजार व भावनियंत्रण		९७ – १२३

या प्रसिद्ध करीत असलेल्या कागदांखेरीज

७ गुन्हेगारी चौकशी व शिक्षाविषयक ५७
८ जमीन महसूल विषयक २७
९ जमाखर्च विषयक ७
१० दिव्य विषयक १३

असे १०४ कागद मजजवळ आहेत, ते पूर्वी सांगितल्याप्रमाणें येथें प्रसिद्ध केलेले नाहींत. वर दिलेलें वर्गीकरण सुचलें तसें केलें; त्यांत शास्त्रीयता नाहीं. एका वर्गात घातलेला कागद दुसरा विषय सांगणारा असूं शकेल व केलेल्या वर्गीकरणाबद्दल क्वचित् मतभेदही होईल. परंतु पत्रांतील तपशिलांतून सुचणारे कांहीं विचार मांडावयाचे ठरविल्यावर असेंच चाचपडत पुढें जाण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं.

— ३ —

पहिलीं ३४ पत्रें वाचणारांस पेशव्यांचा आपल्या प्रजेवर अंमल कशा प्रकारचा होता याची कांहीं कल्पना येईल. इ. स. १७८८ च्या एका पत्रावरून सरकार अनैतिक आचरणास कसे पायबंद घालीत आहे तें ध्यानीं येतें. भिवी नांवाची एका राणोजी वाघापूरकराची बायको, नवरा वारल्यावर सासवडहून पळून पुण्यास आली. तेथें तिनें अनैतिक आचरण केल्याचें कळल्यावरून तिला कोतवालाच्या हुकुमावरून चावडीवर धरून आणलें, तिची जबानी घेतली. ज्यांनीं ज्यांनीं तिजशीं बदकर्म केलें त्यांपैकीं जे सापडले त्यांस धरून आणून त्यांना शिक्षा केली. आतां भिवीचें काय करावें हा प्रश्न पडला. मोकळी सोडावी तर ती पुनः गांवची नीति बिघडवील. तिचें लग्न करून द्यावें तर कुणी तिच्याशीं लग्न करण्यास तयार होईना, अशा स्थितींत ती बटीक म्हणून राहाण्यास राजी आहे असें पाहून एका रामाजी गोविंदास त्याजपासून ५० रु. घेऊन तिला विकून टाकली व बजावलें कीं, इला बटीक म्हणून संभाळावें व इचा कोणी वालीसदार आल्यास त्याजपासून आपले खर्च झालेले रु. ५० घेऊन चोऱ्याचे रुजवातीनें तिला त्यास देऊन टाकणें. (ले. १६). दुसऱ्या एका पत्रांत सासवडनजीकच्या दिवे घाटांत जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांस पाणी मिळावें म्हणून पाणी देणारा एक इसम दरमहा ७ रु. पगारावर नेमला आहे (ले. २४). या पाणपोईची सोय कशी करावी याबद्दलच्या सूचना ले. २६ मध्यें आहेत. अशी पाणी पिण्याची सोय लांब प्रवासाच्या रस्त्यावर आज विसाव्या शतकांतहि सरकारी खात्यामार्फत झालेली आहे कीं नाहीं याचा विचार करावा. असो. आणखी एका पत्रांत सासवडचे वाणी, साळी, रंगारी, कापडकरी, सराफ,

जिनगर, तांबट व हलवाई इत्यादि उदमी लोकांचा खानेसुमारी झाडा लिहून पाठवण्याचा हुकूम आहे (ले. ९). अशाच दुसऱ्या एका पत्रांत गोसाव्यांच्या नांवनिशीचें व ठावठिकाणाचें टिपण केलें आहे (ले. ३३). गोसाव्यांनीं भिक्षेसाठीं त्रास देऊं नये, लोक देतील ती भिक्षा घ्यावी म्हणून बजाविलें आहे. (ले. १४). या गोसाव्यांची संघटना असे, व त्यांच्या मठाधिपतीच्या जागीं कोणी प्रमुख नेमला जाई, तेव्हां त्या नेमणुकीस पेशव्यांची संमति आवश्यक असे (ले. १५). आणखी एका पत्रांत कोणी कोल्हापूरकर स्वामी ब्राह्मण संतपर्ण करण्यासाठीं दक्षणा मागत आहेत, त्यांचा पुरस्कार करून ठिकठिकाणच्या देशमूख देशपांडे यांस त्यांना साह्य करून पुढील गांवीं लावून द्यावें अशा सूचना दिल्या आहेत (ले २५). दुसऱ्या एका पत्रांत एका स्त्रीस सती जाण्यासाठीं जरुर तें साहित्य घेता यावें म्हणून रु. २५ ची सरकारी मदत करण्याची देशमुखांस श्रीमंतांनीं आज्ञा केली आहे (ले. १००). मंदिराच्या जीर्णोद्धारास साह्य करावें (ले. ३१), मुलखांतून फौज गेल्यानें रयतेचें कितपत नुकसान झालें, याची माणूस पाठवून चौकशी करावी (ले. १७), वेठ-बेगारीचा बंदोबस्त करावा (ले. ६), अशा अर्थाचींहि पत्रें आहेत.

या पत्रांवरून तत्कालीन सरकार हें नुसतें 'पोलीशी सरकार' नव्हतें हें लक्षांत येईल. रयतेच्या बहुविध जीवनाशीं समरस होऊन तिला वडिलकीनें साह्य करावें, जुनें सोडूं नये, नवें करूं नये, दुर्बळांचें रक्षण करावें, विद्वानांचा सन्मान करावा, धर्मकार्यास हातभार लावावा अशी तत्कालीन राज्यकर्त्यांची बुद्धि होती. पण हें चालूं असतांना लोक हरएक बाबतींत सरकारच्या तोंडाकडे पहात नसत. काळोलीचा मोकदम शेरीकर हा दुष्काळ पडला हें पाहून सरकारनें गांवचें रक्षण करण्यासाठीं कोणकोणता खर्च कमी केला पाहिजे, कोणती वसुली तहकूब केली पाहिजे हें सुचवीत आहे (ले. १२, १३). दुसऱ्या एका पत्रांत गांवकरी यांनीं दुष्काळास तोंड देण्यासाठीं कर्ज काढून गांवास ५०० रु. दिले. त्यांत कुणा एकाच्या वाटणीस अवघे २ रु. आले 'ते किती दिवस पुरावे' असें सदरहु पत्रलेखक मोठ्या अजीजीनें विचारीत आहे. (ले. २७). ह्या सर्व पत्रांवरून लोकांची स्वावलंबनाची तयारी व सरकारची रयतेस पूरक म्हणून मदत करण्याची तयारी या दोहोंची कांहींशी कल्पना येते. अशा प्रकारच्या अमलास एकतंत्री राजसत्तेचा अंमल म्हणावें कीं नाहीं याची खरोखर शंका आहे. जनतेस पंचायतीच्या साह्यानें गांवकीचा कारभार करण्यास उत्तेजन द्यावें, ज्ञातीनें किंवा गोसाव्यासारख्या पंथानें हि आपली संघटना करावी, परंतु हरएक निर्णयावर सरकारी पसंतीचें शिक्कामोर्तब असावें असा कटाक्ष असे. प्रजेच्या आशा-आकांक्षेशीं समरस झालेलें, तिच्या दुःखाबद्दल सहानुभूति असणारें असें हें सरकार असल्याचें या पत्रांवरून सूचित होतें. या सरकारचा अंमल निर्दोष होता असें सुचविण्याचा येथें उद्देश नाहीं. उपलब्ध पत्रांवरून काय अंदाज येतो तेवढाच सूचित करावा असा हेतु आहे.

— ४ —

ले. ३५ ते ९६ हीं पत्रें वतन विषयास वाहिलेलीं आहेत. इतिहासकालीन महाराष्ट्रांत वतन संस्थेचें केवढें तरी प्रस्थ होतें. जात, चालरीत व वतन हीं समाज स्थिर राखणारीं तीन प्रमुख साधनें होत. वतन विषयाचा विचार श्री. शं. ना. जोशी यांनीं पूर्वीं अनेक निबंधांतून केला आहे त्याची येथें द्विरुक्ति नको. पुढें दिलेलीं ६२ पत्रें वाचून वतन संस्था महाराष्ट्रांत किती दृढमूल होती याचा प्रत्यय येतो. कशाचें वतन निर्माण होईल याचा कांहीं नियम नव्हता. इ. स. १७२२ च्या एका पत्रांत शेख इमाम, रुस्तुम व दावल या तिघांना हवेली नजीकच्या सहा खेड्यांतून माणसाळलेले वाघ व अस्वलें दाखवीत फिरण्याचा वतनी परवाना मिळाला होता (ले. ३५)! वाघ, अस्वलें दाखवीत खेड्याखेड्यांतून हिंडत असतां दर घरटीं दोन पैसे घ्यावे अधिक घेऊं नयेत असा नियम होता. दुसऱ्या कोणी दरवेशानें त्याच्या हक्कावर अतिक्रमण केल्यास तें चालत नसे (ले. ३६). खेड्याच्या पाटलानें या दरवेशाचें सामान इकडून तिकडे वाहून नेण्यास गाडी पुरवावा, रात्रौ त्यास जागल्या पहाऱ्यास द्यावा अशा पाटलांना सूचना असत. कधीं कधीं हे दरवेशी अर्धा आण्याऐवजीं एक आणा वसूल करीत, व त्याबद्दल योग्य अधिकाऱ्याकडे तक्रार होई. या दरवेशाच्या वतनाप्रमाणें गांवाला फुले पुरविण्याचें वतन माळ्याच्या अभावीं एका गुरवाला दिलें असतां नवीन आलेला माळी त्या विरुद्ध तक्रार करूं लागला (ले. ६१), तेव्हां त्याच्या विरुद्ध गोत पंचायतीकडे तक्रार गुदरण्यांत आली व आपण पुनः असें करणार नाहीं असा त्याचा जाब घेतला गेला. फुलें पुरविण्याप्रमाणें संबळ वाजविण्याचेंहि वतन होतें. तें गोंधळ्यांना दिलें असतां गोसावी त्यावर अतिक्रमण करूं लागले, तेव्हां त्यास कसून विरोध झाला (ले. ७६). यापुढें जाऊन गोंधळी गोसाव्यांना गोंधळ घालण्यासही मना करूं लागले. तेव्हां त्याची चौकशी झाली व त्यांत असें ठरलें कीं गोंधळ हा एक परमेश्वरभक्तीचा मार्ग आहे, तो कुणासही खुला असला पाहिजे. परमेश्वराच्या भक्तीचे मार्ग कुणाचेंहि राखीव वतन होऊं शकत नाहींत (ले. ९२).

समाजांत ही हरएक प्रकारची वतनदारी निर्माण करण्याचा हेतु उघड आहे. त्यायोगें वतनदारास आपल्या जीवनाविषयीं स्थिरता येते, धंद्याला स्थैर्य येतें व गांवाला त्या त्या वतनदाराची चाकरी हक्कानें मिळते. या पद्धतींत गुणाप्रमाणें दोषहि आहेत. त्याचा येथें विचार करीत नाहीं, कारण वतनाच्या इष्टानिष्टतेची सर्वांगीण चर्चा करण्याचा येथें उद्देश नाहीं. इ. स. १७८३ च्या एका पत्रांत मौजे गराडे येथील तांबोळ्यास गांवांत एक जमीन दिली व त्याचें विड्याचीं पानें विकण्याचें वतन स्थिर करून दिलें (ले. ७१). याबद्दल तांबोळ्यानें गांवच्या हकीमास रु. १५ दिले, त्यानें सरकारास दरसाल २ रु. वसूल द्यावा व गांवच्या पाटील कुळकर्णी आदि अधिकाऱ्यास रोज विड्याचीं ५० पानें द्यावींत, असा करार होता. यासंबंधींचें एक अभयपत्र तयार करण्यांत येऊन त्यावर त्या

खेडेगांवांतील अठरा वतनदारांच्या सह्या घेतल्या. या वतनदाराचें नांव कासिम बिन बाजी. बाजी हा हिंदु असावा. मुलानें पुढें मुसलमान धर्म स्वीकारला असावा. धर्मांतरानें अशा वतनास धक्का लागत नसे, तें तसेंच त्या घराण्यांत राहूं शके. इ. स. १७६९ सालीं गराडे येथील तांबोळ्याच्या पानें विकण्याच्या वतनावर वाण्यांनीं अतिक्रमण करण्याचा यत्न केला तेव्हां सासवडच्या देशपांड्यांनीं गराडे येथील पाटलाला या अतिक्रमणाचा बंदोबस्त करण्यास सांगितलें (ले. ६३). वतनदार हे गांवचे हक्कदार, त्यांना सन्मानानें वागविलें जाई. कोणीं भयानें आपलें वतन सोडून जाऊं लागल्यास त्यास ‘ तूं गांवचा चौगुला आहेस, तुला कुणाला भिण्याचें कारण नाहीं ’ असें आश्वासन दिलें जाई (ले. ५६). प्रसंगानें एखाद्या वतनदाराचें आपल्या चिमुकल्या वतनांतील उत्पन्नावर भागेनासें झालें तर तो देशपांड्याकडे अर्ज करी. त्यावर देशपांडे गांवपंचायतीस लिहीत. एका पत्रांत गांवचे पाटील सासवडच्या देशपांड्यास लिहितात ‘ईश्वरें कुंभाराचा वंशवेल वाढविला त्या अर्थीं त्याच्या वाढत्या प्रपंचास पुरेल अशी तरतूद करण्याची आम्ही जबाबदारी घेऊं’ (ले. ८७). हल्लींच्या काळांत अशा प्रकारचें आश्वासन अद्भुत कादंबरीप्रमाणें वाटेल यांत शंका नाहीं.

सर्व बलुतेदार सारख्या दर्जाचे नसत. गांवांस वाटणाऱ्या गरजेवर वतनी बलुतेदाराचा दर्जा अवलंबून असावा. एका कागदांत (ले. ७५) बलुतेदाराचे तीन वर्ग केले आहेत. पहिला वर्ग सालाचे प्रत्येकीं १० रु. वांटा असणारे; सुतार चांभार, महार व मांग, दुसरा वर्ग प्रत्येकीं ५ रु. वांटा असणारे कुंभार, न्हावी, परीट व लोहार; व तिसरा वर्ग प्रत्येकीं २½ रु. वांटा असणारे जोशी, गुरव, सोनार व मुलाणा हे होत. या कागदावरून वतनाची श्रेष्ठकनिष्ठ श्रेणी जातीवर किंवा स्पृश्यास्पृश्यतेवर अवलंबून नसे हें उघड दिसतें. या वतनदारीच्या श्रेणींत स्थलकालानुसार फेरफार होई. उपरोक्त श्रेणींत पाटील कुलकर्णी कोठे दिसत नाहींत, कारण ते बलुतेदार नव्हेत. ते गांवचे अधिकारी असल्यानें त्यांचे वेतनवतनाचे प्रश्न स्वतंत्र असले पाहिजेत.

गांवच्या वतनदारींत हमेशा अनेक वादाचे प्रसंग उत्पन्न होत व त्यांपैकीं बहुतेकांचा निकाल गांवपंचायत बोलावून केला जाई. पंचांगश्रवणप्रसंगीं गंध लावण्याचा अग्र हक्क कोणास असावा याबद्दल गांवजोशी व गांवपाटील यांच्यांत वाद झाला असतां त्याचा निर्णय गांवपंचायतीकडे सोपविण्यांत आला (ले.८०). होळीच्या पंच-महानैवेद्यावर कोणाचा हक्क, महाराचा कीं चांभाराचा ? असा प्रश्न इ. स. १७७८ सालीं उपस्थित झाला असतांना गांवची समस्त पांढर व बारा बलुतेदार बोलावून तींत अखेर चांभाराच्या बाजूनें निर्णय लागला (ले. ७०). कित्येक वेळां वतनी हक्काच्या मानाच्या बाबी क्षुल्लक असत. तरीहि दोन पक्ष हट्टास पेटून पांचपांचशें रुपयांची पैज लावीत व वादाचा निकाल लावून घेण्यासाठीं इतर गांवीं कसे प्रघात आहेत याची माहिती मिळवीत. अशाच एका प्रसंगीं ३८ गांवाहून माहिती जमा केल्याचा उल्लेख

सांपडतो. (ले. ७२) यावरून वादाचा निर्णय करण्यास किती श्रम घेतले जात याची कल्पना येते. क्वचित् वादाचा प्रश्न धर्मविषयक असल्यास पैठणच्या धर्ममार्तंडांचा सल्ला घेण्यांत येई व गांव त्यावर निर्णय देई. इ. स. १७२४ सालीं खळद गांवचे लोहार व सुतार यांच्यांत वर्तनावरून भांडण लागलें (ले. ३७). तें तोडण्यासाठीं गांवांतील माळी, न्हावी, जोशी, परीट, चांभार, गुरव, मांग, कुंभार, पोतदार व महार यांच्या साक्षी गांवच्या देवळांत शपथपूर्वक झाल्या. मुलाणाची स्वतंत्र साक्ष झाली व त्यांतील माहितीनुसार वादाचा निकाल लागला. अशा वेळीं सरकार गांवपंचायतीस निकाल देण्यासाठीं उत्तेजन देई व त्या निकालाची अंमलबजावणी करीत. प्रसंगीं या गांवपंचायतीची बैठक चालू असतां सरकारी अधिकारी हजर राहात. हेतु हा कीं, गांवकीच्या वादांत खाजगी दाव्यावरून एखाद्या पक्षकाराचें नुकसान होऊं नये व वादाचा निकाल निःपक्षपातानें लागावा.

— ५ —

ले. ९७ ते १२३ या २७ पत्रांतून बाजार व भावनियंत्रणविषयक मिळणारी माहिती आजच्या रेशनिंगच्या काळांत मोठी उद्‌बोधक होईल. पशवाईंत वजनें व मापें वेळोवेळीं तपासून त्यावर सरकारी शिक्के मारणारे अधिकारी असत; त्यास आवटी असें म्हणत. प्रसंगीं या आवटेपणाचें वतन होत असें व आवट्याला आपल्या कामाबद्दल दर धान्याच्या पोत्यामागें कांहीं ठराविक हिस्सा मिळे. (ले. ११२). आवटी वजनामापांची तपासणी करण्यास येणार आहे, त्यावेळीं त्यास वजनें, मापें दाखवावीं व त्यास वसूल द्यावा अशी गांवांतील वाणी गुजरांना ताकीद द्यावी. या अर्थाचीं पत्रें देशपांडे यांस आगाऊ पाठविलीं जात (ले. ११४). इ. स. १७३४ च्या बाजीरावाच्या एका आज्ञापत्रांत तेल्यांनीं नवीं सरकारी मापें वापरलीं नाहींत याबद्दल निषेध केला आहे व पुनः असा प्रकार जाणून बुजून झाल्यास दंड केला जाईल असें बजावलें आहे (ले. ९८). नवीन बाजारपेठ वसविण्यासाठीं प्रारंभीं कांहीं करांत सवलती दिल्या जात व तेथील वतनदारांस आपला वतनी हक्क प्रारंभीं कांहीं काळपर्यंत उगवूं नये अशाप्रकारचे हुकूम पोहोंचत (ले. १०६). नव्या पेठेबाबत वतनी हक्क कोणकोणते याबाबत शेजारच्या बाजारपेठेंत चौकशी करून त्याप्रमाणें नव्या पेठेंत हे हक्क हलके हलके निर्माण केले जात (ले. १०९). इ. स. १७७१ च्या एका पत्रांत सासवडला एका सराफाला आपलें दुकान सुरू करण्यासाठीं गांवकऱ्यांनीं सवलती दिल्याचा उल्लेख आहे. चार वर्षपर्यंत त्यानें नेहेमीचे कर द्यावयाचे नाहींत, फक्त सालीना १ रु. द्यावयाचा अशी सवलत होती. विशेषतः सासवडला अगोदर चौघे सराफ असतांना ह्या नव्या सराफास येऊन धंदा सुरू करण्यासाठीं विशेष सवलती दिल्या गेल्या (ले. १०४). जुन्या व्यापाऱ्यांची कोंडी फोडण्यासाठीं असें कांहीं केलें

असण्याचा संभव आहे. कित्येक वेळां बाजारांत जातवारीची स्पधा चाले. इ. स. १७९५ च्या एका पत्रांत जेजूरीचा एक वाणी सरकारास लिहितो ' आमच्या गांवीं वाण्याचीं दुकानें पुष्कळ आहेत त्यांत हा गुजर नवीन आला त्यांस उठून लावावा गुजर आमचे गांवीं नको. आमचें म्हणणें मान्य केल्यास आम्ही सरकारला १०० रु. नजर देऊ ' (ले. ११६). वाण्याचें हें म्हणणें सरकारी अधिकाऱ्यांनीं मान्य केलें कीं नाहीं कळत नाहीं. गांवोगांवीं यात्रेच्या निमित्तानें बाजार भरत असे, त्यावेळीं दुकानांचा क्रमहि सरकार ठरवून देत असे (ले. ९७). प्रसंगीं सरकारी अधिकारी पदार्थांच्या किंमतीचें नियंत्रण करीत. इ. स. १८०६ च्या एका पत्रांत (ले. ११९) सासवडला वाण्यांनीं तेल विकूं नये, तेल्यांचा तो वतनी हक्क आहे असें ठरविलें. पण त्याबरोबर तेथील तेल्यावर अशी शर्त घातली कीं, त्यांनीं तेल पुण्याच्या भावानें किंवा त्यापेक्षां स्वस्त दरानें विकावें. किंमत वाढवितां कामा नये, व गांवाला तेलाचा तुटवडाहि पडूं देतां कामा नये (ले. ११९). यांत जर त्यांचेकडून कसूर झाली तर त्यांचा तेल विकण्याचा वतनी हक्क काढून घेतला जाईल. कित्येक प्रसंगीं भावनियंत्रणाच्या पुढली मजल म्हणजे पदार्थांचें वांटप करण्याचाही सरकार यत्न करी. लग्नाच्या मोसमांत सासवडच्या गुरवास पत्रावळी पुरविण्याचा भार येऊन पडल्यावर दरवेळीं त्याजकडून फक्त हजारच पत्रावळी घ्याव्या असा सूचनावजा हुकूम देण्यांत आला (ले. ११०).

वरील सर्व उदाहरणांवरून तत्कालीन सरकार बाजार व आर्थिक व्यवहाराकडे कोणत्या धोरणानें पहात असे हें लक्षांत येईल. सरकारच्या नियंत्रणामुळें चढाओढीस वाव मिळत नसे असें म्हणतां येत नाहीं. उलट या नियंत्रणाच्या मर्यादेंत झालेली चढाओढ धंद्यास उपकारक अशीच होई. रोजच्या जीवनास लागणाऱ्या वस्तू प्रजेस मिळाल्या पाहिजेत, त्या पुरविणाऱ्या व्यापाऱ्यांनीं एकाच ठिकाणीं गर्दी करूं नये, फार नफा मारूं नये असा यत्न असे. तसेच नवी व्यापारपेठ वसविण्याकडेही सरकारचें लक्ष असे. एकंदरींत आर्थिक व्यवहाराचीं चक्रें सरकारी नियंत्रणाच्या वंगणामुळें सुरळीत फिरावींत, जीवनाचा गाडा उगाच कोठें अडून व मोडून पडूं नये या संबंधींची दक्षता घेतली जाई. बाजारासंबंधीं व आर्थिक व्यवहारासंबंधीं पदार्थांच्या किंमती कोष्टकें, वगैरेबद्दल आणखी पुष्कळच सांगतां येण्यासारखें असलें तरी तूर्त आवरतें घेतों.

— ६ —

ले. १२४ ते १५१ हीं अठ्ठावीस पत्रें जी विवाहविषयक माहिती करून देतात त्यावरून तत्कालीन समाजापुढें आपल्यापेक्षां किती तरी भिन्न प्रकारचे प्रश्न होते व ते, ते कसे सोडवीत याची मोठी उद्बोधक कल्पना येते. युद्ध हें त्या काळीं मराठ्यांच्या पांचवीला पुजलेलें. लढाईवर गेल्यावर बेपत्ता होणें, मनुष्य मृत आहे कीं जिवंत आहे याचा अंदाज नसणें, मृत आहे असें गृहीत धरून पुढील व्यवहार सुरू

झाल्यावर पुढें अनेक वर्षांनीं अनपेक्षितपणें तो मृत मानलेला इसम पुढें दत्त म्हणून उभा राहणें व त्यानें आपले जुने हक्क उगवून घेण्याचा आग्रह धरल्यामुळें अनेक पेंच प्रसंग उभे राहाणें हे प्रकार हमेश होत. त्याबद्दलची माहिती वाचल्यावर तत्कालीन समाजाच्या वास्तववादी दृष्टीचा प्रत्यय येतो. इ. स. १७६९ च्या एका पत्रांत (ले. १२९) सांडखत दिलें आहे. सांडखत म्हणजे लग्नाच्या बायकोवर नवरेपणाचा हक्क सोडल्याचा कागद. सासवडचा एक तेली पानपतावर लढाईस गेला तो कित्येक वर्षें परत आला नाहीं. त्याच्या बायकोस शुद्ध चारित्र्यानें राहाणें कठीण वाटून तिनें पहिला नवरा मयत झाला असें समजून आपल्या बापाच्या संमतीनें दुसरा घरोबा केला. या दुसऱ्या जावईबुवांनीं मुलीच्या बापाला याबद्दल ३० रु. दिले. कांहीं दिवसांनीं तेली परत आला व त्यास घडलेली हकीकत कळली, तेव्हां त्यांतून मार्ग काढण्यासाठीं गोत पंचायत बोलावली गेली. तेथें तेल्यानें कबुलायत दिली कीं 'हे बायको विटाळलेले भांडें आपल्या कार्याचे नाहीं.' असाच एक कागद इ. स. १७६१ चा आहे (ले. १२८). कोकणांतील नागवे गांवचा सिदनाक महार नागपुरास नोकरीस गेला असतां नागवे गांवीं एका सोननाक नांवाच्या महारानें त्याच्या बायकोस फितविली व तिला त्याचेपासून मुलें झालीं. याची वार्ता कानीं येतांच सिदनाकनें पेशव्याकडे तक्रार गुदरली. तेव्हां पेशव्यांनीं प्रतापगडचे हवालदारास गोतपंचायत भरवून या गोष्टीचा निकाल करण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणें भरलेल्या पंचायतींत सिदनाकनें सिद्धवस्तूस (*fait accompli*) आपली मान्यता दिली. गोतानें ती मंजूर केली व पेशव्यांनीं त्यावर पसंतीचें शिक्कामोर्तब केलें. पाट किंवा दुसरें लग्न करतांना बहुधा सरकारला ही गोष्ट कळवावी लागे व सरकारी अधिकारी पाटास मंजुरी देतांना थोडी बहुत फी आकारीत असले पाहिजेत असें इ. स. १७९६ च्या एका पत्रावरून (ले. १४१) दिसतें. कित्येक वेळां या पाट लावणारास आपण बायकोला व मुलें लेकरें होतील त्यांना संभाळूं असें आश्वासन जमातीस किंवा सरकारी अधिकाऱ्यासमोर यावें लागे. स्त्री–पुरुष व्यवहार हे इतर शारीरिक गरजेप्रमाणें सुरळीत पार पडण्याची व्यवस्था झाली पाहिजे. पण स्त्रीपुरुष संबंध ही व्यक्तिव्यक्तीमधील खाजगी बाब नाहीं, त्यांनीं आपली सामाजिक जबाबदारी ओळखून ती पार पाडली पाहिजे व त्यासाठीं सरकारचें जरूर तें नियंत्रण असलें पाहिजे ही दृष्टि तत्कालीन व्यवहारावरून प्रत्ययास येते. लग्न प्रसंगीं व्हावयाचे विधि नीट न झाल्यास त्याबद्दल जात व सरकार सारखीच दखल घेई. जातीला जातिबाह्य कृत्य होऊं नये ही इच्छा असे व सरकारला अशा विवाहांतून कांहीं कायद्याचीं कुलंगडीं निर्माण होऊं नयेत याबद्दल दक्षता घ्यावी असें वाटे. इ. स. १७८४ च्या एका पत्रांत (ले. १३८) माण येथील एका इसमानें आपल्या बहिणीचा पाट लावला, पण तत्पूर्वी पहिल्या मृत नवऱ्याचें क्रियाकर्मांतर नीट केलें नाहीं याबद्दल जाब देण्यासाठीं पेशव्यानें हुकूम काढून बोलाविलें. क्रिया-

कर्मांतर किंवा लग्नविधी जाहीरपणें केल्याचा एक फायदा उघडच आहे कीं, होणाऱ्या गोष्टीस प्रसिद्धि मिळते व गुपचुपपणें गैरफायद्याची एखादी गोष्ट करतां येत नाहीं. इ. स. १७४५ च्या एका पत्रांत (ले. १२६) सासवडचे धोंडदेव देशपांडे यांनीं लग्न लागल्यावर बारा वर्षांनीं नवऱ्याच्या जातीचा पत्ता लागेना म्हणून बायकोतर्फे मागितलेली काडीमोड मंजूर केली. याच्या उलट इ. स. १७४० च्या एका पत्रांत (ले. १२०) असा उल्लेख आहे कीं सासवडच्या न्हाव्याचा एक बटकीचा मुलगा न्हावी मयत झाल्यावर त्यास जातींत घेतलें व मयत न्हाव्याचा औरस पुत्र म्हणून वारस केलें, कारण त्याच्यावांचून पितरास पाणी देण्यास दुसरें कोणी नव्हतें. परंतु न्हाव्याचें वतन मात्र या बटकीच्या पोरास गांवपंचायतीनें मिळूं दिलें नाहीं. इ. स. १७७२ चें एक पत्र तर फारच मौजेचें आहे. बेलसरच्या एका परटाला (ले. १३२) दोन बायका होत्या. परीट वृद्ध झाला. बायका म्हणू लागल्या आम्ही याचे जवळ नांदण्यास तयार नाहीं, हा आम्हास बापाप्रमाणें आहे. परिटालाहि त्यांना ठेवण्याचा उत्साह नव्हता. तेव्हां त्यानें बेदावा पत्र लिहून दिलें. आणखी अशाच एका पत्रांत (ले. १२५) उदयगिरीच्या गोसाव्यानें इ. स. १७४४ सालीं आपल्या दोघी बायकांस काडीमोड तर करून दिलीच, पण त्यापैकीं एकीचें योग्य नवरा पाहून दुसरें लग्न करून दिलें! त्यास धर्म लग्न म्हणून म्हटलें आहे!!

— ७ —

ले. १५२ ते २०५ या ५४ पत्रांतून जातिरक्षण व शुद्धि व्यवहाराचा विषय आलेला आहे. व्यक्तीकडून स्वार्थी हेतूनें जातिनियमांचें उल्लंघन होऊं नये याबद्दल समाज फार जपत असे. कोणत्याहि काळीं स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठीं सामाजिक किंवा सरकारी कायद्यांचें उल्लंघन करून गुन्हा करणाऱ्या व तो केल्यावर पचविण्याचा यत्न करणाऱ्या व्यक्ति असावयाच्याच. पण समाज या सर्व प्रकाराकडे डोळ्यांत तेल घालून पाहात असल्यानें असे प्रकार उघडकीस आल्याखेरीज राहात नसत. पुण्याच्या शिंप्यांनीं सरवदे यांना आपल्या जातींत घेतलें (ले. १८३, १८४, १८५). तेव्हां सासवडकर शिंप्यांनीं यावर आक्षेप घेऊन सांगितलें कीं कुणास जातींत घ्यायचें किंवा नाहीं हा केवळ पुणेकर शिंप्यांचा प्रश्न नाहीं. हा सर्व शिंपी ज्ञातीचा प्रश्न आहे. यावर पुणेकर शिंपी, त्यांचे बहुधा पुण्यांत सरकार दरबारीं वजन असल्याकारणानें, जबरदस्तीनें आपला हेका चालवूं लागले. यामुळें प्रकरण बरेंच चिरडीस गेलें. एक वर्ष बखेडा पडला. कांहीं जणांवर ज्ञातीबहिष्कार झाला. अखेर हें प्रकरण कसें शेवटास गेलें तें नीट कळत नाहीं. पण ही एक बाब पुणें-सासवड येथील समग्र शिंपी जातीच्या कशी जिव्हारीं लागून राहिली होती व त्यांत किती उलाढाल व येजा झाली तें चांगलें लक्षांत येतें. इ. स. १७५७ च्या एका पत्रांत (ले. १७०) चेऊलच्या चित्पावनांनीं

क्रमवंत ब्राह्मण हे अपंक्त आहेत असा आग्रह धरला. यापूर्वींच शाहू व कान्होजी आंग्रे यांनीं क्रमवंत हे पंक्त असल्याचा निर्णय दिला होता. परंतु असें दिसतें कीं यासालीं चेऊलच्या चित्पावनांनीं उपोषण करून सत्याग्रह मांडला. ही गोष्ट पेशव्यांस कळतांच पेशव्यांनीं उत्तर केलें कीं 'पूर्वीं समस्त थोर थोर पंडित शास्त्रज्ञ होते ते समयीं वडिलांनीं समस्तांचे विचारे पत्रे दिल्हीं ती अमान्य करून नवीन करावे तेव्हां ये गोष्टीस शास्त्रज्ञ काये करतील? या प्रकरणाचा अखेर काय निकाल झाला तें कळत नाहीं.' इ. स. १७७२ च्या एका पत्रांत (ले. १७७) गोसावी हे आपले जातीचे नियम पाळीत नसतील तर त्यावर बहिष्कार घालावा असें पेशवा नारायणराव यानें कळविलें आहे.

त्या काळीं जातिबंधनें निःसंशय दृढ होतीं व समाज जागरूक असल्यानें तीं कसोशीनें पाळलीं जात. परंतु मनुष्य चुकीस पात्र आहे. त्याजकडून चूक झाल्यास कोणत्या प्रायश्चित्त विधानें झालेली चूक दुरुस्त करावी व गाडें सुरळीत चालू करावें याचेहि नियम तयार असत. क्वचित् ज्ञातिभोजन घालून, तर कधीं तीर्थयात्रा करण्यास सांगून, तर कधीं दंडवसुलीनें, तर कधीं पश्चात्ताप झाल्याचें पत्र घेऊन शुद्धीकरण होई. हा शुद्धीकरणाचा विधी गोत व सरकारी अधिकारी एकमेकांच्या विचारें निश्चित करीत असत. समाजस्थैर्यासाठीं नियम करावे, ते कठोरपणानें पाळावेत, पण त्यांचें कुणाकडून उल्लंघन झाल्यास गुन्हेगारास शिक्षा देऊन त्याच्या गुन्ह्याचें परिमार्जन करून त्यास पुन: जातींत घ्यावें हें धोरण निःसंशय प्रागतिक व वास्तववादी स्वरूपाचें आहे. स्वराज्याच्या काळांत अशा प्रकारचें धोरण पाळलें जाई. इ. स. १७६५ च्या एका पत्रांत (ले. १७३) कुणी भवान माळी म्हणून गृहस्थ पंचवीस वर्षें माळी ज्ञातींत वावरला व नंतर लक्षांत आलें कीं, त्याच्या आईच्या जातीचा नीट शोध लागेना. आतां काय करावें असा प्रश्न पडल्यावर तो सरकारकडे निर्णयार्थ पाठविण्यांत आला. तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांनीं असा सल्ला दिला कीं इतकीं वर्षें झालीं, आतां या प्रकरणाचा शोध करीत बसल्यास जातींत मोठा घोळ उत्पन्न होईल, त्यापेक्षां जातगंगेनें भवान माळ्यास कांहीं मामुली प्रायश्चित्त देऊन पावन करून घ्यावें व एकंदर प्रकरणावर पडदा टाकावा. अशीच इ. स. १७३२ च्या एका पत्रांतील (ले. १५२) गोष्ट आहे. इंदुरीच्या एका परटास फिरंग्यांनीं बाटविलें व त्यांचेकडे तो तीन वर्षें होता. इ. स. १७३२ सालीं तेथील परटांनीं गोताचें लेकरूं म्हणून त्यास फिरून शुद्ध करून घेतला.

जातिप्रकरणीं ही शुद्धीकरणाची प्रागतिक दृष्टि स्वराज्य नष्ट झाल्यावर बदलली. इंग्रजी राजवटींत आतां आपलें काय होणार हें न कळल्यानें समाजमन बावरून जाऊन तत्कालीन लोकांनीं आपलीं जातिबंधनें अधिक दृढ केलीं व बहिष्कृतास शुद्ध करून घ्यायचेंच नाहीं असा निश्चय केला. इ. स. १८४४ सालीं मुंबईचा एक शेषाद्रि परळीकर नांवाचा देशस्थ ब्राह्मण मिशनऱ्यांच्या संगतींत ५७ दिवस

पर्यंत राहिला व त्याच्याबरोबर त्यानें अन्नोदकादि व्यवहार केला. बहुधा तो ख्रिस्तींहि झाला. (ले. १९२ ते २०१). त्यानंतर त्याच्या धर्मान्तराचा व प्रायश्चित्ताचा प्रश्न उद्भवला असतां लोकांचें असें म्हणणें पडलें कीं शुद्धीकरणास शास्त्राधार आहे, पण विद्यमान रूढी ही शुद्धिकरणाचे विरुद्ध आहे! याचें कारण असें कीं सध्यांच्या संक्रमण स्थितींत समाज व्यवस्थेंत अशा कांहीं सवलतींचा चंचुप्रवेश होऊं दिला, तर त्याच्या आधारें एकाहून एक अपवाद वाढू लागतील. समाजरचनेच्या भिंतीस खिंडार पडेल व समाज विस्कळीत होईल. हे परळीकर ब्राह्मणशुद्धीचें प्रकरण पुढें पुणेकर ब्राह्मणांकडे निर्णयार्थ आलें. कारण पेशवाईचा शेवट झाल्यापासून बाहेरगांवचे ब्राह्मण पुण्याच्या ब्रह्मवृंदांस धर्मपीठ मानीत असत. पुण्यास या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठीं तुळशीबागेंत मोठी सभा झाली व मोठा कडाक्याचा वाद झाला. उभय पक्षीं धर्मशास्त्राधार दाखविण्यांत आले व अखेर बहुमतानें असा निर्णय ठरला कीं सदर धर्मभ्रष्टास परत धर्मात घेतां येईल असा प्रायश्चित्त विधी देणें योग्य नाहीं (ले. १९७). तुळशीबागेंतील सभेखेरीज विष्णुमंदिरांत व राहातेकर यांचे घरींहि अशाच सभा होऊन हाच निर्णय लागला. या योगानें पुणेकर शास्त्री मंडळींत दोन तट पडले व पक्षभेदाचें राजकारण जोरावलें. विंचलकर सावकारांनीं शुद्धि व्हावी असा आग्रह धरला व तत्कालीन विद्वान पंडित बाळशास्त्री जांभेकर यांनींहि विंचलकरांची बाजू उचलून धरली. परंतु या सर्वांचा कांहीं उपयोग झाला नाहीं व खरें म्हटलें तर कोणत्याच पक्षाचा विजय झाला नाहीं. कारण जो तो पक्ष आपला हेका धरून बसला. अशा वादांत पूर्वी मराठेशाहींत सरकार या किंवा त्या, योग्य वाटेल त्या, बाजूचा निर्णय देऊन त्याची बाज उचलून धरीत व त्या निर्णयाची अंमलबजावणी करीत. परंतु इंग्रजी अमदानींत सरकारनें धार्मिक बाबतींत तटस्थतेची भूमिका घेतल्यानें असलेलीं धार्मिक बंधनें खिळखिळीत झालीं व त्यांच्या जागीं नव्या वळणाचीं प्रागतिक बंधनें व यमनियम निर्माण होऊं शकले नाहींत. सारांश, प्रजेचें पितृवत् पालन करणाऱ्या शासनसंस्थेनें आपली प्रजेबाबतची भूमिकाच बदलल्या कारणानें एकोणिसाव्या शतकाच्या इंग्रजी अमदानींत पहिल्या पिढींतील महाराष्ट्रीय समाज सुकाणू नसलेल्या जहाजाप्रमाणें इतस्ततः हेलकावत राहिला !

—८—

ले. २०६ ते २१८ हीं १३ पत्रें वादग्रस्त प्रश्नावर धर्मनिर्णय सांगणारीं किंवा धर्मशास्त्राधारपूर्वक कोणता विधि आचरावा याचीं चर्चा करणारीं आहेत. त्यांचा धावता परामर्श घेऊन हा ओझरता परिचय संपवितों. आपण धर्माज्ञा कसोशीनें पाळून धर्माचा मान राखल्यास तो धर्महि आपलें रक्षण करील, 'धर्मो रक्षति रक्षितः' अशी भावना त्या कालीं एवढी प्रबळ होती कीं धार्मिक बाबतींत कूट प्रश्नावर शास्त्रार्थ पाहाण्यासाठीं लोक

अट्टाहास करीत. एका उत्तर पानिपतकालांतील पत्रांत (ले. २१९) अशीच एक शास्त्री पंडितांची सभा भरल्याचा उल्लेख आहे. प्रश्न असा होता कीं, प्रथम पत्नी मृत्यु पावल्या-वर द्वितीय विवाह एका वर्षाचे आंत करावा असा शास्त्रार्थ होता, तसेंच पित्याच्या मृत्यूनंतर एका वर्षांत लग्न करूं नये असाहि शास्त्रार्थ होता. ज्याची पत्नी व पिता थोडे बहुत आगे मागे मृत झाले असतील त्यानें कसें वागावें ? यावर निर्णय निघाला कीं 'विनायकशांत' केल्यावर एका वर्षाचे आंत द्वितीय विवाह केल्यास बाध येत नाहीं. इ. स. १७९४ सालच्या एका पत्रांत (ले. २१०) राखेच्या लेकाचें सुतक धरावें कीं नाहीं असा एक प्रश्न विचारीत आहेत. रक्षा ठेवण्याचें नीतिबाह्य वर्तन राजरोस चालतें, पण तिच्या लेकाबाबतचे धर्मविधी मात्र नीट पाळले पाहिजे हा तत्कालीन समाजाचा आग्रह मोठा मौजेचा वाटतो. इ. स. १७८८ च्या एका पत्रांत (ले. २०९) कोंडीत येथील खेड्यांत एका चांभाराच्या मुलीच्या लग्नास हरकत घेतली गेली. कां तर, तिचा चुलता तुरुं-गांत वारल्यावर त्याचें विधिपूर्वक क्रियाकर्मांतर लग्नाआधीं झालें नाहीं. थोरला माधव-राव स्वारीवर निघाला असतां शत्रुपराजयार्थ अनुष्ठान करण्याविषयीं राजश्री नीळकंठ महादेव यास लिहित आहे (ले. २०७). दुसऱ्या एका पत्रांत (ले. २०३) विष-बाधेनें मृत्यु पावलेल्या एका इसमास दहन करण्यापूर्वी त्याच्या शवाची शुद्धि न केल्या-बद्दल तक्रार मांडलेली आहे. त्याच्या निरसनार्थ पलाशपत्राचा देह करून त्यावर शुद्धि संस्कार करून नंतर त्यास दहन करावें असा शास्त्रार्थ सांगितला ! ले. २१४ व २१५ हे एक एक ओळीचे दोन लेख मुद्दाम शेजारीं शेजारीं दिलेले आहेत, ते वाचून मौज वाटेल. धार्मिक व ज्योतिषविषयक भ्रामक समजुतींनीं भारावलेल्या व ग्रामण्याच्या वितंडवादांत कालाचा व शक्तीचा अपव्यय करीत बसणाऱ्या समाजाचीं अठराव्या शत-काचे अखेरीचीं अधोगतीचीं चिन्हें आपणांस या पत्रांतून भरपूर पाहावयास मिळतात !

अठराव्या शतकांतील महाराष्ट्रीय समाजाच्या स्थितीचें मूल्यमापन करण्याचें हें स्थळ नव्हे. प्रस्तुत प्रसिद्ध करीत असलेल्या २१८ पत्रांप्रमाणें पेशवे दप्तरांत, मुख्यतः भाग ४३ मध्यें, 'पेशवाज डायरीज' मध्यें व अन्यत्र विखुरलेलीं अशीं किती तरी पत्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत व अप्रसिद्ध तर याहून किती तरी अधिक आहेत. कारण इतिहास-अभ्यासाची ही बाजू, सापेक्षतेनें बोलावयाचें तर, अद्याप दुर्लक्षिलेली आहे. त्यांच्या अभ्यासाकडे प्रस्तुत प्रकाशनानें अभ्यासकांचें अधिक लक्ष लागावें व अठराव्या शतकांतील महाराष्ट्रीय समाजाचे अंतःप्रवाह अधिकाधिक उजेडांत यावे असा हीं पत्रें प्रसिद्ध करण्याचा उद्देश आहे.

नारळी पौर्णिमा (टि. पं.)
शनवार २९ जुलै १९५०
पुणें २.

— रा. वि. ओतुरकर

सूचना व आभार

वर ओझरता परिचय म्हणून पुढील पत्रांची ओळख करून दिली आहे. पण कुणाची ओझरती नजर कोठें स्थिरावेल याचा नेम नाहीं, हें लक्षांत घेतां मूळ पत्रांचा ज्याचा त्यानें आस्वाद घेणें आवश्यक ठरतें. सदरहु पत्रांचा केला याहून किती तरी प्रकारांनीं अभ्यास करतां येईल. त्यांतील मराठी भाषाविषयक विचार, तसेंच शुद्ध मराठी शब्दांचे सामान्य व्यवहारांत व निरनिराळ्या जातींच्या माणसांकडून निरनिराळ्या काळीं कसकसे अपभ्रंश होतात (उदाहरणार्थ देशावरचे कांहीं ब्राह्मण देखील 'दृष्टि' शब्दाचा उच्चार 'द्रष्टी' असा करतात व तो शब्द तसा लिहितात देखील) याबद्दल कांहीं संपादकीय लेखन करण्यास मी अनभिज्ञ आहें. सोबत कांहीं कठीण शब्दांचे अर्थ दिले आहेत. पण असे पुष्कळ शब्द सुटले आहेत व कित्येक शब्द मला न लागलेले असेंहि आहेत.

सदरहु 'पेशवे कालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहारा' च्या प्रकाशनासाठीं **मुंबई विद्यापीठानें** रु. २०० ची देणगी दिली. या पत्रांच्या संपादनासाठींहि मुंबई विद्यापीठानें प्रारंभीं कांहीं साह्य दिलें होतें, याबद्दल मी मुंबई विद्यापीठाचा फार आभारी आहे. श्री. रु. वा. पुरंदरे यांनीं कागद मिळवून व नकलून दिले, श्री. शं. ना. जोशी यांनीं ते रुजू पाहिलें, सूचि तयार करून दिली, व मुद्रितें वाचण्यास साह्य केलें व वेळोवेळीं शंका समाधान केलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

— रा. वि. ओ.

पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार

अनुक्रमणिका

४ लग्नव्यवहार

५ जाति व शुद्धि व्यवहार

६ धर्म-शास्त्राधार चौकशी

पेशवेकालीन

सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार

जकातीवर समाईक रजपूत नोकर

ले. १ (१४३) श्री { श. १६५४ मार्ग वद्य १३ / इ. १७३२ डिसें. ८

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री सखो माणकेश्वर गोसावी यासि

सेवक नारो शंकर सचिव नमस्कार सुा सलास सलासन मया अलफ तुंम्ही विनंति पत्र पाठविलें ते पावोन लिहिलें वर्तमान विदित जाले जकातीच्या प्रयोजनास येक रजपूत समाईक ठेवावा लागतो त्याची मोईन करून माणूस नेमून पाठवावे म्हणून लिा त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केले आसे तरी समाईक रजपूत ठेवणे दर माहे रोजमरा २॥ आडीच देणे आणि याजपासून जकातीची सेवा घेणें छ २६ जमादिलाखर
[मो. अ. शिक्का]
+
सुरु सुद बार

राडीची दुरुस्ती

ले. २ (२५७) श्री { श. १६५६ / इ. स. १७३४ पूर्वी

श्रीयासह चिरंजिव राजमान्य राजश्री धोंडोबास प्रती अबाजी त्रिंबक आसिर्वाद उपरी आम्ही ताा छ ४ सवाल परियेत कुषल असो विशेष रगारी याची राडी जुनी

चिरेबदी कर्दीम आहे तिची डागदोजी करावी लागती म्हणून रगारी मजकूर यानीं सागितले तरी तुम्ही आपला कामावरील गवडीया व चुना लागेल तो देऊन राडीची डागदोजी करून देवणे हा* आसिरवाद

भूतकरणाचा तपास

ले. ३ (२९) श्री { श. १६५६
इ. स. १७४८

राजश्री मोकदम मौजे गराडे गोसांवी यांसी

श्रो त्रिबक सदासिव पुरंदरे देशपांडे का॥ सासवड आसीर्वाद सु॥ तिसा आर्बेन मयां व अल्फ मालजी गाईकवाड मौजे हिवरे हा गांवातून पलोन गेला आहे आणि तुमचे गांवी थारा धरून हिवऱ्यावर दावादंद करून भूत करितों म्हणून विदित जाले तुमचे गांवी थारा धरून दावा .... ठिकाणीं लागले तरी तुम्हास जड जाईल गाव नागवला जाईल येसे समजोन मालजी मजकुरास आश्रा न देणे कदांचित आला तरी आम्हाकडे धरून पाठवणे छ २२ जिल्हेज जासुदास लाकडे मोल्या ४ देणे छ २२ जिल्हेज

महोत्सवासाठीं गांवाकडे दळण

ले. ४ (१३५) श्री { श. १६८३ भाद्र. वद्य ६
इ. १७६१ सप्टे. २०

आज्ञापत्र राजश्री शामराव आबाजी ता॥ मोकदम मौजे चाबली ता॥ करेपठार प्रात पुणे सु॥ इसने सितैन मया आलफ मोहोछावाचे दलण मौजे मजकुराकडे केली पाच मण दिल्हे होत त्याची कणीक गहूभार केली पाच मण गु॥ जानोजी कटका चवगुला माचीचे मुकामी जमा आसे छ २० सफर मोर्तब

सुद

बार

---

* यापुढील मजकूर खाशाऱ्या हातचा.

सरकारी पागेकडील जिन्नस

ले. ५ (७७) श्री { श. १६८५ ज्येष्ठ वा। ३ / इ. १७६३ मे ३१

श्रीमत राजेश्री धोंडो म(ल्हार)
पुरधरे आपासा।

कबज वसूल बा। विठल व्येंकटेश भालेराव आ। मा। मौजे वडुले खुर्द सन ११७३ यास राजबा चव्हाण दि।
कारणे कबज लेहून दिधले येसे जे सारचे पागेस बा। ता। जिनस

॰।४ जोरी भरीत घोडी ९ ॥॰। चंदी ठाणे मा।री
माप बारुले मन घोडी १० पायेली साडेसा
१ मीठ नरूत रुा।

सदरहूप्रमाणे अपनास पावले आपन सारात (?) रुजू करून देऊ हे कबज लिा।ले सही
ता। छ १७ माहे जिा।द नि। कटारी
[क. चि.]
बि। राजाराम रघुनाथ कुलकर्णी
मौजे मा।र

वेठबेगारीचा बंदोबस्त

ले. ६ (पत्र नं. ४) श्री { श. १६८९ माघ शु. १० / इ. १७६८ जाने. २८

आज्ञापत्र राजश्री [1]पंत प्रधान ता। मोकदम मौजे आबोडी ता। करेपठार प्रांत पुणें सु।। समान सितैन मया व अलफ मौजे मजकुरास हाजीर बेगारीचा उपसर्ग लागतो याजकरितां हे आज्ञापत्र सादर केले असे तर सरकारचे दस्तकासिवाये हाजीरचे वगैरा वोझें चालो न देणे बलेच कोणी तसदी देईल तर धरून हुजूर पाठऊन देणे [2]जाणिजे छ ९ रमजान पा। [3]हुजूर लेखन

सीमा

---

१ येथें माधवराव बल्लाळ यांचा शिक्का आहे. २ येथून अक्षर निराळें. ३ हा शब्द त्याहून निराळे वळणाचा आहे.

खरेदी-खत

ले. ७ (१७५) श्री { श. १६९२ मार्ग. वद्य ७
{ इ. १७७० डिसें. ९

नकल

सिका

कबालेपत्र कोतवाल चौत्रा शहर का॥ पुणे वि॥ राजश्री केशराव बलाल रा॥ कचो रघुनाथ ठोंबरे वा॥ पेठ गुरुवार शहर का॥ मजकूर सु॥ ईहीदे सबैन मया व अलफ शके १६९२ विक्रतीनाम संवछरे सन ११८० दिल्हे कबालेपत्र येसी जे राणू वा॥ यमाजी राजगूर व राणोजी मजकूर याचे पुत्र राघू व गोविंदा वा॥ राणोजी सुतार राजगुर वा॥ पेठ शुक्रवार याची जागा पेठ मा॥री इमला खपरेल खण सुमार ४ होती ती त्याणे तुम्हास आपल्या स्वसंतोषे विकत दिल्ही त्याची गज मोजणी गु॥ मल्हारजी गौंड दि॥ द्वारकोजी गौंड चाकर सरकार गज सुमार

लांबी पूर्व पश्चिम गज सुमार	रुंदी दक्षण उतर गज सुमार
१६ गर्भी जागा	८ गर्भी जागा
०॥३ पश्चमेची भिंत खुद	०॥४ उत्तरेची चादई येन गज ०॥।~ पैकी निमे मेलोजी भुतकर याची ०४ बाकी खुद असे
१६॥३	८॥४

याची चतुः सीमा

१ उत्तरेस मलू भुतकर सिपी

१ दक्षणेस भवानी परीट

१ पूर्वेस रस्ता बाजार उत्तर दक्षिण जात आहे

१ पश्चमेस गली पलीकडे भाद्रपुरी गोसावी याचा मठ

सेतखाना पश्चमेचे भिंतीत दक्षणेचे कोपरीयास आहे किडकीचे तोंड बाहेर असे कलम १

घराचे पाणी पश्चमेस गलीत मोरी बांधून सिरस्ते प्रा॥ लावणे कलम १

दरवाजा पश्चमेचे भतीत वागावयाचा आहे कलम १

येकूण लांबी साडेसोला गज तीन तसू व रुंदी गज साडे आठ च्यार तसू व चतुःसीमापूर्वक कलमे च्यार व सेतखान्याचे कलम येक व घराचे पाणीयाचे कलम येक व दरवाजीयाचे कलम येक याची किमत रुपये पंधरासे सुतार मा॥राने तुम्हा जवळून घेऊन खरिदीखत आडोसी पडोसीयाचे साक्षीने करून दिल्हे ते तुम्ही आणून दाखविले ते रुजू पाहून चौकसी करून जागा करार करून देऊन सरकार सिरस्ता दर सेकडा रु॥ १० द्राहा प्रा॥ रुपये १५० दीडसे द्यावे त्यास ही जागा कर्जात घेतली आणि सुतारकडे कर्ज भारी त्याजला द्यावयास सामर्थ नाही आणि त्याजला मुक्त केले याजकरिता तीन हिसे

बाद बाकी रुो ४१। सवा येके चालीस तुम्हापासून घेऊन कबालपत्रे भोगवटीयास करून दिल्हे असे तरी त्या जाग्यावर इमारत बाधली आहे तेथे तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने सुखरूप नादणे जाणिजे छ २१ माहे साबान मोर्तब सुद मोर्तब असे

बार

माल न्या किंवा विकूं द्या

ले. ८ (८०) श्री { श. १६९३ अ. आषाढ शु. ६ / इ. १७७१ जून १८

*पौ छ ३ रावल सन इसने

सबैन आधिक श्रु ६ शके १६९३

सेवेसी विज्ञापना येसी जे कर्डी पाच साहा मण येथे आहेत या विकावयाच्या आसिल्या तरी आज्ञा करावी नाही तरी येथे खर्चास पाहिजे सारख्या आसिल्या तरी न्यावयास आज्ञा करावी व दाल तुरीची आहे ती न्यावयास आज्ञा करावी दाहा बारा मण दाल आहे व लोकर आहे ती न्यावयाची आज्ञा करावी येथे पाच सेर प्रो मागतात याची काय ते आज्ञा करावी येथील वर्तमान तरी श्रीमत बज्याबानी खंड प्रभू यास राजगड तोरणा याजवर घातला आहे घालावयास कारण तरी जामदार खानियातून चोरी केली याजकरितां किल्यावर घातले आहेत मुले, मागसे सासवडीच आहेत याप्रमाणे वर्तमान आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

धंदेवाईकाची खानेसुमारी

ले. ९ (४८) श्री { श. १६९७ चैत्र शु. १० / इ. १७७५ एप्रील १०

राजश्री देशमूख व मोकदम व देशपाडे कसबे सासवड गोसावी यांसि

++++ (सीत) सबैन मया व आलफ कसबे मजकूरचे खानेसुमारी वाणी व साली व रंगारी व कापकारी व सराफ व जिनगर ताबट हल (वाई) वगैरे उदमी व हुडीवाले आडाणाचा इसमेवार झाडा सरकारात पाहिजे तर प्रातःकाली सदरहू झाडा लेहून पाठवणे जाणिजे. छ ९ (सफर?) मोर्तब

सुद

---

* मोडक जंत्रींत षष्ठीला रबिलावल ४ आहे. मितीप्रमाण धरून तारीख दिली आहे.

सतीस सरकारी मदत

ले. १० (२४२) श्री {श. १६९७ माघ वद्य ५
इ. १७७६ फेब्रु. ९}

राजश्री देशमुख व मोकदम व देशपांडे गो

श्री बगाजी साबाजी आसीर्वाद व नमस्कार सुा सीत सबैन मया व आलफ आनाई चव्हाणीण इचा दादला हिंदुस्थानात गेला त्यास पधरा सोळा वर्षे जाली त्या चाा आनाई माार सती पडते त्याजला साहित्य पचवीस रुाो पावेतो करणे म्हणौन श्रीमंताची आज्ञा जाली त्यावरून तिचा दीर कुसाजी चव्हाण यास पचवीस रुाो देविले आसेत आदा करणे जिल्हेचे ऐवजी मजरा पडतील जाणिजे छ १८ जिल्हेज बहुत काय लिहिणे हे विनंति

जेजुरीस दारु भटी

ले. ११ (२०३) श्री {श. १६९९ माघ शु. १०
इ. १७७८ जाने. ६}

राजश्री बापूजी माहादेव काा मौजे
जेजूरी गोसावी

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य-स्नो तुकोजी होलकर दंडवत सुा समान सबैन मयां व आलफ मौजे मजकुरी सरकारी कारखाने चालतात त्या कारखानीयाचे कामाकरिता राजश्री शामजी नारायेण कारखानदार सटवा खाटकाकडून आठवे रोजी दारूच्या फुलाची भटी लाऊन फूल कारखानियाचे कामास नेतील त्यास तुम्ही मुजाहीम न होता आठवे रोजी मात्र दारूची भटी चालू देणे दिकत न करणे जाणिजे छ ७ मोहरम बहुत काय लिहिणे मोर्तब

सुद

श्री
म्हाळसाका
तचरणी तत्प
र मल्हारजिसु
त तुकोजी हो
ळ कर

(आकार कोयरीचा)

कुळांचें रक्षण करा

ले. १२ (१४५) श्रीशंकर { श. १७०० / इ. १७७८ (?)

राजेश्री धोंडो मल्हार देसपांडे कर्या [त्] सासवड साहेबाचे सेवेसी

॥द् अर्जदास्त शेरीकर मोकदम मौजे काळोली कर्या [त] मार पायावर डोई ठेऊन दडवत विनति ता। छ १ जमादिलाखर पावतो साहेबाचे कृपादृष्टी करून मौजे मारची बखैर सलायेत असे हाकीकत हेच की मौजे नालोली प्रा। सुपे येथे शेरी राजश्री जिऊबा चिटनीस यानी केली तेथे विठोजी घाटगा कमाविसदार ठेविला शेरी वोढ्याचे कांठी आहे त्यास मौजे मारची गुरेढोरे पाण्यावर जातातो दोन वरसे पाऊस नाही पाणी तेथेच थोडेकसे आहे त्यास रोज मारामार करितातो नालोलीहून चालोन येऊन कजिया करितातो वेडेवाकडे बोलतातो की तुम्ही हिमातदार आहा मानीत नाही तर आम्ही रयेत आमच्या जोर काये आहे राजश्री आवजी कवडे याची कोठी येथे उतरली होती त्याचे बैल पाण्यावर गेले त्याची याची परस्परे मारामार जाली ते काही आम्हास ठाऊक नाहीं आणि येथे येऊन धामधूम केली तुम्ही आमची माणसे मारली यैसे तुम्ही हिमाती करून **मवास** राहतां तर ये गोष्टीस आम्ही काये करावे समजावीस करतां पुरे जाले पागोटे बाधोन समजाविले त्यास दोन महिने जाले आतां साताराहून मसाला रुा। ५ व रसद रुा। १० येऊन हुजूर येणे म्हणून रोखा आणिला रुा। १० खडाखडी घेतले पैका मिलेना मसल्याचेहि तष्ट लावलेच आहे यैसे रोज उठोन आमच्याने समजावीसहि होत नाहीं गावावर नादनूकहि होत नाही दोन तीन वरसे गावावर तवई आहे ते साहेबास विदित आहे साहेब धणी आहे साताऱ्यास लेहून यादी विल्हे करतां तर पात्यापासी जगले जाऊ नाहीतर कुळे तजावजा होईल साहेबास कळावे हे आर्ज दास्त

सेवसी सेवक न्हन्हावा नाईक दोन्ही कर जोडून सा। नमस्कार आपण आहो आम्ले वेडेवाकडे चुकून लिहीले तर माफ करणें

अवर्षणकाळांतील जगणूक

ले. १३ (१४६) श्री { श. १७०० / इ. १७७८

राजेश्री धोंडो मल्हार देशपाडे को। सासवड साहेबाचे सेवेसी

अर्जदास्त शेरीकर मोकदम मौजे कालोली का। मार पायावर डोई ठेऊन दडवत विनति उपर मौजे मारची हाकीकत पीकपाणी नाही उपासी मरताती जोधळ्याचे येक दोन मोड हरणे खाताती तर साहेबी मेहरबानी करून बेगाऱ्यास व सुतारास निरोप दिला पाहिजे हरयेक विशई गाव साहेबाचा आवर शेन या प्रकारचे वरसाने वरीस कठीन येते जगनूक होये यैसे केले पाहिजे हे आर्जदास्त

भीक मागणाऱ्या गोसाव्यांचा बंदोबस्त

ले. १४ (३०) श्री { श. १७०५ श्रावण शु. १२
{ इ. १७८३ आगस्ट ९

० श्री ०
राजा शाहूनर
पतिहर्षनिधान (आकार कोयरीचा)
माधवराव नारा
यण प्रधान

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान तां फिरस्ते गोसावी झुंडी सुा आर्बा समानीन मयां व आलफ मौजे कोढीत बुद्रुख काा सासवड येथील गांवकरी यांनी हुजूर विदित केले कीं मौजे मारी गोसावी येऊन भिकेचा वगैरे मनमानेसा उपद्रव करिता आपण भीक देतो ते घेत नाहींत येविसीं ताकीद जाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हे अज्ञापत्र सादर केलें असे तरी गांवकरी आपले स्वसंतोषे भीक देतील ते घेऊन जात जाणे जाजती उपद्रव केलीयाचा बोभाट अलीया कार्यास येणार नाहीं जाणिजे छ १० रमजान पाा हुजूर लेखन

सीमा

मठाधिपतीच्या हक्काचें भांडण

ले. १५ (२०९) श्री { श. १७०५ ज्येष्ठ वद्य ११
{ इ. १७८३ जून २५

दस्तक बो गगागीर गोसावी कोतवाल दसनामी कदबा लिहून दिल्हे यैस जे लालपुरी गोसावी मठ सुकलोनी तो मयेत जाला सबब गिरीपुरी गोसावी यानी मजला मठ आधीपती केले त्यावरून आपन तेथे नव वरसे होतो मठ बाधला वगैरे खरच येच नाव समधे केला यैस आसता पुरी गोसावी म्हनता [त] की त्या मठास दुसरा गोसावी पाठवितो तुम्ही तेथून निघने यैशास मजला तेथेल मठ सारे गोसावी मिलून दिल्हा आसता फिरून मागावयास कारण काये याजकरिता साहेबी सारे गोसावी यास तागीद करून माझा मठ मजकडे आहे त्याजप्रमान आसावा म्हणोन साहेबापासी विनंति केली त्यावरून पुरीनामी गोसावी यास बेलाऊन आनले आणि तुम्हास मठ दिल्हा हे कशावरून म्हनता हे लिहून देन व साधन दाखलन म्हणोन पुरसीस केली त्यावरून मजपासी खरचायेरचाचे व गोसावी यानी कागद लिहून दिल्ही आहेत ते साहेबास

दाखविले त्याची चवकसी साहेबी केली त्यात मजला मठ दिल्हा येसे नाही आपन साहेबापासी मजला मठ निहेमी दिल्हा म्हणोन म्हनत होतो ते बातल न (व) वरसे मी तेथे होत त्याजमुळे लालपुरीचा येवज, वसूल केला त्याचा खरच जाला याखेरीज माझे पदरचा खरच जाला तो चवकसी करून सान्या गोसावी यानी मिळून माझा मजला देवा [वा] आनी लालपुरीचा मठ घ्यावा माझा वारासा नाही हा कदबा लिहून दिला सही सके १७०५ सोभकृतनाम सवछरे जेस्ट वा। ११

बाो दारकूजी जैन गाडापूरकर नििा त्रिसोल
हली वस्ती काा पुणे →—

अनैतिक आचरणास पायबंद

ले. १६ (१०) { श. १७१० ज्ये. शु. १० इ. १७८८ जून १३ }

नकल

चिठी कोतवाल शहर पुणे विाो घासीराम सावळदास राा रामाजी गोविद निाा जकाते सुाा तिसा समानीन मया व अलफ भिवी कोम राणोजी कडू वाघापूरकर हली वस्ती पेठ सोमवार इणे बदकर्म केले म्हणोन चावडी कसबा येथे धरून आणली पुरससि करिता तिणे जबानी लिहोन दिल्ही त्यातील माार की मी चौघजवळ बदकर्म केले म्हणोन लिहोन दिल्हे त्याजपाो दोघाचा खंड चावडी माारचे हिसेबी जमा आहे दोघे गैरहजीर पुढे तिची चौकसी करिता भिवी माार ही पहिली सासवडास होती दादला मेल्यावर पुण्यास येऊन पाच साहा महिने जाहाले बदकर्म केले साा आटकेस दोन तीन महिने आहे इचा कोण्ही वालीसदार नाही खडाचा पैका न मिळे बटकीची पोर गैरराहा जाहाली घास्तव पाट कोणी लाविना येरवी सोडावी तर बदकर्म करीत फिरेल व ती बटकीपणास राजी सबब भिवी माार बटीक कस उमर वर्षे तीस रंग निमे गोरा इचे किमतीचे रुाो ५० पनास तुम्हापासून घेऊन तुमचे स्वाधीन केली आसे तरी बटीकपणाचे कामकाज घेऊन ठेवणे कालकला इचा कोण्ही वालीसदार आला तर आपले रुाा घेऊन चोत्र्याचे रुजूवातीने स्वाधीन करणे जाणिजे छ ८ रमजान मोर्तबसुद

फौजेच्या जाण्यानें नुकसान

ले. १७ (१८१) श्री { श. १७१० ज्येष्ठ शु. १० इ. १७८८ जून १३ }

यादी पायेमाली मौजे कुरकुंब ताा पाटस प्रां पुणे सुाा तिसा समानीन मया व आलफ सन ११९८

१३५॥ भोसले याचे स्वारी बद्दल खर्च
२९ नागपुराहून आलेगांवावर मुकाम जाला सबब
१४ कडबा खरेदी करून दिल्हा गुा केरो
धवडा पुले २०००
१२ हरभरे केली ८३ दर ८।॰
१ भेटी
२ संताजी ना। जासूद
२९

१२॥ देवराहून तोफखाना व बुनगे घेऊन नागपुरास
जातां मुकाम जाला
३ ताकीददार आसामी २
२ छकडेवाले
२ जासूद
१ बिनीवाले भेट
२ दरोगा यास दिल्हे
१॥ बाणदार
१ ढलाईत
१२॥

३१ पुण्याहून नागपुरास जातेसमई मुकाम दौड
१६ कडबा पुले २००० यौ
६॥। ताकीददार आ। ५
१ ढलाईत
१ बिनीवाले
१ जासूद
२ बिगारीच्या डोल्या तीस आल्या सबब
१॥ छकडेवाले
॰॥।॰ बाणदार
१ दऊत ल्याहावयास नेली त्याजबद्दल
ज्याची दऊत त्यास घेऊन दिल्ही
३१

३३ बिगारीस बैल दोन नेले ते माघारे देई-
नात त्याचा पैका चौघाचे गुाने खडला
परंतु पैका द्यावयाचा आहे

२० नरसिंगराव सितोळे १
१३ खड माळी १
३३ २

३० कडवल डागू झगडा याचे कापून येक विघा नेले तो गावातून जाऊ लागला तेव्हां चौघे मिळोन त्याचा खंड रुा

१३५॥

२१ रास्ते यांची फौज आली त्याचा मुकाम जाला
४ ताकीददार
१ भेट
१ बिनीवाले
१५ कडवल खड माळी याची १० पांड कापून नेली

२१

५ माहादाजीपंत बेहेरे याचा मुकाम जाला त्यास खर्च
१ भेटी
॥० भालदार
३॥ कडबा पुळे ५०० येकूण रुा

५

२७॥ माधवराव रामचंद्र याची स्वारी दौंडेस आली तेव्हां विा रा आनंदराव हवालदार
३ सडवाजी कड हुजरे रोखा घेऊन वाण्यावर व गावावर दंगा केला तेव्हां त्यास देणगी
३ सिदोजी कडू व सुभानजी वरातदार कामगारी दोन खडी बाजरी व माळवे व फांटी याचे कामास आले तेव्हा देणगी
३ रामोसीयाकरितां गावास मसाला केला सबब
२ मसाला
१ कबर खुलाई

३

६ पोंत्यास उसीर लागला याजकरितां गारदी
दोघे व ढलाईत दोघे आले तेव्हां
५ मसाला
१ कबर खुलाई
६
१ गणोजी चौभा निा हवालदार देणगी
११॥ गारदीं व ढलाईत असामी ४
९॥ पोटखर्च
२ पानुसुपारी
११॥
२७॥.

१० पातशहाचे हातीवाल्यानी होडी[1] कणसासुधा कृष्णा माली याची पांच पांढ कापून नेली दर पांडास रुो २ प्रमाणे करार केले ते द्यावयाचे आहेत

१९९
[2]तपसील
१०९ गावखर्ची खर्च पडलें
९० पायेमाली खर्च मजुरा निा भोसले १३५॥ पैकी
१९९ नवद रुा मजरा देणे

छ ८ रमजान तिसा

कर्जवसुलीची तहकुबी

ले. १८ (२६७) श्री {श. १७०६ चैत्र वद्य ६ / इ. १७८९ एप्रील २६}

(ले. १४ प्रमाणें पंतप्रधानांची मुद्रा)

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ताा मोकदम मौजे गराडे ताा करेपठार प्रांत

---

१ हुंडी नांवाचा जोंधळा.

२ या पुढील सर्व शेऱ्याचा मजकूर त्या वेळचा पुणें प्रांताचा सुभेदार जनार्दन आपाजी एरंडे याच्या हातचा आहे. वास्तविक सुभेदार नारो आपाजीचा मुलगा रामचंद्र नारायण; तो अल्पवयी असल्यानें त्याच्या तर्फेनें त्याचा जनक बाप जनार्दन आपाजी सुभेदारीचा कारभार कूलमुखत्यारीनें वहात असे. एरंडे नारो आपाजीचा भाचा.

सुर्ण सुा समान समानीन मया व अलफ विठोजी गरुड वा मौजे मार याणे हुजूर विदित केले कीं आपल्याकडे सावकाराचे कर्ज बहुत आहे त्याचे तगादे होतात साल मारी माहागाई यामुळे पेस्तर सोईसोईने निकाल करीन म्हणतो ते येकत नाहीत येविसी ताकीद जाली पाहिजे म्हणोन त्यास विठोजी मार नादार आहे याजकरितां याचे सावकार तगादा करितील त्याजला ताकीद करून तूर्त तगादा होऊ न देणे कर्जाचा निर्गम पेस्तर सोई सोईने करून देईल जाणिजे छ १९ रजब पैा हुजूर लेखन (आकार कोयरी)

सीमा

पत्र पाठवणीचा दर

ले. १९ (१०६) श्री {श. १७१६ [१७९४?]

शेवेसी कोंडो मल्हार कृतानेक सा नमस्कार विज्ञापना ता छ २९ मोहरमपर्यंत यथास्थित असे विशेष हैदराबादेहून डाकेबराबर रामलाल चिनीलाल याचे दुकानी लाखोटा आला दुकानदारानी आपले गुमास्ताबरोबर आपले वाड्यांत पाठविला लाखोट्यावर आठ आणे लिहिले त्याप्रो त्यास द्यावे तर दुकानदाराचे म्हणे दुकानचे च्यार आणे यो बारा आणे द्याल तर लाखोटा देऊ तेव्हा पारसी हारफ लाखोट्यावर लिहिले आहे तो राजश्री गोविंदराव तात्या याजकडून वाचविले त्यातील मायना या पत्राचे उतर व पुढे पत्रे पाठवाल ती युक्तीने बेमालूम पाठवावी म्हणून त्यावरून बारा आणे देऊन लाखोटा घेऊन पाठविला आहे राजश्री दौलतराव सिंदे याचे लस्करातून लाखोटा आला तोहि पाठविला आहे हैदराबादचे उतर लाखोटा करून आठ आणे इनाम लेहून पाठऊन द्यावा याप्रो दुकानदारानी सांगितले त्यास पारसी हर्फाचा मजकूर व त्यांचे लिहिण्यांत काय हे ध्यानात आणोन उतर येईलच शेवेसी श्रुत होय लोभाची वृधी असावी हे विज्ञापना

ग्रामदेवतांची शांती

ले. २० (२८६) श्री {श. १७२५ ज्येष्ठ शु. ९ इ. १८०३ मे २९

यादी येशवंतराव होळकर याच्या दंग्यामुळें गाव परागंदा जाला होता सा ग्राम देवताची शांती केली त्यास खर्च सुा सलास मयातैन व अलफ शके १७२५ रुधिरोद्गारी नाम संवत्छरे छ ७ सफर जेष्ठ शुा ९ शनवार

२१॥॰ ॥॰ खो जिनस

१४८ ॥ गला कैली

६ तां रा सा ८॥॰॥ दर ८८१॥–

६०= कणीक करावयासी गहू ०१।-।
दर ००२॥
१ दाल तुरी ०२॥-
१ कढी पीठ पिठीस वगैरे
१४०=
७॥-॥ वजन पो
५ तूप ००८ दर ००१॥९
१॥। गूल ०।१॥ दर ००७
।। हिंग जिरे मिरे वगैरे
०= गुलाल ००॥
०-॥ मिरे ०००९
०= साखर ००।
।। तेल ००१
७॥-॥
२१॥।।॥।
१० आंबे पिकले रसास सुमारी ३००० दर ३००
१८।-। देवताकडे वगैरे
३ श्रीबहीरव
२॥ लघुरुद्र ब्राह्मण आा ११ दर ।-
।। देवापुढे
३
३ श्रवटेस्वर
२॥ लघुरुद्र ब्राह्मण आा ११ दर ।-
।। देवापुढे
३
३ श्री संगमेश्वर
२॥ लघुरुद्र ब्राह्मण ११ दर । प्रा
।। देवापुढे
३
५। किरकोल देवता २१ दर देवास
(एका) दशनीस ब्राह्मण १ दर ।। प्रा
।। वो लक्ष्मणभट गुरुजी

	२	भोजन दक्षणा खुर्दा टके ७ दर ३॥
	·।ॆ	देवतापुढें दर ८।· प्रो
	१।=।·	मजुरी ब्राह्मण
	·॥·	आच्यारी
	·।·	पोलक्या
	८=।	देवास नैवद्य नेणार ४
	·।·	ब्राह्मण बोलावणार धोंडभट लोखंडे
	·।·	पाणका
५०८=	१।=।·	

सदरहू चिठी राघोबा म्हेत्रे याजवर छ ७ सफरी दिल्ही

कळमकर मुलीची चौकशी

ले. २१ (१५८) श्रीराम { श. १७३१ मार्ग. शु. ९ / इ. १८०९ डिसें ३१

पौ छ २५ जिलकाद

सुा असेर मयातैन

अज स्वारी राजश्री मनोहरगीर सुभेदार किले पुरंदर व वज्रगड ताो मोकदम मौजे आबोडी काो सासवड सुा अशर मयातैन व आलफ तुमचे गावात कोणी कळमकर आहे की काये असल्यास त्याची पोरगी मौजे पानवडी ताा निरथडी येथे लोल्याचे घरी दिल्ही होती तिचे लमास वर्षे किती जाहली व कोणाची लेक व कोणा लोल्याची घरी दिल्ही व मुलीचे नांव काये व हली तिचे कोण गावात आहेत त्याची नावे काये त्या मुलीचा आईबाप आहे किवा मेला व चुलते कोण आहेत याची गावात चौकसी करून तपसीलवार लेहून पाठवणे जाणिजे छ २४ जिलकाद मोर्तबसुद

मोर्तब
सुद

दिवे घाटांत पाण्याची सोय

ले. २२ (२१४) श्री { श. १७३९ चैत्र शु. १ / इ. १८१७ मार्च १८

यादी पोवई मौजे दिवे काा सासवड येथील घाटावर सालाबाद ब्राह्मण दोला व शुद्र दोला पाणी इा चैत्र शुध्द १ ताा मृग अखेर पावेतो अल्यागेल्या मनुष्यास याके

सुा सबा अशर मयातैन व अलफ मख्ता गुा येलगुडा तैलंग लंकावारु रुपये २१
[1]येकवीस सुा मख्ता पवईचे कामाचा करार
[सुमार एक ओळ तेलगू मजकूर]
छ २९ राखर सबा

पत्रें पुरीं करावयाचे पांच नमुने

ले. २३ (७४) श्री { इ. १८१७ ?

* पुरते करावयाचा मसुदा
दोन गावच्या दोन सनदावर
जाणिजे छ २१ राखर मोर्तब सुद
बार
कुंजीर याचे नावे खत आहे त्याजवर
बहुत काये लिहिणे हे विनंती
आकरा कलमाचे यादीवर
सदरहू सदरी लिहीले आहे येणे प्रा करार
तारीख छ २१ राखर सन मजकूर मुा सासवड
येकूण पाच बंद रास
पाच कलमाचे यादी
सदरहू सदरी लिहीले आहे येणे प्रा करार
तारीख २१ राखर सन मजकूर मुा सासवड
तीन बंद रास

दिवे घाटांत पाणी पिण्याची सोय

ले. २४ (१४) श्री { श. १७४३ चैत्र शु. १
इ. १८२१ एप्रिल ३

यादी दिव्याचे घाटावर पोवईचे कामावर नारायेण फुलवाला यास ठेविला सुा इसने अशरीन मयातैन व अलफ ब्राह्मण व शूद्र वगैरे वाटसरू येतील जातील त्यास

---

[1] या पुढील मजकूर त्र्यंबकराव महिपत पुरंदरे यांच्या हातचा

* हा ' पुरते करावयाचा मसुदा ' त्रिंबकराव महिपत उर्फ नाना पुरंदरे यांच्या हातचा आहे.

पाणी पाजीत जावे. पाण्याचा बोभाट आल्यास रोजमुरा मागणार नाहीं. या प्रमाणे करार करून घेऊन दरमहा रोजमुरा द्यावयाचा ठराव केला ते ७ रु

सदरहु कामाचा बोभाट न पडावेसे करावे आणि (?) चैत्र शु. १ प्रतिपदेपासून दरमहा सात रु. करार

मठाधिपतीस ब्राह्मण संतर्पणास मदत करा

ले. २५ (१५) श्री { श. १७३६ वैशाख वद्य १०
{ इ. १८१४ मे १४

नकल

देशावर देशांतर ब्राह्मण मंडळी नमस्कार विनंति विशेष मठाधिपति कोल्हापूर तपोनिधि स्वामी पर पाराये आले. तर स्वामीचे दर्शण होताच बहुत सन्मान करून पत्र व दोन व अणी गांव गाव श्वपहस्ते पर हस्ते प्रयेत्न करून स्वामीस भीक्षा द्यावी स्वामीस ब्राह्मण संतरपण कर्तव्य आहे. तरी पत्राचा अपमान सहसा न करावा. शंक्त(ल)गी (?) सारे भीक्षा आनकूल होईल ती करीत जावी स्वामीस गुरवबिगारी काढून पुढील गांवास रवाना करून देत जावे कमावीसदार देशमुख देशपांडे व पा। कुलकर्णी सर्वत्र लाहाण थोरानी वंद्यावे पत्रा प्रो मठपटी व बगारी व एक सिपाई देऊन मार्गस्त करीत जावे. फार काय लिहीणे.

शके १७३६ भाव नाम सवछरे वैशाख वद्य १० शेनवार (पत्राचे पाठिमागे)

दिवेघाटांत पाण्याची सोय

ले. २६ (२२०) श्री { श. १७४३
{ इ. १८२१

विज्ञापना ऐसी जे दिव्याचे घाटात पोहई सालाबाद घालावयाची त्यास वसंतकाळ हाली साल मजकुरी मृग वैशाख मासी निघतो याजकरिता पोहेचा बंदोबस्त चांगला आसावा मुख्य गोष्ट मांडव कूड सावलीचा चांगला बळकट आसावा धर्मपोई सावली गार आसावी शेजारी चवकी रामोशाची त्या चवकीस आंतर लांब दाहा हाताचे आसावे भ्रष्टाकार सावली देखील पडू नये याजकरिता रामोसी ती चवकी सोडीत आसल्यास उतम त्यानी न सोडल्यास उतरेचे बाजूस झाडाखाली झाडाची सावली व मांडवाची सावली दोनी सावल्या व मांडव कूड चांगला घालून पोहे घालावी सारोष आसा बंदोबस्त करावयास कोणी शाहाणा पाठऊन हा बंदोबस्त करावा रामोसी यास साफ ताकीद करावी की तुम्ही उतरेकडील बाजूस राहावे आथवा वीस हात लांब राहावे

आमची सालाबाद जागा श्रीविठोबाच्या मोर्ती याजवर सावली करून पोहे घालीत आलो तुमची चवकी येथे आमचे उपयोगी नाही आसे सांगून निखालस ताकीद मामलेदाराकडून करऊन ती चवकी सोडावी आसे करवावे हे न जाल्यास उतरेकडील बाजूस धर्मपोहे घालावी ब्राह्मण नवा ठेवणे जाल्यास पांडू खटपट्या आला आहे यास ठेवावा दुसरा ठेविला असल्यास रोजमुरा कमजास्त पाहून ज्यास्त ठेवणे असेल त्यास ठेवावा सरोंष सदरी विनंती लिाप्रो बदोबस्त जाला पाहिजे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

दुष्काळांतील दैन्यावस्था

ले. २७ (३६) श्री

चिरजीव राजश्री केशेवराव यासी प्रती खडो त्रिंबक आसिर्वाद उपरी येथील क्षाा ताा भाद्रपद वाो ७ मुाा मौजे माार येथाम्थित आसो विशेष इकडे करेपटार पुणें प्रांती पाऊस पाणी आगदी नाहीं पाऊ गेला दोन दोन पेरे होऊन उधळून गेले त्यास जेल-शोष पड [ला] पाणी प्यावयास देखील मिलत नाहीं आणि आपल्या आडास पाणी देखील नाहीं पाणी नदीहून आणावे लागते ढेळास देखील पाणी नाहीं वारंवार खाणावा लागतो ही दशा जाली आहे व गुरांचा संहार जाला आहे गुरू कोठे नाहीं तशा+++ (आ) पल्या घरीची गुरे दरोबस्त मेली ... ... बियानी काय करावे ही आवस्था जाली आहे व मौजे भिवरी येथील साल साल माारी आपले आले आहे त्यास पाऊसा-मुळें आगदी गर्दी जालीच आहे त्यात सरकारातून जाहीरनामा येऊन सालांची जप्ती जाली आहे त्याचा जाहीरनाम्याची नकल आपल्याकडे पाठविली आहे व जोसीपणा सुधां सिपाई यांनी जप्ती करून आडथला केला त्यास सरकारात आबाजी नारायेण मामलेदार याजकडे जाऊन जोसपणाची सोडचिठी मात्र आणली तिची नकलहि पाठ-विली आहे ही वेवस्ता भिवरीची जाली त्यात महर्गता विशेष जाली आहे येणे प्रो बिाा

++++++	॰॰= बाजरी कैली
॰॰ १॥। गहू कैली	॰॰= ताा कैली
॰॰ १॥ दाल तुरी कैली	॰॰१॥। हरभरे कैली
++ तूप वजन	॰॰=॥। तेल वजन
० हुलगे अगदी मिलत नाही बीबूड	॰॰= पावटे कैली
॰॰= मूग कैली	॰॰३॥। गूल वजन
० दूध आगदी नाही	॰॰=॥। साकर वजन
॰॰३ मिर्च्या वजन	॰।= मीठ कैली

येणे प्रो धारण आहे तेव्हां या महर्गतेत वाचणे कठीणच आहे पैसा कोणापासी नाही **गावकरी यानी कर्ज काढून** गावास **पाचसे रुपये** गावास मात्र दिल्हे त्यात आपल्यास वाटणी **दोन** रुो मात्र दिल्हे ते घेऊन किती दिवस खावे याप्रो आहे पीत्रपाठ चांला आहे **पित्रे देखील कोणी घालीत** नाही घरचा + + + + आहे खर्चास नाहीं म्हणऊन .... लिहीले आले होते की मनुष मजकडे पाठऊ नये व तुम्हींहि येऊ नये याप्रो कागद येऊन मनुष न पाठवावा तर मरावे परंतु मुले लकरे आहेत त्यापक्षी तुमचे आर्जव करणे प्राप्त मी येकलाच आसतो तरी तुम्हास काळजी कशास आसावी व मीहि लिहीतो ना परंतु महर्गता याप्रो उपाय चालेना व चिरंजिवास आशाढपाटी आली पुढे श्रावणपाटी आली पुढे श्रावणपाटी पाठवावी लागती त्यास आयाप ठिकाण श्रावणपाटीस नाही रुो दादा सरनाईक यानी नित्या म्हणावे की आमची श्रावणपाटी कधी पाठवितात + + श्रावणपाटीस दाहा बारा रुो लागतात .... आपल्या पोटाची चिंता लागली (अपूर्ण)

गोत भोजनाची तयारी

ले. २८ (१२७) श्री {

राजश्री राणोजी व बजाजी देशमूख रुष्णाजी पाटील का सासवड गोसावी यांसि

द अखंडित लक्ष्मी आलरुत राजमान्य श्रो देशमूख मोकदम देशपांडे का मजकूर राम राम आनुक्रमे असीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष राजश्री स्वामीनी रुपये २५०० आडीच हाजार करार केले आणि गोतपतीची पत्री [आज्ञा] दिल्ही त्यास आम्हीहि लौकरच येतो तुम्ही काही चिंता न करणे गोत दोन हजार जमा होईल तरी तुम्ही दो हाजाराची सामोग्री करणे ये गोष्टीविसी आतर न करणे माहारास ताकीद करून लाकडे आणवणे दर घरास कणीक दोन मणाची करणे, ये गोष्टीस आंतर येकदर न करणे खाटकास सांगोन खसी बकरे पंचवीस आणविणें आम्हाकडे कागदपत्र काही न पाठवणे तुम्ही गोताचे सामान करणे बहुत काये लिहीणे लोक कोणी गावचे दिलग्र होतील तरी त्याची समजावीस करणे हे विनंति

हे॥ चिरंजीव राजश्री खंडोजीस प्रती राहूजी पाटील आसिर्वाद आम्हीहि येका दो दिवसानी येतो तम्हा काहा चिंता न करणे हा आसिर्वाद

पंचांगाची मागणी, पाद्याचें औषध

ले. २९ (१७०) श्री {

वडिलाचे शेवेशी विनंति आपण पंच्यांग पाठविले ते काही कामाचे नाहीं आगदी (च न) + + + कले तीथ वार नक्षत्र तेरीख काहीच (क ल) + + त नाही चैत्र वद्य आमवास्या त्या दिवसी शुक्रवार लिहिला आणि वैशाख शुद्ध प्रतिपदेस शुक्रवार लिहिला तेव्हा येक वार दोन दिवस कोणी लिहीतो की काये काहीं उपयोगी नाहीं आम्हास तीथवार नक्षत्र तेरीख समजत नाहीं याकरिता चांगले पंचांग बारा महिने लिहऊन या दो रोजात पोचे ऐसे करावे उपाध्ये आहेत ते आपले मात्र कार्यास जपतात पंच्यांग पाहिजे ते चागले लेहून द्यावयाचे दैवास येईना सारे सुखाचे आहेत पंच्यागांचे लिहीणावल पावला चवल पडला तरी या (वा) + + + पंच्यांग पाठऊन द्यावे येजमान स्वामींचे पोटात दुखते तीं तऱ्हा काही लिहिता पूर्वत नाही अन्न खात नाही त्यास काही क्लेश दाने करावी यैसे मनात आहे आणि आपणहि पहिले पासुन म्हणत आले तेव्हा ब्राह्मणाचे आनकूल जाहाले नाही त्यास + + नानाचे रासीस वाईट ग्रह कोण कोणते + + + कोणत्या ग्रहाचे कोणते दान द्यावया (चे) किती ब्राह्मण पाहिजेत त्याचीं दक्षणा कोणत्या दानास किती हे समजोन त्याची बेगमी करून पाठवावी आधेल्या पावल्या आम्हाजवल आहेत ब्राह्मण दानाचे किती ते समजोन आम्हास कलवावे म्हणजे ब्राह्मणाचे परमानगीचे रावोपंत याजवल + (बोलो) के आपणंहि त्यास सागावे रा। कुशाबा नाना यास म्हणावे की येजमानाची प्रकृ (त) (आ) गदींच बिघडली जाऊन समाचार + + (घेई)इनास काये आरभिले आहे यैसे सागावे आणि येजमानाचे भेटीस येई यैसे करावे आले तरी उतम आहे वडिलाची प्रकृत फारच बिघडली शरीर रोड पडले अन्न खात नाहीं घशातील फोड बरे होत नाही हे ऐकोन चितात स्वस्तता वाटत नाहीं येजमान घोर करितात आम्हाजवल बोलतात त्यास सान्या सौसारिकाचा घोर खर्चास नाही येजमानाचे प्रकृतीचे ठीक नाही सर्व गोष्टी(चे) संकट वडिली कालजी घेतली यात सवशय नाहीं त्यास विवेकाच्या गोष्टी सागणार बहुत आसतात परतु ज्याची कालजी तो + + (लि) हितो थोरली गोष्ट परतु आपण घोर करू नये ज्याचे जे दैवी आसेल ते घडेल ईश्वरे इतके करावे की शरीरे जतन करावी येवडे आसिले म्हणजे बारीक मोठे वस्त्र अन्न मिलेल तसे खावयास येईल आपण कालजी न करावी तोडास **औषध पादरी** वैद्यापासून घ्यावे आजपर्यंत जसी घेतली तसी त्यात पादरीचे औशध + + + घ्यावेच येवडी गोष्ट आमची ऐकावी + + चा रोजमुरा चैत्र मासाचा देणेची (नि) कड आहे चैत्रमासचा सिल्कचंद जमाखर्चा(चे) बंद १३ तेरा पा। आहेत पाहोन सासवडास रवाना करावा + मेचे येकसे चालीस कामथडी

बाबत रुो त्याचा तपसील आसेल तसा लावावा लवण शाकेस आबे हाजार पाठवावे हलद मीठ सर्व तर्तूद करून ठेविली आहे हे विज्ञापना कादे दीड दोन मण किंवा मण सासवडाहून आणवावे किरकोल लागतात हे विज्ञाप्ती

गुरवास फौजेपासून तसदी

ले. ३० (१७४) श्री { ~ बाजीराव बल्लाळ कारकीर्द

श्रीमंत राजश्री आपासाहेबांचे सेवेसी

सेवक बकाजी भोसले मौजे सिरगाव साा दडवत सेवेसी विज्ञापना येसी जे मौजे चेवनेश्वर श्रीई+श्वराची जागा येथील हकीकत पूर्वी सेवकाने साहेबास विदित केली साहेबी अभिमान धरून देवब्राह्मण श्वस्त राहावे येसे केले परस्तुत मौजे मजकुरी च्यार गुरवाची घर आहेत त्यास साहेबांचे लस्करचे कबाडी फऊज बहुत तस्ती देतात येणे करून गुरव पलावयास तजावजा जाले तेथील गुरवास काही आणखी मील [कत] नाही मात्र गवत काडी जतन करून च्यार गाई बालगोन श्री ची सेवा करून आहेत त्यास हा उपसग्र जाला म्हणिजे त्याची जगणूक होता दिसत नाही साहेबांच्या आश्रीयावरी अजीपर्यंत धीर धरून होती साहेबाचे कुरण कड्याखाली होते त्याजमुले त्यास उपसग्र नव्हता आता कुरणात धुंद जाले तैसेच त्यास उप (प) सग्र लागला गुरवाच्या परसातील गवते आपल्या घराची होती ते नेऊ लागले मग त्यासी त्याणी काय करावे साहेबी ये गोष्टीची ताकीद केली तरी श्री ईश्वरावरी (श्री पुरवणी श्रीमंत राजश्री आपासाहेबांचे सेवेसी साा दंडवत विज्ञापना येसीजे) उदक घालोन गरिबे राहातील नाहीतरी त्याच्या परसातील गवते गेलियावरी श्रीस उदक पडणार नाही गुरवास काही मिल [कत] नाही मात्र च्यार गुरे वासरे बालगून श्री पासी आहेत त्याच्या परसातील गवत गेलियावरी श्री ची जागा उद्वस होईल साहेब धणी आहेत श्री चेवनेश्वरास आपले अभयपत्र पाठविले पाहिजे साहेबाच्या लस्करच्या लोकानी फारसा उपसग्र दिल्हा आहे म्हणून सेवकाने साहेब चरणासी विनति लिहीली सेवेसी श्रुत हे विज्ञापना

महादेवाच्या देवळाचा जीर्णोद्धार

ले. ३१ (१८०) श्री पांडुरंग {

श्री माहादेव

* साहेबाचे सेवेसी मो मौजे हिंगणी गाडा ता पाटस प्रा पुणे विज्ञापना येसी जे मौजे मारी श्रीयाचे देऊळ जुने होते तें नवे देऊळ बाधले श्रीची साळुका व नंदी भंगला होता तोहि नवा केला त्यास देवळास व साळुकेस व नदीस आवघे मिळोन चाळीस रु लागले त्यास साहेब कृपा करून श्रीच्या खर्चास सरकारातून देवावयासी आज्ञा केली पाहिजे हे विज्ञापना

रु

४०

† पौ मजुरा रु २० वीस देऊन जमाबदीत वजा करावे आऊतकाठीस बाभला दापोडीचे कुरणपौ पांच द्यावा छ ११ रावल सन सीत

नवीन मठाधिपत्य : बंदोबस्त

ले. ३२ (१९८) श्री {

शेवेसी देवशेट माहादसेट वीरकर सेट्ये विज्ञापना ऐसीजे आमचे गुरु महंत आया जंगम मठ वाई येथे आहेत त्यास तेथें मठात पट होतो त्याविसी कोणी हाली हारामी काजिया करून आडथळा करील म्हणून ताकीदपत्रे द्यावयाची आज्ञा

१ अनंदराव रास्ते यासी पत्र कीं महत आयाचा पट होतो त्यास तेथे कोणी आडथला करील त्यास ताकीद करून आटकाव न होय ते करणे म्हणून पत्र येक

१ राजश्री हैबतराव भवानी शंकर यास पत्र सदरहू आन्वये येक

२

वडील भाऊ मठाधिपत्य करीत होता त्यास विरक्ती जाली सा धाकट्या भावास आधिपत्य देऊन आपण मोकला होणार त्यास कोणी आडथल्यास आला तरी यांची परंपरा याप्रो यांप्रमाणे चालते जंगमात चाल्या प्रा आहे म्हणऊन यानी विदित केले येशास चाली प्रा हे करिता आणि दुसरा गैरवाजवी दिकतीस आल्यास ताकीद करावी येविसी दोन पत्रे द्यावी

छ २४ जमादिलोवल खमस आशाढ

---

* हा गावकऱ्याचा अर्ज † अर्जावर सुभेदाराचा शेरा.

१ या पुढील मजकूर नारो आपाजी यांच्या हातचा आहे.

गोसाव्याची यादी

ले. ३३ (२०८) श्री { उत्तरपानिपतकाल

यादी पत्रांत गोसावी आहेत

	१ जागेश्वर महंत सिष कल्याणगीर
मयेत	१ भगवानपुरी
	१ सिवपुरी, खासा आहेत
मयेत	१ सुरजपुरी
	१ बेणीपुरी सिष सिध्धपुरी
	१ भवानपुरी सिष बुधपुरी
उद्मास गेले	१ रामचंद्रपुरी
	१ दलेलपुरी
मयेत	१ कासी पुरी
	१ रायेपुरी खुद आहेत
देशावर	१ इछापुरी
देशावर	१ पिंताबर पुरी सातारा
मयेत	१ गुलाब पुरी
	१३

चोरीचा माग

ले. ३४ (२४७) श्री { उत्तरपानिपत काल ?

सेवेसी विज्ञापना मौजे खांबगाव येथील बैल दोन चोरीस गेले आहेत त्याचा माग मौजे मजकूरचे गांवकरी व बेरड याणी मौजे येवत येथील वेसीआंत नेऊन घातला त्यास येवतकरानी आपले रामोसी आणून माग पुढे काढून अथवा बैलाचा पता लावावा आसी रीत सर्वां ठिकाणी चालत आहे त्याप्रो येवतकराचे सोईस पडेना रेटाई करितात त्याजवरून आपाजी पत नागवडे याजसमागमे पत्र पाठविले त्यास आपले पत्र आले तेथे आज्ञा की येवतकरास सरकारांतूनहि समक्ष सांगितले आहे आणि तुम्ही आपला प्यादा येक व रामोसी येक येवतांत बसऊन माग त्याणी आपला रामोसी आणून पुढे काढून दिल्हा तरी उतम नाही तरी आपला बैलाचा निकाल येवतकरापासोन

करून घेणे म्हणून त्याजवरून दोन वेल प्यादा व खांबगावकर रामोसी येवतास पाठविला परंतु येवतकर सांप्रत गांवांत आहेत ते म्हणतात कीं आमचे पाटील व कारभारी पुणियास गेले आहेत ते आद्याप आले नाहीत त्यास येवतकर भोंवरगांवांत दंडेल लबाड आहेत ते रीतीने सांगितल्यास येकतील हा विचार घडावयाचा नाहीं यास्तव मुदाम खंडोजी चव्हाण पाा आहे तरी बैलाच्या जावसाला बदल येवतकरास सरकारची आथवा हावलदाराची चिंठी आणून पाठविली पोा म्हणजे येवतास चिठी व स्वार चौघे पाठऊन जे बैल गेले आहेत तेच आणवितो त्याजला पुर्तेपणे नेट बसविल्याखेरीज गोष्ट घडावयाची नाहीं खांबगावकर रामोसी खोटा माग काढावयाचा नाहीं तो म्हणतो कीं हा माग चौघा रामोशाच्या मुखे खरा करून देईन सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

दरवेशी वतन

ले. ३५ (२१९) श्री नकल { श. १६४४ आश्विन वद्य १४ इ. १७२२ आक्टो. २७

आज्ञापत्र सुभा प्रात पुणे ताा मोकदम य न्ही देहाये

किता	किता
१ ताा हवेली	१ ताा कडेपठार
१ ताा साढस	१ ताा निरथडी
१ ताा पाटस	१ ताा कर्यात मावल

येकूण तर्फ साहा सुाा सलास असेरीन व अलफ शेख रुस्तुम वाा शेख दावल व शेख इमाम वाा येऊन विदित केले की तर्फनि माार चे गावगना वाग आसवले आपण घेऊन जातो त्यास दर गावी दर घरास दरसाल दोन पैसे प्रमाणे भिकणे व वोझेयास हजीरी बेगारी व रात्री चौकी या प्रो वतनाची चाल चालत आली आलीकडे गावगना दिकत करितात येविसी ताकीदपत्र दिले पाहिजे व प णोन (म्हणोन) त्याजवरून सेख रुस्तुम दरवेसी याजवल मागील सरकारची ताकीदपत्रे आहेत ती पाहोन हे आज्ञापत्र सादर केले आसे तर पूर्वीपासून चालत आले आसेल त्याप्रो दर गावी दर घरास दर साल दोन पैसे प्रो देत जाणे व पोटास भाकरी व वझ्यास हजरी व चौकी पाहारा करीत जाणे फिरस्ते दरवेसी कोन्ही आल्यास त्यास भीक न देणे जाणिजे छ २७ मोहरम मोर्तबसुद

दरवेशी वतन (पुढें चालू)

ले. ३६ (२३७) श्री नक्कल { इ. स. १७२२

विनति मुकदमानी देहाये ता। तरफ (सिका)
हावेली ता। साडस ता। कडेपठार ता। निरथडी
१ १ १ १
ता। पाटस ता। किरयात मावल
१ १

यासी सिदोजी नरसिगराव मितोले देशमूख प्रात पुने सन हाजार ११ — ल्याहावया कारणे जे सेख इमाम वलद फकीर महमद सेख दरवसी वाघवाले व आसवल-वाले गावगना हिडतील त्यास नकल्या दाखवितील त्यास मना न करणे दुसरा कोनी येईल त्यास येऊ न देण जानिजे दर घरास च्यार पैसे देत जाणे दरसाल दुसरा कोन येईल तर त्यास न देणे जाणिजे छ ९ माहे रजब

सुतार-लोहार वतन : गाव सभेची साक्ष

ले. ३७ (२९७) श्री { श. १६४६ कार्तिक वद्य ९
नकल { इ. १७२४ आक्टो. २९

राजश्री देशमूख व देशपांडिये का। सासवड गोसावी यासी

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रो मोकदम व समस्थ दाहीजण मौजे खलद का। मार सुहूर सन खमस आसरीन मया आलफ मो मजकूरचे लोहारपणाच्या वतनाबद्दल होनाजी लोहार व रामजी सुतार यामधे भाडण आहे तेयाबदल साहेबापासी भाडत आले साहेबी जमान राजीनामे तकरीर लेहून मो। मजकूरच्या श्रीच्या देवलात घालून समस्थ दाहीजण व बारा बलुते घालून ते सत्य सागतील ते लेहून पाठवणे म्हणून

आज्ञा केली आज्ञेवरून समाकूल पाढरी व थलवाईक कुणबी व बारा बलुने जमा करून श्री च्या देवलात घालून गळा माल घालून सत्य स्मरोन सागितले बिा

बाो तुलाजी बीन तुकोजी रासकर मेहतरे माो मजकूर उमर वरशे ६१ आसामी १

माहादजी बीन सभू माळी रासकर उमर वरशे ८० आसामी १ गुठा संताजी बिन माहादजी रासकर उमर वरशे ३० आसामी १

बाो मावजी कातबन्या बिा कान्होजी उमर वरशे ४५ आसामी १

मानाजी बिा येसाजी न्हावी उमर वरशे ५५ आा १

नाईकजी बीन फिरगोजी न्हावी उमर वरशे ४५ आा १

बालोजी बीन तान्हाजी परीट उमर वरशे आसामी १

गोदजी बीन बोपाजी उमर वरशे ६० व वाघोजी बीन मलकोजी चाभार उमर वरशे ४० आसामी २

आबनाक बीन येसनाक माग उमर वरशे ६० आसामी १

बाो फिरगोजी बीन पदाजी रासकर उमर वरशे सुमार ७० आसामी १

बालोजी बीन रणोजी रासकर उमर वरशे ४० योा आा १

तुलासी बिा रतन माळी फुले उमर वरशे ६१ येकून आसामी १

बाो आनंतभट बिा त्रिंबकभट जोतीशी १.

मोराजी बिा तुकोजी गुरव उमर वरशे सुभार २५ योा आसामी १

जावजी बिा विठोजी कुंभार उमर वरशे ६५ येकून आसामी १

बावजी बिा केसावा नाईक पोतदार उमर वरशे ४० योा आसामी १

कोंडाजी बिा चांदखान मुलाणा उमर वरशे सुमार ४५ योा आा १


धावनाक बिा सखनाक उमर वरशे ५० व भीकनाकबिा नावनाक उमर वरशे ५० संतनाक बिा हसनाक उमर वरशे ६० योा आसामी ३

येणेप्राो मिळोन जमा करून श्रीच्या देवलात माल बेलभंडार घालून इमान घालून मग त्यानी माल घेऊन सत्य स्मरोन सागितले की सुतारपण व लोहारपण पुरातन सुताराचे आहे हे खरे लोहारपण वतन आलाहिदा नाही यामधे साहेब धणी आहेत छ २२ सफर पत्री वली २३ तेवीस रास बहुत काये लिहिणे हे विनंति बाजी गोर्पाजकर दिा मोकासी रामजी जखताप खंडनाक नाईकवाडी काा सासवड याच्या विद्यमाने देवलात घातले आसेत हे विनंति आसल खडनाकापासी दिल्हे अेक कागद १ मोघम देशमूख व देशपाडियासी दिल्हा आसे

पांढरीच्या चाकारीसाठीं वेतन

ले. ३८ (२४१) श्री {श. १६५१ आश्विन शु. १
नकल {इ. १७२९ सप्टें. १२

श्रीसके १६५१ सौम्यनाम संवछरे आस्विन सु॥ १ ते दिवसी राजश्री देशमुख व मोकदम देशपाडिये का। सासवड यासि खडोजी बीन गणोजी बगाडे गणोजी बिन खडोजी बगाडे मेहेतरे व जिवाजी बिन बहिरजी व मारजी बिन नामाजी बगाडे पेठ बहिरवपुरा का। मा।र सुहू सन सलासीन मया आलफ लेहावया कारणे ऐसेजे तुम्ही पाढरीची चाकरी [करि] ता यामुले तुम्हास दर दुकानास चोली येक दर माहे देऊन यासी आतइ करू तर श्री बहिरवाची शफत आसे आपल्या पूर्वजाची आण आसे यो १७ हे लिहिले सही

निा  (कात्री)

बि॥ भैराल गोमाजी कुकर्णी व देशकुरकर्णी का। मा।र

माळी व माळी मेहत्रे अधिकार

ले. ३९ (२६१) श्री {श. १६५२ ज्येष्ठ शु. १४
{इ. १७३० जून ३

राजश्री बहीर माली मेहत्रे का। सासवड गोसावी यासि

•॥ द अखडित लक्षमी आलकृत राजमान्ये श्रो। कोबाजी माली व बहीरजी माली पाढरे का। सासवड सु॥ ईहीदे सलासीन मया आलफ कारणे कागद लेहोन दिल्हा यैसाजे आपण पिपल्यामधे मुडावल व फुले पत्री व बाजी पाला कोणाचे घरी देऊ तर आपण दिवाणचे गुन्हेगार जे वेलेस आपण फुले घातली होतील म्हणजे आपणास मल्यातून दूर करणे हे लिहिले सही गोताचे आन्याई हा कागद लिहिला सही छ २७ जिलकाद

बि॥ अताजी गणेश कुलकर्णी मौजे मा।

गोही

सखावा नाईक १	विठाबा नाईक १
कुसाजी बिन दस माहाले का। सासवड १	सोमाजी पाटील वडधे मौजे कोढीत १

भाऊबंदकीचा वाद : विड्या टिळ्याचा हक्क कोणाचा

ले. ४० (१६) श्री {श. १६५४ चैत्र वद्य ६
इ. १७३२ एप्रील ५}

तालीक

माहाराज* राजश्री पंतप्रधान साहेबाचे सेवेसी

तकरीर कर्दे बाो धोंडो मल्हार व माहादाजी अंबाजी पुरंधर जोसी कुलकर्णी का। सासवड व देशकुलकर्णी कर्यात मजकूर सुहूर सन इसने सलासीन मया अलफ कारणे साहेबांचे +चंदेगीसी (सेवेसी) तकरीर लेहून दिल्ही येैसी जे आपले आजे त्रिंबकपंत व मैराल गोमाजी यांचे आजे विसाजीपंत हे उभयेता येकोदर सखे भाऊ त्यास त्रिंबकपंत वडील व विसाजीपंत धाकटे भाऊ येैसीयासी वतनास मानपान विडा टिला व तश्रीफ व नावदस्तक व रुमाल व सेव व तेल व सरूप व जोडा कांबला व करला व राबता माहार व होळीची पोळी व सण व सणाची मोळी व हकाच्या चोल्या व याखेरीज किरकोल वडीलपणाचे मान आपले आहेत येैसे असोन राघो लक्षमण व मैराल गोमाजी हे नहक घसधस करून साहेबांपासी फिर्याद आले त्यावरून साहेबी आपल्यास मसाला करून हुजूर बोलाऊन तकेरीरविसी अज्ञा केली तरी सदरहू लिहिल्याप्रमाणे आपले वडील-पणाचे हक मान आहेत याखेरीज वतनसमधे उत्पन व हकलाजिमा असेल तो भाऊ-पणाप्रमाणें खाऊन सुखरूप असों ते वडीलपणाच्या मानाविसी व हकासी राघो लक्षमण यासी मैराल गोमाजी यांसी लक्षमण रामचंद्र यांसी अगर अणीक कोणा भावासी संमध नाही याखेरीज जोषपणाचे व कुलकर्णाचे व देशकुलकर्णाचे उत्पन ते व हकलाजिमा व इनामाचे उत्पन होईल भाऊपणाप्रमाणे आमचे घरीहून वांटा न्यावा हे तकरीर लेहून दिल्ही सही छ २० सवाल

बाजारपेठेंत वंशपरंपरा वतन

ले. ४१ (३०७) + {श. १६५४ मार्ग. शु. ११
इ. १७३२ नोवें १७}

छ मा। अनाम देशमूख व मोकदम व देशपांडिये का। सासवड यासि बाजिराऊ बलाल प्रधान सुर सन सलास सलासैन मया अलफ आबाजी त्रिंबक पुरधरे देशपांडिये का। मजकूर याणि का। पुणे याचे मुकामी हुजूर येऊन विनती केली की का। सासवड येथें सोमवार बाजारामधे आपणास काही हक करून दिल्हा पाहिजे त्यावरून मनास आणून तुम्हावर कृपाळू होऊन बाजार मजकुरी हक करून दिल्हा बीता।

* ह्या शब्दावरच सेवेसी हें लिहिण्याचा यत्न केला आहे

वाणीयापासून दर दुकानास सुपारी कलम १
ऊस दर दुकानास ऐवज माफीक घ्यावा कलम १
दाणीयास फसकी व गोणी मोट व पाटी पाहून घ्यावे कलम १
केळे व बोर ऐवज पाहोन घ्यावी कलम १
मालवे सेव दर पाटीस व मोटेस कलम १
बोचील सोडे कलम १
मणेराच्या व काफराच्या दुकानास सुई दाभण व नाडा कलम १
खाटीक मास कलम १
मीठ फसकी व तादूल फसकी कलम १

येणे प्रमाणे नव कलमे करार करून दिल्ही आहेत तरी याचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने हक चालवणे जाणिजे छ ९ जाखर

पंचाचे न्यायास मान्यता

ले. ४२ (३९) श्री { श. १६५७ ज्येष्ठ वद्य ७ / इ. १७३५ जून १ }

मान्यपत्र दामोदर भट्ट द्वितीय उपाध्ये येहिं लिहिलें किं बाळंभट्ट प्रथमोपाध्ये यांशि व आपणाशीं कायस्थकुळाचे वृत्तिमूळे कलह लागला त्याचे निर्णयाकरितां समस्त ग्रामस्थ वृत्तिमंत पाचारून राजश्री देशमूख यांचेसंनिध उभयथा येऊन आपआपलें वृत्त विदित केलें त्यावरून राजश्री प्रमुख समस्तानि विचारलें आमचे न्यायास उभयथा मान्य असाल तर मान्यपत्र लेहुन देणें त्यावरून आपण पंचाचे न्यायास मान्य देऊन हे मान्यपत्र लेहून दिधलें असें जो आमान्य होईल तो न्यायास खोटा व पंचाचा अन्यायी हें सत्य

शके १६५७ ज्येष्ठ व ७ रवौ स्वहस्ताक्षर

(सर्व पत्र बालबोधींत आहे) **महार-पाटील वाद**

ले. ४३ (१४०) श्री { श. १६६० भाद्र. शु. १२ / इ. १७३८ आगस्ट १६ }

द मा। अनाम देसमूख व देशपांडे का। सासवड [फ. भो. वाटोळा शिक्का] यांसि फतेसिंग भोसले सुहूरसन तिसां सलासीन मयां अलफ मौजे राक का। मजकूर येथील माहार मौजे मजकूरच्या पाटिलांसी सुरलीत वर्तणूक करीत नाही म्हणऊन हुजूर

विदित जाहाले तरी पाटील मजकुरास व माहारास आपणाकडे नेऊन याचा कजिया मनास आणून सुदामतप्रमाणे माहार पाटिलासी रुजू राहात ते गोस्टी करणे *जाणिजे *छ ११ जमादिलोवल *पा हुजूर

लेखना

बार

वधिमुद्रा

श्रीशिव शंभु
स्वामिनि शाहू भूपे
व पार्थिवोतंसः परि
णत चेतोवृत्तः फत्ते
सिंहस्य मुद्रेयं

महार पाटलाची समजूत

ले. ४४ (१५०) श्री { इ. १७३८ / श. १८६० }

राजश्री देशमुख व देशपांडे का। सासवड गोसावी **यांसि**

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो मल्हार तुकदेऊ पुरंदरे देशपांडिये का। मजकूर आसीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष मौजे राक का। मजकूर येथील पाटलासी मौजे मा।रचे महार सुदामत प्रमा।णे सुरलीत वर्तत नाहीं याकरितां कजिया लागला आहे म्हणून हे वर्तमान राजश्री फत्तेसिंग बाबाकडे आले त्यावरून त्यानी तुम्हास पत्र लिहिलें आहे तरी मौजे मा।रचे पाटील व माहार आपले जवल बोलाऊन आणून कारिना मनास आणून रास्ती निवडून सुदामतप्रमाणें माहार पाटलासी सुरलीतपणे वर्तत ती गोष्टी केली पाहिजे पाटलांची व माहारांची समजावीस करून वाटे लावणे माहारास+ ताकीद करून सुरलीतपणें वर्तत ते करणे जाणिजे छ ११ जमादिलौवल बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंति

---

* तिन्ही अक्षरें भिन्न.

\+ अक्षरा खाशाचे

जेवणाबद्दल कजिया : गोताचें मत मान्य

ले. ४५ (२९९) श्री { शक १६६० ज्येष्ठ वद्य ३०
नकल { इ. स. १७३८ जुन ६

दस्तक यो फिरंगोजी जुनरकर सिंपी रया वस्ती मौजे बेलसर कर्यांत सासवड सुा तिसा सलासीन मया अलफ कारणे कतबा लिहून दिल्हा ऐसा जे संताजी बिन पदाजी सुपेकर सिंपी मेहतरे मौजे मजकूर याचा व आपला जेवणाबदल कजिया जाला त्याबदल हर दोजण ठाणियास काा मजकुरास आलो वर्तमान जाहीर केलें त्यास काा मजकुरच्या गोताचे मते पूर्वी चालत होतें त्याप्रमाणें पुढें जेथें प्रयोजन होईल तेथें गोत ज्यास जैसे वर्तवील तैसे आपण वर्तो संताजी मेहतरे यांसी जेवणाबदल कजिया करणार नाही जर कजिया करूं तर दिवाणचे गुणेगार व गोताचे अंन्याई हा कतबा लिहून दिल्हा सही छ २८ सफर निशाणी कातर

बिा त्र्यंबक गोविंद पुरंदरे देशपांडे काा सासवड

साक्ष

हरजी कांबला काा मजकूर १	संडोजी बगाडे काा मजकूर १
मल्हारजी निरगुडे काा मजकूर १	मल्हारजी कोढीलकर काा मजकूर १
येमाजी बसला काा मजकूर १	संकराजी गोरठा काा मजकूर १

पाटिल-महार वाद

ले. ४६ (२९२) श्री { श. १६६० भाद्र. वद्य ३
नकल { इ. १७३८ आगस्ट २१

राजश्री देशमूख व देशपांडे काा सासवड गोसावी यासि

द अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्ये—स्नेो देशमूख व देसपांडे काा ललगूण बुध पांचगाऊ आसिरवाद व अनुकर्मे रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष राजश्री रघोजी रणनवरे पाटील मौजे राक काा मजकूर हे हुजूर गेले होते हुजूरुन हुकूम आला जे माहाली महालीच्या पाटिलाचे व माहारांचे दाखले घेऊन जाणे म्हणून हुकूम आम्हास आला तरी अमचे कसबां व माहलचे पाटिलांचे व महारांची बाबत बी तपसील

नांगरे पाटिलाचे खाली

माहार बाधले खोलेचा बारमाही अष्टोप्रहर राबता असावा कलम १

वरकड माहार असतील त्यास पाटिलाचे हुकूमाप्रमाणें उभी पांढरीची चाकरी करावी कलम १

माहारांची कलमें चालवावीं

१ हराटी जमीन खाऊन पाटिलाचेंथे राबावे कलम

१ माहारीक जमिन खाऊन दिवाणचे राबणूक करावी कलम

१ म्हेतरे माहारांचे गांडू गुडयाचे बाईते घ्यावे आठा माहाराखेरीज म्हेतरेचे कलम

१ पेवाचे तलबूड कलम

१ म्हाराचे बलुते कलम

१ याखेरीज माहार बावन हकाचे धणी म्हणून दुनिया बोलतात कलम १

६

याखेरीज पडझड पाढरीवरी होईल ते माहाराची कलम १

अटफला लवेचा माहार पाटील जे वेळेस मागतील ते द्यावे कलम १

सणांस मोलिया दर सणांस मोली १ आधी द्यावी मग पोटास मागावे कलम १

पाटील कुलकर्णी व चौगुले यांच्या घरच्या ढोरांचे चामडे ज्यांची त्यास द्यावी याखेरीज पांढरीची खोत मत्खसर कुलवाडयाचे धुरेचे बैलाचे चामडे ज्यांचे ढोर त्यास चामडें द्यावे कलम १

लक्षुमीचे जत्रेचे रेडयाचे दल नांगरे पाटिलाचे कलम १

गांवीचे होलीस माहाराचे होलीचा विस्तो अणावयासी माहारास द्यावे खोबरेची वाटी १ पानसुपारी विडा कलम १

गांवाचे होलीचा नैवेद्य कोलीयानें व घडसीयाने घ्यावा उचलिले हातें कोली माहारास देईल ते घ्यावें कलम १

वोटल दाम वांणियाचे बिराड उतरतील त्यास द्यावे रुके

पाटील दर बिराडास दर बिराडी माहार-

रुके ०४ राखण यासि रुके ०२

येणेप्रमाणें साहा रुके घ्यावे कलम

येणे प्रमाणें सदरहू कलमे आमचे माहालीचे चाली आसे यासि अन्यथा नाही येथील चाल राऊलास विदित व्हावे म्हणून लिहिले असे सन ११४८ तिसा सलासैन मया अलफ शके १६६० कालयुक्तनाम सवछरे भाद्रपद वद्य त्रितिया छ १७ जमादिलावल बहुत काये लिहिणे हे विनति

महार-पाटील वाद (पुढें चालू)

ले. ४७ (१२९) श्री { इ. १७४० (?) श. १६६२

श्रीमंत राजश्री माहादाजीपंत बाबा यांसी

॥ द श्री सकल गुणालंकर्ण अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्ये स्नो सौभाग्यवती सकू .... दंडवत विनंति उपरी .... स्वकीये लेखन करणे विशेष...वीरास रा गोमा ...... पाटील धुमाल याचे घर ....त्यास अजी तागाईत मौजे ... पाटीलकीचा कारभार तिमाजी पा प्रो.........चुलता व वरकड भाऊ येैसे करीत होते त्यास साल मजकुरापासून तिमाजी पा याने कारभार न करिता महाराचे हावाला पाटीलकी केली भावानी त्याच्या हाताखाले वर्तावे जो न वर्ते त्यास आपणाकडील मोकासी याचा अधिकारी नारोपंत कुलकर्णी यास दिल्हा आहे ते बाहीरनाकाच्या हाताखाले न वर्ते त्यास शासन करू म्हणतात यावरून अपूर्व दिसोन आले जे आपले राज्य नीतीचे असतां मुलकाखेरीज हा विचार आढलला त्यावरून हे पत्र आपणास लिहिले आहे तरी मौजे वीर येथील पाटील मजकूर आमचे मेहूणे आप्त आणि आपले सेरकर पाढरीचे चाकरीस दुरुस्त याचे हे आसतां काजकाम माहाराचे हातें द्यावे येैसे नांहीं व सालकरी कुलकर्णी आसोन केवल नारोपताने मुकासा म्हणून भावाबदास दबाऊन पाढरीत अवघ्याचे काजकाम करावेस .... आपण मेहेरवान जाले तरी (दुसरे) ...... दरड गावी यावा आणि ...... आहे तरी ...... याउपरी मोकद (म) .... पाटीलकी तुम्ही .... कारभार करितील .... माहार अथवा नारोपंत कारभारास या .... दिवाणातून कारभारी येऊन पाटीलकी जफ्त हो(ईल) (अ)से ताकीदपत्र तिमाजी मार यास द्यावे व माहारास ताकीद पस्ट करावी की याच्या कारभारांत पडलीयाने हुजरून पारपत्य केले जाईल येैसी ताकीदपत्रे द्यावी हा मजकूर आम्ही आपणास न ल्याहावा परतु भोवर गावात बदनक्षाची गोस्ट आण हे आमचे आप्त यास्तव लिहिले आसे तर हे पत्र सहश्रा पत्राचे जागा मानून लिा प्रा कार्ये करावे आणि पत्राचे उतर पाठवावे त्यासारिखे रा गोमाजी पा व गुजाजी पा आपणाकडे येतील ते मुखवचने सागता कलो येईल पत्री कोठवरी ल्याहावे आपण सर्वज्ञ विवेकी आहेत ल्याहावे येैसा अर्थ नाहीं परतु सूचनार्थ लिहिली असे बहुत काये लिहिणे कृपा लोभ—असो दीजे हे विनति

वतन-वादाची आपसांत तडजोड

ले. ४८ (८१) श्री { श. १६६८ वैशाख वद्य ७*
{ इ. १७४६ मे १

तालीक

श्री शके १६६८ क्षयेनाम सवस्छरे वैशाख वद्य ७ सप्तमी गुरुवार ते दिवसी रामाजी रंगनाथ खडो सिवदेव व मल्हार लक्ष्मण पानसी जोतीसी कुलकर्णी मौजे दिय का सासवड यासि बाजी निबदेव व बापूजी निबदेव पानसी जोतिसी कुलकर्णी मौजे मा। सुा। सीत आर्बैन मया आलफ सन हजार ११५५ कारणे लेहून दिल्हे यैसे जे मौजे मारच्या वृतीवर पूर्वी पाडागले उठले होते त्यास तुमचे वडील विसाजी परसराम यानी त्यासी वाद सागितला कोंकणामधे म्हसलियान विसाजीपती दिव्य केले तेसमई त्यानी वृतीसाठी खर्चवेच केला त्याचा विभाग आपले वडिली निमे विभाग भाऊपण्याप्रो देऊन वारावा तो न वारिला मोघम मजकूर राहिला दरम्याने तुमचे वडील व तुम्ही तगादा करीत आले नादारी मुळे आम्हास द्यावयासि अनकूल पडले नाही साप्रत आमचे विचारे आले की हे लिगाड वारून टाकावे भाऊपणीयात किलाफ कार्याचा नाही म्हणऊन राणोजी बिन गोपाजी पा। झेडे व कावजी बिन सभाजी पा। झेडे व सिवजी बिन बावाजी ढमे व बाळोजी ढम व जानोजी येसाजी काले चौ व बगनाक माहार गायेकवाड यैसे घेऊन तुम्हाकडे सातारियासि आलो खर्चावेचाचा हिसेब मनास आणिता व्याज मुदल मिळोन पैका मोबलग होऊ लागला मग सदरहू मिरास भावा देखत तुम्हास पदर पसरून वृतीचा तह केला निमे भाऊ तुम्ही व निमे. आम्ही तीन वर्षे तुम्ही कुलकर्ण खावे तीन वरसे आम्ही खावे त्यासी सा वरसाची पाच वरसे ठरसली खर्चवेचामुळे ठरवल्यापैकी तीन वर्षे तुम्ही तिघरानी कुलकर्ण करावे व दोन वर्षे आम्ही करावी तुम्ही तीन साले व आम्ही दोन साले यैसी पाच वरसे मौजे मारचे कुलकर्ण खावे व भटपण तुम्ही निमे खावे निमे आम्ही खात जाऊ येणेप्रो तह करून हे पत्र तुम्हास खुसरजावंदीने लेहून दिल्हे आणि तुमचे पत्र खर्चवेचे पावलियाचे आम्ही लेहून घेतले सदर तहाप्रो तुम्ही आम्ही वंशपरंपरेने खाऊन सुखरूप सुखसंतोशे राहावे राजश्री पिलाजी जाधव व जोत्याजी जाधव थलवाई मौजे मार याचे घरी उपाध्यपणास राघो अनत मजमदार यानी खलेल केला होता त्यास तुम्ही दरबारी वाद सागोन राघो अनत नव्हेसा करून राजश्री पिलाजी जाधवराव याचे वृतीपत्र उपाध्यपणाचे करून घेतले त्यास खर्चवेचहि पडिला तो द्यावयासी नाही व पूर्वीचाहि खर्चावेचाची रयात केली

* मोडक जंत्रींत वै. व. ६ चा क्षय असून ७ स बुधवार दिला आहे. येथें वार प्रमाण धरून तिथी व तारीख खाली दिली आहे.

याकरितां राजश्री पिंलाजी जाधवराव याचे घरीचे उपाध्यपण तुम्हास दिल्हे आसे तुम्ही सुखरूप वेशपरंपरेने खाणे राजश्री पिलाजी जाधवाच्या घरच्या उपाध्यपणास बोलावयासि समध नाही राजश्री पिलाजी जाधवराव याचे घरचे जोतीशाचे तुम्ही निमे व आम्ही निमे खाऊन सदरहू तह प्रो आम्ही व आमचे वंशीचे कोण्ही नवदिगरीची गोष्टी सागू तरी आम्हास आमच्या पूर्वजाची व कुलस्वामीची शफत आसे मौजे भोली वगैरे देह पाच निरथडीचे व सोनोरी ता कऱ्हेपटार प्रा पुणे येथील तुमच्याआमच्या वाटण्या आमचे तीर्थरूप य.चे विद्यमाने होऊन परस्परे पत्रे जाली त्याप्रो तुम्ही आम्ही वर्तणूक करून मौजे मारची तीन साले तुम्ही करीत जाणे दोन साले आम्ही करीत जाऊन भटपण निमे तुम्ही व निमे आम्ही खाऊ राजश्री पिलाजी जाधव याचे घरच्या उपाध्यपणासी आम्हास समंध अर्थाअर्थी नाही तेथील उपेद्र तुम्ही खात जाणे तुमचे कागदपत्र चनाजीपताचे हतचे अगर सभाजीपताचे हतचे आगर आणिक कोणाचे हातचे आम्हापासी असतील तरी रद आसेत सदरहू तहप्रो वंशपरंपरेने सुखरूप खात जाणे खेरीज जाधवाचे भावाबंदाचे घरीचे जोतीस उपेद्र तुम्ही निमे खावे व आम्ही निमे खात जाऊन तुमचे वडील घर आमचे धाकूटपण व पाढरीत मातबर जाबसाल पडेल तो तुमच्या आमच्या विचारे करून सदरहू तहप्रमाणे चालू येथून पुढे पाढरीमुळे सर्चवेच पडल तो आम्ही आपले तक्षिमप्रो देत जाऊ हे लिहिले सही बीकलम बाजी निबदेव सदरहू लिहीले सही बापूजी निबदेव पानसी कुलकर्णी जोतीसी.

गोही

राणोजी बिन गोपाजी पा क्षेडे मौजे मजकूर १

कावजी बिन सभाजी पा क्षेडे मौजे मार १

येसाजी बिन मईलाजी काले चौगुले मौजे मार १

जानोजी बिन नावजी काले चौ मौजे मार १

सिवजी बिन बावाजी ढुमे थळवाई मौजे मार १

बालोजी बिन म्हसाजी ढम थलवाई मौजे मार १

बगनाक बिन होननाक गायेकवाड माहार मौजे मजकूर

उपाध्येपणाचे वतन

ले. ४९ (२९३) श्री { श. १६६७ माघवद्य १३+ इ. १७४६ फेब्रु. ७ }

श्रीशके १६६७ क्रोधननाम संवत्सरे माघ वद्य त्रयोदसी मदवासरे ते दिवसी राजश्री खडो सिवदेव व रामाजी रगनाथ पानसी गोत्र मुदगल कुलकर्णी व जोतीसी मौजे दिये करयात सासवड यासी पिलाजी जाधवराव बीन चांगोजी जाधव व सटवोजी जाधवराव बीन पिलाजी जाधवराव जोत्याजी जाधवराव बीन संभाजी जाधवराव थलवाई मौजे मजकूर सुाा सीत आर्बैन मया आलफ सन हाजार ११५५ कारणे लेहून दिल्हे असी जे खडो सिव [देव] पानसी याणी आम्हापासी येऊन विदित केलें की पुरवीपासून तुमचे उपाधेपन् आमचे आपले वडिलास तुमचे वडील पुर्जीत आले आहेत व उपाधेपनाचे उपयेद्र देत आले आहेत हा कालपर्यंत तुम्हीहि त्याजप्रमाण चालवितात परंतु प्रस्तुत दरम्यान तुमचे मजमूदार राघो अनंत गैरवाजवी आम्हासी कजिया केला ये गोस्टीचा अर्थ कलत नाही तुम्ही व आम्ही वतनदार भाऊ वडिला वडिलाचे क्रियेन तुम्ही आम्ही वर्तावे म्हणून विदित केले त्यावरून आम्ही मनास आनता तुम्ही मूल उपाधे ज्याप्रमाणे आमचे वडील तुमच्या वडिलास उपाधेपनाचे मानपान देत आले आहेत त्याप्रमाणे आम्ही वौश परपरेणें तुम्हास पुजून देत जाऊ राघो आनत मजमदार यास तुम्हासी कजिया करावयास हरगीज समर्थ नाही राघो आनत् आम्हापासी येखत्यारीने कारभार करितात यामुले आम्हास न कलत मागे कागद करून ठेविला आसले आगर पुढे गफलतीन करून उपाधेपनाविसी ठेवितील कालकला काढतील तरी तो रद आसे राघो आनत यासी व त्याच्या वंशजास व हरकोणास हर कोणेटाई तुमचे उपाधेपनास आमचे घरी व आमच्या भावाबंदाचे घरी मुजाहीम होवयास समथ नाही तुम्ही व तुमचे भाऊबद पानसी ही येकदर सुखरूप लेकराचे लेकरी आमचे घरचे उपाधेपन देव देवतार्चन आच्यार्यत्वं दानधर्मांश हावेकवे लग्न मुहूर्त वगैरे मानपान अनभऊन सुखरूप उपाधेपण वंशपरपरणे करणे येविसी तुम्हासी अतर करू तरी आपणास व आमच्या वैशजास श्रीकुल स्वामीची सेफत आसे श्वदेसी व विदेसी सुखरूप आपले उपाधेपणाची वीत करणे

सबूरीबद्दल समाधान

ले. ५० (१२६). श्री

पुाा चिरंजीव राजश्री नानास आसीर्वाद उपरी सिवजी पाा संभाजी पाा मनमाने

+ मोडक जंत्रींत शुक्रवार आहे. तिथी प्रमाण धरून तारीख दिली आहे.

१ पत्र मल्हार तुकदेव ऊर्फ दादोबा पुंदरे याचे आपल्या पुतण्यास. पत्राचा काळ अंदाजे इ. स. १७४६ पूर्वीचा.

सारिखे बोलिले परंतु तुम्ही सबुरी केली बहुत उत्तम गोष्टी केली सबुरी कामाचीच आहे याच रीतीनें पुढेंहि सबुरीचा अर्थ चितात ठेऊन दूरंदेश दृष्टी देत जाणे गावकरी बहुत गोष्टी तुम्हास बोलिले तुम्ही त्यास उत्तर दिल्हे नाही बहुत उत्तम गोष्टी केली पुढे गावकरी जितके बोलतील तितके सोसीत जाणे ते वडील मायेबाप आहेत या मध्ये सर्व गोष्टी आहेत कलले पाहिजे बहूगुणी पाठऊन देणे बहुत काय लिहीणे हा आसीर्वाद

राजीनामा पत्र

ले. ५१ (१४७) श्री { श. १६७१ आश्विन शु. १५ / इ. १७४९ आक्टो. १४

राजेश्री देशमूख व राजेश्री देसपाडे का। सासवड साहेबाचे सेवेसी

राजीनामा बो। मो। मोजे बेलसर का। मजकूर सु॥ खमस सु॥ ११५९ कारणे साहेबाचे सेवेसी राजीनामा लेहून दिल्हा ऐसा जे मौजे मारच्या कुलकर्णी याचा व आपला कजिया कुलकर्णी याच्या हाकालाजिमीया बाबत आहे येविसी तकरीर लेहून दिल्ही ऐसीयासि साहेबी राजीनामा लेहून देणे म्हणून आज्ञा केली त्यासि साहेब विल्हे लावितील त्यासि राजी आसो नवदिगर करू तर साहेबाचे आन्याई हा राजीनामा लेहून दिल्हा सही तेरीख १३ माहे जिलकाद

नि॥ नागर

[नां. चि.]

कुलकर्णी वतन लाटण्याचा यत्न

ले. ५२ (९९) श्री { इ. स. १७५०

यादी कलमें ....

नागावे आकसी येथील कुलकर्णी रुद्राजी सेणवी याचे त्यास त्याचे पोटीं संतान नाहीं त्याजवल विठोजी प्रभु शागिर्द होता त्यास शेणवी वाराणसीस जाऊ लागला तेऱ्हां कागद रुमाल हावाला केले त्याचा लेक बालाजी विठोजी करीत होता त्याची बायको व लेक आहे

१

सदरहू वतन साप्रत कृष्णाजी व साबाजी तुकाजी बालाजीचे भाचे रो। मानाजी आंगरे याचे हिमाईतीने आपण कुलकर्णी म्हणो लागलें आहेत १

महार-मांग वाद व गांवाची शांत

ले. ५३ (४५) श्री { श. १६७६ भाद्र. शुद्ध १२ / इ. १७५४ आगष्ट २९

राजश्री देशमुख व मोकदम व देशपांडिये को सासवड साहेबाचे सेवेसी

द्या बाो माहार का मचकूर नावनिसी आसामी

रणपिसे माहार	चवरे माहार
२ धावनाक व उमनाक बिन केरनाक	१ साबनाक बिन जननाक
१ भिवनाक बिन सांवनाक	१ कासनाक बिन गोमनाक
१ पदनाक बिन गोदनाक	१ देवनाक बिन मालनाक
१ तुक बिन सटवनाक	१ निंबनाक बिन सटवनाक
१ होननाक बिन सुभाननाक	१ संतनाक सटवनाक
१ आमनाक बिन काननाक	१ लालनाक बिन बाबनाक
	१ संतनाक बिन टकनाक
७	७

यो आसामी चवदा सुा खमस खमसैन मिया व अलफ कारणे साहेबांचे सेवेसी कागद लिहून दिल्हां येसा जे का मजकूरची गावची सात होणे याजकरता साहेबी आज्ञा केली की सात करणे त्यास आपण म्हणत होतो की सातेच्या पेढ्याची घागर आपण चालऊ व मांग का मजकूर हे म्हणत की पेढ्यांची घागर आपण चालाऊ येस्यास आमचे हरदूजणाचे भाडण होते त्यास साहेबी सातेचे नेट लाविले की याउपर सात करावयास दिरंग लाविता येत नाही तरी तुम्हीच पेढ्याची घागर चालवावी येसी चौ कसब्याची भोवर गावची सड आणून देणे आणि घागर चालवणे म्हणून अज्ञा केली तेव्हां आम्ही समाकूल माहार लाहान थोर येके जागा होऊन विचार केला कीं आपण पेढ्याची घागर आपली म्हणतो हें मांडण बाथल आणि देशातहि चाल कीं सातस मागाने घागर पेढ्याची चालवावी येसे आसोन आपण भाडतो हे देशाखेरीज भाडतो येसा पुरता शोध केला तेव्हा आपण हे भांडण सोडून मांगाने घागर पेढ्याची चालवावी वरकड सातेतील जी कलमे आहेत ती मांगानी आपण जन सिरस्ताप्रो वर्तावे येसे रजावंद होऊन कागद दिल्हा आसे तरी सदरहू लिहिल्याप्रमाणे वर्तणू [क] करूं यास नवदिगर करूं तरी दिवाणचे गुन्हेगार हा कागद लिहून दिल्हा सही छ १० जिलकाद

कांहीं गावकामगारांचा मुशाहिरा

ले. ५४ (२८१) श्री { श. १६८० श्रावण वद्य ३ / इ. १७५८ आगस्ट २१ }

पौ स्रावण वद्य आमावास्या

सके १६८० बहुधान्य संवत्सरे

राजश्री आबाजीबावा देशाई प्रो चेऊल हाली मो पुणे स्वामी वडिलाचे सेवेसी छ सकल गुणालंकरणे अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्येश्नो येसनाईक लस्करी मो आकसी चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना तां श्रावण वद्ये त्रितिया इदुवार पावेतो आपले आसिरवाँदेकडुन वर्तमान येथास्तीन असे विशेष स्वामीचे सेवेसी चिरजीव कृष्णा यासी पाठविला त्याणी आपले वृत्त सर्व स्वामीचे सेवेसी निवेदन केले त्यावरून आपण पत्र लिहिले ते उतम सिरसा विदिले त्या पत्रात वर्तकाचा मुशाहिरा पनास लाहार लिहिला व घरत व मान्ये याचा मुशाईरा साठ लाहारी लिहिला परतु वर्तक निवडिला आणि घरतवमान्याचे मुशाईरा निवडून लिहिला नाही याजकरिता फरोन चिरजीवास स्वामीचे सेवेसी पाठविला असे तरी अनाथावरी स्वामीने कृपावंत होऊन याप्रा तपासिले त्याहावे वर्तकाचा पुरुश घरताचा पुरुश व मान्याचा पुरुश येकत्र सरकार चाकरीस रुजू त्यापासोन मानपान व मुशाईरा यैसे निवडून तपसिले करून त्याहावे

वर्तकाचा पुरुश	घरताचा पुरुश	मान्याचा पुरुश
१	१	१

यचे हक याखाली निवडून त्याहावे सरकारपैकी मुशाइरा व गावातील ज्याप्रा हक खुटले आहेत ते नावनिसीचे नावनिसीखाली निवडून त्याहावे घराताचा पुरुश व लस्करी याचा वतनास लागू चालवीत होता तो उपरांत सरकारचे गुंत्यामुले परांगदा जाहाला त्यापासोन सर्व वर्तमान लिहून अनायास सनाथ करावे यास्तव सेवेसी चिरजिवास पाठविले आहे तरी यैसे पत्र लिहून द्यावे की वाद प्रतिवाद पडल तेव्हा आपले पत्रात दूशण कोण्हाचे न चाले आणि आमचे मस्तीकी हस्त स्वामीचा तोच आसिर्वाद सिधीस जाई यैसे जाहाल्यास स्वामीचे सेवेसी आणखीहि चुकणार नाही तरी सर्व मानपान हक यैसे निवडून तिघाचे तिघाखाली लिहून निवाडपत्र याबरोबर जरूर सत्वर पाठऊन द्यावे मार्ग लक्षीत आसों व वर्तकाची वतनवाडी व घरताची वतनवाडी मान्येयाची वतनवाडी कुल देखील याचे वृत्त सविस्तर त्याहावे मणजे माझा तरणापाये होईल सर्पाचे फडवर आपले ज्ञावरून पाये दिल्हे यहुत काये लिहिणे हे + + + +

जुन्या वतनदाराची तक्रार

ले. ५५ (२५८) श्री { श. १६८१ भाद्र. शु. ९ / इ. १७५९ सप्टें. १

का सासवड येथील माली व तांबोली व तेली व रगारी वगैरे याणी हरताल पाडली कीं पुरातन सेवधार वगैरे खुमास कायदेदार यासी सेवधार द्यावी ते मनमाने तैसे घेतात व नवे कायदेदार बहुत जाले पुरातन कायेदा नसतां बलेंच घेतात यामुले आपल्यास उदीम करवत नाही त्याजवरून जमीनदार हुजूर आणून पुरसीस केली त्याजवरून त्यानी विनंती केली कीं पंधरा दिवसाचा वाईदा द्यावा गावास जाऊन पुरातन कायदेदार आसतील त्यानी पुरातन प्रा वर्तावे नवे आसतील त्यानी घेऊ नये या प्रां चंदोबस्त करून वार विनती पधरा दिवसी करू कतबा लेहून देऊ आमचे कोण्ही गावांत न आईके तर साहेबास विदित करू ते समई जाजती सेवा कोण घेत होता व पुरातन कोणाच्या सेवा त्यास ध्यावे काये त्यात घेत होते कसे हे सविस्तर विदित करू म्हणून विनंति केली त्याजवरून पंधरा दिवसाचा वाईदा दिल्हा कराराप्रा पधरा दिवसी येऊन विदित करावे कतबा लेहून घ्यावा याप्रा रद बदल केलो आसामी बीता।

१ सटवोजी बिन दताजी देशमूख
१ संताजी बिन सिवजी
१ भुजाजी पा।
१ माणकोपंत
१ राघो गंगाधर
—
५

येणे प्रा पांचा आसामी येऊन करार केला छ ८ मोहरम सन सितैन

परागंदा होऊ नये

ले. ५६ (१९) श्री { श. १६८६ आश्विन शु. १३ / इ. १७६४ आक्टो. ७

[हैबतराव भवानीशंकराचा आष्टकोनी अस्पष्ट मराठी ६ ओळींचा शिक्का]

अजदिवाण ठाणे माहाल खालसा सां कोरेगाऊ ता। जानापा वाणी चौगुला मौजे तडवले सां मजकूर हाली वस्ती मु। हासूचीवाडी सु। खमस सितैन मया अलफ तू वतनदार चौगूला गावातून परागदा जाहाला आहेस म्हणून पाटील मजकूर यानी विदित केले तरी परागदा होवयासी कारणे काये हाली पत्र सादर केले आहे तरी तुम्ही गावावरी

येऊन आपली मिरासीची सेते करणे व चौगूलकीचा कारभार करणे कोन्हाविसी वसवसा न धरिता सुखरूप येणे तुझे वतनदारीचे सेते तुजला देऊ तरी येणे छ ११ रविलाखर

मोर्तब

सुद

शिमग्याचे पोस्त

ले. ५७ (५४) श्री {श. १६८७ फा. व. १३
इ. १७६६ मार्च ९

चिठी का। सासवड ता। येमाजी खाटीक का। मजकूर सु।। सीत सितैन मयां व अलफ देणे सिमघ्याचे पोस्त सिवरकर टिपरकर माली यास बकरे येक किमत रु।। २ दो रुपयांचे देणे साल मजकूरच्या सान्याचे यैवजी मजुरा पडेल जाणिजे छ २७ रमजान

बार

टिळ्याविड्याचा अग्रहक्क

ले. ५८ (३१) श्री {श. १६८९ चैत्र वद्य १२
इ. १७६७ एप्रिल २५

॥ छ मा। अनाम देशमूख व देशपांडे का। सासवड यास सदासिव चिमणाजी

श्री सचिव सु।। सबा सितैन मया अलफ राऊल गोसावी याचा

शंकराजि व ठाकूर याचा कजिया लागला आहे सबब जे ठाकूर

नारायण म्हणतात की दाहाजण कुणबी कार्यप्रयोजनामुले व हरयेक उद्यश जमा होतात तेथे टिलाविडा मानपान पूर्वापार अधी आम्हास देत अले अहेत मागाहून राऊलास देतात याप्रमाणे माहालो माहालचे जमिदा [रा] चे साक्षीनसी खरे करून देऊ राऊल म्हणतात जे अधी आम्हास टिलाविडा मानपान देतात याप्रमाणें माहालो माहलचे जमिदाराचे विद्यमाने खरे करून देऊ म्हणून हरदोजण भाडत हुजूर आले याकरिता हे पत्र सादर केले असे तरी कर्यांत मा।रा पूर्वापार कैसे चालत अले अहे ते सड लेहून पाठविणे जाणिजे छ २५ जिलकाद पा। हुजूर [मो. अ. शि.]

बार बार सुरसुद पत्राव

धिरयंभाति

मुरळीच्या लग्नाचा वाद

ले. ५९ (१८४) श्री { श. १६८८ पौष वद्य १३
{ इ. १७६७ जाने. २८

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो आपाजी गो। यांसि

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सु॥ सबा सितैन मया व अलफ येमुनी मुरली इणे हुजूर विदित केले की आपली बहीण मैनी मुरली इचे लग्न गंगी मुरुळीच्या लेकासी लाविले होते त्यास तिजपासून काही अंतर पडले यास्तव तिचा दादला महीपा वाघा याणे तिची साड केली त्याजवरून मौजे जेजूरी येथील गावकरी यानी मैनीचे आगावर वस्तभाव त्याणे घातली होती ते व आणखी च्यारसे रुपये लग्न करावयास आपल्यापासून महिपा वाघ्यास देवऊन त्याचा लढा तोडून टाकला आणि सरकारात वर्तमान विदित करून सरकारची पत्रे नेऊन मैनीच्या गळा गाठ्या श्रीचा बाधिला आणि मुरली केली ऐसे असता महिपा वाघ्या याणे सुभा गैरवाका समजाऊन मैनीने जेजूरसि न राहावे ऐसे पत्र आणिले आहे तरी येविसीची ताकीद जाली पाहिजे म्हणून त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी मैनीने श्रीचा गाठ्या बाधिला असता महिपा वाघ्या इसी कजिया करीत असल्यास त्यास बरे वजेने ताकीद करून कजिया करू न देणे इणें गाठ्या बाधिला आहे ही वरकड मुरल्याप्रो॥ जेजूरीत देवाजवळ राहील तिला सुखरूप राहू देणे येविसी सुभाचा कौल मैनी मुरलीस देणे फिरोन बोभाट येऊ न देणे महिपा वाघा याचा उपद्रव लागो न पावे तें करणे *जाणिजे छ २७ साबान *बहुत काय लिहिणे (लेखन

सिमा)

सेखसला पीराची नेमणूक

ले. ६० (१३७) श्री { श. १६८९ पौष वद्य ८
{ इ. १७६८ जाने १२

नकल

आज्ञापत्र राजश्री माधवराव नीलकंठ ता॥ मोकदमानी देहाये ता॥ करेपठार प्रा॥ पुणे सु॥ समान सितैन मया व आलफ सेखसला पीर का॥ पुणे याजकडे उरसास वगैरे दर साल मोईन गावनि॥ पावते ते भलता पिरजादा येऊन घेऊन जातो पिराचे कामास देत नाही भाऊबंदास सांगत नाही याजकरिता साल मारी सेख फाजल व सेख हाजरत आले आहेत याजपासी जे सुदामन पावत आले आसल त्याप्रा॥ साल मजकुरी देणे म्हणजे दरग्यास पावते करतील जाणिजे छ २१ साबान मोर्तब सुद

गाठ्या–खंडोबाच्या भक्ताच्या गळ्यांतील रुप्याची हसळी

गुरव-माळी वतनवाद

ले. ६१ (२७) श्री { श. १६९१ कार्तिक वद्य ३
{ इ. १७६९ नोवें. १६

राजश्री जगजीवन माहाले हवालदार व कारकून किले वज्रगड गोसावी

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री नारो अपाजी असीर्वाद व नमस्कार सुा सबैन मया व अलफ गुरव किले मजकूर व किले पुरंधर व पेठ नारायेणपूर व मौजे पूर याणी विदित केलें कीं आपण पुरातन वतनदार सदरहू ठिकाणीं बेलपत्री फुले मुढावल देखील आपण घालीत आलो मालियाचें वतन तेथे नाहीं असे असतां आलीकडे गडचे दंग्यापासून खंडोजी बिन तुकोजी माळी सासवडाहून येऊन पेठेंत रा। रामभट पुरंदरे जोसी कुलकर्णी यांचे घर आहे तेथें राहिला आणि फुलें पत्रीविशीं आम्हांसी कटकट करितो यास्तव पेशजी सरकारांत येऊन सांगितलें आणि ताकीदपत्र नेलें परंतु लबाडी करितां राहीना यास्तव मागती आम्ही सरकारांत फिरयाद केली त्यावरून त्याजला सरकारातून आणविला परंतु जाबसाल न करितां गेला आहे यास्तव ताकीद केली पाहिजे म्हणोन त्यास पूर्वीपासून तेथें वतनदार माली नाहीं गुरवच फूलपत्री घालितात असें असतां गडचे दंग्यापासून मात्र खंडू माली पेठेंत येऊन राहिला आहे आणि गुरवासी कजिया करितो फूलपत्रीविशी पेशजी ताकीद जाली असतां लबाडी करितो हे गोष्ट कायाची नाही याजकरितां हें पत्र लिहिलें आहे तरी पुरातन चालत आल्याप्रो किले मजकुरी फूल पत्री बेल गुरवापासून घेवणें मुंढावलीदेखील गुरव घालितील उपरी माळी यास कजिया करावयासी दरकार नाही येविशीं चांगली ताकीद करणे फूलपत्री घालूं न देणे [1]जाणिजे छ १६ रजब [2]बहुत काये लिहीणे हे[3] आसिर्वाद

बार

टिळ्याविड्याच्या कज्जा

ले. ६२ (३) श्री { श. १६८९ ज्येष्ठ वद्य ६
{ इ. १७६७ जून १७

द अनाम देशमूख व देशपांडे कर्यात सासवड [शि. पं. स] प्रांत पुणे यासि सदासीव चिमणाजी सचिव सुा समान सितैन मया व अलफ राऊल व ठाकूर यां उभयेतांचा टिलाविड्याचा कजिया आहे याजकरितां माहालो माहालच्या सढी अणावयासी सरकारची पत्रे देऊन हरदोजणास पाठविले ते का। मजकुरास गेले तेथे

१-२-३ या पुढील मजकूर निराळे वळणाचा आहे

दोघाची समजावीश काढून परस्परे कागद लेहून घेऊन हुजूर पाठविले ते मनास आणितां खोटा कोण याचा निवाडा स्पष्ट पत्री लिहिला नाहीं यामुले तुटक होत नाहीं तरी निखूण राउलास अथवा ठाकुरास आधी टिलाविडा कोण्हास द्यावा हे लेहून पाठवणे जाणिजे छ १९ मोहरम पा। हुजूर [शि. प. भा.]

सुरूसुद

तांबोळ्याचें वतन

ले. ६३ (२५९) श्री { श. १६९१ फाल्गुन शु. १३
नकल { इ. १७७० मार्च ८

मा। मुरारजी जाधव मौजे गराडे यासी महिपतराव त्रिबक सु॥ सबैन मया व आलफ आबाजी तांबोली मौजे मजकूर याणे विदित केले जे आपली वतनी जागा होती ती कुलकर्णी यास नेमून गावकरानी दिली ऐसीयास वतनदाराची जागा दुसरीयास द्यावी हे गोष्ट काये कामाची तरी याची जागा यास देवणे आथवा तांबोली मा।र याचे विचारे करून दुसरी जागा त्याचे उपयोगी पडावयाची आसल ती नेमून देणे तांबोली गावात असता वाणी पाने विकतो तरी त्यास ताकीद करून पानें न विकी यैसे करणे येविसी फिरो [न] बोभाट येऊं न देणे छ २० जमा दिलावल

सदरहू आसल कागद रा। नरसोजी जाधव दि॥ राजश्री बज्याबा पुरधरे पा। निमे मोकदम मौजे गराडे ता। करेपठार प्रा। पुणे याजवल दिल्हे आसे मिती शके १६९१ विरोधीनाम सवछरे फालगुण सुध १३ सुक्रवार

महार-मांगाचा कजिया

ले. ६४ (२६९) श्री { श. १६९५ कार्तिक शु. ५
{ इ. १७७३ आक्टो २०

पौ छ ३ साबान

सेवेसी विज्ञापना सासवडच्या माहाराचा कज्या आहे मांग गाव चालवीत होते ते बेगारीस कंटलले काल सिद्याचा बैल मेला वढीनात तेव्हां संध्याकालपर्यंत उपासी त्याचे घरची तेव्हा संध्याकाली बले टाकविला त्यास आपण समक्ष रूबरू माहाराविसी नारोपंत नानास पुसिले सहासे रु॥ घरिचे देतो आणि माहार तात्याच्या वेलेपासून चाकरी चवरे रणपिसे करितात तसी करू द्यावी पुढे साबल्याचा इनसाफ होईल तसे चालतील परंतु यैकिले नाहीं यैसीयासी आता नारोपंत नानाची

मर्जी कलली आपले यैकिले नाहीं त्यापक्षी श्रीमंतास विनंती करून श्रीमंताचे पत्र कमाविसदार व देशमूख पाटील देशपांडे याचे नावे की रणपिसे चवरे साबले माहार यांचे भांडण बहुत दिवस आहे त्यास पेसजी कैलासवासी बाजिराव प्रधान याचे आज्ञापत्र सादर जाले त्या पत्रावरून रणपिसे चवर गाव चालवती होते आलीकडे सन †समान सितैनात अमानत सनद जाहाली त्यावरून *साहा वर्षे अमानत आहे त्यास हाली सनद सादर केली आसे तरी रणपिसे चवरे याणी गांवचे चाकरी करावी पुढें साबल्याचा इनसाफ होईल ठराव होईल त्याप्रो साबलेही चाकरी करतील याप्रा पत्र घेऊन पाा म्हणजे गुता वारला नारोपंती यैकिले नाहीं त्या विचारे यैसे करावे पेसजीचे आज्ञापत्राच्या नकला पाठविल्या आहेत त्या विचारे पत्रे द्यावी गांवच्यास कोणास कलो न देतां काम केले तरी होईल हे विज्ञापना

माळयाची छळणूक थांबवा

ले. ६५ (१५२) श्री { श. १६९६ कार्तिक वद्य ३०
{ इ. १७७४ डिसें ३

पौ छ २८ रमजान सन
खमस सबैन मुा नांदुर
+

सेवेसी विज्ञापना सासवडी आपण असतां नाव माली म्हेत्रा याणे विनंति केली कीं बाजारांत केवटेकरी मालणी मालवे घेऊन बसतात त्यास देशमुखानी बिगार गवताची लाविली त्यावरून आपण बगाजीपंतास बोलाऊन रूबरु सांगितलें की गरीब मालणी लोकांच्या पडवींवरी बिडाराने राहिली बाजारात मालवे विकून पोट भरितात माहार गांवास नाही हरी पोचवितात यासी बेगार गवताची लाऊ नये आपला निरोप देशमुखास सांगितला च्यार दिवस राहाविली आपण स्वारीस गेल्यावरी नाव माल्याच्या घरी प्यादे बसविले आहेत उपासि बसविले तेव्हा माली आले त्यावरून बगाजीपंतास सांगोन पाठविले बगाजीपंती उतर केले श्रीमंताचा निरोप देशमुखास सांगितला त्याणी राहाविले ते स्वारीस गेल्यावरी हली तगादा केला आमचा उपाये काय त्यावरून आपणाकडे म्हेत्रा आला आहे माल्याचा आकस देशमूख करितात माल्याचा जागा मालवे विकावयाचा तो दुकाने दिल्ही गल्लीकुचीने पाट्या माडतात त्यास बेगारीचा पेच घातला आहे आपणापासी गोड बोलतात आपण सांगितले ते यैको नये यैसे जवल हसतात त्याचे विचारे चालतात आज्ञा कर्तव्य ते करावी जनोबादादास चिठी द्यावी म्हणजे ठीक आहे नाना प्रकारे माल्यास छलतील याचा बंदोबस्त करावा अथवा च्यार दिवस पोट बाहीर भरा यैसी आज्ञा करावी हे विज्ञापना

---

†श. १६८९ *१६९५ श. प्रारंभीं दिलेली मिती पैवस्तीची आहे.
+ पत्र पुरंदऱ्यांचे दिवाण सखो महादेव यांचे आहे.

उपाध्येपणाचा कलह

ले. ६६ (१६८) { श. १६९६ आषाढ व. १०
{ इ. १७७४ आगष्ट १

[प्रारंभीचा मजकूर गाहाळ]

श्री विस्वेश्वराचे देवालई माहा अनुष्ठान आपस्तंभ अथवा रुगवेदी येजमान याणी केले तर आच्यार्यवर्ण व कुडमडप आमचा १

रुगवेदी याचे घरचा दुसरा कलश व ब्रह्मत्व आमचे व उपाधेपण पराजप्ये याचे कलम १

ब्राह्मणाकडील उपाध्येपणाविसी आपला व पराजपे याचा काही कलह नाहीं पूर्वीपासून चालत आले आहे त्याप्रो उभयेता चालवीत आहो ऐसे असतां परांजपे याणी सुभाहून उपाधेपण सारेच अमानत करविले आहे १

कुणवी याजकडील उपाध्येपणाचा कलह दोन च्यार वर्षे करीत आहो साल गुदस्ता सदासिव रघुनाथ फडणिस किले येशवं[त]गड व च्यार गांवचे ग्रहस्त नेमून गावच्या सड्या साक्षी घ्याव्या त्यास गावास ताकीद जाहाली की श्री नाटेश्वराचे देवालई ग्रामस्त व कुणवी याणी जाऊन सड्या साक्षी घ्याव्या त्यास गुरव व कांही कुनबी जाऊन गावचे कारदार नसता मनमाने तसे बोलले कट केला नाहीं यैसे मारानिले यांजवल बोलिले पुढें च्यार महिने यानी कट केला आहे यैसे गुरव व गांवकर कुणबी मान्य होऊन श्रीस नारल ठेविले आणि कट परांजपे याचे समक्ष वारिला १

मौजे मजकूरचे कुणबी वगैरे खुम याचे घरचे उपाध्येपण आमचे वडील चालवीत आले व काही पराजपे चालवीत यैसे असता बालंभट पराजपे लक्ष्मणभट पराजपे याचा बाप याणी गुरव मराठा व दोन च्यार कुलवी गांवचे यास कांही देऊन घेऊन श्री देवीचे देवालई मिलोन कट केला की जो कुण + + + उपाध्ये यास बलावील जाती वेगला ऐसे बोलोन पाच स्थली नारल पाच ठेविले हे वर्तमान आम्हास कलले यावर ग्रामस्तास वृत निवेदन केले त्याणी उत्तर केले जे या प्रसंगी तुलाजी आगरे सरखेल याची कारकीर्द मनमानेसारिखी मनसुबी होईल आपण दंडखड पडेल याजकरिता आमच्याने पराजपे यास या प्रसंगी साग + + + पुढे स्वराज्य जाहाले यावर मनसुबी +(करा)वी तर आमचे वडील मृत्य पावले आम्ही कज्या करावा तर कज्या करावयास सामर्थ नव्हतें याजकरिता वसि बेवसि वर्षे राहिले

येणेप्रमाणे हकीकत लिहून दिल्ही सई दस्तूर माहादाजी चलाल गोखले खोत कुलकर्णी मौजे मजकूर

[1]सदरहु सात कलमें लिहिल्याप्रमाणे सहि नरशिंभट बापट सके १६९६ जयसंवत्सरे आषाढ वद्य दशमी बिकम वों

नेमणूक ऐवज देण्याची तजवीज

सवाई माधवरावाचें पत्र

ले. ६७ (७) श्री { श. १६९९ मार्ग. वद्य ८ / इ. १७७७ डिसें. २२

राजश्री तुकोजी होलकर गोसावी यांसि

द सकल गुणालंकारण अखंडित लक्ष्मी आलरुत राजमान्य-श्नो माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणे विशेष बा। देणे चिरजीव राजश्री महिपतराव त्रिंब यांस साल गु॥ प्रो साल मजकुरीं आसामी बा। साला बाद नेमणूक ऐवज पावावयाची आहे त्या प्रो रुा ५०० पाचसे रु॥ देविले असेत. तरी पावते करून पावलियाचे कबज घेणे +जाणिजे छ २१ जिलकाद सु॥ समान सैब न मया व अल्फ +बहुत काय लिहीणे हे+ आसीर्वाद

बार ० श्री ~

राजाराम नरप-
ति हर्ष निधान मा-
धवराव नाराय-
ण प्रधान

वेशींत बकरे मारण्याचा हक्क

ले. ६८ (१७६) श्री { श. १६९९ भाद्रपद व. ३० / इ. १७७७ आक्टो. १

अखंडित लक्ष्मी आलंरुत राजमान्य राजश्री जनार्दन आपाजी गोसावी यांसि

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व अलफ आभिमानराव जगथाप पाटील मौजे पणदरे पो सुपे याणी विदित केले की आपण

---

१ यापुढील मजकूर निराळे वळणाचा असून बालबोधींत आहे. येथें शुद्धलेखन मुळांतील कायम ठेविलें आहे.

+ चारही अक्षरें भिन्न

दसरीयाचे दिवसी घोडीयाचे पुढे व निशाणाजवल बकरे वेसीत दरसाल मारितो त्याप्रो साल गुदस्ता मारिले साल मजकुरी मुले घरी आहेत यासी भाऊबंद कोण्ही कजिया करितील त्यास ताकीद जाली पाहिजे म्हणून त्याजवरून हे पत्र सादर केले असे तरी सालाबाद चालत आले असेल त्याप्रो साल मजकुरी चालवणे नवीन होऊ न देणे जाणिजे छ २८ साबान +बहुत काय लिहीणे श्री

लेखन

सीमा

दिवस घालावयाची परवानगी

ले. ६९ (१०५) श्री { स. माधवराव कारकीर्द

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे

सेवेसी

पो बालाजी माणकेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयास आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष राजश्री मलोजी देशमूख व आंबोजी देशमूख का सासवड यांची कटकट होऊन मारामार जाली ते वलस पुढे आठा चौ दिवसी जोती जगथाप मेला हा मार सर्व ध्यानात आहे त्यास उभयेताची समजूत करावी परस्परे समजूतपत्रे करून द्यावी याप्रो ठरले आहे परतु आम्हाकडील आलसामुळे जाले नाही त्यास पुण्यास आलियावर तोहि उदेग उरकू परतु जोती जगथाप याचा दिवस जाला नाही गांवात त्याच्या भावबदाची लग्ने होणे याज-करिता दिवस घालावयाची परवानगी द्यावी रा गणेशपंत यानी पत्र सुभेदारास लिहिले आहे ते प्रविष्ट करऊन चिठी काढून द्यावी सोनारीच्या धरणाचे कजियाबाबत कारकुनीचे रुो २५ पचवीस याची तरतूद करून पा आहे त्यासी बोलून चिठी काढून द्यावी आणि रुो द्यावे आपल्या कार्याविसी आम्हापासून अतर व्हावयाचे नाही ध्यानात असावे रुा पचवीस द्यावे चिठी काढून द्यावी बहुत काये लिहीणे लोभ कीजे विनंति

चांभार-महारवाद : साक्षीदारांची कैफियत

ले. ७०(२२८) श्री { १७७८ (?)

यादी वदणूक चाभाराचा व माहाराचा कजिया लागला मौजे पारगाव ता करेपठार प्रा पुणे सुा सबैन मया व अलफ सन हजार ११७९ समाकूल पाढर व बारा बलुते मौजे मार

कडतोजी बीन मावजी पा

मेमाणे मौजे मा उमर वरसे ४०।४५

याचे मस्तकी बेल भडार घालून पुरसीस केली की होलींचे नवेद्य ५ पाच माहारास देत आला कि चाभारास देत आला हे सत्येनरे सांगावे याचे उतर तर पाटील मजकूर वदले जे आपले आज्या पासून आजतागाईत चाभारास होलींचे नवेद्य ५ पाच देत आलो परतु आपल्या बापाचे वेलेस माहारानी कजिया केला परतु माहारास पाच नवेद्य दिल्हे नाहीं चाभारास देत आलो हे खरे कलम १

कालोजी बीन रामजी मेमाणे मौजे मार उमर वरसे ४५।५० याच्या माथा बेल भडार घालून पुसिले त्यावर त्यानी वदले जे होलीचे नवेद्य ५ पाच आपल्या वडिलापासून पूर्वापार आज तागाईत चाभारास देत आले आहेत दरम्याने माहाराचा कजिया कधी आयेकिला नाही आगर वडिलानींहि सांगितले नाही चाभाराचे नवेद्य पाच खरे देत आलो

सुतार लोहार मौजे मार

१ कान्होजी बीन कबाजी उमर वरसे ५०

गोदजी बीन कान्होजी पा मेमाणे मौजे मार उमर वरसे ३५।४० याच्या मस्तकी बेलभडार घालून पुरसीस केली की होलींचे नवेद्य ५ पाच माहारास देत आला की चाभारास देत आला हे सागणे तर याचे उतर पाटील मजकूर वदले जे आपल्या आज्यापासून आज तागाईत चाभारास होलींचे नवेद्य ५ पाच देत आलो हे खरे मागे कधी कजिया चाभाराचा व माहाराचा कजिया पडला नाही हे आपल्यास ठाऊक नाही हे खरे १

माहादजी बीन गोमाजी पा मेमाणे मौजे मार उमर वरसे ३५।३० हे वदले जे होलींचे नवेद्य ५ पाच चाभारास आज्या पनज्या पासून आज तागाईत चाभारास देत आलो मागे कधी माहारानी नवेदाबदल चाभारासी कजिया केला नाहीं आपल्या वडिलानींहि सांगीतले नाहीं हे खरे १

माहादजी बीन मकाजी सावंत थलकरी मौजे मार उमर वरसे २५ याच्या माथा

१ भिकाजी बीन नानजी उमर वरसे ३०।३२
१ सताजी बीन मानाजी उमर वरसे ३०।३५
१ सटवोजी बीन बापाजी उमर वरसे ४०
—
४

सदरहू चौघाच्या माथा बेलभडार घालून पुसिले जे त्यास त्यानी वदणूक केली जे होळीचे नवेद्य ५ चाभारास देत आलेत वरकड नवेद्य माहारास देत आलेत याचा नेवदासाठी मागे कधी महारानी कजिया केला नाहीं व आपल्या वडिलानी कजियाचा मजकूर सागितला नाहीं

कान्होजी बिन कबजी माने सागितले जे मागे येक वेल माहाराचा व खेल्याचा नाचामुळे कजिया जाहाला ते दिवसी माहारानी होळीच्या गवऱ्या वाहिल्या नाहीत म्हणून होळीचे नवेद्य चांभारास नेवद्य ५ पांच देऊन बाकी नवेद्य अडथालून टेविले मग धुळवडीचे दिवसी वडिलानी सागितले माहारास व खेल्यास तेव्हा नवेद्य माहारास दिल्हे परतु चाभाराचे नवेद्य ५ पाच चालत आले आहेत हे खरे १

बेल भडार घालून पुसिले त्यानी ते वदले जे होळीचे नवेद्य पाच चाभारास देत असतात बाकी माहार घेतात पाचा नवेदाचा माहारानी कदी कजिया केला हे आपण आयेकिले नाही व आपल्या बापानेहि सागितले नाहीं हे खरे १

सावजी बिन सुभानजी परीट मौजे माार याच्या माथा बेल भडार घालून सतोतरे सागणे म्हणून पुसिले त्यास तो वदला जे आपल्या बापापासून आयेकत आलो व आपले डोईस पाहात आलो जे होळीचे नवेद्य ५ पाच चांभारास पाटील देत आले माहारानी कधी कजिया केला नाहीं अपल्या वडिलानीहि सांगितले नाही व आपणहि आयेकिले नाहीं पूर्वापार चाभारास नवेद्य ५ पाच देत आले आहेत हे खरे १

तांबोळ्याचें वतन-अभय पत्र

ले. ७१ (२४०) श्री { श. १७०४ आश्विन वद्य ५
इ. १७८३ आक्टो. २६ }

आभयेपत्र मोकदम मौजे गराडे तां करपठार प्रां पुणे तां कासीम बीन बाजी तांबोली स्यान मौजे मजकूर सुाा सलास समानीय मया व अलफ दिल्हे आभयेपत्र यैसी जे तुं येऊन विनंती केली की मौजे माारचे वतन तांबोलीपणाचे आपणास दिल्याने मौजे माारी राहून दुकान घालून वतन आनभऊन राहीन त्यावरून तुजला मौजे माारीचे वतन करून दिल्हे असे व तुजला जागा वतनी राधाई जगदली दामदरी

इच्या सेजारी बखल जागा आहे ती पूर्वकडे लांबी हात २७ सतावीस व रुंदी हात १४ चवदा हद जागा कुंभाराची पूर्वेकडे व दक्षणेस पाणद उतरेस जागा सटवोजी बिन माणकोजी आणखे जगदले येणे प्रा जागा दिल्ही आसे तुजपासून हकीमास सेला पागोटे रुपये १५ पंधरा घेतले आसेत व दर रोज हकाची पाने विड्याची ५० पनास देत जाणे व दिवाण सारा दर साल रुपये २ दोन देऊन सुखरूप राहाणे जाजती उपसर्ग लागणार नाहीं हे वतनपत्र तुजला दिल्हे आसे तरी मौजे मारचे वतन वंशपरपरेनें आनभऊन सुखरूप राहाणे हे वतनपत्र करून दिल्हे आसे जाणिजे छ १७ माहे जिलकाद शके १७०४ शुभक्रनाम सवछरे आश्विन वाा ५ पंचमी सन ११९२

बिाा रामचद्र हैबतराव आत्रे   निाा नागर

जोसी कुलकर्णी

साक्ष

१ सिवजी बीन माणकाजी जगदले पाा	१ सिदोजी बीन सताजी सुतार
१ गोमाजी बीन राण माळी सवते	१ बहीरजी बीन सटवाजी परीट
१ सटवाजी बीन माणकोजी जगदले	१ सिवजी बीन बाजी नाहावी
१ हाबाजी बीन पुताजी जगदले	१ माधजी बीन रघोजी लोहार
१ सिवाजी बीन येसाजी दूरकर	१ बहेरजी बीन राणोजी गुरव
१ माहार गायेकवाड व शेलार	१ बालोजी
१ धोंडनाक वलद सटवनाक गायेकवाड माहार	१ ताजूभाई वलद बूबदभाई मुलाणा
	१ भवानजी बीन कावजी चांभार
१ सिदनाक वलद मरनाक माहार शेलार	१ दारकू बीन सिदू चांभार
१ सिदनाक वलद जीवनाक माहार शेलार दयनाक	

फरे घेण्याचा हक्क

ले. ७२ (२२९)

श्री

{ श. १७०६ पौष शु. १४
{ इ. १७८४ डिसें. २५

रुजू   तालीक

जानाई

रोखा राजश्री महिपतराव त्रिंबक पुं[दरे] देशपांडे काा सासवड ताा मोकदम व

समस्त दाहीजण मौजे कामथडी ता। खेडेबारे सु॥ खमस समानीन मया व आलफ बापूजी पा। इगुलकर मोकदम व नरसोजी पाटील इगुलकर मौजे मजकूर याणी पुण्याचे मुकामी येऊन विदित केले की श्री देव मौजे मजकूर येथील नवरात्राच्या घटाचे बकरे दसरियास मारितो त्याचे फरे आम्ही मोकदम घेतो भोगवटा बहुत दिवस चालला आहे साल मारी जानोजी बिन वाल्होजी व + गाजी + + + बीन सोनजी व पदाजी बीन मायाजी व सोनजी बिन राणोजी वाल्हेकर मौजे मजकूर याणी आडथळा करून फरे घेऊ दिल्हे नाही म्हणोन त्यावरून सदरहू वाल्हेकर यास मसाला करून पुण्याचे मुकामी आणून पुरसीस केली तेव्हा वाल्हेकरानी कतबे लेहोन दिल्हा की इंगूलकर मोकदम मौजे मजकूर हे चालीस वर्षे फरे जबरदस्तीने घेतात आमचे माहालात व भोवर गावी घटाचे बकरीयाचे फरे मोकदम घेत नाहीत माहालात भोवर गावी घटाचे दसरीयाचे फरे मोकदम घेतात यैसे जाहल्यास गुन्हेगारी रुपये पाचशे देऊ याप्रा कतबा छ १५ (आश्विन वद्य ३ आक्टो. १) जिलकादी दिल्हा आहे त्यानंतर इंगूलकरानी कतबा लिहोन दिल्हा की आपले खेडेबारे येथील भोवर गावी दसरीयाचे घटाचे बकरे मारितात त्याचे फरे मोकदम घेत आसतात येसी चाल भोवर गावी व माहालात आहे जरकरिता चाल नाही यैसे जाहल्यास गुन्हेगारी रुा ५०० देऊ याप्रमाणे कतबा छ १५ जिलकादी दिल्हा त्या उपर जामीन राजीनामे घेऊन देशमूख देशपाडे ता। मा।र यासी येविसीच्या चवकसीविसी पत्र व आमीन राजश्री बाबूराव आपाजी पा। देशमूख देशपाडे मौजे मा।रास येऊन ता। मा।रचे पाटील आणून चवकसी केली काही गाव चवकसीचे राहिले म्हणोन देशमूख देशपाडे ता। मा।रचे व बाबूराव आपाजी कवडण-पुरास जाऊन तेथून देशमूख व देशपाडे याणी पत्र व ता। मा।रचे गावगनाची याद बिा

यादी गावगना ता। खडेबारे येथील
पाटील दसरीयाच्या बकऱ्याचे फरे
पुढील घेतात कोण व न घेतात कोण
याची चवकसी सु॥ खमस समानीन
मया व अलफ मार्गसीर्ष वद्य ५ (डिसें. १) ता।
मा।रचे देहे ४० पौ। वजा देहे

१ कसबे सिवापूर
१ हली कज्यामुले मौजे कामथडी

२

बाकी देहे ३८ याचा तपसील चौकसीमुळे

बकऱ्याचे फरे घेत नाहीत		बकरीयाचे फरे घेतात देहे
	देहे	१ मौजे खडकी
	२४	१ मौजे कापूरवाहाल
चौकसी होणे	देहे	१ मौजे कामरे
१ मौजे सिंदेवाडी		१ मौजे देगाव
१ मौजे धांगवडी		१ मौजे हरचंद्री
१ मौजे सारोले		१ मौजे केतकवले
१ मौजे देवढी		१ मौजे खोपी
४		१ मौजे निगडे
कज्यामुळे आमान		८
१ मौजे वर्ये		
१ मौजे काजले		
२		

येणे प्रमाणे आडतीस गावचा तपसीले यादी चिटको कृष्ण आजहत देशपाडे निा राजश्री पंत सचीव याचे हातची

येणेप्रमाणे यादीं व पत्र देशमूख देशपाडे याणी कोडणपूरचे मुकामीहून बाबूराव आपाजी कारकून याजबरावर पाठविली त्याजवरून: वाल्हेकरास याद दाखऊन तगादा केला वाल्हेकर धटाईस आले त्यास वाल्हेकरानी कतबाच लिहोन दिल्हा आहे की इंगूलकर मोकदम चालीस वर्षे बकरीयाचे फरे घेतात देशमूख देशपाडे याच्या यादीस आठगाव बकरीयाचे फरे घेतात याप्रमाणे लिहिले आहे त्यावरून मनास आणिता चालीस वर्षे भोगवटा वाल्हेकराचे तकरीत आठ गावचा दाखला भोवर गावी आहे त्यावरून बापूजी पाटील इंगूलकर मोकदम यासी भोगवटीयाप्रमाणे घटा पुढील दसरीयाचे बकरे श्री–देवापासी मारितात त्याचे फरे पुढील द्यावयाची आज्ञा करून हे पत्र दिल्हे आसे तरी पेशजीप्रो पुढील बकरीयाचे फरे घेऊ देणे जाणिजे छ १२ सफर

हुजूरांकडून आलेलीं वस्त्रें

ले. ७३ (३०४) श्री { श. १७०७ / इ. १७८५ पूर्वी

यादि राजश्री महिपतराव त्रिंबक यास हुजरून वस्त्रे पा बो सनगे यो आख

८१	तिवट	१
१२०	जाफरखानी	१
१२०	जामेवार जरी	१
३७॥	किनखाप	·॥·
३५८॥		३॥

यो सनगे साडे तीन आख सुमारी तीनसे साडे आठावन पा आसे छ २२ रासर

गळ टोंचावयाचें वतन

ले. ७४ (१०४) श्री तालीक { श. १७१० / इ. १७८८

राजेश्री गणेश भिकाजी गोसावी यांसि

सुा तिसा समानीन मयां व अल्फ तुलाजी सुतार लोहार को सासवड याणे हुजूर विदित केले की का मजकूरचे लोहरकीचे काम व श्री बहीरवाजवळ चैत्री पौर्णिमेची यात्रा भरते तेथे गळ टोचावयाचे काम मजकडे व सुतारकीचे येथाविभागे भाऊपणीयाप्रो चालत असता सुतारभाऊ लोहरकीचे कामास व बगाडाचे गळ टोचावयास अडथळा करितात येविसी ताकीद जाली पाहिजें म्हणौन त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी तुलाजी मजकूर याजकडे लोहरकीचे व बगाडाचे गळ टोचावयाचे काम सुदामत चालत आले असेल त्याप्रो चालवणे दरम्यान सुतारभाऊ गैरवाजवी दिकत करीत असल्यास ताकीद करणे जाणि [जे] छ १२ रजब मोर्तब सुद

बलुत्याची वाटणी

ले. ७५ (४७) श्री { श. १७२१ / इ. १७९९

यो बलुते याजवर बयेदामुळे येक साला सुा मयातैन व अलफ रुा

४० कास थोरली
- १० सुतार
- १० चाभार
- १० माग
- १० माहार
- ४०

२० कास मधील
- ५ कुभार
- ५ न्हावी
- ५ परीट
- ५ लोहार
- २०

१० धाकटी कास
- २॥ जोसी
- २॥ गुरव
- २॥ सोनार
- २॥ मुलाणा
- १०

७०

पो वजा माहार वतनावर चाकरीस नाहीत सबब रुो १० बाकी रुा ६०

संबळ वाजविण्याचें वतन

ले. ७६ (२६३) श्री { श. १७२१ आश्विन वद्य ३ / इ. १७९९ आक्टो. १६

आजस्वारी राजश्री बाळाजी रघुनाथ कमाविसदार कसबे खेड सिवापूर ता॥ खेडे-बारे ता॥ मोकदम मौजे गराडे सुा मयातैन व आलफ यचु बिन भा + वा न नाथ

गोसावी वो मौजे विंग याने पेठ सिवापुरी राजश्री रगो बाबूराव हावालदार ता। मार याचे घरीं गोधळ दिवटी सबल व तुतुने वाजऊन घातला त्याजवरून सासरू बिन येल-दास गोधली चाबलीकर हली वो पेठ सिवापुरी राहातो त्याने फिर्याद केली जे बचु मार गोसावी असता दिवटी व सबल व तुतुने वाजवावे याचे कारण नसता वाजविले गराडकर गोसावी याचे सोला आलामीतील हा बचू नव्हे त्यावरून हारदोजणाचे कतबे घेऊन हा रोखा तुम्हास सादर केला आस तर तेथील गोधले याची चौकसी पाहून वाजबी निवाडा होऊन ठरले आसेल त्या पत्राची नकल पा। देणे आणि बचू मार सोला आसामीतील आहे नाहीं हे तपसीलवार लेहून पो त्याप्रो हददोजणाचे विल्हे लाविले जाईल जाणिजे छ १६ जावल मो सुद मोर्तब

सुद

महार-मांग वाद

श्री

ले. ७७ (पत्र नं. ३) { श. १७३२ इ. १८१०

(अत्रे-गराडे) (नकल-मोडी)

करिणा बो सिदनाक वा बहीरनाक गाइकवाड माहार मेहेत्रा मौजे गराडे ता। करेपठार प्रा पुणे सुा इहिदे आशर मयातैन व आलफ सन १२२० कारणे साहेबाचे सेवेसी लेहून दिल्हे ऐसाजे माझा व कृष्णा माग मौजे मार याचा वाद हाली लागला आहे त्यास पूर्वी पासून गावचे भोवता टोणगा फिरतो त्याचे पुढे पेढ्याची घागर आम्ही माहार घेऊन जातो व नगाऱ्याची लईस आम्ही मुलाणा पासी हालाल करून तिचे काताडे काहाडून घ्यावे मागाने काताडे घेऊन नगरा मढवावा व मागाचे घरी ढोर मेले ते आम्ही माहारानी न्यावे या प्रमाणे चालत आसता माग म्हणतो की आमचे माहाराचे काही नाही त्यास पूर्वी प्रो आमची आम्ही वहिवाट करीत आलो आहो हाली चैत्रमासी मागाचे घरी बैल मैत जाला तो मी ओढून नेऊ लागलो त्यास माग आडवा आला तेव्हा बैल सध्याकाळ पर्यंत पडला तेव्हा पाढरीकडे माग फिर्याद गेला त्यावरून पाढरीने मजला बोलाऊन सांगितले की ढोर पडू देऊ नका तुम्ही बैल नेऊन याची भाजी तुम्ही माहारानी घ्यावी आणि काताडे काहाडून चाभाराचे घरी आमानत ठेवा तुम्ही उभयेता पुण्यास जाऊन सड आणावी त्या प्रमाणे करू म्हणौन माग सड आणावयास पुण्यास आला व मीही पुण्यास आलो तो गावकरीही पुण्यास आले होते

चोरीच्या बंदोबस्ताची हमी

ले. ७८ (२४३) श्री { श. १७४० कार्तिक वद्य ३ / इ. १८१८ नवंबर १५

कुपणी सरकार

मणके राघोजी व बाळाजी वलद म्हालाजी व माणकोजी वलद दादजी व बापू बलद कालोजी व दवलता वा। कुसाजी नाईक रामोसी वतनदार मौजे गराडे ता। करेपठार तालुके पुरधर सुभा पुणे सन १२२८ फसली कारणे कतबा लेहून दिल्हा ऐसीजे आम्ही मौजेची रखवाली करून आपला मामूल सिरस्ताप्रो घेऊन मौजे मारी सरहद्यत चोरी छेपी काही येक वगैरे जाली यात आम्ही भरून देऊ यात काही चुकल्यास आपल वतन सरकारास सोडून देऊन सरकारास गुन्हेगारी देऊन सरकार सिक्षेस हजर राहून म्हणौन खुद राजीने कतबा लेहून दिल्हा सही सन १८१८ इंतवी च तारीख छ १५ नवबर

नि॥ तीरकमठा

हक वसुलीची परवानगी

ले. ७९ (२९१) श्री नकल { श. १७४० मार्ग. व. ७ / इ. १८१८ डिसें. २०

नंबर ९३ सिका

कपटन हनरी डंडास राबटसन साहेब कलकटर सुभा पुणे यानी

इजत असार नारो तुकदेव आमानत मामलेदार पो। पुरंदर बफायत बाशद दरविला पा। मजकुरात ता। निरथडी व ता। करेपठार येथील जमेदार देशमूख व देशपांडे व पाटील कुलकर्णी यांनी हुजूर येऊन अर्ज केला की आमचे हक मुकर आहेत आम्ही गावगना परभारे वसूल करीत आसंतो त्यास साल मारी हक वसूल करण्याचा हंगाम हेच दिवस पुढे राहिल्यास रयेत लोकास बहुत जिकर पडल यासाकरिता मामलेदार यांस पत्र देऊन गांवगना मामूल हक चालत आले आहेत याप्रो गावगनास ताकीद करवून वसूल चालता करावा म्हणौन अर्ज केल्यावरून तुम्हास पत्र सादर केले आसे तर गांवगना ताकीद करणे जे सदरहू जमेदार याचे हक मामूल पासोन चालत आले आहे त्याप्रो देऊन रसीद घेणे याप्रो ताकीदा पाठवणे व तुंम्ही जामिदार याचे हकास अडथला न करणे जाणिजे बतारीख छ २० दिशंबर सन १८१८ ईसवी

(पत्राच्या पाठीवर) इंग्रजी आक्षर

सिका हुकूम कुपीण इग्रज बहादुर कलकटर पुणे असल बमोजी नकल असल मामलेदारापासी ठाणे जेजोरी

गंध लावण्याचा अग्रहक्क

ले. ८० (२३९) श्री गजानन प्रा { श. १७४१ चैत्र शु. २
इ. १८१९ मार्च २७ }

मसुदा

राजश्री जोसी कुलकर्णी आत्रे मौजे चावली स्वामीचे शेवेसी

पोा. बोकील जोसी कुलकर्णी मौजे हिवरे सा नमस्कार विनंति उपरी तुम्ही पत्र पा ते पावले पत्रात माार की संवत्सर प्रतिपदेस देवली पच्चांग श्रवणास सर्वत्र मिलतात तेव्हा आगोदर जोसी वगैरे दुसरे कोणी ब्राह्मण असल्यास त्यास गंध लाऊन मग मानकरी पाटील यास गंध लावावे ऐसी चाल पूर्वापार आजपरियंत चालत आली ऐसे आसता आज पाटलानी खटला करून गुरवास सांगून आम्हांस गंध न लाविता पाटलानी आपले कपाळी गंध लाऊन घेतले याजमुळें त्याचा आमचा खटला बहुत जाला भोंवर गांवची चाल पाहावी असे पाटील म्हणतात त्यास तुमचे गावी गंध लावावयाची व लग्नात वगैरे विडे द्यावयाची चाल कसी आहे ती लेहून पाठवावी म्हणोन लिाे त्यास संवत्सर प्रतिपदेस वगैरे गंध लावणे ते आगोदर जोसी यास लाऊन मग आणिक कोणी ब्राह्मण आसल्यास त्यास लावावे नंतर मानकरी पाटील यास लावावे व लग्नात वगैरे विडे देणे ते आगोदर जोसी यास देऊन नंतर मानकरी पाटील यांस देतात याप्राो चाल पूर्वापार आमचे गांवी चालत आली आहे मिा शके १७४१ प्रमाथीनाम संवत्सरे चैत्र शुा २ बहुत काय लिाे लोभ करावा हे विनंती तुमचे गांवचे बालाजी बिन मोघाजी पा कामथे व कालोजी राजगुरे काल प्रतिपदेचे दिवसी देवली पंच्यांगश्रवणाचे समारंभांत आले होते त्याणीहि याप्राो पाहिलेच आहे बहुत काय लिाे हे विनंति

सुतार वेठीचा बोभाटा व ताकीद

ले. ८१ (१७) श्री { श. १७४४
इ. १८२२ पूर्वी }

+राजश्री माहादाजी माणकेश्वर स्वामी गोा विनंति उपर कोा सासवड येथील सुतार यांस बेगारीचा उपद्रव बहुत लागतो म्हणोन बोभाट आला त्यास तुम्हास वाड्यात व पदरचे लोकास सुताराचा उपद्रव न करणे वाड्यात सुतार लागला तर चिठी मोर्तबाची करून देणे आणि सुतार आणावे दरम्यान कोणाचा उपद्रव कसा लागतो हे तपसीलवार लेहून पा राा छ २५ सफर हे विनंति

+ त्र्यंबकराव महिपत उर्फ नाना पुरंदरे याची स्वदस्तुरची चिठी.

दोन गुरव भावांचा तंटा

ले. ८२ (१५६) श्री { इ. स. १८२२ पूर्वी

राजश्री त्रिंबकराव नाना गोसावी यांसि

द सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य—श्री सटवोजी जाधवराव कृतानेक दंडवत विनति येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष राजश्री बापूकडे हिवरीचास गेलो होतो तेथें हिवऱ्याच्या पाटलानी रा। बापूजवळ सिदू गुरव उभा केला तेसमई रा। बापूनी सिदू गुरव हातीं दिल्हा की याजउपरी तू दियात जाऊन राहाणे त्याजवरून हा आम्हापासी येऊन राहिला आहे त्यास कोठीतील पीठ देतो त्यास सिवा गुरव व सिदू गुरव याच्या भाडनाचा पाढरीने हाड भाऊ नव्हे म्हणून पाढरी वदली त्यास सिवा गुरव आज बहुत वरसे स्रात आला आहे इतके मात्र आहे त्यास ह्या उभयता गुरवास कोन्हे पधतीने गाव चालयायास लावावे जे आपल्या चितात असल तैसे लेहून पाठवावे त्याप्रमाणें उभयेतास सागून सिदू गुरव वडील सिवा धाकटा येसे आहे त्यास वडील धाकटे कैसे नादवावे ते मन खुलाशाने उतर पाठवावे त्याप्रा करू राजश्री खंडोपंत व मलबा व रामाजी रगनाथ अवघे पानसी आहेत याजकरिता आपले उतर आले म्हणजे अरणे (आज्ञे!) प्रमाणे सागू बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे याजउपरी रागाचे हाती न द्यावे रा। बापूनी सागितले याजकरिता आपणहि कृपा करून सिदूचे वडीलपण राखून उतर पाठवावे त्याप्रा करू *ह विनती

चाकरी करणारे महार व त्यांचें उत्पन्न

ले. ८३ (७६) नकल { श. १७७४ / इ. १८५२

यादी वतनदार माहार मौजे गराडे तर्फ करपठार तालुके पुरंदर मौजे मा।र येथील उत्पन्न चाकरी करितात सा। स. १२६२ फसली

---

१ पिलाजी जाधवरावाचा मुलगा सटवोजी जाधवराव यानें हे पत्र त्र्यंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यास लिहिलें. पुरंदरे हे मौ. दिवे गांवचे देशपांडे होत. पत्राचा काळ अंदाजें इ. स. १८२२.

* हे शब्द सटवोजीचे हातचे असुन 'ह' व 'ती' हीं दोन अक्षरें बालबोधींत आहेत व 'विन' ही अक्षरें मोडींतील म्हणतां येतील.

१६०४०११ इनाम जमीन बिघे ६६ आकाराप्रमाणें रुपये ३१०१०६६
पैकी वजा सरकारात द्यावयाचे ते हडवल्याबद्दल
शा बाकी १५०५०७

७७०१४ खेरीज

६० गला

३७८८ बलुते गला खंडी १। दर ०॥= प्रमाणे

३७८८

२२८८ भाकरीबदल गला ॥। दर ०॥= प्रो

६०

५ वैरण बलुते याजवा

१२ गावची गुरे मरतात त्याबद्दल सर साल

०१४ वाणियाकडील तमाखू सुमारी

७७०१४

६४०२०११

यासी चाकरी करणारे आसामी खाली लिहिल्याप्रमाणे

गाईकवाड

१ बिठू वा। लिंबनाक
१ सदू वा। लिंबनाक
१ जोगू वा। बलनाक
१ राघू वा। बलनाक
१ विठु वा। बलनाक
१ कोंडी वा। सुबनाक
१ रामा वा। सिद्नाक
१ धोंडी वा। सिद्नाक

८

१ देवजी वा। नावनाक
१ आबू वा। तुकनाक
१ हरी वा। आबू
१ मालू वा। बहीरजी
१ बापू वा। बलनाक
१ जोती वा। सिवनाक
१ मालू वा। सिवनाक
१ कुडल्या वा। सिद्नाक
१ लक्ष्मण वा। सिवनाक

९

१७

यादी वतनदार रखवालदार रामोसी मौजे गराडे ता कडेपठार

इनाम

२५०८ बलुते गला ०॥० दर ०॥= वैरण

२२०८ ३

०१४ पांढरगणा वाणी याजकडील

०४ वाटसरे याची बिऱ्हाडाबा

६ गावचे रयेत याजकडून सुखवस्तू याजपासून

१ चिलार खातून दर साल पावत जावे ते

३३०१०

३ वतनदार

१ बाबूबा दादजी १ बाबा बा राघुजी १ देवजी बा बनाजी

३

२ उपरी

१ सतू बा भवानी १ विठू बा भवानी

१ नौकरीखेरीज जोगू बा बहीरजी

मांग याजबा

२१ बलुते गला ०॥० दर ०॥= वैरण

१८ ३

० इनाम वगैरे

२१

पाटील याजबा

५७०९०१ इनाम

१०१२ पांढरगणा

५९०५०१

तपसील

२९०१००५ भगवंतराव कुंजीर पा मो

१४०१३०४ सालोजी बालोजी

१०७०९ खुद ०११०१० सदासीव ०१००१० रंगूजी १०७०९ गोपाळा भिवजी १०७०९ म्हसकू भगाजी ०७०११ सखाराम मुला ०७०११ आंदोजी मुकनाजी ०७०११ नारायेण ३०११०४ रामजी ३०११०४ कृष्णाजी मोराजी

१४०१३०४

१४०१३०४ येसाजी कुसाजी

३०११०४ खुद ०१४०१० बाबू हैबतराव ०७०६ लक्ष्मण बाळोजी ०७०५ सखाराम होनाजी ०७०५ सदाशिव विठूजी ०७०५ जया कोम राघू ०१४०१० कृष्णाजी रामजी ०१४०१० खंडू बाळाजी ०१४०१० महादजी सिदोजी ०७०५ पांडू संताजी ०७०५ खंडू संताजी ०१४०१० त्रिंबकजी ०१४०१० येसू बापूजी ०४०११ काळू बापूजी ०४०११ येमाजी लक्ष्मण १०१०४ येसु म्हतारजी १०१०४ अनाजी भानजी

१४०१३०४

५९०५०१

कुलकर्णी

३८०१३०५ नख्त ०१४ पांढरगणा

९९०११०५

४९०१३०८ शंकराजी बाबुराव खुद

४९०१३०९ आबाजी त्रिंबक

८०५ खुद वराडे ४०२०५ सिताराम मल्हार वराडे ४०२०५ केसो आबाजी देवशे ८०५ हरी रघुनाथ खुद ४०२०६ कृष्णाजी शंकर वराडे ४०२०५ नारो सखाराम देवासे ८८५ व्यकटेश राजाराम सिंदे लस्करात ८०५ गणेश भगवंत गणेगाव

४९०१३०९

चोरीच्या बंदोबस्ताची हमी
उमाजीच्या भावाचें पत्र

ले. ८४ (३३)

श्री

{ इ. १८५४ सप्टें
{ श. १७७६ भाद्रपद व. ७

राजश्री मोकदम मौजे गराडे
गोसावी यासि

बा। दा। संयाजी ना। बिन दादजी नाईक खोमणे रामोवसी किले पुरधर व दादजी बिन कोडाजी ना। चव्हान रामोसी वा। किले पुरधर रामराम विनति उपरी कारणे कागद लेहून दिल्हा ऐसी जे तुमचे गावची रखवाली चाकरी पतकरिली आहे त्यास गावात चोरीमारी होईल त्याचा थाक माग लाऊनदेऊ थाक माग न लाऊन देऊ चोरी भरू (न) (दे) ऊ येणे प्रमाणे करारनामा लेहून दिल्हा आसे तुम्ही आम्हास पोटास

१ सुप्रसिद्ध उमाजी नाईकाचा भाऊ

जला केली बारुले मावे दोन खडी व नख्त रु॥ ५० पनास तुम्ही आम्हास द्यावे आम्ही चाकरी करावी रखवालीस आंतर पडले तरी तुम्ही आम्हास पोटास देऊ नये हा करार-नामा लेहून दिल्हा सही मिती भाद्रपद वा। ७ शके ( ) आनदनाम संवत्छरे छ + +वी॥ राघो चिंतामण जोसी नि॥ शंकराजी बाबुराव आत्रे जोसी कुलकर्णी मौजे मा॥र

कुळकर्ण्याचा मुशाहिरा

ले. ८५ (५३)

राजश्री शामजीपंत दाणी यासी आचलोजी पा॥ कुभारकर मौजे वणपुरी दंडवत विनंति उपरी हाली सालचा मुशाहिरा कुलकर्णी याच्या बारुले ८३ तीन मण तुम्हाकडे आले त्यास येक दोनदा तुम्हास कुलकर्णी याने दाणे मागीतले तुम्ही गैगुद्र करिता तरी हे गोष्ट कामाची नाहीं खडणीस जावे लागते त्यास कुलकर्णी येत नाहीं तरी तुम्ही कुलकर्णी यांचे दाणे देणे याचा बोभाट न घेणे जरी करिनां दाणी याची हैगै केली तरी श्रीमंत राजश्री नानापासून दाणियाबद्धल वरातदार परभारे येतील मग आम्हास बोल नाहीं तरी पत्रदर्शनी दाणे देणे याचा जाब पाठवणे बहुत काय लि॥ हे विनंति कुलकर्णी याकडे जाऊन त्याची समजावीस करून (त्यास) खडणीस ये येसे करणे विनति

पाटिलकीस भाऊबंदाचा विरोध

ले. ८६ (१२५)

श्री

श्री मोरया

पूर्वीचा संप्रदाय आपणास विदितच आहे विशेष येथील वर्तमान फालगुण शुध प्रतीपदा येथास्थित आसे आपले वर्तमान लिहीत आसिले पाहिजे यानतर बहुत दिवस जाले पत्र येऊनू कुशल वर्तमान कललें नाही तर येणार मनुष्याबराबर कुशलवृत्त लिहीत आसिले पाहिजे यावर सुभानजी पा॥ कालोखा मौजे देहू याच्या वडिली पाटीलकी केली सांप्रत हा करिता येसियासि याचे भाऊबद यासी कलह माडिला आहे याजकरितां सुभानजी पा॥ आपल्यापासि आला आहे वर्तमान याचे चितास आणून येथान्याये करून आपल्या गांवावर सुखरूप नादेत ते गोस्टी केली पाहिजे येथान्यायास आंतर न होये ते गोस्टी करावी विशेष लेहावे तरी मुज्ञ आसा कलले पाहिजे विशेष काये लिहिणे

---

१ माथ्यावर 'श्री मोरया' असा साधा बालबोध शिक्का व 'पूर्वीचा संप्रदाय आपणास विदितच आहे विशेष' अशा आरंभाने लिहीले गेलेलें पत्र चिंचवडकर देवांच्या मठांतून मठपतीनें लिहिलेले समजावें.

वतनदारांचा सांभाळ

लें. ८९ (६५) श्री
छ ५ जावल

राजश्री माहाद्‌जीपंत देशपांडिये कसबे

सासवड गोसावी यांसि

द अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्ये——श्रो देशमूख व मोकदम कसबे मजकूर दडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष तुम्ही जासूदा समागमे पत्र पाठविले ते प्रविस्ट होऊन लेखनार्थ आवगत जाहाला त्यास मौजे वनपुरीस माणसे पाठऊन वतनदार कुभारकर मल्हारजी व परसोजी व सखोजी जैतजी व सकराजी कुभारकर येसे कबिला समेत कसबे मजकुरास छ २ जावल आणिले सेत व घर त्याच्या हवाला केले जो कुणबी सेत घर मागेल त्यास आम्ही आपली खुद त्यास यावी सुभानजी भिवरा तेथे आला आहे त्यास येथे पाठवणे ईश्वरे कुभारकराचा वंश वाढविला आणि त्यास सेतेघरे पाहिजेत तर आम्ही आणिखी दाहा यावयास तयार आहो बहुत काये लिहिणे तुम्हास येत समई आण घातली आहे तर राजश्री बाबास दोन्ही साज जेवावया घालीत जाणे ये गोस्टीस आतराये येकदर न करणे राजश्री धोंडोबास गावास पाठवणे बहुत काय लिहिणे रुपा लोभ आसो दीजे हे विनंति भिवरीयास कागद कुभारकराचा आहे तो त्यास देऊन रवाना केले पाहिजे बहुत काये लिहिणे हे विनंति कुंभारकरानी वाडियातील नवसूबाई यास पत्र लिहिले आहे ते त्यास प्रविस्ट करून भिवरीयास तेथून काढून वाटे लाविला पाहिजे बहुत काय लिहिणे हे विनति नवसूबाईचे व आहे ते आपले ते विचारे जाले तर नवसूबाईस प्रविस्ट करून पारपत्य परभारे करवणे बहुत काये लिहिणे हे विनति

होळीची पोळी याबद्दल वाद

लें. ८८ (८६)

[आरंभीचा मजकूर गहाळ]

हुढीपासी देत आली त्यास तीस ते बतीस वरसे होयास आली त्यामागे येक होळी होऊन दोघांच्या पोल्या लागत आल्या आहेत पुरातन दोन होल्या नाहीत याजकरिता येकेच होळी पहिली चालत आली आहे त्याप्रा करावीं नाहीतर पस्चमेस सिदोजी नरसिंगराऊ यांची होळी होत आहे पूर्वेस तुम्ही करावी येसे सांगितले त्यावरून त्याणी आपले जागा विचार करून आवघे विचारे निश्च(य) जाला की सिदोजी नरसिंगराऊ यांची होळी आहे त्याचे उतरेस दाहा हात जागा मधे टाकून विठोजी नाईकांची होळी

करावी पलीकडे पांच हात जागा आणीक टाकावी त्यास हे जागा आवघी सिदोजी नरसिंगराव याजकडील आहे त्यास जितकी जागा होळीचे पायेमालीखाले असेल तितकी जागा दुसरी समाईकपैकी सिदोजी नरसिंगरायास द्यावी याप्रमा करार आणांच्या वाडियांत जाला त्यास आणा निद्रेस गेले होते मजूमदार भोजनास गेले होते मग हे वर्तमान सांगावयास येणेप्रा मजूमदाराच्या घरास गेले बीा

सिदोजी नरसिंग रयाकडी	विठोजी नाईंकाकडील
२ सखो रघुनाथ नारो मोरेश्वर लोलेकर	१ नानाजी बाजी
१ त्रिबकजी सेट्या	१ सटऊ करम + उ
	१ धाकट्या + + + + +

सिपी रंगारी यांची वहिवाट

ले. ८९ (१३८) श्री

म्हणौन आज्ञा त्यास सिपी व रगारी याचा वहिवाट पहिले चालीप्रमाणें हाली चालत आहे नवीन नाहीं

कुणब्यावर जबरदस्ती

ले. ९० (२००) श्री {

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत व राजश्री कुसाजीपंत वरवंडकर स्वामीचे सेवेसी

पोष्य मल्हार तुकदेव कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल फाल्गुन शुध येकैादसी जाणून स्वकींये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष राणोजी पाा दियेकर मौजे मजकूर याणी येऊन सांगितले की गावी + + + + दुर्बाळाचे (!) घरी लग्ने होतात पाघरावयाचे पासोडीवर नंद काढून लग्न लावितात नंदाची पासोडी जोसी याकडे जाते त्यास चवल पावला अरधा कूल पाहून देतो आण ती पासोडी सोडवितो येैसे जोसी कुलकरणी याचे व आपले पूर्वापार चालत आलें दुसरी गोष्टी बलुते जोसा याचे देणें ते कूल पाहून सेत पाहून पिकासारिखे देत आलों तेहि घेत आले सांप्रत नंदीची पासोडी अगदींच बलकाऊं लागले व बलुत्यास सेतोसेती कुसाजीपंत रांगड्या बटकी घोडे देऊन पाठवितात बटकीचे मनास येईल तसे गूड बांधून सेतकरी याकरवी घोडीयावर काबाड लादऊन घेऊन येतात कुणबीयाने उजूर केला तर बटकी सिवीगाल करितात

सदरहू मजकुराकरितां कुसाजीपंतास नीतीने सांगावयास गेलो ते आपल्यावर काठी घेऊन मारावयास धांवले येसे कितेक प्रकारें उपद्रव करू लागले ते जोसी कुलकरणी आपण पाटील त्याचा उपसर्ग आपल्यास कसा सोसतो आपण गाव टाकून जातो श्रीमंताकडे अगर दरुनीमहालकवाडे फिर्याद करावी तर ते तु (मचे) सोयरे यास्तव तुम्हाजवळ विदित करावयास आलों येसे सांगितले त्याजवरून स्वामीस लिहिले आहे तर पूर्वांपार याचे आपले चालत आले असेल तेणेप्रा चालावे नवीन करावे येसे नाहीं दूर दराज जाऊ द्यावे येसे नाहीं आढळला. मजकूर स्वामीस लिहीला आहे यांत आपणास उतम दिसेल तें केलें पाहिजे ब्राह्मणटिके पाच परतणे पहिल्यापासूनं इनाम असतां हालीं दाहा परतणे जबरदस्तीने खातात ज्या कुणब्याचे सेत जाजती पांच परतणे घेतले तो कुणबी श्रमी होतो म्हणून सांगितले तर सेताचाहि माार कसा असेल तसा समजणे + बहुत काय लिहीणे लोभ दीजे हे विनंति

भरणी श्राद्धाचा वतनदार ब्राह्मण

ले. ९१ (२१३) श्री { उत्तरपानिपतकाल

सेवेसी मोरो हरी सां नमस्कार विज्ञापना पिराजी देशमूखाचे वाडियात कलह भारी जाहला म्हणून ते श्रमी फार होऊन भरणीश्राध परकी ब्राह्मणापासून करवावे येसे म्हणत होते त्यास श्रीमंत राजश्री बापूनी त्यास पष्ट सागोन आबाचे वाड्यातील ब्राह्मण देविला आहे भरणी श्राध होईल कलहाचा फडशा आज उद्या होऊन त्याची समजी होऊन पूर्ववतप्रा चालते करितील आपली मर्जी यथास्थित असावी हे विनंती

गोंधळ कोणी घालावा

ले. ९२ (२२७) श्री { पानिपतपूर्व

निवाडपत्रें जोगी मराडी याजपासी आहेत गोधले खोटे जाले याची थलपत्रे

१ पैठणच्या धर्माधिकारी यांचें पत्र

२ जयाजी सिंदे यानी इनाफ (इनसाफ !) करून पत्रे दिल्ही

१ देशमूख देशपाडयास

१ गोधल्यानी बेदावीयाचा कागद दिल्हा

२

१ सिंहगडाचा कागद कोंढाणपुरी दसनाम सन्यासी यानी इनसाफ करून हवालदाराने निवाडपत्र करून दिल्हे

० कनेर

४

येकूण च्यार पत्रे सिक्यानशी आहेत जे गोधल म्हणजे भक्तिमार्ग ज्याच्या चितास येईल त्यानीं गोधल घालावा केवळ गोंधळ्यानीच गोधल घालावा येसा शास्त्रार्थ नाहीं व परिचारहि नाहीं सुखरूप गोधल घालावा गोधल्यानी डवरे गोसावी यास अडथला करूं नये येसी पत्रे आहेत

वतनदारीचा हक्क कसा बुडवितां?

ले. ९३ (२३५) श्री { उत्तरपानिपत

सेवेसी विज्ञापना येसी जे संतछर प्रतिपदे आढ्यापासी आवघे येऊन वाटणी रुपयाची घेणार त्याचे विचारे कीं खुर्दा करून पैसा आदेला अवघ्यास वाटणी येईल तैसा घ्यावा याजकरिता आपणास हे वर्तमान सासवडी सागितले आपण आज्ञा केली की दोन वाटे रुा ·॥· नागेश भट व सरकार रुा दोन वाटे, दोन राहिले ते पानवडक्रिास येक व पिंपलेकरास येक याजप्रो द्यावे वरकड गावातील मात्र सर्वास येईल तैसे घ्यावे त्यास पिंपलेकर येकतील तरी उत्तम नाहीं तरी आपली आज्ञा येईल त्याप्रो वर्तू यानंतर विठल भटानी लोखंडे माहारास मोहूर्त मोहूर्त पाटाचा दिल्हा की ब्राह्मण नलगे म्हणून सागितले मग माहारानी माहूर्त ब्राह्मण नसता लाविला तो माहारास माधवराव यानीं बोलाऊन पुसिले कीं बिभीच्यार केला ब्राह्मण नसता केले ते ठीक जाले नाहीं त्यास माहारानी लेहून दिल्हे की विठ [ल] भटानी सागितले तैसे केले मग भटजीस पुसिले कीं वतनदारीची हक बुडविता हे काये मग भटजीनी आपा जगनाथ यास गालीप्रदाने केली मग भटजीचे घरीं चौकी बसविली की गुन्हेगारी पंचवीस रुा देणे व मोहूर्त दुसऱ्यास न सांगावा येसे लेहून देणे मग चौकी उटऊ भटजी येकत नाहींत वद्य येकादसीस पाणी बंद केले चूल पेटऊ दिल्ही नाहीं शनवारी आवेत कैसे होईल पाहावे कलावे आढ्यात्रे रुपयाचे काये करावे याचे उतर कृष्णाजीपंत दादास ल्याहावे कलले पा सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

देशपांडे यांचे कानू कायदे

ले. ९४ (२३६) श्री {

यादि फेरीस्त देसपाडे पा खटाऊ कानू कायदे चालतात

१ तश्रीफ वडील घेता मागे धाकटे

१ दस्तक उभयताचे नावे

१ इनाम जमिन ८ आठ चावर आहे त्यास वडिलास चावर

१ हक दर सदे ३ प्रा आकार होतो त्यास पाचवी तक्षीम वडिलास देता बाकी ४ च्यार तक्षिमा भाऊपणावर घेता

१ वानवला दर बिघा ००।. प्रा गला जमा होतो तो भाऊपणावर

१ तूप भाऊपणावर घेतो

१ बीजबूड गला गाव पाहून आहे तो वाटणी

१ सिमगा दर घरास बाटी येक द्यावे पोस्त करावे

१ गूळ दर बिघा ०॥. आहे भाऊपणी-यावरी

१ बाहे जमा दर घरास रुा ०।. भाऊपणा-वर

१ धुरुग (?) झाडे व बौशावली जे गावीची दाखविलीया तरी त्यामुले जे मिलेल ते भाऊपणावर

१ माहार पंधरवडा येता तो भाऊपणा

१ जोड भाऊपणा इनाम गाव बुडाल

१ तेली तेल घाणेबूड भाऊपणावर

१ माले येतात त्या भाऊपणावर

१ सेवधार भाऊपणावर

१ वाडा घर दाखवणे जाहाले पाच रुा मिलाले तरी भाऊपणावर द्यावे

१ खड गुन्हेगारी जाहालीया तक्षीम होईल त्यास पाचव्या हिस वडीलपणास बाकी भाऊपणावर

१ माहाजर लिा वरी वडिलाने वडील पाच रुा जाहले तरी १ येक द्यावे ४ च्यार भाऊपणावर

रुमाल वडिलाचे घरी कागदपत्र वडि-लाकडे

'वतनदारीस सर्वांस लागली आहे'

ले. ९५ (२५३) श्री

राजश्री देशमूख व देशपांडे व मोकदम काो सासवड गोसावी यासि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——— श्रो कोंडाजी नाईक व

संताजी नाईक चिव्हे व सुभानजी ना॥ रामोसी व समस्त सरदार किले पुरंदर रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे यानंतर हसनखान नाईकवाडी व दादूशा यांचा वाडा तुम्ही दुसरीयांस राजश्री जगोबा व भिवाजीपंत याजला नाईकवाडी मा॥र याजवर जबरदस्ती करून देतां म्हणोन वर्तमान ऐकिलें त्यास तुमचे भाऊ आस्तां दुसरियास वाडा यावा हें तुम्हांस उचित नव्हे ऐसें आस्तांहि बलेंच घर देत आसिला तरी श्रीमंत आलियावर जे होणे ते होईल वतनदारी सर्वांस लागली आहे येकाचे काढून येकास द्यावे हे बरे नव्हे सोयेवार दिसल ते तुम्ही करावे केले तरी येविशीचा जाबसाल तुम्हास करावा लागल तुम्ही तो करणार नाहीं यैसे परतु सूचना मात्र लि॥ असे *बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंति रा॥ छ २६ रजब

माहार-मांगाचा कजिया

ले. ९६ (३०८) श्री }

सिका पारसी

स्वस्तश्री श्रीमंत विराजमान्य राजमान्य राजश्री मोकदम व माहाजन व शेट्य व समस्त दाहीजण का॥ सुपे प्रां॥ मा॥र याप्रती श्रीमंत गादावरीतीर्थ विराजमान्य माहास्थन प्रतिष्टानस्थित धर्माधिकारी प्रमुक वेद्वैद्य वैदिक यथायथा मैन्य तै सि शा हा विशेष तुम्ही पत्र पा॥ ते पावले लि॥ वर्तमान विदित जाले तुम्ही लि॥ की का॥ मा॥रचे वतदार माहार व मागाचा सात व सेत सतका व पाल्याचा बैलाचा नैवेद्य व लक्ष्मीचे विरडे याचा कजिया पडला आहे याचा निर्णय स्वस्थानीहुनी होहून येईल त्याप्रां॥ हरदोजणांस वरतळन ऐसा करार केला त्याजवरून दोघाजणास राजीनामे जामीनया घेऊन येविसी हे विनंतीपत्र लिहून उभयेतास पा॥ आहेत आपनाला कजियाची मा॥र येविसी निवेदन करितील ते ध्यानास आणून सदरहू कलमाचा निर्णय करून लाखोटा करून पत्र पाठवावे त्या ऐनये आपली आज्ञा मान्य करून उभयता वादीयास लखोटा करून पत्र दिल्हे ते शेवेसी प्रविष्ट होईल तुम्ही पत्र लिहिले होते त्यात मा॥र की या उभयेताचा उत्पती व

---

* यापुढील मजकूर निराळे वळणाचा

उपजीविका शास्त्री आहेत परतु त्या उपजीवेकेमध्ये च्यार कलमाचे चाल आहे त्याचा तपसील शेवेसी लिहिला असे कलमे बिा तपसिल

काली व पाढरी मडप डहला माहाराचा असे त्यात मागाचे काही नाही कलम १

पाढरीचा होलीचा हेलगा मारितात तो माहाराचा असे यात मागाचे काही नाही कलम १

तुमचे गावी सांत म्हणता तेहि माहाराचा असे कलम १

पोल्याच्या बैलाचा नेवेद्य माहरच घेतात मागाचे काही नाही कलम १

सतका जेथवर वोवालून देतात तो मागाचा असे माहाराचे काही नाही कलम १

नवरात्रास जागणी मागिणी फिरतात ते पुण्य मागीचे असे माहाराचे काही नाही कलम १

सदरहू प्रो आपले प्राती चाल चालत आली आहे शेवेसी सांप्रतहि चालत आहे शेवेशी श्रुत होय सदईव रुपापत्री संतोषवीत जावे लोभ असो देणे व याप्रमाणे* क्षेत्री जी चाल वर्तातें पांच कल्माची लिहिली आहे तुमच्या गावची चाल तर तुम्हास विदित असेल चालीस शास्त्र प्रमाण असे किंच धर्मशास्त्रे ॥ यस्मिं देशे पुरे ग्रामे त्रैविदे नगरेपि वा ॥ यो यत्र विहितो धर्मस्तंधर्मं न्नैवलंघयेत् ॥१॥ अयस्मिं देशेय आचारः पारंपर्यक्रमागतः श्रृति स्मृति विरोधोपी सदाचारः सउच्यते ॥ २ ॥ या उभय वाक्याचा अर्थ चित्तात आणून हे उभयतां वादि प्रतिवा [दी] याचा कलह निवृत्ति करणे उचित असे किंबहुलेखनेनाभि ई न चूडामणी षु॥ इत्यलं* पत्रा प्रो साक्ष

भिकंभट धर्माधिकारी पत्राप्रो साक्ष मगलमूर्ती धर्माधिकारी

पत्रा प्रो साक्ष शामाचार्य हस्ते अक्षर रामांच्यार्य पुतने

पत्राप्रो साक्ष येशवत माहाजन भोर

पत्राप्रो साक्ष गोविंद हरबाजी भाा वासरे

पत्राप्रो साक्ष आमाजी सदासिव चौवधरी

पत्राप्रो साक्ष आत्माराम धर्माधिकारी

साक्ष गुमस्ते देशपाडे प्रो माार

साक्ष नारो त्रिंबक व वेकटराव जीवनराम आा देशमूख प्रो मादार पत्राप्रो साक्ष धोंडी लाटे पाटील

पत्राप्रो साक्ष निबजी खाबीट

बीाा मोरो नारायेण कुलकर्णी प्रो माार

* ह्या खुणेंतील मजकूर रुवें बाळबोधींत असून ओळीच्या आद्यंती उभे दोन दंड आहेत.

[पत्राच्या कडेच्या कोन्या जागेंतील आडवा लिहिलेला मजकूर]

श्रीमंत राजश्री कृष्णराव राजे जाधवराव देशमूख देशपाडे सरकार दौलताबाद वगैरे सजण माईं दिं॥ सरकार हेलगा राजे साहेबानी विजया दशमीस मारितात तो माहाराचा पूर्वी पासून घेत असतात हालींहि ते तेंच घेतात मागाचे काही नाही पूजा व बेजा दारू माहारच घेत असतात आमचे गांवी बेजा म्हणतात तुमचे गावी पेडा म्हणतात ते माहारच घेतात यात मागाचे काही नाही माहार भूमिपुत्र आहे

यात्रेतील दुकानांचा क्रम

ले. ९७ (१८) श्री { श. १६५२ मार्ग. वद्य २ / इ. १७३० डिसेंबर १५

राजश्री देसमूख व देसपांडिये का॥
सासवड गोसावी यांसि

॥द श्री॥ अनंदराऊ बहिरव आसीर्वाद व नमस्कार सु॥ ईहीदे सलासीन मया आलफ तुम्ही पत्र पाठविले पावोन वर्तमान विदित जाले श्रीकोंढाणपूरचे यात्रेस का॥ मजकूरचे सिपी आले त्यांचे जागे साल दर साल आहेत ते हिरोन घेऊन दुसरियास दिल्हे म्हणून लि॥ यैसीयास सासवडकर सिपी अगोधर यावे ते आले नाहीत याकरितां पुणेकरानी पाले दिल्ही होती त्यास सासवडकर आलियावरी दो पालाचा जागा मानाचा करून द्यावयाचा तो दिल्हा त्याउपरी सिपीयानी आणीक चौघानी वाढते वोलीस बसावे ते न बैसता रुसवा करून उठोन गेले याकरितां पुणेकरास आणून त्यास ताकीद करणे ते केली पेस्तर सालापासून जागे नेमून तह केला की पाच पाले सिवापूरकराची त्याचे सेजारी पांच पाले सासवडकराची हे येक वलीस बसावी दुसरे वलीस पाच पाले नसरापूरकर व त्याचे सेजारी नारायेणेपूरकर येणेप्रमाणे मानाची पाले दोही वलीस बैसावी त्याचे पुढे पाच पाले पुणेकर व पाच पाले नादेडकर यानी बैसावे याहून जाजती पेठाचे सिपी येतील त्यानी वाढते वलीस बसावे यैसी समजावीस दादजी पाढर कामा याचे गुजारतीने समजावीस करून समाधान परस्परे केले आसे याउपरी पेस्तर कजिया होवा यैसे नाही सासवडकर अगोधर आले नाहीत म्हणून कथला जाला होता हे वर्तमान दादजी पांढरकामा सागता कळेल छ१५ जमादिलाखर हे विनति

×पौ॥ छ१६ जमादिलाखर

सके १६५२ साधारणनाम सवछर

× अक्षर वेगळें.

वजनामापांचें नियंत्रण

ले. ९८ (पत्र नं. ६) श्री { श. १६५६ ज्येष्ठ / इ. १७३४ जून

० श्री ०
श्री राजाशाहू न-
रपति हर्ष निधान
बाजीराव बल्लाळ
मुख्य प्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री बाजिराऊ पंडित प्रधान तां तेली को सासवड सुा सन खमस सलासीन मयां आलफ तुम्हांस सालगुदस्तां आज्ञा केली होती कीं आलमगिरी पैसीयाने आठां टकियाची पासेरी बांधोन त्या वजने व्यवसाय करीत जाणें त्यास तुम्हीं कोणाचा देवघेव होता त्यामुळे गय गुदर करून पहिली वजने होती त्याच वजने उदीम व्यवसाय केला बरें पेशजी जाले ते जाले हली रा नारोबाजी याणी तुम्हांस ताकीद केली असतां वजने नवी बाधत नाहीं म्हणतां की पुणियासी वजने जाली नाहींत ऐसी लबाडी करितां हे गोष्टी बरी नव्हे. हलीं देखत आज्ञापत्र आलमगिरी पैसियाने आठां टकियाची पांशेरी बाधोन त्या प्रमाणें वजने आवधी करून साल मजकुरापासून व्यवसाय करीत जाणे पेशजीची वजने आहेत त्याणे उदीम केला म्हणजे गुनेगारी घेतली जाईल ऐसे जाणोन आज्ञे प्रमाणे वजने बाधणे याउपरी लबाडी केली म्हणजे मुलाहिजा होणार नाही जाणिजे मोहरम आज्ञाप्रमाण लेखन सीमा

बाजार कराबद्दल वाद
पांढरीची साक्ष

ले. ९९ (५१) श्री { श. १६७१ आश्विन वद्य ८ / इ. १७४९ आक्टो. २२

श्रीवलयासिद मौजे बेलसर का सासवड येथे पाटील व कुलकर्णी मौजे मार चांचा बाजारची सेव व फसकीचा कजिया आहे त्यास समाकुल पांढरी श्रीचे देवली देशमूख व पुरंदरे देशपांडे यानी जमा करून श्रीचा आगारा डोईवर घालून बोलिले तें लिहिले छ२१ जिलकाद रविवार अष्टमी आश्विन वद्य सुा खमसेन मया अलफ

खुम नावनिसी बी ता।

गिरजोजी बिन म्हालोजी सेट्या उमर वर्षे ५० वद्ला जे माझे आज्याचे अमदानीस बाजार होता तेव्हा पाटिलानी सेव फसकी घेतली कुलकर्णी यानी घेतली नाही बापाचे वेलेस मुलुक बेचिराख होता तेव्हा बाजार नव्हता माझे वेलेस बाजार भरला पाटील फसकी सेव सुपारी घेतात कुलकर्णी घेत नाहीत कलम १

जायाजी बिन परसोजी बुधा मेहेत्रा गावडाधणगर उमर वर्षे ६५ वद्ला जे आपल्या बापाने आपल्यास काही सांगितले नाही पहिले मला ठाऊक नाही अलीकडे माझे आमदानीस पाटिलास हकाचे घोगडे देत आहे कुलकर्णी यांस देत नाही कलम १

तिमाजी बिन भिकाजी पांडकर कोष्टी मेहेत्रा मौजे मार वद्ला जे माझा बाप होता तेव्हा पाटिलास सरूप दिल्हे कुलकर्णी यांस दिल्हे नाही व माझे वडिलाने मजला सांगितले नाही मीहि दिल्हे नाही कलम १

ताबोली जदीद

संताजी बिन मुलबाजी माळी रासकर मेहेत्रा उमर वर्षे ६० वद्ला जे माझा आजा सोमाजी माली होता व नवलोजी पंजा होता तेव्हा पूर्वी बाजार होता पाटील सेव फसकी घेत होते कुलकर्णी घेत नव्हते बापाचे वेलेस बाजार नव्हता माझे आमदानीस पंतप्रधान यानी सात साला कौल दिल्हा कौल पुरल्यावर पाटील सेवफसकी-घेतात कुलकर्णी घेत नाहीत कलम १

गोपालजी बिन मैरालजी साली मेहेत्रा उमर वर्षे ३५ वद्ला जें माझा बाप कोथल्यात नांदत होता पहिले मजला कांहीं ठाऊक नाही माझे वेलेस पाटिलास हकाची पासोडी देत असतो कुलकर्णी मागत नाहीत मीहि देत नाही कलम १

संताजी बिन पदाजी सुपेकर सिपी मो उमर वर्षे ६० वद्ला जे श्रीमंत राजश्री नानाच्या कौलापासून पाटिलास सरूप देत आहो कुलकर्णी यांस दिल्हे नाही १

कलम आपले आमदानी आलीकडे पहिली आपली आमदानी नव्हती १

तेली जदीद

हिशेब यादी

ले. १०० (पत्र नं. ५) श्री { श. १६८० / इ. १७५८

यादि हिशेब श्रीमत् राजश्री धोंडो मल्हार पुरंधरे पा मोकदम मौजे वडुले प्रा सेवगाव स्रुा सन ११६८

जमा गला जिणस बाजरी माप बारुराले

१८॥=॥= गाव नि॥ स॥ सिरस्त येवज दर ८।= प्रा येकोण ११९८

११-॥ बाजार खरिदी ८९८- दर ८।-। प्रा व किरकोळ

१८ मल्याबा हिंसीं

१॥।३॥ घुगरी तगट खरीफ खडी ६२ दर खडीस पायली ८॥१॥ प्रा घेतली

२२॥।१॥।२

गच्चीच्या चुन्यासाठी गुगुळ

ले. १०१ (८५) श्री { श. १६८९ श्रावण शु. ५ / इ. १७६७ जुलै ३०

रोखा राजेश्री धोंडो मल्हार ता॥ दतरामसेट गुजर पेठ रविवार सु॥ समान सितैन मया आलफ इमारतीचे खर्चाबदल गचीचा चुन्यास घालावयास मसाला गुगोळ वजन पका ८८१ येक सेरभर देणे ता॥ भोवानी नाहावी जाणिजे रवाना छ ३ माहे रबिलावल बार (कागदामागें अक्षर वेगळें)

कर्जरोखा

ले. १०२ (१८९) श्री { श. १६९० भाद्र. वद्य १३ / इ. १७६८ आक्टो. ८

कर्जरोखा शके १६९० सर्वधारीनाम संवछरे भाद्रपद वद्य १३ ते दिवसी खत लिखिते धनकोनाम राजश्री रामाजी बलाल जोसी मौजे सोमेश्वर ता॥ हराचिरी यासी रिणकोनाम जिवाजी नरहर सहस्त्रबुद्ध देशमूख ता॥ केले माजगाव आम (त्म १) कार्यपर्वंत समर्थे तुम्हापासून कर्ज घेतलें मुदल रुपये ८६०० आठ हजार साहासें घेतले यासी

व्याज दरमाहा येकोत्राप्रमाणें बिनसूट आरकट प्रत देऊ यासी गाहाणवट ऐवज तुम्हा-पासी ठेविला बीतपसील

सिरपेच दागिना जडावाचा बिा पस्या तेहतीस ताावर

१५ थार माणके पधरा

३५ धाकटी माणके पसतीस

२४ पने लाहान थार चौवीस

१ मध्य नाईक हिरा चवकी थार येक

३३ पेस्या तेहतीस

३ साकल्या आकड्यासुधा तीन सिवाय हिरकण्या व चुनी माणकाच्या पेटी भवताल्या आसत

१११

येकसे आकरा याची किंमत आज मासे रुपये २००० दोन हजार

सिवाय हवेली पुण्यातील वोमकारेश्वरा-जवलील उजवे हाताकडे ठाकराचा वाडा डावे हाताकडे आताजीपत मराठे याचा वाडा पुढे बाग वोमकारेश्वराचे मध्ये गली पीछेवाडा देवस्थले मध्यें गली आजमासे लाबी हात ऐशी व रुदी हात ऐसी येणे प्रमाणे हवेली तुम्हाकडे गाहाण आसें सोपा पीछवाड्याचा खण सोला बाधिला आहे व आवर इटे बंदी व दरवाजे थोर दोन आसेत बाकी जागा जळून पडलेली आहे हे तुम्हाजवल गाहान ठेऊन तुम्हा-जवलून याचे आजमासे रुपये घेतले रुपये ५००० पाच हजार घेऊन तुम्हाकडे जागा गाहाण ठेविला आसे

१ आगटी निलाची चव + +
सोन्यासुधा कि (मत) + +
से रुपये

४६ कंठी मोत्याची

३७ मोत्य सुमार सत (तीस)

४ लालड्या च्यार

५ धुगधुगी

१ मध्यनाईक माणीक थोर येक

३ हिरकण्या तीन

१ लोलक पाचेचा थार आजमासे पसतीस (चव ?)

५

४६

किमत आजमासे रुपये २५० आडी-चसें आसें

या कलमा सेरीज तुम्हाजवल वाड्याचे पत्र आलाहिदा आसे

येणेप्रमाणे तुम्हापासी गाहाण ठेऊन रुपये घेतले आसेत यास मुदत पाच महिन्यानी रुपये देऊ न देऊ तरी दुहोत्राप्रमाणे देऊ हे लिहिले सही

साक्ष

१ कृष्णभट डोगरे मौजे केले

१ + + त्रिबक भोले मौजे जाबरूण

ताा केले माजगाव पत्र प्रमाणे ...... खुद

आदसेरीचा कौलनामा

ले. १०३ (१४४) श्री { श. १६९१ ज्येष्ठ शु. ३ / इ. १७६९ जून ७

नकल

नकल कौलनामा आज दिवाण श्रीमंत राजश्री धोंडो मल्हार पुरंधरे निमे मोकदम मौजे वडुले खुर्द पा सेवगाव कौल बो समस्त मारवाडी व बेपारी पेठ मौजे मार सन ११७९ दादे कौलनामा लेहून दिधला ऐसा जे तुमचे विशई राजश्री विठल व्यंकटेश आा मो याणी येऊन आर्ज केला की साहेबाचा कोल पेशजी हिवरी याचे पेठप्रमाणें आहे की हरजिनस येईल त्याची आदसेरी घ्यावी उमरपटी न घ्यावी ऐसे आसता उबरीपटी ....देत नाहीं........त म्हणतात की आदसेरी घ्याधी उबरा न घ्यावा त्याजवरून आर्ज खातरेश आणोन तुम्हास कौल सादर केला आसे की पेठ मजकुरी माप आणाल व पेठ मारीहून माल बाहेर न्याल त्याची हरदम आदसेरी देणे उबरा माफ तुम्हास केला आसे आदसेरीचा मोकारा

तपसील

किराना काबाड हरजिनस एकदर बैल येईल त्याची आदसेरी बा आणे तीन मुसारास दर खंडी कैली ००१ पायेली येक देणे

किराना काबाड तटू दर रास हरजिनस येईल त्यास आदसेरी बा आणा दीड देणे काबाड खादी बैल यास आणे ।• चार देणे

हरजिनस निकालस बैन जिनस येईल त्याची आदसेरी दर पला आदसेरी देणे

येणे प्रमाणे देऊन सुखरूप पेठची आमदानी कर्णे सिवाय जाजती आजार लागो देणार नाहींत हा कौल दिल्हा सही

तेरीख छ २ माहे सफर ऊर्फ जेष्ठ +वद्य ३

निा नागर [नां. चि.]

बीा राजाराम रघुनाथ कुलकर्णी मौजे मार

+ शुद्ध पाहिजे. सफर महिना ह्या ११७९ फसली वर्षात आरंभी व अखेरीस असा दोनदां येतो. पण अखेरीचा घेतल्यास सफर २ तारखेस ज्येष्ठ शुद्धच ३ येत नाहीं ४ येते म्हणून प्रारंभीचा धरून वरील मितीतारीख दिली आहे.

सराफास वसाहतीस सवलत

लें. १०४ (२५४) श्री { श. १६९३ आश्विन वद्य १४ / इ. १७७१ नोवें. ५ मंगळवार }

नकल

कौलनामा शके १६९३ खरनाम संवछरे आस्विन वद्य १४ चतुर्दसी भोमवार ते दिवसीं राजश्री देशमुख व मो व देसपांडे काा सासवड ता + भिकाजी मोरेश्वर सराफ निा राजश्री बाजी नारायेण पुरंधरे देशपांडे काो माार यासी कौल लिहून दिल्हा ऐसाजे सराफीचा दुकान पेठ सोमवार काो माार येथें घालून सुखवस्तीने राहावे दिवानचा सारा चौघा सराफाप्रमाणें तूर्त द्यावयासी ताकत नाही म्हणून विदित केले ते मनास आणून कृपाळू होऊन कौल चौ वरसाचा दिल्हा आसे दर साल सारा रुा १ येक प्राो इा शके १६९३ तागाईत शके १६९६ शाहंणव अखेर सालपर्यंत चौ साला च्यार रुाो देऊन सुखरूप राहोन कीर्द आबादानी करणें हा कौल लेहून दिल्हा सही जाणिजे छ २७ रजब सुाा ईसने सैबेन मयां व आलफ मोर्तब सुद

बिा रावजी मोरेश्वर दिा राजश्री महिपतराव त्रिंबक पुरंधरे देसपांडे प्राा सासवड व जोसी कुलकर्णी काा माार

कलसपाकचा गठ्ठा

ले. १०५ (२३) श्रीकृष्ण { श. १६९८ / इ. १७७६ }

पौ छ २५ राखर सन

सबा सबैन

विज्ञापना यैसी जे कलसपाकचा गठा घेतल्यास सनगे किती असतात व किमत काये पडती लिहिणे म्हणोन आज्ञा त्यास गठ्यात सनगे असतात बिा

१५०	२५ फेटे चाळीस हाती दर ६
८	१ तिवट साठ हाती
१२०	३१ फेटे तीस हाती दर ४८
१७५	२५ सेले दर ७
३०	२ पातळे
६	१ चिरडी
५	१ दुपटा
८	१ धोत्रजोडा
७५	१८ जामेवार फर्द दर ४।
५७७	१०५

येणे प्रो सनगे येक दुसरे कमी ज्यास्त इतकी असतात आखाची मोडणी दर सेंकडा रुपये तीन प्रो मुद माहे २ व सूट रुपये २ यो च्यार रुपये वजा यो दर सेकडा च्यार रुपये वजा करून तूर्त हली सिका रुो द्यावे या प्रो आहे गठ्यास किमत आजमासे साहासे रुपये बसतात जानोजी बंगाळे यास सर्व ठाऊक आहे उटावरून जिनस पा आहे बीा

बाजारचा जिनस

०१ साकर धुवट दर ००१॥।४॥
०१ खोबरे बारीक दर ००३
००५ साकर कालपीची खडी दर रुा १ प्रो
००५। खडी साकर टपराची दर ००१।४॥
००६ कुंकू दर ००२
०२१६।

ग्यानोजीकडील

०१॥०१। साकर दाणा दर पके ००=॥
०३।= रासी साकर दर ००३=९ प्रो
०४॥३।

येणे प्रो जिनस पा आहे साकर फार माहाग जाली दिवस प्रजन्याचे आणि लस्करची आवाई यामुले फारच माहाग जिनस जाला चौ जागा निरख पाहून चौकसी केली मग जिनस घेतला विदित व्हावे आले वजन पके ०। दाहा सेर येका रुपयाचे पा आहे जेष्ठ वद्य द्वादसी सेवेसी श्रूत होय हे—विज्ञापना

नव्यावसाहतीसाठी करांत सवलती

ले. १०६ (३७)

श्री

{ श. १७०० कार्तिक शु. १३
{ इ. १७७८ नोवें. २

मा। सुलतानजी होलकर गुमास्ते यासी तुकोजी होलकर गावडे प्रांत सुपे सुा तिसा सबैन मया व आलफ मौजे मुरटी प्रांत मजकूर हा गाव राजश्री धोंडोपंत आपा पुरंधरे यांजकडे आहे तेथे त्यानी कौल देऊन नवी पेठ वसाविली आहे बाजार भरत असतो त्यास तुम्ही गौडकीचा हाक दस्तूर मागता म्हणौन विदित जाले त्यावरून हे पत्र सादर केले असे तरी कौलापूर्वी सालाबाद हाक दस्तूर घेत आला असाल त्या प्रमाणेच घेत जाणे पेठेस कौल दिल्हामुळें जमीदार व मोकदम वगैरे हाक घेत नसल्यास कौल पुरे तोंपर्यंत तुम्हीहि न घेणे कौल पुरल्यावर जमीदार मोकदम वगैरे

हाक घेऊ लागतील तेव्हा तुम्हीहि गोंडकीचा हाक घेत जाणे आलीकडे गैरवाजवी उपद्रव न देणे [1]जाणिजे छ १२ सवाल मोर्तब

सुद (कोयरी आकार)

पेठ वसविल्यावर करवसुली

श्री

ले. १०७ (९५) नकल { श. १७०३ भाद्र. वा ४
इ. १७८१ सप्टं. ६ }

राजेश्री मोकदम व कुलकर्णी मौजे वडुले प्रां सेवगाव गोसावी यासी

श्री सकल गुन आलकर्ण आखंडित लक्ष्मी आलक्रुत राजमान्ये — श्रां मोकदम व माहाजन व कुलकर्णी का वाबौरी प्रां सगमनेर राम राम आणूक्रमे सा नमस्कार विनंति उपरी आपन पत्र पाठविले ते पाऊन वर्तमान विदित जाले पेठचा हाकाचा मजकूर लिहिला त्यास येथे राजेश्री नागो राम याणी पेठ वसविली त्यापासून आज तागाईत कुलकर्णी याचे वतन सरकारात जप्त व्हते हाली आपा कुलकर्णी सरकारातून वतन कुलकर्ण सोडविले अद्यापवर नागोपंत बाबा म्हणतात की पेठेस कौल दिल्हा आहे कोन्हास बोलू देत नाही हाली हकमीहि त्याचीच आहे आस्ट आधिकार त्याचेच आहेत त्याचेच मरजीनरूप वर्तनूक करितो बाबा म्हणतात की कौल पुरल्यावर तुमचा बंदोबस्त करून देऊ तुमच्या परगनियांत पेठा आहेत त्या पेठा जुन्या सलाबतखानापासून आहेत तेथे हाक लाजीमे आहेत ते पाहून वर्तनूक करावी बहुत काये लिहीणे सके १७०३ प्लवनाम सवछरे भादवा वा ४ हे विनंति

बाजारांत कुळकर्ण्यांचे हक

ले. १०८ (१०३) श्री { श. १७०३ भाद्र. वद्य १२
नकल इ. १७८१ सप्टं. १४ }

याविराजित राजमान्ये राजेश्री मोरापंत व महिपतराव व मुन्हारपंत व भैरालपंत कुलकर्णी मौजे वडुल गोसावी यासी

जाणो मुद्गल कुलकर्णी का तुलापूर सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जानऊन तुम्ही आपले स्वकुशल जानऊन तुम्ही आपले स्वकुशल लिहीत जाणे यानतर पत्र पाठविले ते पोहोचले वर्तमान विदित जाले पेठंत कुलकर्णी याचा हाक काये आहे

---

[1] या पुढील मजकूर निराळे वळणाचा

तो लेहून पाठवणे म्हणोन लिा त्यास येथील हाकाचा वर्तमान जर बैल ढोर विकले तर चिठी त्याहावी चिठीस पैसा टके व गोनी दाल तादूल मीठ दाल बाहेर भरून गेली तर टोलीच्या (?) कवंड्या (?) दर गोनीस ... गावात आली तर पानसुपारी दाखल देखील कयास करावा चारा वगैरे बैलाचा तांडा पेठत आला तर पानसुपारी मागून घ्यावी मग तो काही साली कोष्टी धनगर तेली तांबोली याजवर काही हाक नाही येथील हा विचार आहे विदित व्हावे बहुत काय लिहीणे हे विनंति पौ सन ११९१ शके १७०३ प्लवनाम सवछर भादवा वा १५ रोज शुक्रवार छ २५ माहे रमजान

नवी पेठ वसवितांना वतनी हक्कांची चौकशी

ले. १०९ (९२) श्री { श. १७०६ कार्तिक वद्य ५ / इ. १७८४ नोवें. २ }

नकल

[1]राजेश्री मोकदम व कुलकर्णी व सेटे माहाजन पेठ आमरापूर प्रो सेवगाव गोसावी यासि

छ आखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्ये — श्री मल्हार धोंडदेव पुरंधरे पा मा मौजे वडुले खुर्द पा सेवगाव मार आसिर्वाद व आनुक्रमे नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत आसावे विशष आमचे गांवी जदीद पेठ वसविली आहे तेथील पाटील कुलकर्णी व सेटे माहाजन यैसे हाक द्यावे लागतात त्यावरून तुम्हास पत्र लिा आहे तर तुमचे गावीचे पेठत हाक उत्पनाचे धार कैसे कोनाचे कसकसे उत्पन्न व्होतात याचा मार निकालस तपसीलवार निवड करून लिहून पाठवावे सदरहू हाक लाजिमे कोनाचे कौन पधेतीचे चालतात त्याप्रो तपसील कलमबंदीची याद आलाहिदा करून पाठऊन द्यावी छ १८ माहे जिल्हेज खमस समानीन बहुत काय लिहिणे हा आर्सिवाद

पत्रावळीचें 'रेशन'

श्री

ले. ११० (९१) { श. १७०७ / इ. १७८५ पूर्वी }

राजश्रीया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवसी

पो महिपतराव त्रिंबक कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाजे विशेष सासवडकर गुरव यांजकडून राजश्री भिवराव

---

१ याच अर्थाचे व याच मितीचें कसबे तिसगाव यासहि पत्र आहे.

येशवंत याचे घरी मुंजीबद्दल पत्रावली पांच हजार आपण देविल्या त्यास येथील गुरवावर पत्रावलीचा कसाला गावांत च्यार ग्रहस्त मातबर आहेत यांचे घरी लग्न मुहूर्त आहे त्याजमुले पडतो व मनाजी गोसावी यांस सोपान देवली प्रो बगाजीपंती पांचसे देविल्या व खासगत घरी मुंजीबद्दल कान्हूर येथे पांचसे पत्रावली नेल्या वर्कड किरकोळी कार्यप्रयोजन को मजकुरी होतच आहे ते क्षणी देविल्याच पाहिजेत तर गुरव मजकूर यास करार करू पत्रावली सुमार १० [००] याजकरितां येक हजार पत्रावलीचा करार करून चिठी देवावी म्हणजे त्यांस हजार पत्रावली पावत्या करितील पानाचाहि तोटा आहे याजकरितां गुरवाचे गरिबीवर नजर देऊन येका हजाराची चिठी देवावी बहुत काये लिहीणें

मारवाड्यास समन्स

ले. १११ (१८६) श्री { श. १७१० आश्विन शुा १४ / इ. १७८८ आक्टो. १४

तां केशर व लालू मारवाडी वा मौजे हडपसर ता हवेली प्रां पुणे सुा तिसा समानीन मयां व अलफ नायगांवकर वाणी दाण्याच्या गोण्या विकावयाकरितां पुण्यास घेऊन येत होते त्यांजला तुम्ही वाटेहून वळून मौजे मा।रास नेले आणि मनस्वी आधोली लाऊन दाण्याचे माप घेतले म्हणोन हुजूर विदित जाले त्यास सदरहूचा मजकूर मनास आणावा लागतो याजकरितां तुमचें प्रयोजन आहे तरी देसत आज्ञापत्र हुजूर पुण्यास येणे या कामास सेटी बागूल पा। यास मसाला दर आसामीस दोन रुो प्रो रुपये ४ च्या देविले असेत अदा करणे जाणिजे छ १३ मोहरम मोर्तब सुद

पौ लाल्याचे माप २ मोर्तब

केशऱ्याकडे करार २ बार सुद (डबल गोल शिक्का)

आवटेपणाचें पत्र करून द्या

श्री

ले. ११२ (२८४) { श. १७१० कार्तिक शु. १ / इ. १७८८ आक्टो.३०

+ + + खंडगसिंग कुंभार परदेशी यासी विठलराव मल्हार व (चिम)णाजी धोडदेव पुरदरे सुा तिसा समानीन मया व अलफ मौजे मुरटी प्रा सुपे येथील बाजार सोमवारचा नवा भरविला ते समई श्रीमंत अपासाहेब यानपासी अर्ज केला बाजारचे

+ अक्षर वेगळें.

अवटेपण मजला द्यावे मी पेठेत घर बाधोन राहातो त्यावरून साहेबानी कृपाळू होऊन मौजे मजकूरचा आवटेपण दिल्हे अधोल्या ध्यावयास सांगितल्या त्याप्रो पेठेत घर बांधून अवटेपण आजपावेतो अनभविले पत्र करून दिल्हे नाही + + + आता साहेबानी कृपा करून भोगवटियास पत्र करून द्यावे म्हणोन विदित केले त्यावरून दफ्तरी शोध मनास आणिता शके १६९७ कार्तिक मासी सोमवारचा बाजार भरविला त्या पेठेचे अवटपण तीा कैलासवासी आपासाहेब वाणी तुजला दिल्हे *आधोल्या आणून अवटपण करावे असी यादी करून ठेविली *ती पाहून तुजला पत्र करून दिल्हे असे तर मौजे मारच्या सोमवार पेठेच्या बाजारास *साल मजकूरापासून* खेरीज किरणा करून कैली जिनस येईल त्याचे अवटेपण दर गोणीस केली ०८– चिपटे सिरस्ते प्रो घेत जाणे तुजला साहेबानी अवटपण दिल्हे त्याप्रो करार असे पेठेत राहून अवटेपण करीत जाणे मि॥ शके १७१० किलकनाम सवत्सरे कार्तिक शुद्ध १ प्रतिपदा वली सुमार ३० तीस

करारनामा: गुन्हेगारीचे पैसे देण्याचें अभिवचन

ले. ११३ (१८८) श्री { श. १७१० पौष वद्य ५ / इ. १७८९ जाने. १६

द्या बाो बापूजी बिन देसाजी सोनार मौजे देऊलगाव नजीक आलेगाव सन ११९८ कारणे साहेबाचे शेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसा जे मौजे मजकुरी गांवातील कुलास म्या खोट्या रुपयावरी निशाने घालोन चालविले हे वर्तमान सरकारात कळलें याजमुळें मजकडे गुन्हेगारी करार रुा २०० दोनशे करार जाहाले ते इा पासून दोहो महीनीयानी देऊ यासी आंतर करणार नाही हा कतबा लेहून दिल्हा सही यासी उगवणीस जमान मुधोजी बीन महादजी गिरमकर चौगुले मौजे मार सदरहू रुा मुदतसि यापूजी सौनार देईल मुदतीस न आले तरी आपण देऊ हे लेहून दिल्हे सही शके १७१० कीतक नाम संवत्सरे पौष वद्य ५ बीा महिपतराव त्रिंबक बोकील जोसी कुलकर्णी मौजे हिवरे ताा करेपठार प्राा पुणे

वजनामापाची चौकशी

ले. ११४ (१३१) { श. १७११ नंतर / इ. १७८९

+ + + + + तिसैन म(या) ... हाय मजकूरी वाणी व गुजर + + + + त्याची केली मापे व वजने कमजाजती असतील त्याची चौकसी करून त्यावर सरकारचा

---

* हा मजकूर मध्येंच वर लिहिला आहे.

छापा करून द्यावा (आ)णि पुणे यातील सिरस्तेप्रो पैका घ्यावयाची भास्कर गोविंद यास आज्ञा केली आहे त्याप्रमाणे आमल करतील तुम्ही सिरस्तेप्रमाणे वाणी उमर्दी यास ताकीद करून वसूल देणे......छ १६ जमादिलाखर पाहुजूर मोर्तब

बाजारकराची वाटणी करार

ले ११५ (१३०) { श. १७१२ आषाढ शुा १२ ते १७१३ आषाढ शुा१० / इ. १७९० जुलै २३ ते १७९१ जुलै ११ }

[प्रारंभीची दोन कलमें व त्या आधीचा कांहीं मजकूर गहाळ]

कलम १

किरकोळी माळी व साळी कोष्टी व वैरणीचे भारे बाजारास येतील त्याजपासी घेणे ते सुमार पाहून घ्यावे कलम १

सरकारचा शाग्रीत पेशा वगैरे याणी कोण्ही गोण्या घेतील त्यास घेऊ नये कलम १

माळणी व बागवान याची सेव येइल ती आम्हांस घ्यावी कलम १

आणि आबादाणी करावी

गावात वाणी वगैरे घरे बाधोन राहिले आहेत त्याजपासी घेणे ते आम्ही घेत जाऊ तुम्ही न घेणे बाहेरील गोणी येईल त्याचे तू घेणे कलम १

कार्याकारण ग्रहस्त कोण्ही थोर बाजारात खरेदी करावयासि येतील त्याची जकात घ्यावयाची नाही त्याची परवानगी देऊ ती मानावी हासील मागू नये कलम १

कलमे सात करार करून दिल्ही असेत येणे प्रो वर्तणूक इमाने इतबारे करून बाजारची आबादाणी चांगली राखावी आणि सदरहू रुो पाऊणशे हाकदारखेरीज करून आम्हास द्यावे त्याचो हासेबंदी रुो

२५ आशाड मासी
२५ पौष मासी
२५ वैशाख मासी


येकूण पाऊणशे रुपये देऊन सुखरूप वहिवाट करणे ई॥ आशाढ शु॥ १२ शके १७१२ ता। आषाढ शु॥ १० शके १७१३ येकूण सर साल १ असे

वाणी पुष्कळ आहेत गुजर नको

ले. ११६ (१९४) श्री { श. १७१७ अ. भाद्र. शु. ७ / इ. १७९५ आगष्ट २२ }

दस्तक बाो कासीबा बीन केदारजी धुमाल वाणी मौजे जेजोरी ताा करेपठार प्राा पुणे सुाा सीत तिसैन मया व आलफ सन १२०५ कारणे कतबा लेहून दिल्हा

येसा जे मौजे मजकुरी वाणीपणाचीं दुकाने बहुत दिवस आहेत वगैरे वाणीहि आहेत त्यास आमचे म्हणे साहेबासी आहे की मौजे मजकुरी गुजराचे दुकान आहे ते नसावे गुजरास दुकान देऊ नये म्हणोन गुजरास येथें आणून त्याचे दुकान मौजे मजकुरीहून काढून टाकावे व गावातून लाऊन द्यावा त्याबा॥ आम्ही साहेबास नजर रुा॥ १०० सेंभर देऊ हा कतबा लेहून दिल्हा सही माहे आधिक भाद्रपद शु॥ ७
नि॥ तराजू बी॥ मोरो शेंकर जोसी कुलकर्णी मौजे कुरकुब (हें कागदावर उजवे बाजूला आडवें लिहिलें आहे.)



बाजारभाव

ले. ११७ (१२८) श्री {श. १७२३ कार्तिक वद्य ३ / इ. १८०१ नोवें. २३

निरख बाजार स्वारी राजश्री पंत प्रधान वि॥ त्रिंबकराव महिपत पुरंदरे सु॥ इसने मयातैन व अलफ छ १६ रजब मु॥ पिपलगाव प्रा॥ चादवड गु॥ हैबतराव माणकेश्वर कारकून सिलेदार

गला कैली बारुले मापे चादवडी	वजनी.................वजन पके
रुपयाचा दर	ऽऽ१॥।९ तूप
ऽ।२॥ बाजरी ऽ।२॥०	ऽऽ३ तेल
ऽ।१॥ हरभरे ऽ।१।·	ऽऽ३॥ गूल
० जोरी	ऽऽ१ साखर खडी
ऽऽ२॥। ता॥ मोठे सा॥	ऽऽ१॥ साखर दाणा
ऽ।· ता॥ मोठे आ॥	ऽऽ१। साखर धुवा
ऽऽ२।· ता॥ बारीक सा॥	ऽ।२ कणिक
ऽऽ१॥। ता॥ अंबेमोहर सा॥	ऽ।८ बाजरीचे पीठ
ऽऽ१॥। दाल तुरीची	ऽ।२। ता॥ मोठे सडीक
ऽ।·।· दाल हरभेरेची	ऽ।३॥ ता॥ मोठे आ॥
ऽ।१ दाल मुगाची ऽ।·॥-	ऽ।· ता॥ बारीक सा॥
ऽ।·॥ दाल उडदाची	ऽऽ१२ मिरे
ऽऽ३॥। दाल मसूर	ऽऽ१॥। जिरे
ऽ।१॥ मूग	ऽऽ४ हळद
ऽ।२॥ उडीद ऽ।२।·	ऽऽ१॥ सुठ
ऽ।२॥ मठ	ऽऽ१ हिग ६

꠱। मीठ
꠱।॥ गहू
___
।-꠱।

खुर्दा मुा —————— टके
४॥

सुमारी
१४०० पाने नागवेल
९०० हिरवी
५०० पिकली
___
१४००
___
१४००

꠱꠱३॥ खारीक
꠱꠱२॥ खोबरे
꠱꠱६ भोईमूग दाणे
꠱꠱२ आचासोल
꠱꠱१ मसाला
꠱꠱५ भाग गरदा
꠱꠱३ भाग बातुट
꠱꠱१ आफू रासी ५
꠱꠱१ आफू मालवी ८
꠱꠱७ आचाडी
꠱꠱३ सुतली
꠱꠱१ सूत बारीक
꠱꠱१। सूत मोठे
꠱꠱१॥ सुपारी रासी
꠱꠱१॥। सुपारी चारडा
꠱॥३ बागवान
꠱꠱७ कांदे ओले
꠱꠱६ लसूण
꠱॥। मिरच्या वोल्या
___
꠱॥३
꠱꠱७ हलवाई
꠱꠱२ पेढे
꠱꠱१॥। बरफी
꠱꠱१॥ बतासे
꠱꠱२ ईलायेची दाणे
___
꠱꠱७।
꠱१꠱३॥ गवळी
꠱।६ दूध
꠱॥५ दही
꠱꠱२॥ लोणी
___
꠱१꠱३॥
___
।-।१॥९

गला कैली	वजन पक्के	खुर्दा टके	सुमारी
·।· ८।·	·।·।१॥९	४॥	१४००

पाच[1] मण येक सेर गला कैली व सवा पाच मण दीड सेर नऊ टाक वजन पक्के व साडेचार टके खुर्दा व चौदासे सुमारी निरख बाजार छ[2] १६ रजब

वजनामापाची चौकशी

ले. ११८ (२६६) श्री { श. १७२६ फाल्गुन शु. ६ / इ. १८०५ मार्च ७ }

मा। वरातदार यासी सु॥ खमस मयातैन व आलफ मौजे गराडे ता। करेपठार येथील वाणी यास बटछगाईबदल तगादा केला आहे.त्यास आठ दिवस तगादा न करणे दुसरी कामगीरीस उठोन जाणे जाणिजे छ ५ जिल्हेज मार्तंब सुद मार्तब आसे

श्री नकल { श. १७२६ माघ वद्य १० / इ. १८०५ फेब्रु. २४ }

आजस्वारी राजश्री सदासिव चितामण सुभेदार प्रात पुणे ता। मोकदम मौजे गराडे ता। करेपठार प्रा। मा।र सु॥ खमस मयातैन व आलफ मौजे मा।र येथील वाणी उदमी त्याची केली मापाची व वजनाची चैवकसी महिपतजी ना। यादव यासी सागितली असे तरी यासी रुजू होऊन बटछपाई बा। दर दुकानास रु॥ ८॥= आठ रु॥ द्राहा आणे प्रा। यैवज घेऊन फाडशास पुण्यास येणे जाणिजे छ २३ जिलकाद मौतला सुद मार्तब आसे

(कागदाच्या मागे)

सिपाई आ। २ यासी सिदा फालगुण मास

शु॥ ५ मंगळवार
पीठ ८८१॥
दाळ ८८।·
रुके
८३ तेल
८३ तूप
८३ तमाखु
भुजा गुरव पुणीयासी पा। त्यास
पोटखर्च पैशे १२

शु॥ ६
पीठ ८८१॥
दाळ ८८।·
तूप तमाखू तेल
८३ ८३ ८३
मसाला ८३ यो। रु॥ ·।·
शु॥ ७ गुरुवार रोजगुदस्त प्रो

---

१ या पुढील मजकूर निराळे वळणाचा २ यापुढील याहून निराळे वळणाचा.

भावनियंत्रण

ले. ११९ (२८२) श्री { श. १७२८ आश्विन शु. १२ / इ. १८०६ आक्टो. २४ }

यादी कां सासवड सुा सबा मयातैन व आलफ कां मारचे तेली याचा उदीम पडला वाणी तेल विकतात ते त्याणी विको नये येविसींची कलमे बी तपसील

पुण्याचे धारणे प्रो तेल विकावे कमी विको नये

पेशापासून हाजारो रुा याचे तेल गावात आगर परकी खरेदीस गावात गिराइकास मिळावे सासवडात तेल मिळत नाही असे होऊ नये

पुण्याचे धारणे पेक्षा ज्याजती आसावे किंवा बराबरीने आसावे कमी धारणेने विकले आसता व तेल मिळत नाही असा बोभाट पडला आसता पारपत्य करून वाण्यानी हि तेल विकावे आसे होईल तेल्यानी बोलू नये

बिछाईती येके जोडी पासून पन्नास जोड्या आल्या आसता त्याची खो फोक्त तेल्यानी करावे जिनस माघार जाऊ देऊ नये जातो असे जाहाल्यास वाण्यानी दरम्यान दरदाम ज्याजती आगर कमी करून घेऊ नये

वाण्यानी तेल विको नये दरम्यान लबाडी केली आसता पारपत्ये करावे वाण्यास घरखर्चास तेल लागेल ते देखील तेल्यापासून घ्यावे

भुसार उदीम सर्वानी करावा आसे आहे त्याप्रो तेली यानी केला असता वाण्यानी बोलू नये भुसार सर्वांनी विकावे

किराण जिनस तेल्यानी विको नये विकले आसता गुन्हेगारी घ्यावी

कलमे ७

सात कलमे कराराची याप्रा निभा(व)णी करू म्हणोन तेल्यापासून कतबा लेहून घ्यावा आणि वाण्यास तेल विको नये म्हणोन ताकीद करावी

छ ११ साबान आस्विन मास सन मार

वळवट वळावयाचा शिरस्ता

ले. १२० (६३) श्री { श. १७४३ / इ. १८२१ }

यादि वलवट वलावयाचा सिरस्ता सुा इसने असरीन मयातैन व अलफ मजोरी

१ गहू दर पायलीस ०८

मोहोतर्फ्यांत सवलत

श्री

ले. १२१ (१५३)

{ श. १७५४
{ इ. १८३२

कौलनामा राजश्री लक्ष्मण माणकेश्वर नि ॥ श्रीमंत राजश्री विठलराव मल्हार पुरंदरे ता॥ पेठकरी समस्त मारवाडी पेठ मौजे वडुले खु॥ प्रो दाणेगाव सु॥ सलास सलासीन मयातैन व अलफ सन १२५२ कौल सादर केला असे मौजे मारी पेठ वसविली त्या दिवसापासून आजपरयंत सरकारात मोहोतर्फा दिल्हा नाही सा॥ सरकारातून सन १२३९ येकूणचालसाचे साली तुम्हास मोहोतर्फ्याविसी तगादा जाला त्यावरून तुम्ही आज दोन वर्षे बेदील आहा याजकरिता साल मारी तुमची नातवाणीवर नजर देऊन सालमारापासून दर साल रुपये २५ पंचवीस मोहोतर्फा सरकारात देऊन सुखरूप महामुरी करून राहाणे ज्यास्त व गैरवाजवी तोसीस कोणी लागणार नाही ता॥ छ ५ जाखर मोर्तब सूद

सदरहू नकलेबरहुकूम कौलनामा पेठकरी मारवाडी यास दिल्ही असे.

दळणकांडणाचा निरख

ले. १२२ (६४) श्री

यादि केली जिनस दळणाचा व कांडणाचा निरख गा॥ कुसाई टके

दळणाचा भाव

- ०।० सपीट दर पायेली
- ०।० पिठी दर पायेली
- ०।० हरभऱ्याचे पीठ दर पायेली
- ०३ वड्याचा भरडा दर पायेली
- ०९ गहू दर पायेली
- ०९ मुगाचे दालीचे पीठ दर पायेली
- ०७ उडदाचे दालीचे पीठ दर पायेली
- ०६ बाजरी दर पायेली
- ०९ जोरी दर पायेली

सडाई दर पायेली रुके

- ०४॥ तांदूळ बारीक
- ०३ तांदूळ मोठे
- ०१॥ दाल तुरी
- ०३ दाल उडीद धुवा
- ०३ दाल मुगाची धुवा

भरडाई दर पायेली रुके

- ०३ हरभरेची दाल दर
- ०३ उडीद
- ०३ मूग
- ०३ तुरी

एक जुनें कोष्टक

ले. १२३ (१४९) श्री

[1]याद्री तेल खरेदी पिंपलनेरास केले गुा लक्ष्मण भटजी जोडी २ पौ गणपतराव भाऊस अखे १ बाकी अखे ३ याा येथील तेल सन १२३९ वाा

ताा

प्रां आखी २ याा वाा पासऱ्या येकवीस २१ वाा
σ२॥५

प्राा अखे १ याा वाा साडे दाहा पासऱ्या वाा
σ१।२॥

पौ खर्चास काढिले वाा
σ॥३॥ माहे जिलकाद वैशाख
σ।-॥१ ३॥ माहे जिल्हेज

σ॥!४॥१ ३॥

σ।७॥४॥

बटकीचा लेक गोतांत घेतला

ले. १२४ (२३०) श्री {श. १६६२ श्रावण वाा ४ / इ. १७४० जुलै ३१}

दाा बो दताजी बिन बहिरजी नाहावी मौजे बेलसर काा सासवड सुाा ईहिदे आर्बैन मया आलफ आपण बहिरजीचा बटीकीचा लेक त्यास बहिरजीस संतान नाही त्यास त्याजला देवाज्ञा जाहाली तेसमई त्याचा भाऊ सुभानजी नाहावी जवली होता त्यास बहीरजीने सागितले कीं आपला काल समीप उरला आपण मरतो आपले + + + + नाही पाणी पाजावयासी + + + + नाही येसे आहे तरी आपला कुणबिणीचा लेक दतू आहे याजला गोतात घेणे म्हणजे हा पाणी पाजील येसे सांगितले त्यावरून हाली सुभानजी आपणास गोत घेत आहे तरी आपणास गोत घेतलीयावरी आपण गोताचे पंक्तीपावन मात्र होईन परंतु त्याचे वतनासी आपणास काही संमध नाही हा कागद लेहून दिल्हा सही छ १७ जमादिलवल शके .... नाम संवछरे श्रावण ... गुरुवार

---

१ यावरून कोष्टक बसविता येईल तें असे :

१०॥ पासरी = १ आखे

२ आखी = १ जोडी

बाईस फारकत पत्र

ले. १२५ (३०१) श्री { श. १६६६ मार्ग. व. १४
इ. १७४४ डिसें. २१ }

फारिखत शके १६६६ रगताक्षीनाम संवछरे मार्गसीर्श वद्य चतुर्दसी भृगुवासर तादिनी फारिखत लिखित + + नाईकबाई जगथापीण व राणोजी जगथाप व भिवाई जगथापीण का। सासवड यासी उदेगिरी गोसावी वस्ती देऊल सिदोबा त्याहावया कारणे फारिखत यैसा जे तुम्ही मजपासी दाहा पंधरा वरसे होता यामुले तुम्हाकडे माझी बाडविशाद व टका पैका असेल म्हणून हरकोणी दिकत करून गोसावी अगर दिवाण अथवा गावकर करितील तरी माझे काही बिशादीचा अगर टका पैकीयाचा काडीमात्र गुता नाही मजला बरे वाटत नाही याकरितां तुम्हास हे फारिखत लिहून दिले असे यासी मी तफावत करून तुमची माया धरून हरयेक बिशाद व टकापैका तुम्हाकडे ठेवीन तर माझ्या तोडावर पायेपोस व माझ्या वडिलांच्या तोडावर पायेपोस असे इतकेवरी तुम्हावरी लटके तुफान करून माझे माळीस्तीचे ठेवील त्याच्या वडिलाच्या व त्याच्या तोंडावर पायेपोस असे हे फारिखत लिहिले सई छ २७ जिलकाद सन खमस सदरहूखेरीज तुझे लग्न करून दिले ते धर्मलग्न करून दिले असे याची कोणी दिकत न करणे छ मा।र

निशाण पावडी

साक्ष श्री देव सिधेश्वर

आपाजी पाटील बीन तिमाजी पाटील जगथाप कसबे मा।र

निबाजी बीन मालजी पाटील जगथाप का। मा।र

[1]म्हसाजी बीन गोदजी मोरे वस्ती का। मा।र मौजे निधान पा।

[1]मानाजी देशमूख जगथाप का। मजकूर

आणाजी देशमूख का। मा।र

[1]मनसागीर गोसावी जटिल मठ श्री नगरेश्वर

[2]दा। त्रिंबक सदासीव पुरंधरे देशपांडे कुलकर्णी का। मजकूर

---

१ निराळ्या वळणाचा मजकूर २ खुद्द त्रिंबक सदासिव याच्या हातचा

जातीचा शोध नसल्यानें काडीमोड

श्री

ले. १२६ (२११) { श. १६६७ भाद्र. शु. १
इ. १७४५ आगस्ट १७

साडखत शके १६६७ क्रोधनाम संवछरे भाद्रपद शुध १ प्रतिपदा मंदवार ते दिवसी निबाजी बीन कानोजी चव्हाण मौजे दहीगाव पो वाई हाली वस्ती का। सासवड यांसि शंकर भारथी गोसावीण हाली वस्ती कानगाव ता। पाटस प्रो पुणे लेहून दिल्हे पत्र येसे जे आपली लेक सावित्री अपला जावाई गोपालजी पवार त्याची लेक उमा ती आपली नात ते लाहान साता वर्षांची होती तेव्हां तुजला दिल्ही लग्न केले त्यास आजी दा बारा वर्षे जाली तेव्हां तुम्ही जातीची चौकसी केली तेव्हां आपले जातीचे कोठे ठिकाण न लागेसे जाले तेव्हां तुम्ही व आम्ही श्रीमंत राजश्री धोंडोबा देशपांडे का। सासवड येथे गेलो तेव्हा तेथे पाचजण बैसोन मनास आणिले आणि सांगीतले की तू इची काडी मोडून देणे त्यावरून तुला माझे नातीची काडी मोडून दिल्हीस आणि आपण आपले नातीवरी नग होते ते दिल्हे बी।।

गोठ	तानवडे	मणी गळ्यातील	कंगण्या १
होण ४	२	१२	२

येणेप्रमाणे दागिने मौजे कानगावास गेलीयावरी दिवाणचा हवालदार सुभानजी कामथा तेथे आहे त्याचे गुजारतीने तुझे हवाली करून याउपरी आपले नातीसी तुजला समध नाही हे लेहून दिल्हे सही

बाईस सांडखत

ले. १२७ (२५२) श्री { श. १६७७ कार्तिक वद्य १२
इ. १७५५ डिसें. १.

साडखत शके १६७७ युवानाम सत्वछरे कार्तिक वद्य द्वादसी सोमवार ते दिवसी राजश्री चिंतो तान्हदेऊ पुरंधरे यासी धोंडजी बिन माहादसेट मोटा वाणी का। सासवड सु।। सीत खमसैन मया अलफ कारणे साडखत लेहून दिल्हे यैसे जे तुमचे कुणबिणीची लेक मानी श्रीमत राजश्री अस्करराऊ काका याणी करून दिल्ही होती लग्न जाले तिचे आपले तीन च्यार वरशे चालले प्रस्तुत तिचे आपले बनेना याजकरता आपण चौघाजवळ उभे राहून सागितले की ही बाईको आपणास लागत नाही काडी मोडून देतो साडखत देतो म्हणून बोललो त्याजवरून चौघानी तुम्हास कागद लेहून देविला तरी आपण खुश रजावंदीने साडखत लेहून दिल्हे आसे इजला आल्या वरास देणे अगर हरयेक करणे आपले काही इजकडे नाही नग नगोट्याचा अगर हरयेकविसी

काही (ला) इच्या राहिला नाही याउपरी तिसी चोलावयासी अर्थाअर्थी समंध नाही हे साइखन लेहून दिल्ही सही छ २५ सफर

खीस बेदाव्याचें पत्र

श्री

ले. १२८ (५९)

{ श. १६८२ फाल्गुन वद्य ७
{ इ. १७६१ मार्च २८

छ २३ साबान

श्रीमंत् राजश्री पंतप्र-
धान स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक सूर्याजी+ मोहिते हवालदार व कारकून किले प्रतापगड दंडवत व आा सा नमस्कार विज्ञापना ता छ २० माहे शाबान सुा ईहीदे सितैनपर्यंत स्वामीचे रुपाद्रिस्टी करून किले मारचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विज्ञापना येसी जे जे स्वामींनी आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा जे सिदनाक माहार मौजे नागावे ता गोरेगांव प्रा राजपुरी याणे हुजूर विदित केले की आपण चाकरीस नागपुरास गेलों होतों बायको घरी ठेविली होती तेथून आपले आईचे घरी कसबा नातें येथे गेली तेथून सोननाक कापडेकर याणें माझे सासवेस न पुसता फिताऊन घेऊन किले प्रतापगडास आणिली यावर मी तिकडून आलो घरी आल्या बायकोचे सार्यंत वर्तमान कळले यावर माहार मजकुरासी कजिया सांगोन बायको मागों लागलों त्याजवर का नाते यास गोत मिलोन पंचायेत करून बायको द्यावी आगर हरकैसी समजावीस करून टाकावीसा करार जाला असतां हालीं किलास जाऊन बायको आणू देत नाही तर याचे गोतांत निवाडा ज्याप्रमाणे होईल त्याप्रमाणे विल्हेस लाऊन सित-नाकाची समजावीस करणे येसी आज्ञा येसीयासी आज्ञेप्रमाणे जावली सुभाचे वतंदार माहार व कोकणचे मिरासी मेलऊन इनसाफ त्याजवर टाकिला त्याणी करिणा सर्व मनास आणून सिदनाकासहि च्यार गोस्टी सांगोन सोननाकाची व सिदनाकाची गोडी करून समजावीस केली सितनाक याणें थोरपण घेतले लग्नाची बायको होती खरीच परंतु मजलाहि तिकडे चाकरीवर बहुत दिवस लागले पूर्ती वाट पाहोनें मग दुसरे घरदार करावे होते बरे जाली गोष्ट त्यास इलाज नाही दुसऱ्या मुहुर्ताचे दादल्याची मुले देखील जाली फिरोन ते बायेको आणभवावीसी काये आहे हे चितांत आणून बायेकोची

+ हा सूर्याजी मोहिते शाहू असतां वेळचाच आहे, सिक्का बदललेला नाहीं. तसेंच पत्राप्रारंभींच पत्रांत महिना व तारीख देण्याची ह्याची पद्धती दिसते.

सांड केली समस्त गोतानी हरदुजणांचा कजिया तोडला सितनाकाचे रजावदीने बेदाव्याचें पत्र सोननाकास लेहून दिल्हे आसे स्वामीचे आज्ञेप्रो हरदूजणाचा इनसाप पचायेत मते करून समजावीस केली आसे याउपरी कजिया होणार नाही आथनाक गजीवाले याचे विद्यमाने पचायेतमते इनसाफ विल्हेस लागला आसे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना [शिक्का अस्पष्ट] श्री

राजा शाऊ
छत्रपती सू-
र्याजी मोहिते (सिक्का)

स्त्रीस खांडखत

श्री

ले. १२९ (४३)

श. १६९१ ज्येष्ठ शु. १०
इ. १७६९ जून १३

सांडखत सके १६९१ विरोधी नाम संवछरे जेष्ठ शुध १० दसमी ते दिवसी मुलाजी बिन त्रिंबकजी तेली सिंदे का सासवड यास मालोजी बिन माहादजी तेली का जवळे प्रा कडेवलीत सुा सबैन मया व अलफ कारणे सांडखत लिहिलें जे आपण पानपतचे स्वारीस लस्करास गेलो तिकडे परागंदा होऊन राहिलों माघें बायकोच्याने धीर धरवला नाही व तिचा बाप मल्हारजी बिन होनाजी फले तेली आरणगांव नजीक खडकत तो आपला सासरा त्यानेहि आमची गेल्या मेल्याची खबर चिती धरून मौजे आंबी खुर्द प्रो सुपें येथें कागद लिहून देऊन तुम्हापासी रुा ३० तीस घेतले मोहूतूर लाऊन दिल्ही तीन वर्षे गुजरोन गेली आतां आपण आलों त्यास हे बायेको बिटालेलें मांडे आपल्या कार्याचें नाही असें समजोन समस्त तेली गोत का मजकूर तुम्ही मेलऊन विचार करून आपणास रुपये + + + + + (आतः पर नाव घ्यावयास दरकार नाहीं) व यासी आर्थी आर्थी संमध (नाही) आपण तिची वार्ता सोडली आसें हे सांडखत लिहून दिल्हें सही छ ८ सफर

निशाणी पाहार

गोही*

शाहाजी तेली बिन कान्होजी तेली मेढकर मेहत्रा का मजकूर	पिराजी बिन बहादूरजी पा कामथे मौजे खलद
१	१

---

* यांची हस्ताक्षरें वेगवेगळीं.

कासीबा बिन फिंगोंजी सेटे का मार १

जोगोजी बिन सावजी तेली लेवटे का मार १

सिदोजी बिन नऱ्हेजी तेली रोकडे का मजकूर १

गोदजी बिन सुभानजी तेली मेरूकर का मार १

(पत्राचे बाजूस आडवा मजकूर)

बिा रावजी मोरेश्वर निा राजश्री महिपतराव त्रिंबक पुरंधरे देसपांडे जोसी (कुलकर्णी) का प्रा मजकूर

येसाजी बिन कान्होजी बारके माहाजन का मजकूर १

खंडोजी बिन गोमाजी तेली मौजे भोसरी प्रा पुणे १

तुकोजी मेरूकर तेली १

चिमाजी बिन गोंदजी तेली सिंदा का मार १

उदाजी बिन तुबाजी तेली सिंदे कसबे जवले प्रा कडेवलीत १

परटाच्या लेकीची काडीमोड

ले १३० (६०)

श्री

{श. १६९४
{इ. १७७२

यादि सगी परटीण मौजे दिये येथील मल्हारी परिटाची लेक मौजे बेलसरचे परटास दिल्ही होती तिची काडी मोडिली त्याचा करार सुा सलास सबैन गुा संताजी पाा झडा

रुा
२००

६४ छ ३ जाखर रोख
७५ छ ९ जाखर रोख
१३९

रूपीचें गोतपत करून दिले

ले. १३१ (२०७)

श्री

{श. १६९३ माघ शु. ५
{इ १७७२ फेब्र. ८

जबानी खेमी कोम बुलाभाई काहार वस्ती को सासवड सुा इसने सबैन मया व आलफ छ ३ जिलकाद शनवार ते दिवसी लिहून दिधले ऐसें जे आपली थोरली

लेक रुपी इचा दादव्या गिलज्याकडे पानपताचे वेलेस गैब जाहला तेव्हां वये न्हाण आल्याचे पद बायेको पणात देहे जालून राहवेना मग तारापत पुर्व्यांचे व आमच्या मुलीचें मन मिलोन त्यानें इजला राखले होते त्यासीं इने संग त्यासी केला दाह वरसें सोबत होती मग आंमचे जातीचे लोक बोलिले की थोरली बायेको काहार गरीर आसतां बटकीदाखल सोयेरा करून काल कर्मीती हें जबून जातीत घ्यावी तेव्हां चौघांचे हाताव (र) + + जातगोताचे घालून पंगतीस जेऊ घालून गोतांत घेतली आसता फिरोन पुर्व्यांचे बिन्हाड देवघेव माझा होता म्हणून तुटक होऊन पुर्व्या दुसरीकडे जाईना घरीं बिन्हाड असल्यास दोघे येके जागां वर्ततील मागती जातींत बोल ठेवतील याजकरितां आपले लेकीस धाकटे लेकीकडे आकलकोटास रूपीसहि वाटे लावले पुर्व्यांची व रुपीची तडातोड केली व पुर्व्या मजकुराचा देवघेवहि आपण वारिला तेव्हां आमचे घरीहून निघोन बहीरवाजवल वाडा आहे तेथें जाऊन राहिला त्यास दिढेक महिना जाहला रो महीपतराव लक्षुमण पुरंधरे देसपांडे राघो लक्षुमणाचे नातू जे दिवसीं लस्करास गेले ते दिवसी आगदी देणे तारापतीचे वारून टाकले व आमचे घरीहून निघोन गेला आसे जेष्ट मासी धा [क] टी लेक आपली उजऊन दिधली ते समईंच गोतपत रूपी थोरली लेक इची करून येथून आकलकोटास पाठविली त्यास सात आठ महिने जाले त्याजवर पांच सहा महिने तारापत आमचे घरीच होता त्याचा लाङ्या आवघा वारला तेव्हां घरीहून गेला दिढेक महिना जाहाला हे जबानी होती ते लिहून दिधली आसे छ मजकूर

निा दांडी पालखीची
बायेकोची जबानी सबब काकण

गोही O

जाखोजी सेनट चौगुला

(पत्राचे बाजूस आडवा मजकूर)

बिा रावजी मोरेश्वर दिा राजश्री महिपतराव त्रिंबक पुरंधरे देसपांडे को सासवड व जोसी कुलकर्णी को मजकूर

स्त्रियांस बेदावापत्र

ले. १३२ (१३) श्री { श. १६९४ श्रावण वद्य ११
इ. १७७२ आगष्ट २४ }

छ २४ जमादिलोवल सन सलास सबैन

राजश्री महिपतराव गोसावी यासि

छ. सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री जोत्याजी जाधवराव दंडवत् विनंती उपरी येथील कुशल जागौन स्वकीये लेखन करीत असिले

पाहिजे विशेष आपण पत्र पाठविलें तें पावले बेलसरकर परटास पाठउन द्यावे म्हणौन लिाले येशास त्याची मनसुबी मनास आणिता त्याच्या दोघीहि बायेका म्हणो लागल्या कीं हा आपले बापाप्रमाणे त्या त्याजखालीं नांदत नाहींत परटास सांगितले कीं आपल्या बायकास नांदवा वस्त्राचा पोटाचा बोभाट पडू देऊ नको त्यास तेहि त्याच्याने न होये मजला त्याची नांदणूक होत नाही म्हणून म्हणतो त्यावरून [शि. स. जा.] बेदाव्याचा कागद लेहून घ्याव[या]चा मजकूर चौघाचे विचारें जाला तो आपले पत्र आले कीं इकडेच पाठवणे त्यावरून पाठविला आसे कलले पाहिजे रा छ २४ जमादिलोवल +बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती [शि. मो. सु.] मोर्तब सुद

० श्री ~
पांडुरंग चरणी
दृढ भावपीलाजी
सुत सटवाजी
जाधवराव (अष्टकोनी शिक्का)

पहिला नवरा परागंदा म्हणून म्होतूर

ले. १३३ (१९०)

श्री

{ श. १६९५ श्रावण शु. ५
{ इ. १७७३ जुलै २४

दाा बाो कमाल वलद आजमेरी बागवान वस्ती पुणे पेठ आईतवार सुा आर्बा सबैन मया व आलफ कारणें——साहेबाचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसा जे शामी आपली लेक हसन वलद पीरमहंमद बागवान रांजणगाव ढुधना नदीचे काठचे यास दिल्ही होती ते उभयेता येका जागा नांदली कांही दिवस होऊन त्याचे पोटचे मूल येक जाले होते त्याउपरी हसन मार गिलच्याच्या लस्करास गेला त्यास दाहा बारा वर्षे जाहाली फिरोन सुख समाच्यार अद्यापवर नाही शामी पोर आर्दपराई बायेको तरूणपण तिचे आंगी आहे सबब छेटू वलद भिका बागवान वस्ती काो सासवड यासी मोहतूर निका लाऊन देतो खुशरजावंदी शामीची व आपणासहि पोटचे पोरीचे दुख देखवेना म्हणून निका लाऊन दिल्ही असे कालकला हसन वलद पीरमहंमद बागवान आला तर छटू वलद भिका बागवान यांसी कांही बोलावयासी वाद सांगावयासी समंध नाहीं याचाबे शामीचा वरीसदार आपण तिचा बाप आहे आम्हांसी वाद सांगेल तर त्यास दुसरी बायेको करून देऊं तिचा वारिसा आपण पुरऊन देऊं न देऊं तर गोताचे खोटे व दिवानचे गुन्हेगार हा कतबा लेहून दिल्हा सही छ ३ माहे जमादिलोवल

निाा तागडी
(तागडी तराजूसह चिन्ह)

+ अक्षर वेगळें.

गोही

जानोजी बीन लालमण परदेसी दिा राजश्री बगाजी साबाजी निा जिल्हेदार को मजकूर

पीरखान वलद करीमखान सिकलकर वस्ती को मार
१

सेख निजामवलद राजे महंमद मुलाणे को मार
१

सुभानजी वलद कालू बागवान
१

सामुला वलद फकीर महंमद बागवान
१

राजूवलद शाहाभाइ बागवान
१

नथूवलद जानमहंमद बागवान
१

मदारखान वलद राहानखान पहिले पखालीवर होते हली वस्ती को मार
१

(पत्राचे बाजूस आडवा मजकूर)

बीा रावजी मोरेश्वर निा राजश्री महिपतराव त्रिंबक पुरंधरे देसपांडे का सासवड व जोसी कुलकर्णी को मजकूर

ताट एक नाहीं, म्हणून सांडखत

श्री

ले. १३४ (२६२) नकल { श. १६९५ माघ शु. २ / इ. १७७४ जाने. १४ }

असल पत्र गंगाजी ठाकूर

सांडखत सके १६९५ विजये नाम संवछरे माघ शुधे २ ते दिवसी गंगाजी बिन दिपाजी ठाकूर मौजे येळसे नजीक लोहगड हाली वस्ती मौजे उरली कावल्याची यांसी मालजी बीन उदाजी जाधव मौजे कावरे ता खेडबारे खुा आर्बा सबैन मया व आलफ सन हाजार ११८३ कारणे सांडखत लेहून दिल्हे यैसे जे तुमची लेक ठकाई आपल्या लेक जोगोजी जाधव यासी केली होती लग्न जाहाले त्याजवर गोताने पुरसीस केली कीं तुमचा व यांचा सोयेरसंमध कोणे प्रकारचा आहे व ताट येक नस्तां सोयेरीक कैसी केली यैसे पुसिले तेव्हां त्यावरून अम्हास त्याची पुर्ती होये + + जाहाली मग तुमचे गोताचे गुजारतीन व गोताचे न्याये आपल्या खुशे रजादीन

साडखत लेहून दिल्हे असे तुम्ही अपली लेक अल्या वरास देणे याजविसी तुम्हासी अम्ही अगर अमचा भाऊ कोणी कजिया करीतील त्याचा जाब आपण करूं व दिवाणचे गुन्हेगार व गोताचे खोटे हा कागद लेहून दिल्हा सही सदरहू मुलीच्या अंगावरील व्याळा दोन व कंगण्या दोन व नथ येक तुम्ही दिल्ही असे ते पावली असे लिहिले सही

निा नांगर [नांगराचें चित्र]

साक्ष

१ बापूजी बीन फिरगोजी पाा इथापे मोकदम मौजे देगाव संमत निंब

१ खानाजी बीन खंडोजी खलाटे पाा मौजे खुटे प्राो फलटण

१ जावजी बीन रेखोजी पाा कुंभारकर मौजे कुभारवळण

१ पदाजी बिन माणकोजी पाा सस्ते मोकदम मौजे मुसी ताा हाविली

१ बहीरजी बीन जानोजी पाा मौजे काबरे ताा खेडबार

१ सालोजी बिन सिदोजी पाा गायेकवाड मौजे हिवरे

१ सुभानजी बीन मधाजी पाा गायेकवाड मौजे हिवरे

१ ल्हाखाजी बीन म्हालोजी पाा यादव मौजे हिवरे

१ विठोजी बीन सुभानजी पाा गायेकवाड मौजे हिवरे

१ देवजी बीन गुणाजी निभारे मौजे हिवरे

१ येसाजी बिन म्हसाजी चावीर चौगुले मोजे हिवरे

१ चाहूजी बीन काळोजी पाा कामथे मौजे चावली

१ मोराजी बिन जनकोजी पाा सेडकर मौजे चावली

१ संताजी बीन गोजाजी पाा कामेथे मौजे चावली

१ तावजी बीन तुळजाजी पाा कामथे मौजे चावली

१ यादोजी बीन जिजाजी पाा कामथे मौजे चावली

१ नागोजी बिन मायाजी कटके चौगुले मौजे चावली

सुभानजी बीन लखजी चौ

+ + + + + + + +

बिा त्रिंबक बापूजी अत्रे जोतिसी कुलकर्णी मौजे चावली ताा कऱ्हेपठार प्रांत पुणे

म्होतुराचा करार

ले. १३५ (३२) श्री { श. १६९७ ज्येष्ठ वा। ९
इ. १७७५ जून २१ }

दा। बो। गोरखोजी बिन फकीरजी कुंभार मौजे लिंपणगांव प्रा। कर्डे सुा। सीत सबैन मयां व आलफ साहेबांचे सेवसी कतबा लिहून दिल्हा ऐसा जे राणू कुंभारीण पलसी वनकुटेकर इजला आधिले घरचीं मुलें दोघे पुत्र व कन्या येक ऐसी आहेन रांडकी बायेको आहे ते आपण मोहर्त लाऊन बायेको करितों तिचा पेसजीचा कांही लढा आला तर त्याचा जाबसाल जो पडेल तो आपण खुद नि।। वारून देऊं न वारू सखो तर दिवानचे गुन्हेगार व गोताचे खोटे हा कतबा लिहून दिल्हा सहीं छ २२ रबिलाखर

नि।। चाक

गोही

१ कालू बीन रघोजी कुंभार का। मार

१ महादजी बिन तान्हाजी कुंभार का। सासवड

१ विसाजी बिन मकाजी कुंभार का। मा।र

(पत्राचे बाजूस आडवा मजकूर)

बि।। रावजी मोरेश्वर दि।। महिपतराव त्रिंबक पुरंदरे देसपाडे का। सासवड व जोसि कुलकर्णी का। मा।र

गांवच्या अधिकाऱ्याकडे लग्नाचा कज्जा

ले. १३६ (११) श्री { श. १६९८ माघ वद्य ६
इ. १७७७ फेब्रु. २८ }

पौ छ १९ मोहरम सबा सबैन

श्रीमंत राजश्री आपासाहेब पुरंदरे देशपाडे का। सासवड साहेबाचे सेवेसी

द अर्जदास्त सेरीकर मोकदम मौजे बेलसर को। मजकूर दंडवत विज्ञापना ता। छ १९ माहे मोहरमपर्येंत साहेबाचे कृपेकडून हाकीकत येथास्थित आसे विशेष साहेबी रोखा लोहाराचे सोयेरिकीकरिता पाठविला त्यास त्याचा मजकूर येणे प्रो करंज्यास होनाजी लोहार व बहिरू नाहावी नवरा पाहावयास गेला ते समईचा करार की पचवीस रुो व दोन मण दाणे करजेकरानी द्यावे आणि लग्न वरचेवर करावे या प्रो बोलून होनाजीच्या पुतण्यास व बहिरू नाहावी यास पागोटी बाधली मग त्याजवर करजेकर याणी नागपंचमीचा वैसा आणिला तो उतम रीतीप्रो आणावा तो आणिला ताही व पंचवीस रुो व

दाणे कराराप्रो दिल्हे नाहीत म्हणौन तेचसमइ् कटकट जाली आणि ववसा माधारा नेला व होनाजीच्या पुतण्यास पागोटे बांधले होते तेहि तेच वेलस करजेंकर घेऊन गेले आणि म्हणो लागले कीं सोयेरीक आम्हास दोड जाली आमची भावजई मेली याप्रो वल्गना केली मागती सेजारीपासारी याणी सागितले की ववसा रीतीप्रो व पंचवीस रुपये व दाणे आजपासोन आठा दिवसा घेऊन येणे करंजेकरानींहि कबूल केले की आठा दिवसां येऊ आठा दिवसा न येऊ तर आमची सोगई नव्हे ऐसे बोलोन गेले त्यास सात आठ महिने जाहाले फिरोन परत केली नाही व पागोटेहि माघारे घेऊन गेले सोयेरीक पैकीयाची त्यास पैकीयास माघारे सरले नाहावी बराबर नेला त्यास पागोटे बांधले ते नाहावी याजवल राहिले ऐसे करजेकर म्हणतात तर सोयऱ्याने पागोटे माघारे दिल्हे ते समई करंजकर तुटक करोन गेले मागती सात आठ महिने वाट पाहिली मग गुलुंचकरास सोयेरीक दिल्ही अजची हलद माघ वद्य ९ नऊर्माचे लग्न काहाडिले ऐसे असता साहेबी रोखा पाा की याचे वर्तमान मनास लिहून पाठवावे त्यांजवरोन साकल्य जाहाले वर्तमान तपसलिवार लिहून सेवेसी पाठविले आहे व होनाजीचा भाऊ राणोजी लोहार सेवेसी पाठविला आहे त्यास साहेबी सदरहू मजकुराची मखलासी करोन काये आज्ञा करणे ती करावी आपली आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करूं काल संताजी लोहार करंजकर येथे आला होता तोच कबूल जाहाला कीं आम्हांपासोन आंतर पडलें पैका घेऊन आलो नाहीं व परतहि केली नाही आज कजिया करावा तर सोईस पडत नाही मग आम्ही त्यास पागोटें माघारे देत होतो तेव्हा तो बोलला की माझा चुलता जेजुरीस आहे त्यास घेऊन येतो आणि समजोन जातो याप्रो करार जाहला असतां साहेबाकडे आला आणि गैरवाका समजाऊन रोखा आणिला त्यास उतम आहे बहिरू नाहावी व आणखी साक्षीदार आहेत त्याणीहि काल संताजी करजेकर यास सांगितले की लटका वाद न सांगणे याप्रो कचे वर्तमान आहे सेवेसी श्रुत होय हे आर्जदास्त

शिंपी रंगारी व निलारी या दोन जाती

ले. १३७ (२२२) श्री { श. १७०५ कार्तीक वद्य २
इ. १७८३ नोवें. ११ }

नकल

सिका मुख्ये

आज्ञापत्रक राजश्री — पंत प्रधान ताा समस्त सिपी काो सासवड सुाा आर्बा समानीन मयां व अलफ सिपी रगारी व निलारी याचे जातीचा कजिया पडोन पेशजी श्रीमत कैलासवासी शाहू महाराज याणी इनसाफ करून नामदेव सिपी आहेत त्याणी

सिवणे वगैरे उदीम करून असावे सिपी अँसोन रगारीपणाचे कसब करितात त्यास निराले ठेवावे व निलारी यास अन्न व्यवहारादि समध करू नये याप्रमाणे राजपत्रे करून दिल्ही असता सिपी रगारी व निलारी येकत्र होऊन परस्परे सोयेरिका करितात म्हणून हुजूर विदित जाले यैशास सदरहूची चौकसी करावी लागती तर तुमची वर्तणूक कसी आहे ती तपसिलवार लेहून पाठवणे जाणिजे छ १५ जिल्हेज आज्ञाप्रमाण मोर्तब असे

गैरकायदा पाटाचा जाब

ले. १३८ (२०४) श्री { श. १७०६ वैशाख श. १४
इ. १७८४ मे ४ }

० श्री ७
राजा शाहूनर
पति हर्ष निधान
माधवराव नारा
यण प्रधान ( ) बदामी गोल शिक्का

आज्ञापत्र राजश्री —— पंतप्रधान ता। गोविंदा सोनार मौजे माण ता। कर्यात मावल सु॥ खमस समानीन मया व आलफ सिवराम लक्ष्मण सोनार वा। मौजे तरडगांव पा। फलटण यांणी हुजूर विदित केलें कीं आपला भाऊ नारोजी सोनार हा उठोन गेला याचे ठि(का)ण शोध केला परतु लागेना बारा वर्षे जाली म्हणजे त्याची क्रिया करून मुक्त व्हावे असे असतां नारोजी गेल्यावर वर्षा दिढा वर्षांनी नारोजीची बायेको आपलें माहेरास गोविंदाचे घरीं गेली तिजला आपण बोलाऊ पा। परतु गोविंदाने पा। नाहीं त्याजवर आम्हास न पुसतां तिचा पाट लाऊन दिल्हा तिजवर आपली वस्तभाव होती तेहि दिल्ही नाहीं येविसी मनास आणिले पाहिजे म्हणोंन त्यास नारोजीची क्रिया जाली नसतां तुजला पाट लाऊन द्यावयाचे कारण काये हें मनास आणावे लागतें याजकरितां तुझे प्रयोजन आहे तरी देखत आज्ञापत्र हुजूर पुण्यास येणें या कामास सेटी व कासी बागूल दि॥ हरजी ना॥ पा। यास मसाला १० रुपये देविले असेत आदा करणें जाणिजे छ १३ जाखर पा। हुजूर लेखन

सीमा

बार

श्रीचे देवळांत सत्य सांगणार

ले. १३९ (२५१) श्री { श. १७११ फाल्गून शु. ५ / इ. १७९० फेब्रु. १९

(ले. १३८ प्रमाणें बदामी गोल शिक्का)

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ता। पाटील व कुलकर्णी व थलकरी व बलुते व मौजे भिवरी ता। करेपठार प्रांत पुणे येथील

पाटील कटके
१ धीराजी पा।
१ बहीरजी पा।
१ कृष्णाजी पा।
१ नागोजी पा।
१ शाहाजी पा।
१ विठोजी पा।
१ नागोजी पा।
१ सुलतानजी पा।
१ राघोजी पा।
१ भगवत पा।
१ नाईकाई पाटीलीण
१ हरजी पा।
१२

थलकरी
१ जानोजी घास्या
१ खडोजी वाडकर
१ बापोजी वाडकर
१ बालोजी भिसा
१ गोदजी सवक
१ अमृता गायकवाड
६

कुलकर्णी
१ कालो
१ आचाजी

बलुते
१ सभाजी सुतार
१ गगाजी गुरव
१ चागा न्हावी
१ चाप्या चाभार
१ गंगाजी कोली
१ गंगाजी कुभार
१ चिमाजी मुलाणा
१ येमाजी सोनार
४ माहार
 १ येशा
 १ गोज्या
 १ सभनाक
 १ मायनाक
 ४
१ फिरगा माग

३३

येकूण आसामी तेहतीस सु॥ तिसैन मया व अलफ बापूजी बिन चिमाजी व खडोजी बिन मावजी लोणकर मौजे मजकूर याचा भाऊपण्याबद्दल कजिया पडोन सदरहू तेहतीस आसामी श्री नागेस्वर को। पुणे याचे देवलात सिरून सत्य सागतील

त्यास मान्य या प्रमाणे राजी जाले त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी श्रीचे देवलात वदावयाकरिता सदरहू तेतीस आसामी हुजूर येणे [1]जाणिजे छ ४ जाखर पा[2] हुजूर

लेखन
सीमा
(गोल बदामी शिक्का)

विवाह वृत्तकथन

श्री रामोजयेती

ले. १४० (१५१)

श. १७१७ पैवस्ती वैशाख शुा १५
इ. १७९५ मे ४

वेदमुर्ती राजश्री बाळंभट शाळग्राम
स्वामीचे शेवेशी

सेवक खंडेराव दौलत प्रा। वीनंती उपरी येथील कुशळ ता। फालगुण वद्ये पंचमी पावेतो मुकाम पुणे जाणुन स्वकीये कुशल लीहीत जावे वीशेष आपण येथुन गेल्या तागाईत पत्र येउन कुशळवृत कळत नांही महेश्वरी पोहचलां कधीं तेथे कीती दीवस राहाणार हे सवीस्तर ल्याहावे जोंपर्यंत तेथें आहां तोपर्यंत वरचेवरी सरकारचे डाकेबराबर पत्र व सावकारी कासीद येतात याजबरोबर पत्रें सबनीसाचे राहुटस पोहचेत येसा पत्ता लेहुन पाठवीत जावी म्हणजे आम्हांस प्रवीष्ट होतील तुम्ही गेल्यावरी वेदमुर्ती वीश्वनाथ भटजी येथे आले होते प्रयोजनांत बाळंभट नाहीत तरी मीच आहे येसे बोलले चीरंजीव बाळाची मुजी माघ शुद्ध दशमीस केली व चीरंजीव सौभाग्यवती वेणुबाईचे लग्न माघ वद्य दसमीस जाले राजश्री जीवाजी बलाळ चीटणीस याचे नातवास मुल दीली शरीरसमंध चांगला मीळाला व प्रयोजनेही तुमचे देवाब्राह्मणाचे आसीर्वाद येथावीधीं राजश्री नाना फडणीवीस याणी व श्रीमंतास वीनंती करुन पुर्ववत कोणे गोष्टीवीसी दीकत न पाडावी पूर्ववत प्रयोजने चालत आली त्याप्रमाणे घडवीली पेणकर व ग्रामस्त कोणी चेष्टा करतील म्हणुन सरकारचे गाड्याचे पाहरे श्रीमंताकडील व सीद्याकडील व होळकराकडील व हुजरे देउन प्रयोजने येथावीधी यथासांग करवीली श्रीमंतही समर्थ व राजश्री नानाही थोर आठा वर्षांचा तंटा मोडुन टाकीला व पत्रेही सर्वत्र संस्थानास व सरदारास व मामलेदारास याच आन्वये देवीली मुजी व लग्ने व ईतर प्रयोजन शातीक पौष्टीक सर्व घडली आपण जवळ नाहीत आपणास कळावे म्हणुन ईतका वीस्तार लीहीला प्रयोजनांत वाो आन्याहीं येउन सर्व संपादीले तुम्ही तरी सासुरवाडीस गेला कुटुंबसन्नीध तेथे मेजवानी

---

१ यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा. २ यापुढील त्याहून निराळे वळणाचा.

नीत्य पाहुणचार सर्वकाळ आनंदाचाच जात असेल तेथे स्मरण कोणाचे होणे कळतच आहे येथील प्रकार तर घरी प्रयोजने जाली हा संतोष परंतु क्षणाक्षणा स्मरण ते आन्या साक्ष सांप्रत प्रयोजन (पुढील मजकूर गाहाळ) घेउन यावे सारांष लीहीला आभीप्राये घ्यानात आणुन उतर समर्पक पाठवावे बहुत काय लीहीणे रुपा लोभ करीत जावा हे वीनंती[1]

पोटासाठीं आज्ञापत्र

श्री

ले. १४१ (२०१)

{ श. १७१७ मार्ग. व. ९
{ इ. १७९६ जाने. ३

यादी लक्ष्मण ठाकूर मौजे लोणी कालभर याने विदित केले की मौजे कुरण येथील ठाकरास माझी बहीण मैनी दिल्ही होती त्यास तिचा दादव्या मयत जाला व व पोर जाले होते तेहि मयत जाले दादव्यास कोणी भाऊबंदहि नाहीत पोटास मिलेना व संसार चालला पो याजकरिता तिजला पाटाचा दादव्या मी करून देतो त्यास मौजे कुरण येथील मोराजी सोनार याने येऊन आडथला केला कीं माझे इजकडे रुा येणे आहेत ते दिल्याखेरीज पाट लाऊ नये यैसे म्हणतो त्यास माझे बहीणीचे आगावरील दागिने सोनार माारकडेच येणार आहेत तो दंडेली करितो त्यास तिजला पाट लावायाची परवानगी द्यावी सोनाराचाा वगैरे खटला तिकडे आला तर माार समजोन तिजकडे काही तटा आला तरी त्याचा फडशा मी करीन या आन्वये कतबा आलाहिदा लेहून दिल्हा आहे याजकरिता परवानगी द्यावी म्हणोन त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले आसे तरी मैनी माार इजकडे सोनाराचा वगैर तटा आला तर मी भरून देईन याप्रो ठाकराने कतबा लेहून दिल्हा आहे याजकरिता मैनी पाटाचा दादव्या करिती तिचा पाट लाऊन देणे म्हणौन मोकदम मौजे लोणी यांचे नांवे पत्र

[2]सदरहू आन्वये पत्र देणे १

पाच रुा घेऊन चिठी देणे

छ २२ जाखेर सीत तिसैन

---

१ अक्षर वेगळें व मोडींत, सबंद पत्र बालबोधींत. मुळांतील शुद्धलेखन कायम ठेविलें आहे.

२ या पुढील मजकूर निराळे वळणाचा

पाटाचा लढा

ले. १४२ (२५०) श्री { श. १७२९ ज्येष्ठ वद्य १४ / इ. १८०७ जुलै ४

रा मोकदम मौजे भिवरी यांसी लाडोजी जाधवराव रामराम सुा समान मयातैन व आलफ तुम्ही माहाराचा पत्र पाठविले ते पावले चाभाराचे सोयरीकीविसी मार लिा तो विदित आला मेहेत्रा व चौगुला चाभार आले आहेत त्याचा आग्रह येखत-पूरकर चाभारास द्यावी म्हणतात त्यास ते येकपक्षी बोलत आसतील ते ठीक नाही लढा पडला आहे हा उलगडल्याखेरीज कोणासीहि मुहूर्त लागो! न देणे वाजवी न्याये ठरोन ज्याची ठरेल त्यास द्यावयाची याकरिता पके ठरल्याखेरीज पाट लागो न देणे [1]जाणिजे छ २७ राखर [2]बहुत काये लिहिणे [मोर्तब सुद] (अष्टकोनी सिक्का)

पहिला नवरा मयत, सबब पाट

श्री

ले. १४३ (८७) { श. १७५३ / इ. १८३१

[शि. वा. अ.]

सरकार कुपणी इग्रज बाहादूर विद्यमान
बाबाजी रामचंद्र मामलेदार पो पुरधर याणी

ता मोकदम मौजे पूर ताा करेपठार सुा इसने सलासीन मयातैन व अलफ सन १२४१ फसली रायाजी मसाल मौजे पांचगाव याची लेक सताई उमर वर्षे ३५ ही माहादजी सिपाई निा सिबंदी चाकरी किले पुरधर यासी मुहूर्त लाऊन दिल्ही होती तो साल गुा मयत जहाला सा हाली सिदोजी बीन आनाजी जगताप मौजे राजेवाडी ताा मौजे मार उमर वर्षे ४५ मु (हूर्त) यासी मु (हूर्त) लावीत आहे त्यास मागील नवऱ्याचा .... चौकसी करून पाट लाव.........द कर्णे दाम सिरस्ते प्रा ....जाणिंजे तारीख २० माहे............ (अ. शि.)

———बार

१, २ अक्षरें भिन्न.

म्होतुरास परवानगी

ले. १४४ (२४५) श्री { श. १७६२ माघ शु. १२ / इ. १८४१ फेब्रु. १० }

पौ ता। १० माहे फेब्रवारी सन १८४१ इसवी

राजश्री पा। कारभारी मौजे गराडे ता। करेपठार यास का। बा। सुबाजी बिन संताजी देशमूख चव्हाण मौजे आगळेंचे पेटा डोणजे पो हवली सन १२५० फसली कारणे का। लिहून देतो ऐसी जे आमची लेक बनाम रुष्णा मौजे मूलखेड ता। पौडखोरे येथे दगडू तापकीर यास लग्न करून दिल्ही होती यास दगडू मा।र हा शके मा।रचे भाद्रपद अखेरीस मयत जाला सा। तिचे म्हणे आहे की मजला आन्नवस्त्र नादणे यास कोणी नाही याजकरिता मजला मोहर्तां लाऊन यावा म्हणोन वगैरे मजकुराचे बोलणे पडले सा। हली तुमच्या गावचा रामजी बीन तुकोजी जगदले मौजे मा।र यासी मोहर्त लावीत आहे तरी मोहर्त लाविण्याविसी परवानगी यावी मागील नवऱ्या चा। बीलकूल वारसा येणार नाही वारसा आल्यास त्याचा जाब तुम्हाकडे येऊ न देता आपण खुद नि।। जाबसाल करून देऊ यासी अंतर करणार नाही हा का। आम्ही आपले राजीखुसीने व आकलहुशारीने लि।। सही ता। १० फेब्रवारी सन १८४१ ईसवी

साक्ष मौजे मा।र सही सुभानजी संताजी चव्हाणची

१ मोराजी बीन रुष्णाजी पा। जगदले

१ बहीरनाथ गोसावी मौजे मा।र

बि।। जनार्दन माहादेव पुरंदरे नि।। बाबूराव शकर आत्रे जोसी कुलकर्णी मोजे मा।र

लग्न जमविण्याची खटपट

श्रीगणराज

ले. १४५ (२८९)

चिरजीव राजश्री आताजीपत दाजी खलदकर यासी सिऊबाईताई आर्शीवाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष तुम्हास पत्र पेशजी पा। आहे त्याचे उतर न पा। त्याजवरून लिहिले आहे तरी येक वेल भेटून जावे येथे चिरंजीव गोदोबा काका याचा पुत्र वर आहे याजकरितां वधू पाहिजे त्यास चिरजीव बालोबाची मूल वधू आहे यास्तव बालासहि पत्र लिहिलें आहे ते पाहून तुम्ही च्यार गोस्टी समजून सागून घडल्यात येई ते करावे वतन मोठे येक गाव प्रतिवर्षी येतो आन्नवस्त्रांस खोट पडायची नाही सारौष दोन गोस्टी युक्तीच्या सागून बालोबास घेऊन तुम्ही यावे येथे तुमचे आमचे विच्यारे घडणे ते घडल आनमान करू नये आगत्य

लिहिल्याप्रो करावे येथून बनाजी पा मगर पा आहेत हे मुखजबानी सर्व मार सागतील त्यावरून कलल विशेष काये लिहिणे हे आसिर्वाद चिरजीव सौवती झुराबाईस आसिर्वाद दाजीस लिहिल्यावरून कलल तुम्ही बालास सागोन च्यार गोस्टी सागून घडे ते करावे तुम्ही आपले वर्तमान शरीरप्रकृतीचे लिहिणे येकदा भेटून जाणे हे आसिर्वाद

सेवेसी लक्ष्मण विठल सा नमस्कार विनती लि॥ परिसोन लोभ करावा आली कडेस ममता निठूर केली फार चागले वडीलपणा योग नोव्हे ताईनी लि॥ आहे त्यावरून कलल लि॥ प्रो घडून येई ते करावे हे विज्ञापी

लग्नाचें निमंत्रण

श्री म्हालसाकांत प्रा

ले १४६ (४६)

चिरंजीव विजईभव राजश्री केशेवराव बाबा दाणी यासी प्रति बापू बलवंत दाणी का। सासवड वास्तव्य श्री जेजुरी अनेक आसीर्वाद उपरी येथेल कुशल ता वैशाख शु॥ द्वितीया पावेतो श्रीचे कृपे करून क्षेम असो विशेष आपले घरी चिरंजीव भिमाबाईचे लग्न वैशाख शु॥ १२ नेमस्त केले आहे शरीर संमंध राजश्री जिवाजी मल्हार कुलकर्णी सोनापूरकर ता मावल पुण्यापासून साहा कोस शेहगडाचे मागे आहेत त्याचे पौत्रासी निश्चेय केला आहे ग्रहस्त संपन्न लौकीकवान सुखी आहेत च्यार गावच कुलकर्णी निरंतर त्यासच आहेत याजकरिता आंम्ही येथील ग्रहस्त त्याचे परिचयाचा बरोबर घेऊन जाऊन पाहून त्याचे आमचे बोलणे झाले त्याणी दोनसे रु॥ हुंडा मागू लागले तेव्हा आंम्ही स्पस्ट उत्तर केले की आंम्ही गरीब पदरात घेतल्यास कंन्या आणि कुलसील इतके आहे त्याणी विच्यारिले की वरास व विहिणीस काय द्याल आंम्ही करार केला की वरास येक सेलापागोटे देऊ व विहिणी लुगडे याखेरीज काही आपली शक्ति इतकी त्याजवर त्याणी सागितले की तुंम्ही येथे येऊन लग्न कराल तर आंम्ही वस्तूलाभावर द्रिष्टी देऊन करू आंम्ही मनात विच्यार केला की सुखी स्थळ आज चालीस पंनास खंडी वर्षास गंला तांदूल ज्याचे पदरी दोनसे झाड आंब्याचे इनामात च्यारी गाव वतनाचे पैक्याने बाधून काहाडले आसे हुंड्यासिवाय मिळावयाचे नाही याजकरिता तेथे जाण्याचा रुकार दिल्हा आणि त्याणीहि सारफा (?) पाहिला की आपल्यास परस्थली गेल्यास से दोनसे रु॥ ज्यास्त लागतील आणि त्याचे वृधपण शेरीरास परस्थली जाण्याची यातायात याजमुले आम्हांस घोडी माणसे पाठऊन नेतात दोन घोडी येणार त्याजवर निर्वाह होईल जसा होईल तसा हो तुम्ही सर्व मुले लेकर घेऊन येऊन तेथे पोहाचावे मातुश्रीस व चिरंजिवास सर्वांस घेऊन यावे हे आसिर्वाद लग्न पत्रिका पा आहेत पाठवाव्या

मयतांचें टिपण

ले. १४७ (२८५) श्री

१ रामराव रघुनाथ याचा काल मार्गसीर्ष वा। ४ उदेपुरी जाहाला.

१ रामराव याचे स्त्री आमदाबाजेस होती तेथे त्यास वर्तमान येका महिन्यानें कलोन आस्ती तेथे प्रविष्ट जाहाल्या नंतर त्याणी सहगमन केले त्यास तीर्थी लिहिली नाही परंतु पौष वा। ४ चे मितीचे पत्र त्यास पत्रास येक महिना आजच जाहाला.

२
ता।

१ पुरुषास दोन महिने जाहाले

१ स्त्रीस येक महिने जाहाला

दोन्ही वर्तमाने मिलोन येके समईच कलले

मूल पुरुषापासून १ आम्ही १ मृत जाहाला तो (हें आडवें लिहिलें अम्हे.)

१० ६

'स्थळ' जमविण्याबद्दल खटपट

ले. १४८ (१३४) श्री

सेवेसी गोविंद गोसो सिर सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २७ जमादिलावल पा। येथास्थित असे विशेष राजश्री जनोबाभाऊ देशपांडे सिवापूरकर याचे बंधूची कन्या वधू आहे राजश्री पांडुरंग आपाजी आत्रे याचे पत्र आले तेच पाहवयाकरिता पाठविले आहे सिवापूरची मुलगी दुसरी येक आम्ही गुदस्ता पाहिली होती ती मुलगी लाहान व न्हस्व आकृत याजमुळे रुकार दिल्हा नाही ती करावयाचा उपयोग नाहीच जनोबा भाऊचे घरी मुलगी आहे असे गुदस्ताच समजले होते परंतु कैलासवासी नानासाहेब याचा मनोदय होता की पुणियात ढमढेरे याचे घरचे चालीत याची वागणूक आहे याजकरिता त्या खटल्यात आपण पडावयाचे नाही अशा भावें ती वधू पाहावयाची राहिली हली त्याजकडून येथे बोलणे आले आहे व पत्रहि आले त्यास राजश्री दादा व बापू डोलसे व आंताजी मनोहर व चौथा कोणही ब्राह्मण असे च्यार आसामी सिवापुरास मुलगी पाहावयास पाठवावे नाव नक्षत्राचे टिपण साल संवत्सरसुध्धा लिहून द्यावे उदईक मंगलवारी सिवापुरास जावे मुलगी पाहून जन्मकालचे टिपण घेऊन तिघा जणानी मावारे

सासवडास जावे दादानी टिपणाची नकल घेऊन पुणियास यावे मुलगी थोर व घटीत येत असल्यास आनमान करू नये जवलचे स्थल लग्नहि कार्याकारण समारंभाने होईल लग्नास सिवापुरास जावे लागेल जवल आहे चिंता नाही ढमढरे याचे घरचे चालीचे आता पाहावयाचे प्रयोजन नाही ते मन्मंतर सारेच गेले आपले घरी आपली वधू दील त्याचे चालीची गरज आपल्यास नाही माझे विचारे बरे दिसते मर्जीस येत असल्यास उदईक मगलवारी लिा प्रो करून साईकाली दादानी पुणियास यावे हाहि विच्चार मर्जीस येत नसल्यास दुसरी कोणती ती मर्जीस येऊन दादास लौकर पाठवावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

भाऊबंदांखेरीज लग्न करूं नका : सावधगिरीचा इषारा

ले. १४९ (१५९) श्री

*राजश्री सखोपंत दाजी स्वामीचे सेवेसी

* छ ७ साबान सुा सीत पत्र जनार्दन आपाजी

विनति उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावोन लिा वर्तमान सविस्तर कलो आलें रो मेघःशामपंत आखल्या करूं लागले याजकरितां येथे राहू नका म्हणोन कारकुनाबा सागोन पाठविले ते निघोन गेले तेथे कोणी काही समजावितील यास्तव लिहिले त्यास आरानिले + + आले नाहीत आगर मजकूरहि काही कोणी समजाविला नाही आधी + + + + + निघाल्यास लेहून पाठवणे + + + + (वा) घापूर येथील मोकदम येधून धरून नेला त्याचे लग्न सासवडी करविता म्हणोन कलले त्यास त्याचे भाऊबद कोणा नाहीत गैरहजीर आहेत आणि त्याजखेरीज याचे लग्न केल्याने गावचा बदोबस्त होतो यैसे आसल्यास करावयाचा विचार केला आसेल तो समजोनच केला आसेल उत्तर पाठवावे रा छ ५ साबान बहुत काये लिहीणे लोभ असो दीजे हे विनंति

मुलीच्या बापाचे लपंडाव

ले. १५० (१९७) श्री

दा बो भगवता बीन कोंडाजी सुतार मेहेत्रे का खेडसिवापूर साहेबाचे सेवसी तकरीर केली यैसी जे येमाजी सुतार मौजे हडपसर प्रा पुणे याने आपली लेक आपणास देऊ केली त्यावर आपला बाप कोंडाजी सुतार व आपला चुलत भाऊ भोवानी सुतार व चुलती तबाई यैसी त्रिवग जाऊन मुलीस मागणी घातली वस्तभाव येणेप्रमाणे घात..ी

१ पायेच्या साकल्या जोड १ वालेजोड
१ झुब जोड १ वेलाजोड
१ साडी चोली १ फडकी

किरकोल साहोते

येणेप्रमाण घालून घरास आली उपरातिक बहीरजी व तावजी व येमाची सुतार मौजे मजकूरकर हे त्रिवर्ग येऊन आमचे घरी राहील त्यावर त्यास पागोटी बाधोन रवाना केल उपरा(तिक) वोवसे पाच सात वरसे पाठविले उपरा(तिक) (ल)ग्न करणे यैसे आलिया वरसास जाऊन म्हणत होतो तेव्हा आपल्या वडलास यैसा बोलू लागला कीं आपल्या घरात सेरभर आन नाही उपरानिक यैसा निछेये केला की मूल उजऊन आम्ही नेतो त्याजवरून त्यान लग्ननिछेये करून लग्नपात्रिका करून दिली आण फालगून सुध ५ पचमींची तीथ करार केली नवरी सिवापुरी आनून लग्न लाऊन देतो त्यास फालगुन सुध ३ तीजस आम्ही लग्नाचे साहिते करून मधेस्त मालजी सुतार याजकड पाठविला की नवरी घेऊन येणे त्यास रात्री मुलामाणसासुधा नवरी घेऊन पळा(ला) मग मालजी उठोन आम्हाकड आला त्या + + वैशाखमासी महमदवाडीस खडोजी (सु)तार दिवेकर यास सोयेरीक देऊन लग्न लावल लग्न लागल्यावर महिनियाभरा आम्हास कलल की येमाजी सुतार यान आपल लेकीच लग्न केल याप्रमाण आपला करिना आसे हे लिहील सही छ २५ जमादिलाखर ताजा कलम सदरहू वर्तमाण लेहुन दिल्याप्रमाण आपण गोही साक्षनसी खरे करू(न) देऊ यात आतर जाहल्यास साहेबाच गुनेगार हे लिाा सही

निाा किकर

बिाा भिकाजी गोविद धारणे
जोसी कुलकर्णी मौजे पिंपरी
ताा साइस

हाडभाऊपणाचा शोध

ले. १७१ (२०५)

श्री

बोल्हाई आई

तालीक

राजश्री——देशमूख व देशपाडे काा
सासवड साहेबाचे सेवेसी

द अर्जदास्त सेवेसी आज्ञाधारक समात गोत गुरव नावनिसी तपसील येमाजी उपाधे मौजे कोंढणपूर व धोडजी उपाधे मौ आंबेगाव व देवजी उपाधे मौजे बोपगाव बहीरजी

गुरव मेहेतरे का। पुणे राजजी गुरव मेहेतरे का। चाकण कान्होजी गुरव का। लोहगाव व बाबू गुरव लोहगावकर व गोद्जी गुरव मौजे चावली पिलाजी गुरव मौजे ताथवडे अपाजी गुरव मौजे माजरी बालाजी गुरव मौजे नाहावी बोल्होजी गुरव मौजे तलेगाव सकोजी गुरव मौजे अम्ही लखमोजी गुरव मौजे राहु मालजी बिन गंगाजी गुरव मौजे वाडे माहास्थल श्री—साहेबाचे सेवेसी सदरहु गोताचा अर्ज यैसा जे सटवोजी गुरव व रघोजी गुरव मौजे दिवे व सटवाजी गुरव व सिदोजी गुरव मौजे मा।र यां हरदोजणात भाऊपणीयाचा शोध पडला त्यास सिदोजी गुरव व सटवाजी गुरव यासी बोलिले की तुम्ही आमचे हाडभाऊ नव्हे त्यावरून रघोजी गुरव व सटवाजी गुरव याने येऊन गोताजवल जाहीर केले त्यास समस्त गोत व उपाधे मिलोन वंशावली शोध पाहिला तो सटवाजी गुरव व सिंदोजी गुरव याचे हाडभाऊ सटवाजी व रघोजी गुरव आहेत यांत काही किलाफ नाही सात डोईपासून शोध जाला हाडभाऊ आहेत यांत अन्यथ नाही यैसे असतांना सिदोजी गुरव व सटवाजी गुरव म्हणतात की सोने सरीक आहेत हाडभाऊ नाहीत यैसे आहे गोतमुखे व उपाधे यांनी शोध तहकीक केला हाडभाऊ खरे यांत तफावत नाही त्यास साहेब खावंद आहेत या उभयेताच्या सुतास अधिकार येक मेकास आहे यैसे वर्तमान आहे तरी साहेबी उभयेताचा कजिया विल्हेस लागे आणि हर्शामर्ष तुटे यैसे केले पा। सेवेसी श्रृत होये हे अर्ज विज्ञापना

सेवेसी विठल गणेश वांगे जोसी कुलकर्णी मौजे वाडे श्रीचे रामराम अनुक्रमे नमस्कार गोताचा करिना हस्ताक्षरे स्वदस्तुरे आहे सेवेसी कलावे हे विनंति

गगाजी जगथापाची शुद्धि

श्री

ले. १५२ (२६)

नकल

श. १६५४ भाद्र. वद्य ८
इ. १७३२ आगष्ट ३१*

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५९ परिधावी संवत्सरे भाद्रपद बहुल आस्टमी गुरुवासरे क्षेत्रिय कुलावतंस राजा शाहू छत्रपती स्वामी याणी देशमूख व देशपाडे व समस्त गोत पा। पुणे यासी

आज्ञा केली यैसी जे गंगाजी जगथाप देशमूख वगैरे साली माली सात आसामी कसबे सासवड यासी माहारीसी बदआमल केला त्यास हुजूर आणून तहकिकात करून

---

* मोडक जंत्रींत अष्टमीचा क्षय दिला आहे. वार प्रमाण धरून तारीख दिली आहे.

श्री वाराणसी व रामेश्वरचे यात्रेत जावयाची आज्ञा केली ते यात्रा करून अलियावरी गोतपत करून शुद्ध करणे व त्याचे गोत्रज समधी जे आसतील त्यास दाढी डोई करून त्रीरात्र उपास करऊन प्रयेश्चित घ्यावे वरकाड ग्रामस्तास संसर्ग दोष प्राप्त जाला त्याणी येक दिवस उपास करून प्रयेश्चित घ्यावे ऐसा तह केला आहे तरी तुम्ही याप्रमाणे प्रायेश्चित करऊन शुद्ध करणें साता जणा (पुढील काही मजकूर फाटण्यांत) व सूद्रद संमधी गोत्रज यास + + + वन करणें जाणिजे

गोतगंगा कृपाळू होऊन गोतांत घेतलें

श्री

ले. ११३ (२८३)

{ शक १६५४ आश्विन वद्य १३
{ इ. १७३२ आक्टो. ५

नकल

राजश्री गोत समस्त गावगना
मुा सासवड गोसावी यासि

करिना जवानी मल्हारजी लोणकर मौजे तळेगाऊ इंदुरी ताा चाकण सुाा सलास सलासीन मया आलफ कारणे करिना लेहून दिल्हा ऐसा जे संभाजी कडू घन (गड) कर आपली जात जमाती आहे व हाली आपली सरकती + आहे त्यास तो फिरगीयानी धरून नेला तो बाटविला तीन वरसे तेथे होता तो तीन वरसानी फिरोन आला तेव्हा देहूरकर पटी त्याचे घरी गोधल माडला तेव्हा चौघा गोतानी गोताचे लेकरू म्हणऊन हाती धरावे म्हणऊन विचार केला पुढे गोतापुढे उभा केला त्यावरून गोतगंगा त्याजवर कृपाळू होऊन त्यास गोतात घेतले ते समई हाजीर मज्यालस येणें प्रमाणे होते बिा

बीाा

+ + चाजी परीट पुणेकर १	सुभानजी परीट राऊत चाकणकर
+ + + बाचाजी परीट साजुनर १	राणोजी परीट इदूरीकर १
+ काजी परीट देहूकर १	माणकाजी भायाजी परीट उचरेकर १
बाबाजी परीट चिचवडकर १	बाबाजी परीट चिचवडकर १
धोंडाजी परीट साग + वडेकर	दयाजी परीट चिखलीकर

येणेप्रमाणे होते हे गोस्टी म्हणऊन तुमच्या प्रयोजनास त्यास आपण वगतीस जेऊ घातले झाल्या करीणा याचा कागद आहे तो तुम्हास आणून दाखऊ जर न

दाखऊ तर गोताचे खोटे व दिवाणचे गुन्हेगार छ २६ रबिलाखरी करिणा लेहून दिल्हा सही यासी मुदती आलदीचे यात्रेस कागद आगून दाखऊन कार्तिक बहुल येकादसीस आणून दाखऊन हे लिहिले सही

गोही

होनाजी परीट बारामतीकर	सोनजी परीट कोढीतकर
+ + + परीट गोजेबावीकर	राणोजी चव्हा[ण] घोरपडीकर
+ + जी परीट कानेगावकर पा बीड	राणोजी पिपलेकर
बालोजी परीट का सासवड	खडोजी परीट तलेगावकर इदुरी
गोजाजी भोसला का सुपे	१

सदरहू जाऊजी परीट याचे घरी प्रयोजन जाले सुभानजोस बायको केली तेव्हां आवघे मिलाले होते बायको दुसरी मुहुर्तांची

गगाजी जगथापाची शुद्धि

श्री

ले. १५४ (२३१)

{श. १६५५ चैत्र वद्य ६
{इ. १७३३ मार्च २५

राजमान्य राजश्री केसो
समदेव गोसावी यांसी

सेवक बाजिराऊ बलाल प्रधान नमस्कार सुा सलास सलासैन मया अलफ गगाजी जगथाप देशमूख वगैरे असामी साहा का सासवड याजवरी माहारीच्या बद आमलाचा आल आला होता याकरिता साहा जणास श्री वाराणसी व रामेश्वर यात्रेस रवाना करणे यात्रा करून आलियावर पंक्तिपावन करवणे म्हणोन राजश्री — स्वामींनी आज्ञा करून आज्ञापत्रे सादर केली होती त्यास हाली साहा जणास हुजूर साताराच्या मुकामी अणून गोतमुखे व हजीरमजालसीचे मते तहकिकात मनास आणिता गगाजी जगथाप देशमूख वगैरे याजवर आल आला हता तो लटका मुदई कोणी नाही येैसे जाणून यासि पक्तीपावन करावयाची आज्ञा राजश्री —स्वामींनी केली आहे तरी तुम्ही को पुणे येथील मोकदम व सेटे कां सासवड येथे पत्रदर्शनी पाठऊन सदरहू साहा जणास पक्तीपावन करवणे जाणिजे छ १९ सवाल लेखन

सीमा (आकार वाटोळा)

गंगाजी जगथापाची शुद्धि

ले. १५५ (२७०) श्री { श. १६५५ चैत्र वद्य ४
{ इ. १७३३ मार्च २३

॥ छ

मा आनाम देशमूख व देशपांडे ता सिरवल यांसि नारो शंकर सचीव सुहूर संन
श्री सलास सलासीन मयां अलफ गंगाजी जगथाप देशमूख वगैरे असामी
शंकराजी कुणबी तीन व साळी येक व माळी येक व मुसलमान या सात जण
नारायण कसबे सासवड यांजवरी माहारीचा बद अमलाचा आळ आला होता
याकरिता गावास वाळीत पडले त्यास प्रायेश्चित देऊन गाव शुध करणें व मुसलमान-
खेरीज करून साहा जणास श्री वाराणसी व रानेश्वरचे यात्रेस पाठवणे यात्रा करून आलियावरी त्यासहि पंक्तीपावन करून गोतात घेवणे म्हणून पेशजी तुम्हांस आज्ञा केली होती त्यावरून तुम्ही गावास प्रायेश्चित देऊन गाव शुध केले त्यावरी गंगाजी मजकूर हुजूर येऊन विनंति केली की माहारीचा आळ आम्हावरी लटकाच आला आहे ये गोष्टीची माहाराजानी तहकिकात करून साक्ष मोइया मनास आणून आपणास आज्ञा करणे ते करावी म्हणून विदित केले त्यावरून हजीर मज्यालसी व गोताच्या मत्ते तहकिकत मनास आणिता दाईमुदई व साक्षमोइया कोण्ही नाही हे गोष्टी गलथ आहे सातांजणास काही दोश नाही यैसे जाणून यास गोतात घ्यावयाची आज्ञा केली तरी तुम्ही देशमूख व कुणबी व साळी माळी यो साहा जणास पंक्तीपावन करून गोतात घेणे येविशई पेशजी आज्ञापत्र सादर केले होते ते व हाली या पत्राची नकल *घेऊन असल पत्र याजवळ परतोन देणे छ* १७ सौवाल पा हुजूर [मो-शि-अ.]

पत्रावरिधयं भाति

सुरू सुद बार

गंगाजी जगथापाची शुद्धि

ले. १५६ (२७१) श्री { श. १६५५ चैत्र
{ इ. १७३३ मार्च

॥ द मा आनाम देशमुख प्रा सुपे यासि नारो शंकर सचीव सुा सलास सला-सैन मया आलफ गंगाजी जगथाप देशमूख व साळी माळी कुणबी यैसे सातजण कसबे सासवड यांणी कसबे मजकुरी माहारीसी बद आमल केला हे वर्तमान हुजूर

हा सांचवांचा मोतंब. * अक्षर भिन्न

राजश्री-स्वामीस विदित जाले त्यावरून सदरहू सात जण माहारीसी गेले याकरितां यास श्री माहायात्रेस व श्री चे यात्रेस जावयाची आज्ञा केली आहे ते जातील परंतु याचा सांसर्गीक दोष गावाकडे लागला याकरितां माहाली माहालचे देशमूख व गोत जमा करून गावास प्रायेश्चित देऊन शुध करावे येसा सिंधात करून मावल प्रांते व तुम्हास आलाहिदा राजपत्रे दिल्ही आहेत ती मनास आणून त्याची नकल व आज्ञापत्र तुम्हास सादर केले आसे तरी तुम्ही कसबे मजकुरास जाऊन वरकड माहाली माहालचे गोत जमा होईल त्याप्रमाणे जाऊन गावास प्रायेश्चित देऊन शुद्ध करणे

गंगाजीची शुद्धि

ले. १५७ (२७२) श्री {श. १६५५ आश्वि. शु. ३ / इ. १७३३ सप्टें. ३०}

*श्री मोरया

वेदशास्त्र संपन समस्त ब्रह्म मडली का सासवड यासि श्री-ची आज्ञा जे येथील वर्तमान आश्विन शुध त्रितीया येथास्थित आसे आपले वर्तमान लिहीत जाणे यानंतर राजश्री गंगाजी देशमूख वगैरे साली माली आसामी सात यांच्या प्रायेश्चिताविसी राजश्रीनी श्रीस पत्र लिहिले त्याजवरून आपल्यास लिहिले आसे प्रायेश्चितविध जो राजश्रीनी निर्वाह करून दिल्हा तो उतम आसे त्याप्रमाणेच तुम्ही त्यांस प्रायेश्चित देऊन शुध केले पाहिजे विशेष काये लिहिणे

गंगाजीची शुद्धि

ले. १५८ (२७३) श्री [1]मुद्रल {श. १६५५ / इ. १७३३}

श्रीमत्सकल वेदशास्त्र संपन्नैक शिरोमणि
राजमान्य राजश्री देव-स्वामि तथा समस्त
ब्राह्मण क्षेत्र पुणे स्वामि गोसावि यांसि तथा
विरेश्वर भट्ट यांप्रति

स्नो॥ रघुनाथभट्ट पंडितरायकृताः शतशो नतयः विशेषस्तु आपण राजश्री अंबा-

---

* बालबोध-हा बहुधा शिक्का असावा.

१ सबंध पत्र बालबोधींत आहे. येथे मुळांतील शुद्धलेखन कायम ठेविलें आहे.

जिपं [त] तात्यास पत्र पाठविले पावोन वर्तमान विदित जाले महाराज राजश्री–छत्रपति स्वामिस वर्तमान निवेदन केले त्यानि अज्ञा केली किं गंगाजी जगथाप गांवि नाहि तर त्यासाठीं प्रायश्चितास खोलंबा न करणे त्याचे स्त्रीस व घरच्या मनुष्यास देखिल प्रायश्चित देणे तो जेव्हा महायात्रा करून येईल ते काली त्यास प्रायश्चित देऊ तर त्यासाटी खोलंबा येकंदर न करणे सर्वांस निबंधोक प्रायश्चित देऊन अन्नोदक व्यवहार्थ करणे गंगाजीस गांवांत येयास प्रयोजन नाहि कदाचित आला तर बाहेर घालणे सुज्ञापति काय लिहिणे हे+ विज्ञप्ति

गंगाजीची शुद्धि

लें. १५९ (२७४) श्री { श. १६५५ चैत्र वद्य १४ / इ. १७३३ एप्रील २ }

नकल

वेदमूर्ति राजश्री रामभट धर्माधिकारी व समस्त ब्राह्मण कसबे पुणे यासी नमस्कार उपरी येथील वर्तमान येथास्थित आसे आपले वर्तमान लिहीत गेले पाहिजे विशेष राजश्री ——— पंत प्रधान व वेदमूर्ति राजश्री रघुनाथ भट पंडितराव याणीं पत्र लिहिले की कसबे सासवड येथे माहारीच्या बद आमलाचा आळ गंगाजी जगथाप व कुणबी व माली वं साली येकूण आसामी सा याजवर आला होता त्यास त्याचा इनसाफ राजश्री ——— नी मनास आणिला त्यास ते गोष्टी लटकी म्हणून त्यास प्राश्चित देऊन पंक्तीपावन करावे येविशी तुम्हासहि राजश्री ——— नी पत्र लिहिले आहे व राजश्री ——— पंत प्रधान व पंडितराव याणीहि लिहिले आहे तरी तुम्ही कसबे सासवडास जाऊन त्यास प्रास्चित देऊन पंक्तीपावन केले पाहिजे विशेष काय लिहिणे चैत्र वद्य चतोर्दसी शके १६५५

जगथापाची शुद्धि

लें. १६० (२७५) श्री { श. १६५५ / इ. १७३३ }

राजश्री देशमूख व मोकदम का। सासवड
गोसावी यांसि

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य–श्री। अंबाजी त्रिंबक पुरंधरे देशपांडिये

+ अक्षर भिन्न

का मजकूर असिर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये लिहिणे विशेष राजश्री गंगाजी जगथाप येथे आले भेटी जाली कितेक आम्हांसी बोलावयाचे ते बोलिले याउपरी हे येथ आहेत तुम्ही समस्त गोताई करून शुद्ध होणे ब्राह्मण व जखताप व समस्त गांव शुध होणे देखील गंगाजी जखताप यांची बायको आदीकरून शुध होणे +मग याचा निर्व्हा होणे तो हो [ई] ल कलले पाहि हे विनंति

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १६१ (२७६) श्री { श. १६५५ श्रावण शु. ३ / इ. १७३३ जुलै१

श्री मोरया

चिरंजीव — यांसि श्री — ची आज्ञा जे येथील वर्तमान आश्विन शुध त्रितीया येथास्थित आसे आपले वर्तमान लिहीत आसिले पाहिजे यानतरी बहुत दिवस जाले पत्र येऊन वर्तमान कलले नाहीं ते सांप्रत पत्र आले कुशलरूप जाणौन बहुत संतोश जाला सासवडकराचे प्रायेश्चिताचे वर्तमान लिहिले तर आपण जे केले आहे ते येथोचितच केले श्रीस लिहिले तर आपल्या लिहिल्यावरून क्षेत्रोच्या ब्राह्मणास पत्र लिहिले आसें कलले पाहिजे निरतर येणार मनुष्याबराबर कुशल वृत लिहीत आसिले पाहिजे विशेष काये लिहिणे

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १६२ (२७६) श्री { श. १६५५ भाद्र. वद्य ३ / इ. १७३३ सप्टें. १५

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत स्वामी गोसावी यासि

पोष्ये अंबाजी त्रिबक सा। नमस्कार विनंति उपरी येथील कुषल ता। छ १७ रबिलाखर जाणून स्वकांये कुषल लेखन करणे विशेष राजश्री दुर्गाजीबावा यानी पत्र

+ यापुढील मजकूर खुद्द अंबाजीपंत यांच्या हातचा असे.

तुमचे स्वदस्तुरचे पाठविले त्यावरून राजश्री स्वामीस विनंति करून गोतास राजपत्र देऊन पाठविले आहे हे आपणाजवल ठेवणे राजपत्राचा मजकूर कोण्हास कळो न देणे गोताने कागदासाठीं दुर्गाजीबावास आडविले की कागद लेहून देणें तरीच राजपत्र ते समई गोतास दाखवणे तो परियेत कोणास राजपत्राचा मजकूर कळो न देणे कागद आला नाहीं म्हणून राजश्री दुर्गाजीबावा कष्टी होतील तरी त्यास इतके मात्र सागणे की तुम्ही चिंता न करणे प्रसंग उतम होईल *बहुत काये लिंहिणे लोभ असो दीजे हे विनंति

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १६३ (२७८) श्री {श. १६५५ / इ. १७३३}

वेदमूर्ति राजश्री विरेश्वर भट स्वामीचे सेवेसी

सेवक आंबाजी त्रिंबक कृतानेक सा। नमस्कार विनंति उपरी येथील कुषल जाणून स्वकीये कुषल लेखन करणे विशेष स्वामिनी पत्र पाठविले तेच पत्र राजश्री पंडितराऊ यास नेऊन दाखविले त्यानी वर्तमान राजश्री——स्वामीस विदित करून आज्ञा घेऊन तुम्हास पत्र पाठविले आहे त्याप्रमाणे प्रायेश्चित देऊन सुध केले पाहिजे +तुमचे पत्र पाठविले आहे ते आसल पत्र गावकरी यापासि देणे तालिक लेहोन तुम्ही घेणे कृपा आसो दीजे हे विनंति

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १६४ (२७९) श्री {श. १६५५ भाद्र. शु. ५ / इ. १७३३ सप्टें. २}

राजश्री देशमूख व मोकदम को। सासवड गोसावी यासि

द अखंडित लक्षमी आलकृत राजमान्य ——स्नो आंबाजी त्रिंबक देशपांडिये को। मजकूर आसिर्वाद विनंति उपरी येथील कुषल ता। छ ४ रबिलाखर जाणून स्वकीये कुषल लेखन करणे विशेष रा। गोपालपंत यासमागमे आपले पत्र वेदमूर्ति राजश्री विरेस्वरभट याज (चें?) ला पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले त्यावरून राजश्री स्वामीस

---

* या पुढील मजकूर माहादाजी अंबाजीचे हातचा असे.

\+ यापुढील मजकूर खुद्द अंबाजीपंतांच्या हातचा असे.

विनंती केली राजश्री——स्वामीनी आज्ञा राजश्री——पंडितराऊ यासी केली त्यावरून राजश्री पंडितराऊ यानी पत्र दिल्हे ते तुम्हाकडे पाठविले आहे ते पत्र वेदमूर्ति राजश्री वीरेस्वर भट यास दाखऊन त्यांजपासी नकल देऊन प्रायेश्चित घेऊन सुध होणे + आसल पत्र जतन करून ठेवणे प्रायेश्चित आववीयास देणे बहुत काये लिहिणे हे विनंति

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १६५ (२८०) श्री { श. १६५६ चैत्र शु. ३ / इ. १७३४ मार्च २६

माहाराज राजश्री छत्रपती स्वामींचे सेवेसी

विनती सेवेसी गोत समस्त देहाये प्रा मार

देशमूख प्रा पुणे देशमूख बादल ता हिरडस मावल देशमुख ता वेल्हवंडखोरे

देशमूख ता रोहीडखोरे देशमूख प्रा सिरवल देशमूख ता खेडेबारे

देशमूख ता कर्यात मावल देशमूख व पाटील प्रा सुपे

प्रा मा स्वामीचे रुपे द्रस्टीकरून सेरीकराचे वर्तमान येथाछीत आसे विशेष माहाराज रुपालू होऊन गंगाजी जगथाप देशमूख वगैरे आसामी कि सासवड यासी पगतीपावन करावयाची आज्ञा जाली त्यावरून का सासवड येथे आज्ञा प्रा जाऊन छ १ जिलकादी गंगाजी जगथाप देशमुख वगैरे आसामी पगतीपावन केली आसे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

बहुधा तेंच शुद्धिप्रकरण

ले. १६६ (२०) श्री { श. १६५६ / इ. १७३४ पूर्वी

श्रीमंत माहाराज राजश्री——श्रीदेव स्वामीचे सेवेसी

सेवेसी सेवक आंबाजी त्रिंबक सां नमस्कार विज्ञापना ऐसी जे सासवडकरावरी आभिश्राप आला आहे याकरितां राजश्रीची पत्रें आरल्यास आहेत तरी स्वामीनी आपला येक ब्राह्मण व पत्र दिल्हे पाहिजे चिरंजीव राजश्री भैरालजीस पाठविले आहे तरी पत्र देऊन यांस लौकर पाठविले पाहिजे येथे पोरालेकराचा काहार जाला आहे म्हणून सेवेसी विज्ञापी लिहिली आहे राजपत्राची नकल घेऊन आसल पत्र देविले पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती *

+ या पुढील मजकूर खुद्द अंबाजीपंतांच्या हातचा असे.

* ह्या पत्राची आणखी एक प्रत आहे. त्यांत भैरालजी ऐवजी बाबाजी असा मुख्य फरक आहे. आणि वाक्य मागेंपुढें एकादें, पण सर्व मजकूर हाच.

गोतपत-पत्र

ले. १६७ (१५५) श्री { श. १६७० ज्येष्ठ वा। ६ रविवार
इ. १७४८ जून ५

गोतपतपत्र शके १६७० विभवनाम सवत्छरे जेष्ठ वद्य शस्टी रविवार ते दिवसी गोतपत्र लिखते सयाजी वडणा माली बीन तूळ माळी वडणा को। सासवड यांसी गोत समस्त ब्री तपसील नावसिदी

का। पुणे
१ सटवोजी पारखी माली मेहेत्रे
१ बकाजी लडकाज माली मेहत्रे
१ सुभानजी ढोले माली मेहत्रे

का। सिवापूर
१ हिरोजी जगथाप माली मेहत्रे
१ कान्होजी राजेकर माली मेहत्रे

का। मार
[पुढें बरीचशी कोरी जागा]

का। सुपे
१ मल्हारजी हिरवे माली मेहत्रे
१ दसमोजी हिरवे माली मेहत्रे
१ धोंडजी हिरवे माली मेहत्रे
१ रघोजी हिरवे माली मेहत्रे
४

का। सिरवल
१ राणोजी जाधव माली मेहत्रे
१ खंडोजी जाधव माली मेहत्रे
२

भोवर गाऊ गोत
१ देवजी ससागा माली मेहत्रा मौजे हडपसर
१ येसाजी पा। व खंडोजी पा। मौजे खनवडी
१ संताजी व परसाजी माली मेहत्रे मौजे बेलसर
१ म्हलोजी य-टी-मे(?)कर माली दियेकर मेहत्रे
१ रास माली मेहत्रे लोढे मौजे उरली
१ केरोजी लोढे उरलीकर माली मेहत्रे
१ संतमाली व म्हलोजी माली मेहत्रे जेजूरकर
१ फिरगोजी पाटील टिमेकर मौजे येखातपूर
१ सूर्याजी झुरंगे माली मेहत्रे मौजे भुजवडी
१ सुलतानजी रासकर माली मेहत्रे मौजे खलद
१०

सुा तिसा आर्बैन मया अलफ कारणे गोतपत्र लेहून दिल्हे ऐसे जे तुझे लेकीने तांबोली यांसी बदअमल केला त्यास इनसाफ होवा तो तिने जीव दिल्हा त्याजवरून तुजला वाळीत पडले त्याजवरून तुवा हुजूर जाऊन श्रीमंत राजश्री पंतप्रधान याची आज्ञापत्रें गोतास आणली की सयाजी मारााची मुगतता करून पांगतीपावन करणे म्हणून हुजुरून आज्ञापत्रें आणली व राजश्री देशमूख व मोकदम व देशपांडे काा मार यांची पत्रे व हुजूरची ऐसी आम्हा गोतास पाठविली त्याजवरून आम्ही समस्त गोत काा मारी जमा जालो आणि तुझे घरी तुजला पंगतीस घेऊन दोन दिवस जेवलो आणि तुझी शुध्धता करून तुजला पंगतीपावन केले यास कोणी हिला हरकत करील तो दिवाणचा गुन्हेगार गोताचा अन्याई हे गोतपत्र लिहीले सही छ १९ रबिलाखर

पंक्तिपावन करा

ले. १६८ (९) श्री { श. १६७२ ज्येष्ठ वद्य ५
नकल { इ. १७५० जून १३

समस्त गोत दाहीजण थल नेमणूक शके १६७२ प्रमोदीनाम संवत्सर जेस्ट वद्य पंचमी सुा ईहीदे खमसैन मया आलफ

काा सासवड सेटे व माहाजन समस्त दाहीजण कलम १

काा पुणे
१ मोरसेट वडके
१ खडसेट सोनवणी
१ सोमसेट सोनवणी
३

चाकण
काशीबा सेटे

काा चांभारगोंदे
१ सिदराम सेटे वलद रामसेट चौधरी
१ सावदेव बीन नारायेण सेट चौधरी
२

नांदेड
१ खडोजी बीन बचाजी मागेल
१ बहिरसेट वलद मकाजी काले

प्रा खुपे
१ गोपालसेट बीन मलसेट सेटे काा
१ फिरगोजी माहाजन गोलाडे
२

काा तलेगाव
१ तुळाजी बीन बिचाजी सेटे
१ राघोजी बीन धनसेट करंजे
१ मलसेट बीन बापूजी बसले
१ माहादसेट बीन रखमाजी वीर
१ मलसेट बीन संभाजी वीर
५

वाघोली
१ नानाजी वलद संताजी मागेल
१ मैरालसेट वलद धोंडसेट लगडे
१ रखमाजी बिन चागोजी येसवड
३

१ लक्ष्मण बीन सिवजी सोनवणी
का। खेड
१ रामजी बीन मकाजी सेटे

बारामती
१ मलसेट बीन सयाजी बसले
वाडी मौजे दिवे
१ बहिरजी सेट बीन कोंडाजी काले
१ आनसोजी बीन त्रिंबकजी पाडगुले
१ जायाजी बीन पिलाजी हागवणे
१ राघोजी बीन सखोजी देसमाने
४

सदरहू प्रमाणे गोत मेलऊन आज्ञा दिल्ही की ज्याप्रमाणे राणोजी वीरे यासी पंगतीपावन + + + (कल्या) प्रमाणे सासवडकरात आज्ञा की याजप्रमाणे संताजी मोटे यासी तुम्ही पंगतीपावन करणे यात संवशये नाही

सदरहूचे आसेल राणोजी वीरापासी होते सबब हाली निकल लेहून घेऊन पंगतीपावनास आज्ञा केली ते समई हाजीर मज्यालेस

देशमूख
१ बहिरजी देशमूख
१ पिराजी देशमूख

सेटे माहाज [न] वगैरे
१

गोतपतकरून शुद्धि

ले. १६९ (२६५)

श्री

{ श. १६७७ भाद्र. वद्य १२
इ. १७५५ आक्टो. २

नकल

छ मा। आनाम देशमूख व मोकदम व देशपाड्ये कसबे (सिका असे) सासवड कर्यात मजकूर यांसि बालाजी बाजिराव प्रधान मुा। सीत खमसैन मयां व आलफ भिकाजी साली पाडकर वस्ती का। मजकूर याणे हुजूर येऊन विदित केले की आपली सून पेशजी उठोन गेली होती ते पलीकडेले साली पुण्यामध्यें रा। हरी सदाशिव याचे घरी उमगली ते साहेबी त्याजला ताकीद करून आपले हावाला करविली तिजला आपल्या घरास नेली बाहेर गेली होती यामुले गोतानें संशय घेतला याजकरिता साहेबाची आज्ञा घेऊन गोताने रजावंदीने गोत्पत करून शुध केली त्याजपासून घरी नादत असे [ ] आसतां प्रास्तुत भावानी मातेकर साली संशये धरितो म्हणून विदित केले ऐसियासि पेशजी गोत्पत होऊन जातीत तिजला घेतली असतां हाली दिकत घ्यावयासी दरकार काये याउपरी हे पत्र सादर केले आसे तरी कोण दिकत घेत असले त्यास ताकीद करून भिकाजी मजकुरास सुखरूप जातीत वर्तवणे येविसीचा फिरऊन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ २५ माहे जिल्हेज लखनखीमा मार्तब असे

कर्मवंत चित्पावन वाद

ले. १७० (९८) श्री { श. १६७८ फाल्गुन
{ इ.१७५७ मार्च

सके १६७८ युवानाम संवछरे कर्मवंत याची हकीकत फालगून मासी रा। पांडुरंग जोसी याणी कोटी होम केला तेसमई कर्मवंताचा मूल चेऊल प्रतीहून आला होता त्यास सर्वाबरोबर अनुष्टानास लागला त्यास अनुष्टानांतून उठविलीयाने ब्राह्मण क्रोधे भरून सिवीगाली केली तंमुले चितपावन ब्राह्मण याणी मु॥ पुणे येथून चेऊल प्रातस्थ ब्राह्मणास पत्र पाठविले की चेऊल प्रांती करवंत ब्राह्मग आहेत ते अपगत यैसे गेले त्यास मातुश्री लक्ष्मीबाई याणी सहस्त्र भोजन बेलेश्वरी वरसोलीस केले तेथें सारे प्रातस्त जमा जाले त्यास श्रीमंत राजश्री मानाजीबावा आगरे याणी आज्ञा केली की श्रीमत राजश्री पंतप्रधान पुण्यात नाही ते स्वारीहून आलियावर त्याचे पत्र येईल त्याजप्रमाने वर्तणे ते गोष्टी मान्य न केली आणि नागावे आगसी वगैरे आस्टागरकर याणी आतीशये करून त्यांस पक्तीस बसू दिल्हे नाही ते कर्मवत ब्राह्मण पुण्यांत[1] शके १६७८ धाता संवछरे वैशा(ख) मासी[1] येऊन तीन महिने बसले त्यास श्रीमंत आशाड मासी पुण्यास आले त्याचे दर्शन होऊन सायन वर्तमान निवेदन केले पूर्वील पत्रे कैलासवासी माहाराज राजश्री शाहूराजे व राजश्री बाळाजीपंत प्रधान व समस्त ब्राह्मण मु॥ श्रीकृष्णतीर कोटीहोम श्रीमंतांनी केला ते प्रसंगीची दाखविली व कर्मवंताचे उपनाम टुलू म्हणोन पत्रे पैठण व पुणताबे येथील होती ती दाखविली व गोत्रसमधी यैसी दाखविली आलीबागचे मुकाम कैलासवासी राजश्री कान्होजी आगरे याणी सौ लाडूबाईचे लग्न केले राजश्री आपाजी जाधववराऊ यासी दिल्ही ते प्रसंगी पचवीस हजार सहश्र ब्राह्मण मिलला होते सर्वांचें मतें जाले की हे ब्राह्मण यासी दोश नाही यैसे होऊन पूर्वीप्रा आजी छतीस सततीस वरषे चालिले त्याप्रा हालीहि चालावे यैसे श्रीमंत व समस्त ब्राह्मणाचे चितास येऊन राजश्री मानाजी आगरे यासी पत्रे द्यावी यैसा निश्चये करून पत्रे लि॥ सिके करावे तो नागावकर वगैरे चितपावन याणी श्रीचे देवली दोन उपोषणे केली की हे गोष्टी ठिकाणी लावालिया खेरीज पत्र तुम्ही द्याल तर आम्ही प्राण देऊ यैसा आतीशये करून पत्रे राहाविली भाद्रपद शुध्ध प्रतिपदा पुढे सभा करून सर्वांचे मते निच्चये करून पत्रे देणार राजश्री नारो आपाजी देवली ब्राह्मणास उठवावयासी गेले होते त्यासच मध्यस्त घेतले की श्रीमंताजवल तुम्हीच ह्या गोष्टीचा ऊहू करावा ब्राह्मण उपोसित याजकरितां मान्य करून उठविले त्यावर श्रीमंताजवल वर्तमान पंतांनी सागिनले त्यास श्रीमंती उतर केले की पूर्वी समतपत्र थोर थोर पंडित शास्त्रज्ञ होते ते समई वडिलानी समस्ताचे विचारे पत्रे

---

१ हा मजकूर बाजूस आडवा विना ओळ लिहिला आहे.

दिल्ही आहेत ती आमान्य करून नवीन करावे तेव्हा हे गोष्टीस शास्त्रन्य काये करतील शहरांतील महस्ताच्या फलाण्या राहून श्री वोकारी मेलऊन त्याचा इनसाफ करितील येसे भाशण जाले असे

टाकलेली बायको जातींत घ्या

ले. १७१ (२४४) श्री { श. १६८० कार्तिक शु. ९ इ. १७५८ नोवें. ९

नकल

आज्ञापत्र राजश्री ——पंत प्रधान ता परीट का पुणे सु।। तिसा खमसैन मया आलफ तुम्ही हुजूर विनंति केली की सटवाजी परीट मौजे गराडे ता करेपठार प्रात मजकूर याचे बायकोन आपले मूल जिवे मारले म्हणोन तिचे पारपत्य पेशजी हुजुरून होऊन तिला बाहेर टाकले परीट मजकुरान दुसरी बायेको केली तिला मुले होईनात तेव्हा पहिले बायकोस समध जाहाला तिजला मुले जहाली आहेत यास्तव बायेको व मुले का सुपे का सिरवल व का सासवड येथील गोत जमा होऊन जातीत घेऊन वर्तऊ येविसी सरकारची आज्ञा पाहिजे म्हणोन त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले आसे तरी ती बाईको व तिचे मुले गोत जमा क(रून) गोतान घेऊन वर्तवणे जाणिजे छ ७ रावल पा हुजूर सदहू मार सनद परीट मजकूर याचे हावाली केली आसे

जातीचा कजिया

ले. १७२ (५५) श्रीगजानन प्रा { श. १६८५ कार्तीक शु. २ इ. १७६३ नोवें. १३

राजेश्री आपासाहेबाचे सेवेशी तकरीर कर्ते बा निळाजी बीन सिदाजी जगदले मौजे मुरटी प्रा सुपे सु।। सन हजार ११७३ कारणे तकरीर लेहून दिल्ही येसी जे मौजे मारी पारावरी बोली वादलीजे आपण सुभानजी बिन रत्नोजी यासी मानापानाचा कजिया सागत होतो त्यास सुभानजी बीन रत्नोजी बोलिला जे तू पोमान ? जगदला जातीचा नव्हे मग रा जावजी गौळी याजकडे गेला जावजीबावाने कतबा व + + + घेतले जे सुभानजी बोलिला जे तू पोमान खरा करून देऊन म्हणोन पाढरीत बोलीला त्यास जावजीबावास देव आज्ञा जाहाली कजिया तैसाच राहिला

त्यावर साहेबाकडे आलो साहेबी मनास आणून विल्हेस लाविले पाहिजे सेवेसी, तकरीर लेहोन दिल्ही सही छ ७ जावल वि॥ नागर

बी॥ मोरो जिवाजी वाग कुलकर्णी [नांगराचें चित्र]

मौजे मा॥र

आईच्या जातीचा शोध नको

ले. १७३ (२२४) श्री { श. १६८७ आषाढ शु. १२ इ. १७६५ जून ३०

नकल

राजश्री संगाजी साबाजी गोसावी यांसी

सु॥ सीत सितैन मया आलफ भवान माली बनसोड वस्ती कसबे सासवड हा पेशजी सेवगांवकडून कसबे मजकुरी येऊन राहिला आणि सासवडकर व दिवेकर वगैरे माली यांसी सोईरिका केल्या वीस पंचवीस वर्षे जातीत वर्तत आला आलीकडे दोन तीन वर्षे पिलमाली बिन — माली व याल वस्ती कसबे मजकूर हा बोलू लागला की भवान माली याचे आईचे जातीचा पता नाहीं दुसरे जातीची आहे त्यावरून नाव माली म्हैत्रा कसबे मजकूर याणे सदरहू वर्तमान सरकारात सांगोन सेवगांवास सरकारचे आज्ञापत्र व प्यादा घेऊन हरदूजण तेथें गेले आणि सेवगावचा वगैरे गोताचे कागद आणि त्याची चवकसी हाली मनास आणतां भवान माली याचे आईचा पता आहे आगर नाही हा मजकूर काहीच लिहिला नाही याचे वडील जातीत वर्तत आले व सोइरिकाहि आहेत म्हणून लिहिले आहे याचा अर्थ पाहाता भवान माली याचा बाप जातीचा खरा परतु त्याणे बाईको केली तिचा संशय पडला याजकरितां ठिकाण लावावे तरी इकडे सोयरिका करून जातीत वर्तत आला दिकतच पडिली तरी बहुतास पेच पडेल यास्तव चौघाचे विचारे दोन तीन वर्षे सदरहू दिकतीमुळे भवान माली याचे व त्याचे सोईरीयाचे घरी कोणी जेवित खात नाही सबब त्याजकडून गोत-जेवण घालून पूर्ववतप्रमाणे जातीत वर्तवावा यैसे ठराऊन हरदूजणास पुसिले तेव्हा दोघे रजावंद होऊन कतबे सरकारात लेहून दिल्हे त्यावरून गोतमते ठराव जाहाला त्याप्रमाणे हरदूजणास आज्ञा करून समजावीस काढिली आसे तरी तुम्ही भवान माली याजकडून याचे जीवन माफीक गोतजेवण घालऊन सर्वांस ताकीद करून जातीत सुरलीत वर्तवीत ऐसे करणे जाणिजे छ ११ मोहरम + मोर्तबसुद

+ अक्षरें वेगळीं.

पंक्तिपावन प्रसंगीं याद

ले. १७४ (३५) श्री { श. १६९१ आषाढ शु. २ / इ. १७६९ जुलै ५ }

यादी कान्होजी बोडका म्रा येरंडोलाकडे गोतपत जाहाली यावर का। सासवडी पंक्तीपावन केल्यास नावनिसीवार जेवावयासी आले ते शके १६९१ विरोधीनाम संवछरे आषाढ शुध २ द्वितीया बुधवार

किता

जगधाप देसमूख व पाा
१ जानोजी बिन पिराजी देसमूख
१ सटवोजी बिन दताजी देसमूख
१ रामोजी बिन बहीरजी देसमूख
१ घोंडजी बिन सिदोजी देसमूख
१ नानाजी बिन हंसाजी देसमूख
१ राणोजी बिन भोजजी पाा
१ जानाजी देसमुखाचा माहादू पेरगा
भुजाजी पाा यांचे भाऊ
१ फिरगोजी बिन मानाजी पाा
१ सताजी बिन बाजी पाा
१ फिरंगोजी बिन नावजी पाा
१ मालजी बिन नाईकजी पाा
१ हैबती बिन गुणाजी पाा
किाा
१ बहीरजी बिन मल्हारजी जाा
२ सातभाईच्या घरचे
१ मल्हारजी बिन खंडोजी
१ संताजी निंबाजी
२
१ सेट्याजी बिन धर्मोजी
नांदे जगधाप
१ गोविंदा बिन येसाजी नांदे जाा
१७

किाा

१ राणोजी बिन जयेराम प्यादा निाा राा
बगाजीपंत मोकासी
४ देसपांडे पुरंधरे
२ महिपतराव त्रिंबक पुरंधरे देसपांडे
यांजकडील
१ बहीरजी बिन + जी पांढरे
खासबारदार
१ नाईकजी जाधव खासबारदार
२ माधवराव नीलकंठ पुरंदरे देसपांडे
यांजकडील
१ जोतीबा कदम
१ बहीरजी माहाडीक
४
१ निाा राो आपाजी बलवंत यांजकडील
बापूजी गाईकवाड
१ निाा राा सखारामपंत बोकील यांज-
कडील नाईकजी वाल्हेकर
१५ माली येकंदर
१ धोंडजी बिन नाव माली मेहत्रा
१ माहादू माली जाा याजकडील
२ गिरमे
१ चापाजी बिन फिरंगोजी
१ लक्षुमण बिन येसमाली
२

किा
१ सेटी बिन खंडोजी सेट्या
१ बाबुराव सिंदे याजकडील
२ भाडले
१ सुभानजी बिन सटवोजी
१ (अस्पष्ट)
पाहुणे बोडक्याचे घरास त्याचे सोयेरे
झाले ते नावानिसी
४ भोंगोलीकर
१ राणोजी कावले
१ मानाजी कावले
१ जानोजी निकम
१ जानोजी सिंदे
—
४
२ कोढीत खुर्द येथील
१ राणोजी नेलेकर
१ भिवजी नेलेकर
—
२
१ चांबळीकर बाजी बोडके
—
७

१ गोविंदा बिन बहीरजी भोंगेल
१ गौरोजी बिन भाग माली इनामके
१ राणू बिन खुलबाजी चौखडे ?
१ माहाधू बिन विठोजी हिवरकर
१ बहीरजी बिन कृष्णाजी बारके
१ राघोजी बिन मल्हारजी होला
१ वडणे आंबाजी
१ सटऊ लंडगा
१ दिवशा मल्हारीचा ल्योक कान्होजी
१ सिवरकर मायाजी बिन सुभानजी
१ ससाणे येसू बिन बहीरजी
—
१५
२ सेनट चौगुले
१ नरसोजी बिन भिकाजी
१ जाखोजी बिन मानाजी
—
२४

आसामी
५२

सुतकामुळें घोळ, सरकारांत अर्ज

ले. १७५ (१६४) श्री मार्तंड { श. १६९२ इ. १७७० }

दा॥ बा॥ सटवोजी बिन सुभानजी व सकाई कोम गोदजी व मल्हारजी बिन येसाजी पुजारे सुरजन मौजे जेजूरी ता॥ करेपठार प्रा॥ पुणे सु॥ ईहीदे सबैन मया व आलफ सन हजार ११८० कारणे साहेबाचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसा जे आपल्या घरांतील चवथा भाऊ मलजी पुजारा गावी सेला त्याची बायेको मुलकावर

गेली तेव्हा तिजला ल्योक होता किंवा नव्हता हे आपल्यास ठावके नाहीं मलजीचा ल्योक म्हणोन संताजी गावास बहुता दिवसानी आला आणि तो म्हणो लागला की मी तुमचा चवथा भाऊ त्यावरून त्याचा व आपला कजिया वतनामुले सरकारात पडला आपण साहेबापासी लेहून दिल्हे की संताजी हा आपला काही नव्हे त्यावरून पाढरीची साक्ष सरकारात लेहून घेतली आहे व आपले चवथाईंतील वडील नारोजी बीन रायाजी पुजारे याने साक्ष लेहून दिल्ही जे संताजी मलजीचा लेक म्हणोन मल्हारजीचा बाप येसाजी याने आणून भेटविला होता त्यावर संताजी मृत्य पावला त्याचे सुतक आमचे चवथाईतील तीन तक्षीमिचे भाऊ नारोजी बीन रायाजी व मल्हारजी बीन माहा [द] जी व सिवजी बीन भगवतजी व तावजी बिन सावजी यानी सुतक धरले चवथाईतील चवथाईचे भाऊ आम्ही सटवोजी बिन सुभानजी व सकाई कोम गोद्जी व मल्हारजी बिन येसाजी आमचे वाटणीत मलजीचा लेक म्हणोन आम्हासी भाडतो आम्हास त्याचे आदी आवसान समजेना म्हणोन आम्ही सुतक धरले नाहीं त्यामुले आम्हास सरकारातून वाळीत घातले व आपले वतन जफ्त केले त्याजवर आपली भावजई आवजी पुजारी याची बायको मार्गेश्वर मासी मेली तिचे सुतक पडले ते चवथाईचे आपले चौत्रे भाऊ यानी धरले त्यास वाळिता करिता भावजईची क्रिया न होंये यामुले आम्ही आवघे भाऊ सुतकी राहिलो येक महिना जाला त्यावरून आवघे साहेबाजवल आलो आणि इनसाफ करावा येविसी विनती केली की आपला इनसाफ मौजे मजकुरी आमीन व क्रमाविसदार व पाटील कुलकर्णी व दोन तक्षिमा सुरजन नै व येक तक्षीम आगलावे येकूण तीन तक्षिमा व मोरगावकर गुरव व दवडजकर पाटील येसे गोत निवाडा करील त्या प्रां वर्तणूक करू म्हणून आर्ज केला त्यावरून इनसाफ जाला पाहिजे म्हणोन साहेबी आवघीयास शुध करावयाविसी रो बापूजी माहादेव यास पत्र व बगाजी सावजी आमीन देऊन शुध करावयाची आज्ञा केली तेथे शुध होऊ आणि संताजीचा ल्योक स (अपूर्ण)

सुतक धरलें नाहीं म्हणून तक्रार

ले. १७६ (१९५) श्री नकल { श. १६९३ माघ शु. १५ इ. १७७२ फेब्रु. १८

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण क्षत्र
मौजे जेजुरी ता। कऱ्हेपठार स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष खडो शामराज बेलसरे जोसी कुलकर्णी मौजे मार

*१ हें अक्षर अधिक पडलें असावें.

वगैरे गांवातील ता॥ मा॥र हे व सखो मोरेश्वर हे उभेयता येकजदी भाऊ असता खडो शामराज याजकडील सुतक सखो मोरेश्वर याणी व याचे सख्या भावानी धरिले नाही सबब सखो मोरेश्वर यास व याचे सख्या भावास बहिषकार घालून तुम्हांस हे पत्र सादर केले असे तर याचे घरी अन्नवेव्हार न करणे जाणिजे छ १३ (जिल) काद सुा॥ इसने सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति

आचारशुद्धीचा आग्रह

ले. १७७ श्री { श. १६९४ फाल्गुन वद्य ३० / इ. १७७३ मार्च २३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

राजश्री नारो आपाजी स्वामी गो॥

सेवक नारायणराव बलाल प्रधान नमस्कार सुा॥ सलास सबैन मया व आलफ समस्त गोसावी वस्ती कसबे पुणे याणी हुजूर विदित केले कीं आमच्या स्व + + + जोगेश्वर गोसावी वस्ती का॥ मजकूर हा आमचे गोसावीपणाचे आचारा प्रो॥ वर्तत नाही (वि)चारा सिवाय वर्तणूक करितो याजकरिता आम्ही समस्त गोसावी मिलोन त्याचे मठचे अन्नउदक वर्ज केले आहे त्याप्रो॥ गोसावी यास सरकारातून ताकीद जाली पाहिजे म्हणून त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी जोगेश्वर गोसावी आपले जातीप्रो॥ वर्तणूक करावी ते करीत नाही याजमुले अवघे गोसावी-यानी त्याजकडून अन्नउदक मना केले आहे त्यास येविसीची तुम्ही चौकसी करून तो गैरवाजवी वर्तणूक करतो ऐसे असिल्यास सर्वां गोसाव्यास ताकीद करून त्याजकडे अन्नउदक न घेत असे करणे आणि वाजवी मनास आणून विल्हे लावणे [1] जाणिजे छ २९ जिल्हेज [2] बहुत काय लिहीणे

लेखन
सीमा

पो॥ छ ५ मोहरम चैत्र मास
सन सलास

१-२ या पुढील मजकूर निरनिराळे वळणाचा.

वाळीत पडलेल्याची शुद्धि

ले. १७८ (२२६) श्री { श. १६९५ वैशाख वद्य १०
इ. १७७३ मे १६

द मा। अनाम देशमूख व देशपांडे कर्यात सासवड यांसि नारायणराऊ बलाल

श्री
राजाराम नरपति
हर्षनिधान
नारायणराव
बल्लाळ प्रधान

प्रधान सा। सलास सबैन मया व अलफ का। मा।र येथील पिराजी बिन संताजी पा। जगथाप याची व राणोजी पा। जगथाप याची कलागत सेतात गुरु गेलिया मुळे होऊन मारा जाली ते वेळेस पिराजीची काठी राणोजीस लागोन मेला यास्तव पिराजीचे घरात वाळीस पाडिले आहे त्याची शुध्धता जाली पाहिजे याजकरितां हे आज्ञापत्र सादर केले असे तरी पिराजी मा।रास अभयपत्र पा। आहे ते रा। करून त्यास आणवणें आणि त्याचे भाऊबंद व गोत जमा करून शुध्धता करवणे पूर्ववत प्रा। जातीत वर्तवणें [1]जाणिजे छ २३ सफर [2]पा। हुजूर

बार लेखन
सीमा

जातीची चौकशी-जेवावयास जावें कीं नाहीं

ले. १७९ (१०१) श्री { श. १६९५ मार्ग. शु. १२
इ. १७७३ नोव्हें. २५

जबानी लक्षुमण बिन त्रिंबक भट माहामुने वस्ती मौजे कटफल सु।। आर्बा सबैन मयां व आलफ कारणें साहेबांचे सेवेसी लेहून दिल्हे ऐसें जे आपण सोनार जातीत पंचाल सोनार सासवडकर आपले येजमान व सोयेरेहि आहेत त्यांत को। मजकुरी विरापा बीन रखमाजी सोनार जाखलेकर प्रां। कराड येथील आहे वस्तीस राहतो त्यास सांप्रत आषाढ शुध ११ येकादसी काल जाहाली आज द्वादसीस आपणास जेवावयासी सांगावयासी आला त्यास आपला पुतण्या आपा विरापाचे घरी जेवावयासी पाठविला साहेबी विरापाचे जातीची खुणखाण पुरसीस केली त्यास आमच्या सोयेरिकीस सासवडकराच्या नातलगांत आला का आप्तविशई म्हणावा तर परिचये पुरता या प्रांती नाहीं कराड देसीं याचा राहवा आहे तिकडे सोयेरिका आसतील तेव्हां सहजच येकामेकाचे घरास आप्तविशई मुलें बायेकाहि जेवावयासी जातात या गावीं आप्तविशईच कोणाचा नाही याजमुलें विरापाचे घरास आमच्या कोण्ही बायेका जेवावयासी जात नाहींत थोडासा परिचये तोंडवळखी मुलें

---

१ येथून मजकूर निराळे वळणाचा. २ येथून त्याहून निराळे वळणाचा.

आपला पुतण्या आज पाठविला केवल विरापा नातलग नाहीं मग काये सांगावे आमचे जातीत चाल आहे की पुरता सोयेरा चौकडून आसिला म्हणजे जेवायाखाया बायेका देखील जातात आज आपाजीस जेवावयासी पाठविलें ते कांहीं विरापाने श्रात्धाचे आवतणे देतां आढलले नाहीं द्वादसीस साक्षीस आसावें म्हणून जेवावयासी सांगितले श्राधाचा प्रसंग काहीं नवता आधिक वेगलें ल्याढावें तर तो साफ आपले आपत कोण आसतील त्याचे नांव कां घेईना आम्ही इतकें लिहिलें तो येवढा कज्या सांगणारा तो आप्त आपल्यास काही बोलतां कीं नाहीं हे आपण जालें वर्तमान ठाऊक होतें ते लिहून दिल्हे सही हे लिहील सही छ १० रा

निा सोनार भटाचें
पातडे

बिा रावजी मोरेश्वर निा राजश्री महिपतराव त्रिंबक पुरंधरे देसपाडे काा सासवड व जोसी कुलकर्णी कोो मार

यवनभ्रष्टाची शुद्धि

ले. १८० (३०६) ॥ श्रीविठ्ठलोजयति ॥ { श. १६९९ श्रावण शु. २ / इ. १७७७ आगष्ट ५

श्रीमत्सकलामरनिकर शिरोरत्न रंजितांघ्रियुगल श्रीपंढरीशपत्तनस्थाखिलधर्माधिकारिप्रमुखैः सासवडग्रामस्थ प्रभुवर्यान्प्रति तथा देशप्रमुख देशलेखकान्तथा पणस्थान्सकल दैवकदंबकान्नामवांशिनः कृताशिषः समुल्लसंतु ॥ विशेषस्तु स्वस्ती श्रीमन्नृपशालिवाहन शके १६९९ हेमलंबिनाम संवत्सरे श्रावणशुक्ले द्वितीया भौमवासरे श्रीमत्सकल सुरासुर निकर संघर्षितोत्तुंग महाद्वारे भवद्ग्रामस्थ तुकोजी खोलोपनामक आगत्य स्वीयाचरितं निवेदितवान्सर्वेषां स्पष्टावबोधार्थं भाषया लिखितं ॥ स्वामि मि श्रीमत्सदाशिवराव पेशवे याच्या सैन्यात होतो तो तेथे गार्द्दी जालि त्या गर्द्दित मजला यवनाने धरून नेऊन यवनाचार प्रवर्तक केलें मग तेथून अपल्या गावास आलो तो माझा जातीनें पंक्तिबहिष्कृत केलें तेव्हा मजला पश्चाताप जाला कि श्रीक्षेत्रास जाऊन शुत्ध होऊन यावे यावरून स्वामीचे चरणापासि आलो कृपाळु होऊन मज पतितास पावन कीजे इत्यादि इत्यादि सर्वमाकर्ण्य विद्वत्सभासदस्थै धर्माचार्यैनिर्बंधोक्त प्रायश्चित्त प्रत्याम्नाय द्वारा श्रीचंद्रभागा स्नान श्रीक्षेत्र प्रदक्षणा श्रीदर्शनादिकैस्तुकोजी खोलोपनामकः पुनीत कृतस्तज्जातीय नामदासादिकैः पंक्तिपावनः कृतः भवद्भिर + श्रीक्षेत्र पत्राज्ञया व्यवहार्य इत्यलं पल्लवितेन(न)*

---

* हें सर्व पत्र बालबोधींत आहे. मुळांतील लेखन तसेंच ठेविलें आहे.

बटीक विक्रीमुळें घोळ

ले. १८१ (१८७) श्री { श. १७०१ पौष वद्य ६
{ इ. १७८० जाने २७

० श्री ~
राजा शाहूनर
पति हर्षनिधान
माधवराव नारा
यण प्रधान

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ताा आनाजी सोनार दिा हैबतराव पाा गुंजाल मौजे दहीटणें पाा पारनेर सुा समानीन मया व अलफ तुंवा मौजे न्हावी ताा सांडस प्रांत पुणे येथील गोविंदसेट वाणी अगरवाला यासि बटीक विकत दिल्ही ते त्याणा राा रामाजी जिवाजी यासि विकत दिल्ही आहे ते कुणबीण आपली म्हणोन बयाजी शेलार वा आलकुटी हे मुजाहीम जाले आहेत याचा मार मनास (आ) णावा लागतो शेलाराची व (टीक) + + + वाणीयास कसी विक + ... जबदल तुझे प्रयोजन ... आज्ञापत्र हुजूर पुणि (यास) + + + या कामास + भवानजी वारूसा पाा या (स) मसाला रुपये २ दोन देविले आसेत आदा करणें +जाणिजे छ १९ मोहरम +पाा हुजूर

लेखन
सीमा

+बार

पानपतांत हरवलेल्याची ओळख व साखरवाटणी

ले. १८२ (१८५) श्री { श. १७०१ फाल्गुन वद्य २
{ इ. १७८० मार्च २२

दाा बो मोकदम समस्त दाहीजण मौजे न्हावी ताा सांडस प्राा पुणे सुा समानीन मयां व अलफ सन ११८९ कारणे साहेबाचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा यसा जे गोविंदराव सितोले पानपताकडे गेले होते त्याचे ठिकाण मानभावामध्यें लागले त्याजवरून त्याची बायेको व पुत्र त्याजकडे जाऊन त्यास बोलसिले आणि पांढ़ीत साखर वांटली ते साखर कोणी घेतली कोणी न घेतली त्याजवरून परस्परे कलह होऊन आपल्या भाऊपणियांत पेंच पडों लागला त्यावरून गोतानी सर्व सितोले यासी सांगितले की औघे भाऊ एकत्र होऊन विचार करणे गोविंदरायामुले तुमच्या भाऊ-

---

+ तिन्ही अक्षरें भिन्न.

पणियांत पेंच पडावा हे उतम नाहीं गोविंदरायाचे बायकोने व पुत्राने त्यास बोलवून साखर वाटली कोणी घेतली कोणी न घेतली येविसी भांडणें वाढऊन रिकामा भाऊपण्यांत कलह वाढवावा हे ठीक नाहीं म्हणौन त्यावरून आपण समस्त भावानी गोतांच्या सांगितल्या प्रो मान्य करून हा कतबा लेहून दिल्हा असे तरी याउपरी येविसीचा परस्परे कलह कटकट करून लबाडी करूं तरी गोताचे अन्याई दिवाणाचे गुन्हेगार हा कतबा लेहून दिल्हा सही तेरीख छ १५ रावल

बिा भास्कर बाबुराव ठोबरे कुलकर्णी मौजे उंडवडी ताा करेपठार वगैरे गांव

निशाण नांगर
[नांगराचें चित्र]

पुणेकर व सासवडकर शिंप्यांचा वाद
सरवदीयास जातींत घेण्याचा प्रश्न

ले. १८३ (२) श्री {श. १७०७ इ. १७८५ पूर्वी

श्रीमंत राजश्री बज्याबासाहेब पुंधरे देशपांडे काा सासवड साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक चंतू (डु) काबले व संभाजी काबला व संताजी बगाडे म्हेतरे व समस्त सिपी कोा माा साष्टाग दंडवत विज्ञापना येथील वर्तमान ताा छ ४ जिल्हेज पावेतो साहेबाचे कृपेकरून येथास्थित असे विशेष पुणेकर सिंपी यानी गगाजी सरवदीयास जातीत घेतले तेव्हा सर्वा दैवाचे विचारे घ्यावें मातबर पेठा आहेत तेथील समते आणवितो विचार न करितां रेटाईने आपणच वर्तउ लागले तेव्हा आम्हास म्हणो लागले कीं आम्ही यांस ज्ञातीत घेतले वर्तवितो त्याप्रमाणें तुम्हीहि वर्तवावे म्हणो लागले तेव्हां आम्हीं त्यास सागितले कीं तुम्ही त्यास गोतात घेतले तेव्हां च्यार मातबर पेठाचे दैवाचे समत आणून घ्यावा ते न केले आम्ही पुणियापासोन आठा दाहा कोसावर आम्हासहि त्यासमई कलले नाहीं किंव्हा तीर्थी प्रायस्चित तरी घावे तेहि न केले तेव्हां त्यास जातीत वर्तवितां वरकड पेठाचे दैवाच्या समनास येणार नाहीं पेच पडो लागतील उदीम वेवसाहाकरितां जागां जागां जाणे येणे आहे याजकरितां सर्वांचे समते जालियास गुंता नव्हता आता आगोदर सर्वा पेठाच्या दैवात वर्तला म्हणजे आमचा गुंता नाहीं त्याणी त्या गोष्टी आवमानून मातबरीच्या कुन्याने तीर्थांच व वरकड गोताचे प्रयोजन काय म्हणौन तैसेच वर्तउ लागले आम्हींहि आपले गावीं त्या विचारांत न मिळोन राहिलो त्याजवर गुदस्ता फालगून मासीं आपण सातारियास होते तेव्हां पुणेकर काा मारी लग्ना-

करिता संताजी बगाडे याचे घरीं आलें सरवद्याहि बरोबर आणिला त्याणी आपण होऊन लटका कजिया काढून संताजीचे घरीं च्यार दिवस आन्न पाणी न घेऊन खोबऱ्याच्या वास्याचा जाम (?) करून साडे करून पुणियास गेले आणि श्रीमत राजश्री–बापूसाहेब याजवल सांगून आम्हास पुणियास नेले त्याची आमची बहूतच कटकट वाढली पुणेकर पेचात येऊ लागले तेव्हा त्याणी राजश्री रामचंद्रपत पराजप्यासारिखे बापूसाहेबाकडे मधेस्तीस घातले परंतु त्याणी निकालावर घेऊन त्यास व आम्हास सागितले की कोणाची घरे बुडवावी सरवदीयास वरकड चौ पेठात वर्तऊ लागले तरी सासवडकरहि वर्तावितील आम्हांस सागितले की चऊ पेठानी वर्तविलियावर तुम्ही वर्तवणे पुणेकर न जेवता लग्न करून गेले आहेत सरवदीयास वरकड दैवानी वर्तविल्यावर पुणेकरांनी सासवडीस जाऊन संताजी बगाड्याचे घरी जेवावे मग तुम्ही पुणेकराचे घरी जेवावे सरवद्यांहि वर्तवावा म्हणौन आम्हास सागून निरोप दिल्हा त्या तागायेत हा कालवर पुणियात कामकाजास गेलो तर सरवदीयास पंगतीस वर्तु दिल्हा नाही व पुणेकरहि करारापो बंदोबस्त करून संताजी बगाड्याचे घरी जेवले नाहीत यंदा फालगून मासीं पुणियांत सित्र्याचे घरी लग्न जाले फिरगोजी सित्र्याने आमचे गावीं निरगुडे बसले कावले यासे लग्नचिठ्या पाठविल्या वरकडासही ज्यास यावयाच्या त्यास आल्या तेव्हा अवघ्यानी मिलोन विचार केला की पुणेकराचे व आमचे आद्यापि सुरलीत जाले नाही लग्नास जाऊ नये म्हणौन राहिले मागती सित्र्याने आपले जवलील शरीरसंमधी निरगुडे बसले कावले यास आग्रह करून लिहिले की आगत्यरूप लग्नास यावे येथे तुम्ही आल्यास काही पेच पडो देत नाही म्हणोन निश्या करून लिहिल्यावरून रघोजी बसले व गोपालजी निरगुडे व चिमाजी कावले येसे लग्नाचे दिवसी तेथे गेले तों आगोदर दोन प्रहरी पुणेकर सरवद्यासुधा पंक्तीस जेवले हे साईकाली लग्नसमई तेथे गेले लग्न जालियावर सित्र्याने गेले होते यास जेवावया करिता बहुतच आग्रह केला दोन प्रहरी सर्वांची जेवणे जाली आतां तुम्ही व आम्ही व वरकड च्यार सोयरे आले आहेत ते व्याह्याचे घरी जाऊन जेऊं याणी क्षुधा नाहीं आम्ही येत नाही म्हणौन बहुतच आतिशय केला त्याणे न येकोन वरकड कोण्ही येणार नाहीं पेच पडणार नाहीं शंषये न धरितां यावे म्हणौन आग्रह करून घेऊन गेला दाहा वसि पात्र जाले गोपालजी निरगुडे यास भूक नव्हती त्यासहि आग्रह करून जेवावयास बसविलें आग्रहाकरितां मात्र बसला थोडीसी जेवणे जाली तेव्हां जवळील ग्रहस्तास पुसोन पात्राजवळ चूल भरून गोपालजी निरगुडे बसले इतकीयांत त्याणी लबाडी करून सरवदीयास वाढावयास लाविले तो गोपालजीचे पात्रीं वाढावयास आला गोपालजीने सागितले की माझे जेवण जाले वरकडाचीहि होत आली आतां काश्यास वाढितोस इतकेच येकोन माडीवर जेवावयास बसले होते तेथून उतरून ज्या पुणेकरानी विचार करून वाढावयास लाविला

होता त्याजवळ खालते येऊन सागितले त्यातून वाघोजी बगाडे माडीवर जाऊन सासवडकरावर घालून मनमाने तैश्या सिव्या देऊ लागला याणी तितक्याहि सोसून उगेच राहिले त्याणी खालता विचार करून दाहावीस जणे जमऊन उभे राहिले हे जेऊन माडीखाली येताच त्याणी सरवदीयास सागून गोपालजीच्या पदरास धरविले तो मनमाने तैसे बोलला आणि दाडगाईने गोपालजी निरगुडे याच्या तोडावर मारिले हे पाहू लागले तो ते बहुत आपण तिघे थैसे जाणून उगेचे राहिले येक दिवस राहून राजश्री विठल कृष्ण याजवळ सागितले आणि गावास आले तेथे प्रसग पाडावा तरी साप्रत तेथे आम्हास त्राता कोण आपण स्वारीत उपाये नाही म्हणौन दम खाऊन गांवी येऊन मातुश्री आवईजवळ साकल्य वर्तमान सागितले मातुश्रींनी बहुत विस्मय केला की कैलासवासी तात्या पासोन हा कालवर सासवडच्या माणसास कोठेहि पेच पडला नाही बरे आसो म्हणौन आपण स्वारीहून येत तोपावेतो कर्यातीसुधा आमच्या सिपीयानी पुणेकराचे घरी जेऊ नये त्यासहि आपण जेऊ घालू नये यैसी आज्ञा केली आमच्याहि सर्वांच्या विचारास आले पहिलेच हा विचार आम्ही आपले जागा केला परंतु धीर पुरेना मातुश्रींनी सागितल्यावर पूर्ण भरवसा मानून स्वस्त राहिलो तट पडला यैसे जाणून पुणेकर सरकारात सांगून आम्हास बोलाऊ पाठवितीलसे वाटते म्हणौन तपसिलवार जाले वर्तमान साहेबास लिहिले आहे आन्याये त्याचाच पुर्ता परंतु सांप्रत आमचे आगत्य धरून न्यायेनिष्ठूरपणे मनास कोण आणितो हा कालवर तात्या (१) पासोन आपले सावलीस आहो त्या सलाबतीमुले आमचे कोणीहि कोठे गेले तरी पेचच नाही सासवडकराच्याच मुदारतीत सर्व यैसा प्रकार चालत आला पुढेहि आमचे दैवे-करून साहेब सर्व सामर्थ्यवंत आहेत तेव्हा आम्हास भय हरयेकविसीचे नाही आपण मसलतसीर मार्गे यैसा प्रकार जाला आमचा मार किती परतु आम्ही साहेबाचे म्हणवितों येविसीचा आभिमान साहेबासच आहे तूर्त ते घालमेल करून पुणियास न्यावयाचा मार करितील तेथे भलताच सरुनी करून दाबदबाव करील याजकरिता साहेबी श्रीमंताचे पत्र राजश्री नाना फडणीस यास पाठवावे की खासा स्वारी येईतोपावेतो सासवडकर व पुणेकर सिपी याचा कजिया मनास न आणणे खासा स्वारी आलियावर मनास आणिले जाईल यैसे पत्र आले तरच बचाव नाही-तरी साहेबाची रयेत आणि पुणियात पेचात पाडून भलताच रागे भरेल येविसीचा अगत्यवाद धरून कृपालू आतःकरण करून रयतेच्या बच्यावाकरिता पत्र जरूर जरूर घेऊन पाठविले पाहिजे पत्र लौकर आलियावर बहुत उपयोगी पडेल त्याच्या जातीचा मार दुसरे पत्री लिहिला आहे त्याजवरून सेवेसी निवेदन होईल कृपा केली पाहिजे हे विज्ञापना

तोच वाद (पुढें चालू)

लें. १८४ (२४) श्री { श. १७०७ इ. १७८५ पूर्वी

गावांत सिंप्याच्या जातीचा बखेडा जाहाला वर्षभर गोरगरीब पित्रे येतील त्यास जपत आतते आपले आप्त जेवावयासी नेते ते सारे राहिले भावास भाऊ बोलावित नाहीत यैसे जाले हे चागले नाही जानोजी बगाले येसाजी बसले गोपालजी चिमाजी मलोजी हे या गांवी नावाचे ते रदबदली करितात ती यैको नये आणि बखेडा पाडावा हे काये येकामुळे सारा गावचे सिंपी बखेड्यात पडतात मोराजी दानवा सिपी पुणेकर याणे तीन दिवस माल्याचे घरी राहिला सासवडी खोल्या कसा वर्तवितात हे पाहिले पुण्यास गेला तेथे जाऊन सरवद्याची लेक दानव्याने आपल्या लेकास केली ती सासवडकरानी टाकविली फारीखते जाहली सरकारास कतबे दिल्हा की तिजला आणू नये तीं आणिली आणि सासवडकरांस सांगोन पाठविले कीं तुम्ही मुसलमान गोतात घेतला याचा जोडा (१) दुसरा मिलवणे सोला वर्षे मुसलमानात वर्तला येक बटीक घेतली तीस दोन पोरे जाहली याप्रोच मिलविणे यैसा निरोप पाठविला त्यावरून याणी आपले जागां दिक जाहले आहेत पुणेकरास पाठींबे नाना फडनीस मोरोबा फडणीस हरीपंत व आणखी त्या मंडलीचे बहुत आहेत पूर्ते समजावे खोल्या याणी वर्तविला म्हणजे च्यार वर्षे भाडले दा पंधरा हजारास नागविले ते येकीकडे राहून पुन्हा गुन्हेगारीखाले यावे यैसे होते का की खोल्याप्रो जोडा दुसरा मिलावयाचा नाही सरवद्यांचा जोडा पुणेकरास मिलेना तैसा हाहि आहे हे सारे बुडतात यैसे करू नये परिछिने मल्हारीस व चंदू म्हेत्रे यासी रुबरू सांगावे खोल्यामात्र वेगला ठेवणे पुढे कार्तिकीस गोत मिलेल तेथे घडणे ते घडेल तूर्त वेगला ठेवणे यैसे सांगावे आणि वरकड सुखरूप दर घ(री) पित्राचे जेवावयासी जात जाणे खोल्या येकला मात्र ठेवावा त्याचे भाऊसुधा गोतात जेवावे हे चांगले आहे बखेडा पडो देऊ नये थोडे आहे तो आवरावे हे चांगले मर्जीप्रो आज्ञा कर्तव्य ते करावी+

+ पत्र बजाबा पुरंदऱ्यांचे कारभारी सखो महादेव फणसलकर यांचें असून तें सबंध त्यांचे हातचें आहे.

पुणेकर–सासवडकर शिंपी यांचा वाद

ले. १८५ (२५) श्री नक्कल { श. १७०७ इ. १७८५ पूर्वी

सेवेसी सखो माहादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना महिपती खोल्या याज-बरोबरी पत्र पाठविले तेथे आज्ञा की महिपतीने आपले वर्तमान सविस्तर [1]विस्तर विदित केले याणे तेथे लेहून दिल्हे की सासवडी सखो माहादेव याणी आवी चौकसी आपले भावाची केली मग श्रीक्षेत्रास गेलो या प्रो लेहून दिल्हे त्यावरी त्याणी लेहून दिल्हे की ही साक्ष खरी उतरली तरी आपण खोटे त्यावरून महीपती तुम्हाकडे आला याप्रो पत्र द्यावे तुम्ही दिकत केली तूर्त आम्ही कोणास का म्हणून पत्र द्यावे यैसीयांसी उभयेता सरकारात [2]सरकारात भाडत आसता साक्ष जबानीची केली आसता तुम्हांस लेहून द्यावयांसी काये चिंता आता लावणीवरी टाकिले पुढें सरकारातून बोलाऊ आले क्रियाच करा म्हटले तरी कसे करार तेव्हा सासवडकर सिंपी काय कामास येतील हे समजावे आर्जी जसे ते समई जाहाले आसेल ते लेहून द्यावे आपल्याकडे लेडा राहात नाही उगेच भिडेस पडो न [3]पडोन च्यार दिवस लावणीवरी घालावे हे ठीक नाही सासवडकर सिंपी लबाड आज आथवा पुडे कालेकडून हेच होईल तुम्ही लेहून न द्या तरी येथून पांडुरंगपंताचे कारकुनाकडून लेहून देऊ मग आगतीच बुडतील यैसी समजोन लेहून देणे सर्व बुडाले तरी कबूल वाजवीस गुता नाही येसे विस्तारे आज्ञापत्र लिा ऐसीयांसी कसेहि आसो येक सत्य हेच खरे भीड पडोन दुसरीयाचा नाश करणे आसत्ये चालणे तरी से दोनसे वर्ष आणखी वैवाट करावयाची ज्यास भरोसा आसेल त्याणे आसत्ये वर्तणूक करावी आपण कितेक प्रकारे लिा त्यास यासी आम्हास प्रयो-जन काय जबानीची साक्ष तरी आम्ही सरकारची पत्रे आणिली सर्व सिंपी गोत जमा केले पत्र वाचून दाखविले महिपतीचा भाऊ तुकया हिंदुस्थानातून आला बहुत दिवस तिकड राहिला पतीत आहे तुमचे गोताची खेटरे घेऊन उभा आहे त्यासी तुम्ही गोत गंगा आहा पावन करा यैसे बोलिलो आपणहि दिवाणखान्यातुन पाहात होता त्या वेलेस सिंपी म्हणाले क्षेत्रास पत्रे सरकारची घेऊन जावी तेथे सर्व गोत जमा होते तेथे पावन जाल्यावरी गुता उरकला आशाढीस गाठ न पडे तरी कार्तिकीपर्यंत क्षेत्री राहावे येसे आम्ही बोलिलो आणि क्षेत्रास पा। तेथून आल्यानंतरी येथील जातीस पंगतीस जेवावयाचा आरास पुसिला ते समई सिप्याने सांगितले पुणेकरानी सरवद्याच्या कज्यात बायको टाकली ती आणिली पुणेकर खोल्याचे गोताईत जेवले नाहीत खोल्यास नाना प्रकारचे दोष आहेत याचा करिणा लेहून घ्यावा मग करिणा लेहून घेतला याप्रमाणे आमचे साक्षीचे वर्तमान आहे ते सेवेसी लेहून पा। आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

१ हा शब्द दुबार पडलेला दिसतो. २ दुबार. ३ दुबार.

श्री नकल

पुरवणी सेवेसी विज्ञापना महिपती खोल्यास तुम्ही जबानीची साक्ष जी तुम्हास ठावकी आसेल ती लेहून देणे न दिल्ही दिकत केली तरी येथून पाडुरंगपताच्या कारकुनाकडून लेहून देऊ म्हणोन पत्री लिहिले येसीयासी आम्हास जे ठावके आहे ते खरे ते लेहुन दिल्हे आहे आपण परभारे तिकडून लेहून देणे ते पेसजी स्वदस्तूर चिठीवर दोन वोळी लिहिल्या आहेत आहेत की याणी प्रयेचित ध्यावे येसी चिठी सिप्यापासी आपले दस्तूरची आहे ते येक आता येक चौघात दिसे येसे नसावे सूचना लिहिली आहे मर्जीस येईल तसे करावे हे विज्ञापना

प्रायश्चितानें शुद्धि

ले. १८६ (२८) श्री भीमरथ्यै नमः { श. १७०७ इ. १७८५ पूर्वी

[1]श्रीमंत–राजेश्री महिपतराव याप्रति

आश्रीत समस्त ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र तुळापूर कृतानेक वेदोक्त आशर्वाद आपले पत्र आले की पिराजी पाटील जगताप कसबे सासवड यावर गोत्र हत्येचा दोष आला याची शुद्धता करणे त्यावरून समस्त ब्राह्मण मिळोन त्याचे सामर्थ्यानरूप विधिपूर्वक यथोक्त प्रायश्चित्त श्रीचे तिरी देऊन पिराजी पाटील याची शुद्धता केली असे हे आशर्वाद

पिराजी पाटलाची शुद्धि

ले. १८७ (१५४) श्री { श. १७०७ इ. १७८५ पूर्वी

राजश्री पिराजी नाईक जगथाप देशमूख का। सासवड गोसावी यांसि

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य–श्री महिपतराव त्रिबक पुरंधरे देशपाडे का। मा।र आसीर्वाद विनती उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष रा। पिराजी बिन सताजी पाटील याची शुधता जाहाली पाहिजे येविसी आपण सागितले आणि पत्रहि आले होते त्यावरून सरकारची पत्रे घेऊन पाठविली आहेत हे पाहून मौजे तुलापूर येथे पाठऊन शुधता करावी येवजाचा भरणा रा। सखो माहादेव याजकडे करवावा [2]वी दिवसगत न लागता लौकर होये ते करावे माहाराचे विशई मसुदा आपल्यास दाखविला तो राघो गंगाधर यानीं करून दिला होता तो तुमचे खातरेस न ये यास्तव दुसरा मसुदा लौकर–पाठवणें लोभ कीजे हे विनंति

---

१ सबंदपत्र बालबोधींत. मुळांतील शुद्धलेखन कायम ठेविलें आहे.
२ निरर्थक अक्षर दिसतें.

'कडू' असता लेक...

ले. १८८ (१६७) श्री { श. १७०८ इ. १७८६

० श्री राजा शाहूनर पतिहर्ष निधान माधवराव नारा यण प्रधान	मा आनाम गुडोजी ना कोडे देशमूख ता खेडेबारे यास माधवराव नारायण प्रधान सु॥ सबा समानीय मया व आलफ बालोजी कुंजीर हा कडू असतां त्याची लेक भगाजी कोडे दे(शमूख) ता मार याचे घरी तुवां दर (अपूर्ण) बार

बदकर्माबद्दल शुद्धि

ले. १८९ (१९२) श्री { श. १७१६ ज्येष्ठ वद्य १३ इ. १७९४ जून २५

यादी राघू बिन मल्हारी कोली मौजे कोलवडी याचे बाईकोने मानाजी बुरूड मौजे मारी राहात होता त्याचे लेकासी रानात बदकर्म करून बुरुडसुधा पलोन गेला त्यास राघूचे बाईकोने बुरुडासी बदकर्म केले सबब जातीत शुध्ध होणे याविशी पत्रे

१ माहादाजी रघुनाथ यास की गोत कोली जमा करून शुध्धता करून देणे

१ मोकदम मौजे मार यास सदरहू प्रो

१ गोत कोली पुरधरकर यास की राघू मा याची मुलामाणसासुधां शुद्धध्धता क रून देणे म्हणोन *गोतरवेस.ने गोतपत करणे म्हणोन गोत कोली किले पुरंदर यास पत्र देणे

(येविसी) सरकाराची नजर रु॥ येकतीस रु॥ ३१ येकतीस रु॥ करार दो महिन्यानी वसूल ध्यावे

कतबा घेणे

छ २६ जिलकाद समस तिसैन

---

* या पुढील मजकूर निराळे वळणाचा.

जातप्रकरणीं जबरदस्ती

ले. १९० (२८८)

श्री

{ श. १७३६ वैशाख वद्य ९
{ इ. १८१४ मे १३

राजश्री विनायक रंगनाथ ता। वेरडी स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी आबोजी पाटील दुर्गा मौजे नेवाली व माल पाटील मसणे मौजे सेलू ता। मा।र यास सरळ आबेकर देशमूख याणी सखी मोरी इचे जातीचे पचाइती करिता धरून माहुलीस नेले तेथे जातीचा निर्णय न होता आबोजी व माल पाटील यास जबरदस्तीने सखो मोरी इचे हातचे जेवावयासी घातले याजमुळे उभयता पाटलास वरेडीकर पाटील आगरी पंगतीस घेत (नाही) म्हणौन हरदू पाटील याणी समजविले त्याजवरून तुम्हांस लि॥ असे तरी जातीची पंचाईत न होता जबरदस्तीने नेऊन आबोजी व माल पाटील यास जेवावयासी घातले हा दोष दोघा पाटलाकडे नाही परंतु पंगती व्यवहार जाला तेपक्षी उभयता पाटलास जोसी यास सागोन चरण-तीर्थ व गोमुत्र देवऊन जातीत पंगतीस घेण्यासविसी गांवगनांचे पाटील यास ताकीद-चिठी द्यावी [१]रा। छ २२ जमादिलोवल सु॥ आर्बा अशर मयातैन [२]बहुत काय लि॥ हे विनंती

गोहत्येबद्दल प्रायश्चित्त

ले. १९१ (२१८)

श्री

{ श. १७४५
{ इ. १८२३

रोखा राजश्री रामचंद्रराव त्र्यंबक ता। मोकदम मौजे कामथडी ता। खेडेबारे सु॥ आर्बा अशेरीन मयातैन व अलफ विठूजी वालेकर मौजे मजकूर यार्णे पुणेयास येऊन विदित केले की माझे घरची गाय दुभती होती तिचे दूध मी काढीत होतो ते समई तिणे नाठळपणा केला सबब सहजवृत्तीने काठी मारिली तेवढ्याच निमित्याने गाईने प्राण सोडिला हा अभिश्राप मजवर आला तेव्हा हें कर्म गुप्त ठेविल्याने नर्कास जाईन या भयाने सरकारचे शिपाई यास व गांवकरी यास वर्तमान निवेदन करून सरकारास विदीत करावयास आलो आहे तरी साहेबी शासन करावयाचे तसे करावे म्हणोन त्याजवरून येविशींचे मनन करून पाहाता कुणब्यापासून कर्म घडले त्या काली तेथे दुसरा साक्षीस नसता आपला अन्याय येऊन निवेदन केला त्यापेक्षा कुणबी गरीब हे जाणोन याजपासून सरकार दंड घ्यावयाचा तो देण्यास याजला सामर्थ्य नाही बैल ढोर विकून खंड घेतल्याने सरकारी शेत याजकडे

१-२ अक्षर वेगळें.

आहे त्याची उस्तवारी राहाणार नाही यास्तव याचे गरीबी साळशीवर व सरकार किस्तगारीवर नजर देऊन सरकार खड यास माफ करून हे चिठी सादर केली असे तरी याजला श्रीकृष्णा तिरी पाठऊन देवब्राह्मणास शरण जाऊन त्याचे हातून मुख्तता करऊन नंतर गावात जाती जेवण याचे शक्तीनसार शिरस्ते प्रो करऊन यास जातीगोतात घेऊन जातीत सरता करणे येविशी पुन्हा बोभाट येऊ न देणे

आपले सांगितल्याप्रो मसुदा पाठविला आहे चिठी देवावी

शेषाद्री परळीकराच्या मुलाची शुद्धि

ले. १९२ (११४) श्री { श. १७६६ ज्येष्ट इ. १८४४ जून

बाबाजी बिवलकर जेष्ट मासी पुणे मु। आले आणि सभा वगैरे करू लागले तेव्हा मुबईकरहि येथे आले त्याणी शहर मजकूरी समस्ताचे विचारावाचून आपले मते बाबाजीस मुबई मुकामी काही मडळींनी दोषरोप केला आहे त्यास तुम्ही पुणेकरानी बाबाजीकडेस रूभेस व गंधाक्षतेस वगैरे जाऊ नये याप्रो मुबईकर याणी घरोघर सागून पाठविले नतर बिवलकर याजकडे कोणी सिष्ट सभेस गेले व कोणी न गेले सा। त्याचा आपसात वाद (प्रति) वाद होऊ (लागला) नंतर जे मडळी सभेस गेले (पुढील चार ओळी मजकूर फाटण्यात गेला आहे) चौकसी करिता .... विले त्याजवरून मुबईकर याणी सांगितले की नारायणशास्त्री थते प्रभुती मडळी ते सर्व आले म्हणजे आम्ही येऊ त्याजवरून मुबईकर याणी ज्याची नावे घेतली त्यास बोलाऊ पाठविले त्याणी सागून पाठविले की आमचे या सभेस येण्याचे कारण नाही त्याजवरून त्या सिष्टानी मंडळीचा प्रतिपक्ष व मुबईकराचा आतीवाद आहे याप्रो समजून बिवळकर याचे घरी जायास काही दोष नाही अत्ता विचार करून पुडे सभेस गेले त्यात काही ग्रामस्तहि गेले पुढे कसब्यात गुरजर यांचे घरी सभा जाहली तेथे मुबईकर याणी मजकूर समजाविल्यावरून इतःपर बाबाजीचे घरी कोणी जाऊ नये व आजपावेतो गेले त्यास कोणी शब्द ठेऊ नये असे ठरल्यावरून परस्परे लोक विरुध्धांत उपमर्द होऊ लागले त्यास हली आपले ग्रामस्त प्रभुती मंडळीचा ठराव होतो की वो शास्त्रसपन्न राजमान्य राजश्री त्रिबक शास्त्रीबाबा शालग्राम हे व राजश्री रामरावबाबा सा। पुरदरे हे उभयता बिवलकर याचे ग्रामण्यामध्ये ज्याप्रो खटला तोडतील त्यास आंम्ही मान्य असो येविसी सर्वांची संमती

तेंच शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९३ (११९) श्री { श. १७६६ आषाढ वद्य ३०
नकल { इ १८४४ जुलै १५

यादी शहर पुणे येथे सर्वांस वासुदेवभट माडखोलकर मुबईकर हे समजावितात की राहतेकर याचे वाड्यात सभा त्रिंबकशास्त्री व मोरशास्त्री याणी येक तर्फे चिवलकर याजवर दोष नाही असे ठरवितात त्याचे उतर समस्त ब्राह्मणांची सभा तुलसीबागेत करावी आणि सर्वांचे अनुमते त्या वेळेस ठरले तर बाबाजी चिवलकर निरदोष होतील आम्ही मुंबईकर दोष पदरी घालवयाविसी रुजू आहोत हे सर्वांस कलावे मुंबईकराचा ब्राह्मण शहरात बाबाजी चिवलकर निरदोषी असा फिरेल तेव्हा चिवलकर निरदोषी होतील याचे उतराची कोणास आंदेशा असल्यास तुलसीबागेत दोन दिवसाचे आत सभा करावी म्हणजे सर्वांस समजेल मिा आषाढ वाा ३० सोमवार शके १७६६

सही वासुदेवभट माडखोलकर मुबईकर

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९४ (११८) श्रीमंगलमूर्ती { श. १७६६
{ इ. १८४४ (?)

श्रीमंत राजमान्य राजश्री बाबा[1] साहेब पुरंधरे मुकाम कसबे पुणे स्वामींचे शेवेसी

शेवक आपाजी भगवंत येकबोटे मुकाम मुबई कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनद्वारे परामृष होत असावा आम्ही आपले वडील श्रीमंत नानासाहेब होते ते वेलेस दोन तीन वेलां सासवड मुकामी श्रीमंत विनायेकपंत आणा बाघ याचे पदरी असतां आठ पंध्रा दिवस वडिलापार्सी होतों वडिलाचाहि लोभ आम्हावर होता हे आपले ध्यानांत असावेंच परंतु वीस वर्षे आपली भेट जाली नाही यामुळे स्नेहे दृष्टोत्पत्तीस येऊन पत्रद्वारे स्नेह वृध्धींगत जाला नाहीं असो आम्ही येथे आज पधरा वर्षे आहोंत परंतु कोणत्याही प्रकारे उद्योग आपले धर्माचा योग्यतेने करून आहोंत असें असतां गुदस्तां येथें परली वैजनाथकर ब्राह्मणाची मुलें इग्रज पाद्रीकडे स्वसंतोषें जाऊन बाटलीं याविसी येथे दोन पक्ष होऊन ठराव भिक्षूक मडलीचा जाला की जाले वर्तमान बालशास्त्री जांबेकर प्रभृतीनी न लिहितां मतलबी पत्रें लिहून अनुमती आणिल्या आणि येथीलहि ब्राह्मणाचा उत्तमई

[1] रामराव त्र्यंबक पुरंदरे

करून त्या भ्रष्ट मुलास प्रायस्चित दिल्हें त्यास जाला मजकूर श्री क्षत्रादि ब्रह्मवृंदास लिहून त्यांची ठरावपत्रे होऊन उतरे येथेल तो पावेतो बालशास्त्री प्रभृतीकडे अंन उद्कादि वेव्हार न व्हावा असें ठराव पत्र करून भिक्षुक ब्राह्मण मंडलीनी जालें वर्तमान लिहून पत्रे देसी पाठविलीं त्यातून उतेरेंहि आली त्यात श्रीक्षेत्र कासीचे पत्रांतील सारांश कीं, या भ्रष्ट मुलास आम्ही कोणत्याहि रीतीने प्रायेस्चित देऊन घेण्यास अनुमोदन देत नाही याप्रोच आणखी च्यार पत्रें देसीचीं आली त्यांतीलहि सारांश श्रीक्षित्रीचे पत्रानरुप आहे व पुणेकर ब्राह्मण प्रभृतीचेहि पत्र आलें त्यांतील हासील कीं आम्हास बालशास्त्री प्रभृतीनी या भ्रष्ट मुलाचे व याचा दोषाचा लोप करून पत्रें पूर्वी लिहिलीं त्यावरून आम्हीं समत त्या मुलास घेण्याविसीं दिल्हें परंतु हालीं जालें वृतातांचें पत्र लिहून जाभेकरशास्त्री यांसी अनवेव्हार बंद ठेविला तर ते फार योग्य केलेत आम्ही सर्व अनकूल आहोत या सारांश मजकुराचे पत्र आलें त्यावर सही वेदशास्त्र संपन्न त्रिंबकशास्त्री शालिग्राम यांची व प्रभूनी आपले सुरत संमधी याची आहे ती पाहोन आम्ही व चिंचवडकर आणखी मंडली येथे आहेत यानी सह्या केल्यात असे असतां पुणे मुकामी बाबाजी बिवलकर हे त्या पक्षांतील मुख्यच आहेत हे जाऊन द्रव्यद्वारे ब्राह्मण मिळून वाद करीत असतां मिनी आशाढ शुद्ध पूर्णिमा रोजी वेदशास्त्रसंपन त्रिंबकसास्त्री प्रभृनीनी श्रीमुरलीधराचे देवळात सभा करून ठरावपत्र केले त्यातील हासील पाहतां पुणेकर ब्राह्मणवृंदास पत्र पूर्वी बालशास्त्रीप्रभृतीनी मतलबी लिहून ठकऊन शुद्ध कर्ण्यास पत्र नेलें तें रद असे हालीं आम्हास जाला वृतांत समजल्यावरून आम्ही लिहितां जे असे ठक स्वधर्मांचा लोप इछणार यासी अनउदकादि वेव्हार करू नये असा जो नेंम ठरविला तोच काईम असावा आणि जो कोणी त्यांतील येईल त्यास निषकृती केल्यासिवाय घेऊ नये असें हासिलाचें पत्र जाले परंतु बिवलकर द्रव्यवान समजून शास्त्री वगैरे काही ब्राह्मणमंडली अनकूल जाली असे आम्हास समजल्यावरूत फार सर्वांस वाईट दिसलें की द्रव्यलोभास्तव पुण्याहूनच संकराची वृध्धी होऊन अपकीर्ती चौहोकडे होती असे नजरेस आल्यावरून मीं पत्रें वेदशास्त्रसंपन्न त्रिंबकशास्त्री शाळग्रांम यास २ लिहिलीं त्यांतील हासील की आपली सही पाहून व कीर्तीहि ऐकण्यात सर्वांचे आहेच यास्तव आम्ही सर्वांनी सह्या केल्या आहेत यास्तव आपण ब्राह्मण्यांचा अभिमान धरूनच शुध्ध पक्षास सही केली त्याप्रमाणेच दृढनिश्चयाने सुकीर्ती होईल असा योग ऐकण्यात यावा या प्रो लिहिलें त्याची उतरें अद्यापि आले नाहीत यास्तव आमचे गुरु वेदमूर्ती कृष्णंभट धर्माधिकारी व आप्त वेदमूर्ती बाबा ढेरे व बापू दादा ढेरे प्रभृतीस जाला मजकूर लिहिला ते काही पुणे मुकामीं विच्यारात आहेत म्हणौन ऐकिले व आपलीहि स्वारी पुणे मुकामी आहे असे समजल्यावरून विनंति लिहिण्याचा निश्चिय करून जाले वर्तमानाची विनंति केली ही ध्यानांत वागोन सत्यमार्गांने सतकीर्ती होऊन

कृष्णपक्षाचा लोप व्हावा असें अनमोदनाचा योग व्हावा आपण कीर्तिवानच श्रीमंत धर्मराज्याधीश गेल्यामार्गे त्या स्तानीं ब्राह्मणधर्म संरक्षकच आहात व आपण सर्व आप्तातीलच आहोंत हे मी लिहून कलवावे असें नाहीं जालें वर्तमान निवेदनात येण्यास्तव लिा आहे त्यास वडील आम्हावर लोभ ठेवीत आल्या अन्वये अभिमान सत्यमार्गास सही दिल्याचा असोन कोणी आपले आप्तवर्गातील भ्रष्टपक्षास न अनकूल होता श्रीमुरलीधराचे देवाल्यांत ठराव जाले पत्रावर मान्यता आपली समक्ष प्रभूनीची समक्ष होईल असा योग दिसण्यांत यावा याविसीं कागदपत्राचे मनन कर्णे असल्यास तेथें वेदमूर्ति रामचंद्रभट बापट व वासुदेवभट आहेत यापासून कागदपत्र काय लागतील ते घ्यावेत आणि या पत्राचें उतर आपले आप्तच रा। विनायेक गंगाधर उर्फ बापू येकबोटे यासी लिास हुकूम व्हावा सुज्ञाप्रती विशेष अधिक काय लिहून कलवावे असे नाहीं बहुत लिहिणे शेवेसी श्रुत होय विनंति

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९५ (१२०) श्री {श. १७६६ / इ. १८४४}

मसुदा

यादी शेषाद्री ब्राह्मण परळीकर याचा मुलगा श्रीपती यास पाद्री इंग्रज लोक याणी छपंन्न सत्तावंन दिवस अभक्ष्य भक्षण व अपेयेपान इत्यादि संसर्गेकरून बाटविला नंतर परळीकर ब्राह्मण याणे सरकारात फिर्याद करून तो मुलगा परत घेतला पुढे त्याचा विचार ज्ञातीधर्माविसी कसा करावा त्याजवरून मुंबईकर ब्राह्मणापौ काही ब्राह्मणानी शहर पुणे वगैरे येथील शास्त्री पंडित यास मजकूर लिहून पाठविला त्याजवरून त्याणी प्रायश्चित द्यावे म्हणून लिहून पाठविले नंतर तेथे पूर्वांग प्रायश्चित करावयास लागले तो मुंबईकर कितीयेक ब्राह्मण याणी आडथळा केला की हे कर्म प्रशस्त नाही याजकरिता याचा आणखी पूर्ता विचार करुन जे कर्णे ते करावे असे म्हणत असता ते न ऐकता प्रायश्चित जाह्ले त्यात राजश्री विनायेक परशराम बिवलकर दिवाणजी नि।। आगरे याजकडील ब्राह्मण त्या प्रायश्चिताचे याज्ञिकास गेले त्याचा संसर्ग बिवलकर यास घडला असे मुबईकर ब्राह्मण याचे म्हणणे आहे व बिवलकर याचे म्हणणे असे की पुणेकर वगैरे शास्त्री पंढीत याचे पत्रावरून ब्राह्मण गेला याचा विचार पाहाता शब्दारोपण बिवलकरयसच म्हणणे दिसत नाही पुणेकर वगैरे शास्त्री पंडीत याणी प्रायश्चिताविसी पत्रे पाठविली तसा शास्त्रार्थ असला तथापि कालदेशवर्तमान पाहाता हीच अतीप्रवृती होऊन अनाचारप्रवर्तक होईल याजकरिता सर्वांनी वहिवाटीस सुप्रवर्त सुमार्गाश्रित होऊन सर्वां-

नुमते असा ठराव हाली होतो की परळकर याचा मुलगा ज्ञातीत घ्यावयाचा नाही व ज्ञातीप्रकर्णी वगैरे महत दोषाचे निषकृतीस शास्त्रार्थ व लौकिक विचार करणे तो प्रसिध्ध जाग्यात सभा करून सिष्ट व संभावीत याचे अनुमते होत असावा व या प्रकर्णी मागील दोष कोण्ही कोणास न ठेविता सर्वांनी या ठरावावर द्रिष्टी ठेऊन येकरूप चालावे जो कोण्ही या ठरावा बाहेर वर्तणूक करू लागेल तो समती बाहेर असे समजावे

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९६ (१२१) श्री नकल { श. १७६६ आषाढ व. ३० / इ. १८४४ जुलै १०

यादी शके १७६६ क्रोधीनाम संवत्छरे अशाड वा १० बुधवार अन्याबा राहतेकर याचे वाड्यात सभा होऊन त्रियकशास्त्री शालिग्राम व मोरेश्वर शास्त्री साठे प्रभुती मंडलीचा विचार जाहाला त्यातील हासील मुंबई मुकामी परली वैज्यनाथकर ब्राह्मण याचा मुलगा सतावन दिवस पाद्रीकडे राहून भ्रष्ट जाहाला त्यास प्रायेश्चित संकल्प करऊन माहा यात्रेस माहादेवभट शेंडे प्रभुतीनी रवाना केला त्या समंध्यामुळे बाबाजी दिवाणजी यास बहिष्कार आहे म्हणून मुंबईकर वासुदेव भट मालखेडकर याणे पुणियात घरोघर सागून पाठविले याचा विचार पाहता बाबाजी दिवाणजीस त्या मुलाचा संसर्ग तर जाहाला नाही याप्रमाणे वासुदेवभटहि कबूल आहेत त्या संकल्पास बाबाजी दिवाणजीनी समत दिल्हे व त्याजकडील ब्राह्मण सकल्पास गेले त्याचा संसर्ग घडला हा दोष ल्याहावा तर त्या मुलास प्रायश्चित देण्याविषई पुणेकर नारायणशास्त्री थते प्रभुतीनी मुबईकरास पत्र लिा आहे त्या पत्रावरून जाले सा याचा जाब करणे प्रायश्चित घ्यावे म्हणून पत्र लिहून मुबईस पाठविणार नारायणशास्त्री थते प्रभुती पुणेकर याजकडे आहे बाबाजी दिवाणजीकडे नाही व नारायणशास्त्री थते पुणेकर प्रभुती याचे समजुतीपेक्षा मुलास अधिक दोष असले तर त्या मुलाचा मार माहादेव भट शेंडे व तत्पक्षी धोंडभट मालखेडकर याणी पुणेकरास लिहिला सा मजकुरात चूक या उभयताकडून जाहाल्यामुळे याचा जाब त्या दोघावर आहे बाबाजी दिवाणजीवर नाही व नाराणशास्त्री थते प्रभुती काही याचा उलट दुसरे प्रकारची संमती गेल्यापासून त्या मुलास न घेण्याचा निश्चय बाबाजी दिवाणजीनीहि केला आहे हाली दोहो तंट्यातील सर्व मंडली त्या मुलास घ्यावयास मान्य नाही असे असता वासुदेव भट .... ल तसे अक्रमं लोकास सागून ... अडचण ... करून त्या ग्रहस्ताचा दुरलौकिक करितात त्याच्याने दोषाचा पुरावा काहीच होत नाही यास्तव हे सर्व खोटे अदावतीचे कृत्य आहे याविसी कोणाचे मनात विचार करणे असल्यास अवश्यक

करावा व याविशई काही कोणास अधिक उणी माहिती असल्यास व दोष म्हणत असल्यास व कोणाची तक्रार असल्यास विद्वान मंडलीस कलवावे म्हणजे आम्हास फार संतोष होईल कोणी आमचे विषई खत्री केल्यास आंम्ही कबूल आहो हाली दोष काही दिसत नाही मिा मार

सही मोरेश्वरशास्त्री साठे
सही त्रिंबकशास्त्री शालिग्राम

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९७ (१२४) श्री { श. १७६६ इ. १८४४

मसुदा

यादी को पुणे येथे ठराव जाहाला की मुबईस शेषाद्री ब्राह्मण परळीकर याचा मुलगा चवदा वर्षाचा इंग्रज लोकासी सतावन दिवस बाटला तो त्याचे बापाने परत घेतला त्याचा विचार ज्ञातीधर्माविसी कसा म्हणौन बालशास्त्री मुबइंकर याणी पुण्यास शास्त्री यास लिहून पाठविले त्याचे उतर प्रायश्चित देणे विसी गेले परंतु तेथील बहुतेक ब्राह्मण प्रायश्चित देणे योग्य नाहीं असे सांगत असतां ते न ऐकून काही ब्राह्मणानी प्रायश्चित दिल्हे त्या ब्राह्मणासह बाबाजी बिवलकर यांणी संसर्ग केला सा तेथील ब्राह्मणासी व बिवलकर यासी तट पडिला नंतर बिवलकर पुणे मुकामी आले तेंव्हा सदरहू मजकूर मुबईकर ब्राह्मणानी येथे सर्वांस कलविला त्याचा विचार समस्त ब्राह्मणानी करून ठरविले की अशा पतितास पवित्र कर्णे योग्य नाहीं कारण ब्राह्मणधर्मास अनाच्यार प्रवृत होईल याजकरितां त्या मुलास ज्याणी प्रायश्चित दिल्हे त्याचा संसर्ग ज्यास घडला असेल त्यास सर्वानुमत प्रवृत सुमार्गाश्रीत होऊन सर्वांनी येकरूप असावे आणि येथून पुढें ज्ञाती प्रकर्णी महत दोषाचे निष्क्रतीस शास्त्रार्थ व लौकिक विचार करणे तो प्रतिष्ध जाग्यात सभा करून सिष्ट व संभावित याचे अनुमते होत आसावा

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९८ (१६२) श्री नकल { श. १७६६ कार्तीक वद्य ८ इ. १८४४ डिसें. ३

यादी अशेष ब्रह्मवृंद व अशेष ग्रहस्त मंडली सर्वत्रास श्रीशंकराच्यार्य याचे मुखत्यार कारभारी वो व्यकट दिा आथणीकर श्री याणी सा नमस्कार वो व आसिर्वाद श्रीचे आज्ञेवरून खाली लिहिलेले मजकूर कलवितो त्याचा अभिप्राय

१ परळीकर मुलास पूर्वांग प्रायश्चित देणेविसी श्रीची आज्ञापत्र व थोर थोर शास्त्री पडित याचे समतपत्र त्यात नारायणशास्त्री थते याचेही समत असून अलीकडे श्रीची आज्ञा उलंघन करुन सदरहू प्रायेश्चितास अनुमोदन दिल्हे मंडलीस थते व बाबा जोशी मेणवलीकर व विनायेकभट बापट हे तिघे मिलून बहिषकार म्हणून व त्यातील कितेक लोकाकडून प्रायेश्चित द्रव्य घेऊन शुध्ध केले व आपा मुनी श्रीचे आज्ञे वरुन बहिषकृत आसता पगतीस घेतले यास्तव थते व बाबा जोसी मेणवलीकर व विनायेक भट बापट तिघास श्रीचे निग्रह होऊन बहिषकार केला आहे तर सदरहू तिघानी श्रीसन्निधास जाऊन शुध्धपत्र घेऊन येईजेपर्यंत सदरहू तिघासी कोणीहि अन्नोदक वगैरेस व्यवहार करु नये सदरहूची आज्ञा मोडून कोणी सदरहू तिघासीस व्यवहार करतील तर तेहि श्रीकडून शुद्धपत्र आणि जेपर्यंत बहिषकृत आसतील ता। कार्तिक वा। ८ क्रोधीनाम संवत्छरे रुजू व्यकटेश दिक्षीत नि।। शंकराच्यार्य

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. १९९ (१६३) श्री { श. १७६६ इ. १८४४

तट पडल्यानंतर बिवलकर जेष्ट मासी पुणे मु।। आले त्याणी जाहालेले म।।राची कोणास वोलख न देता सिष्टपूजा सभा वगैरे करू लागले तो मुबईकरहि येथे आले त्याणी शहर मजकुरी समस्तास जाहला म।।र व बिवलकर याची सदोष क्रती सभा करून प्रसिध्ध कलऊन सर्वानुमते विचार करावा तो न करिता बिवलकर याणी सभा गंधाक्षत प्रसंगाची केली ते वेलेस आपमते आकस्मात बिवलकर यास बहिष्कार सांगितला यामुळे गंधाक्षतेस कोणी गेले त्याचा व गावातील सिष्ट इत्यादि न गेले त्यांचा आपसांत आतीवाद होऊ लागला स।। काही सिष्टानी राहतेकर याचे वाड्यांत सभा करून या विच्यारास बसऊन मुंबईकर यास बिवलकर याचे चौकसी करिता बोलावणी केली तो त्याणी नारायण शास्त्री थते प्रभ्रुती काही मंडलीची नावे घेतली की हे सर्व आले म्हणजे आंम्ही येऊ व मंडलीचेहि उतर आले की आमचे येण्याचे कारण नाही यावरून त्या सिष्टानी मंडलीचा प्रतिपक्ष व मुबईकराचा अतिवाद आहे याप्रो कलून बिवलकर याचे घरी जाण्यास उद्युक्त जाहाले व त्याप्रो पुढे सभेसहि गेले त्यात वो शास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री त्रिबकशास्त्रीबावा शालग्राम व त्याचेबरोबर काही ग्रामस्त गेले त्यापौ काही दुसरीयाचे अनुषंगी होते त्याजला सभेस गेलियामुळे काही अडचण उत्पन्न होते म्हणून शास्त्रीबावा यास समजले त्यावरून त्याणी पुर्तेपणे मडलीत समक्ष जाऊन मडलीचा अभिप्राय मनात न घेता रागाची भाषणे बोलले त्यावरून मंडलीची व त्याची फूट पडून करुब्यात गुरजर याचे घरी सभा होऊन बिवलकर याजविसी

मुंबईकर याणी मुखजबानी व काही कागदोपत्री मजकूर समस्तास समजाविला त्यावरून बिवलकर सांवसर्गीक दोषी होतात असे दिसण्यात आले परंतु त्याचे पक्षीचा मजकूर काहीच कलला नाही सां सर्वांचे विचारे ठरले की येकपक्षी बिवलकर दोषी दिसतात परंतु उभयपक्षी विचार समजल्याखेरीज शब्दारोप करून दोष कायम करणे हे यथार्थ नव्हे त्यास संशयभूत कर्मास अनकूल होऊन राहणे हेहि योग्य नव्हे यास्तव माध्यस्तारित्या सभेत उभयतांची समक्षता होऊन सिधांत ठरेतोपावेतो बिवलकर याचे घरी न जाता तस्त राहावं व इतःपर त्याचे घरी विचार जाल्यावाचून जे जातील त्यास आपल्यात घेऊ नये याप्रो प्रतिबंध जाहाल्यामुळे आपसात परस्परे लोकविरुध्ध उपमर्द होऊ लागल यास्तव मंडलीपौ कोणाचे मनात आले की शास्त्रीबावा हे सर्वांत श्रेष्ठ व आपणास सर्वांस वडील याचे बोलण्याचा राग मानून त्याचा अपमान पाहाणे हे सर्वथा अयोग्य आहे त्याचे बोलणे आपणास सर्वांस कल्याणदायक असे जाणून त्यांचा व आपला सर्वांचा येक विचार करून पेशजीचा ठराव सदरी लिहिला आहे त्याप्रो बिवलकर यांची व मुंबईकर याची सदोष निर्दोषाची चौकसी होई तो पावेतो उभयताचा अंगीकार व प्रतिपक्ष कोणी (न) करिता माध्यस्तरीत्या तटस्थ राहून राहून (त्या) विसीची चौकशी करावी येविसी संमती (अपूर्ण)

शुद्धिप्रकरण (पुढें चालू)

ले. २०० (११५) श्री {श. १७६६ कार्तिक वद्य १० / इ. १८४४ डिसेंबर ५}

नकल

यादी शके १७६६ क्रोधीनाम संवत्छरे कार्तिक वा १० ते दिवसी वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायणशास्त्री थत व बाबाजी जोसी मणवलीकर व विनायकभट बापट याणी सभा केली याचे कारण की व्यंकट दिा आथणीकर याणी आपले नावाची यादी त्यात मार परळीकर मुलास पूर्वांग प्रायश्चित करण्यास श्रीची आज्ञा ती आज्ञा उलघन केली व आपा मुनी श्रीकडून आपक्त त्यास पंगतीस घेतले सां त्रिवर्ग बहिष्कृत म्हणोन यादी शहरात बापू व चिंतोबा बोलावणेकरी याणी फिरविली याजकरिता सभा करून दीक्षित मजकूर यास बोलाविले ते गैर हाजर तेव्हा बोलावणेकरी यास पुसिले तुम्हास यादी कोण्ही दिल्ह्या त्याणी सांगितले की (जय)-रामभट घारपुरे याणी दिल्ही त्याजवरून + + + + + बोलावणे + + + + येत नाही व यादी दिल्ह्या नाहीत म्हणून नाकबूल जाहाले त्यावरून बोलावणेकरी याणी असल यादीवर सेरे मारून दिल्हे याणी सभेत उभे राहून सर्वांस विनंति

केली की आम्हास फसविले सा। आम्हीं शरण आलो आहोत आमचा आपराध क्षमा करावा त्याजवरून सदरहू सभा श्री विष्णु मंदीर नारायण पेठेत जाहाली त्यास त्या सभेतील सर्व संभावित विद्वान ब्राह्मण व ग्रहस्त मिलोन ठरविले की सदरहू त्रिवर्गाला बहिष्काराची यादी बोलावणेकरी याणी पुणे शहरात फिरविली आणि तेच बोलावणेकरी आज सभेत यादी देणार याणी आम्हास फसऊन आपराध करविला असे म्हणतात त्यापेक्षां सर्वांच्या विचारास आले की या बहिष्काराच्या यादी श्री शंकराच्यार्यांचे नावे करून पुणे मुक्कामी घेवोन खोट्या करून बोलावणेकरी याजपासी दिल्या त्या यादीतील मजकूर कोणास मान्य नाही सा। सदरहू बोलावणेकरी याणी बहिष्काराचा मजकूर जो पूर्वी सर्वांस कलविला आहे तो सर्वथा खोटा आहे म्हणोन बोलावणेकरी याणीच सर्वांचे घरी पुणियात कलवावे असे सर्वानुमते सभेत ठरले असे हस्ताक्षर सखाराम जावले

१ धोंडभट खोती	१ जिवनराव नारायण मजूमदार
१ विनायकभट केलकर	१ गणेश भास्कर घारपुरे
१ बाबा वोझे	१ गोविंदराव करंदीकर
१ बज्याच्यार्य बिडकर	१ त्रिंबक नारायण आभ्यंकर
१ पांडुरंग शास्त्री हरडीकर	१ समस्त ग्रामस्त आष्टघरे आष्टाधिकारी का॥ पुणे सदरहू समत असे
१ केशव शास्त्री नेने	
१ नाना गोसावी नूरकर	
१ बज्याबा जोसी + + + +	
१ कृष्णंभट गोखले	
१ जैराम भ (ट) कणव	

शेषाद्रि
शुद्धि प्रकरण

ले. २०१ (११६) श्री { श. १७६७ श्रावण वा। १
इ. १८४५ आगष्ट १८

यादी शेषाद्री ब्राह्मण देशस्त परलीकर यांचा मुलगा वय वर्षे तेराचौदाचा होता तो पाद्री इंग्रज लोक यांणी त्यास बाटऊन छेपन सत्तावन दिवस अभक्षाभक्ष व अपेयापेय इत्यादि संसर्ग घडला नंतर सदरहू ब्राह्मण याणें सरकारात फियाद करून तो मूल परत घेतला आणि पुढें त्याचा विच्यार ज्ञातीधर्मांविसी कसा करावा त्याजवरून मुंबईकर काहीं ब्राह्मणानी शेहर पुणे येथील शास्त्री पंडित यास हा मजकूर लेहून पाठविला त्याजवरून त्याणी (विच्यार करून) प्रायचित द्यावे म्हणोन लिहून पाठविले त्यानंतर

(त्याजवरून) तेथ पूर्वांग प्रायचित करावयास लागल तो मुंबईकर (ब्राह्मण याणे) बहुतेक ब्राह्मण याणी आडथळा केला की हे कर्म प्रशस्त नाहीं याजकरिता त्याचा आपखी पुर्ता विच्यार करून जे कर्णे ते करावे असे म्हणत असता ते न ऐकता प्रायचित जाले त्यात राजश्री दिवाणी दिवाणजी यांजकडील ब्राह्मण गेले असे म्हणे मुंबईकर यांचे म्हणे त्यास याचा विचार पाहता ब्राह्मण गेली अथवा न गेले याचा विच्यार कर्णे जरूर नाहीं कारण की पुणेकर शास्त्री पंडित याचे लेखावरून काय कर्म जाहाले त्यास यांची आनकूलता जाहली याजवरून त्यास शब्दारोप करावा तरी जे मोठे विद्वान श्रेष्ठ त्यांणी आज्ञा दिल्ही त्याप्रो करावयास हरकत नाहीं तेव्हा येतद्विसी नूनाधिक विचारणे हे शास्त्री–पंडितास असें सिध्ध जाले त्यास शास्त्रीपंडितास येविसी विच्यार पुसता त्यांणी जे शास्त्रार्थ लिहून दिल्हे ते ग्रंथाचे आज्ञेवरूनच लिहून दिल्हे परंतु कालदेशाकडे पाहाता ही अती प्रवृती होऊन आनाच्यार प्रवर्त होइल याजकरिता तो मुलगा ज्ञातीत घेऊ नये असा निबंध सर्वांनुमते ठरून हली असा ठराव सर्वांनुमते होत आहे की येविसी श्रीक्षेत्र कासी येथून आधिक श्रावण वा। १ संवत १९०१ या रोजी सिष्टानुमतेचे पत्र मुंबईकर यास आले त्यात पूर्वांग प्रायचित जाले हे विपरीत अनुष्टान नाहीं याजकरिता कोणी कोणावर शब्द न ठेविता सर्वांनी येकरूप असावे याप्रो कासीचेहि पत्रातही आहे इत्यादि कारणावरून कोणी कोणास दोष न ठेविता सर्वांनी येकव्यव्हाराने चालावे येविसी जो कोणी विपरीत वर्तेल तो श्रीकासीक्षेत्र व पुणे येथील समते बाहेर समजावा व यापुढें ज्ञाती प्रकर्णी किंवा महत प्रायचित असे जे मोठे खटले येईल ते शास्त्री पंडित व ग्रामस्त व भिक्षुक व च्यार ग्रहस्त बसून विच्यार करून सर्वांनुमतेने शास्त्रार्थ देत जावा*

श्री

यादी शेषाद्री ब्राह्मण देशस्त परतुरकर याचा मुलगा श्रीपती यांस पाद्री इग्रज लोक याणी छंपन्न सतावन दिवस आभक्ष्य भक्षण व आपेयपान इत्यादि संसर्ग करून बाटविला नंतर परलीकर ब्राह्मण याणे सरकारात फिरयाद करून तो मुलगा परत घेतला पुढे त्याचा विचार ज्ञानिधर्मांविसी कसा करावा त्याजवरून मुबईकर ब्राह्मण पौ काही ब्राह्मणानी शहर पुणे वगैरे येथील शास्त्री पडीत यास मजकूर लिहून पाठविला त्याज-

+

वरून त्याणी प्राय (श्रित) लोकास देण्याचा विचार करणे तो प्रसिध्ध जाग्यात सभा करून सिष्ट व संभावित यांचे अनुमते बेत असावा व या प्रकर्णी मागील दोष कोणीकोणास न ठेविता सर्वांनी या ठरावावर द्रिष्टी टेऊन येकरूप चालावे व जो कोणी या ठरावा बाहेर वर्तणूक करू लागेल तो समतीबाहेर असे समजावे

+ हें लिहून खोडलें आहे. * कंसांत असलेल्या मजकुराखालीं यादींत रेघ ओढली आहे म्हणजे तो यादींतून गाळावा असें सुचविलें आहे.

शुद्धी प्रकरणीं सॅमसनसाहेबाचा हुकूम

ले. २०२ (२९०) श्री { इंग्रजी अंमल

शेवेसी गोविंद गोसो सिर सांा नमस्कार विज्ञापना ताा छ १५ रजेब वर्तमान येथास्थित असे विशेष राजश्री भास्करभट मेहेंदले याचे शुध्यतेविसी सॅमसन साहेब याचा हुकूम मामलेदार यास होऊन मामलेदार याचा हुकूम कोा मजकुरास आला त्यास समस्त ब्राह्मणानी येक विच्यार करून श्रीमत राजश्री आबासाहेब यांची सला घेऊन याचे शेक्तीनुसार प्रायाश्चित योजून तेथील तेथे शुध्यता करावी असे माझे बुध्धीस येते येथील शास्त्रीबावाचे व येथील समस्त शास्त्री पंडित याचे संमत घेऊन यावे मग शृध्यता होईल आसे कोणाकोणाचे मनात असल्यास मागे पुढे कोणतेहि मोठे धाकटे कर्म जे होईल त्यास येथील संमताचे पत्र पाहिजे तेव्हा ते शेवटास जाईल असी चाल पडेल याजकरिता आपले वस्तीस ब्राह्मण मडली बहुत वैदीक ब्राह्मण शास्त्री पडित आपले संग्रही आहेत व आपले नावलौकिक मोठा तशात सरकारचा हुकूम आहे व कोणतेहि दोषाचे कर्मास प्रायस्चित आहेच आहे त्याअर्थी आपले गावचे गावात सर्वांचे आनुमते समस्तानी तिकडील विच्यार घेऊन करावे हे चांगले समस्ताची मर्जी नसल्यास येथून होऊन येईलच परंतु कोणतेहि मागे पुढे आसेत होत जाईल याजकरिता विनंति लिाा आहे समस्तास हेच पत्र दाखऊन येविसीचा विच्यार व्हावा शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

अपघातानें मेलेल्यास दहनापूर्वी प्रायश्चित्त दिलें नाहीं

ले. २०३ (८) श्री

चिरंजीव राजश्री धोंडोबा यासि सदासीव चिमणाजी आसिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष वाा राजश्री गोविंदभट गणपुले याचा पुत्र माहादेव याणी विशप्रलचे करून मृत्यु पावला त्याचे दहन वेदमूर्तीनी करून समंत्रक क्रिया केली त्यास अघाते मृत्य पावला त्याचे प्रायेश्चित विध आधीं करून उपरांतिक क्रिया करावी ते न केली या गोष्टीचा सशये वाा राजश्री नऱ्हेर भट सासवडास आले होते त्याणीं घेतला त्याजवरून वाा गोविंद भट गणपुले येथे येऊन दाहा ब्राह्मण शिष्ट जमा करून जाहाले वर्तमान सर्व निवेदिले त्याजवरून सर्वांनीं उत्तर केलें कीं अघाते मृत्य पावला त्याचे प्रायाश्चित विध आधी करून मग क्रिया करावी ते न केली याजकरितां पुन्हा प्रायश्चित घेऊन पालांशविधीपूर्वक क्रिया करावी म्हणौन सांगितले त्याजवरून सर्वांनी सांगितल्याप्रमाा गोविंदभटाचे पुत्र बाळकृष्ण(भट) यानी पालाश विधी-

पूर्वक देखील सपिंडी करणे अलदीस केले अतःपर अग्निहोत्रादिक प्रसंग गोविंदभटास करणे तो सुखरूप करावा म्हणोन समस्त शास्त्रज्ञ ब्राह्मणाही पत्र दिल्हेले आहे तरी हे अग्निहोत्रादिक उद्योग करितील त्यास करु देणे रा छ र ५ रबिलोवल* बहुत काये लिहिणे हे[1] आसीर्वाद

जातिभ्रंशास प्रायश्चित्त कोणतें

ले. २०४ (३०३)

+

++++++ प्रति श्रीमत्क्षेत्रस्त ब्र.ळाचार्य ++++ कृतानेक साष्टांग नमस्कार वि ++ येथील क्षेम तागाईत पौष शुक्ल तृतीया पावेतो सुखरूप असो विशेष आपण जातिभ्रंशकर पातकाविषइ प्रायश्चित्त विचारिले त्यावरून ग्रंथावलोकन करून विचार करून जातिभ्रंशकर पातकास सांतपन प्रायश्चित ग्रंथांत उक्त आहे सांतपनास प्रत्याम्नायहि ग्रंथि लिहिला अहे जे अनुकुल पडेल ते कर्वीणे कळावे बहुत काय लिहिणे हे विनंति ॥

पुणेंकर-सासवडकर सोनार यांचा वाद

ले. २०५ (३०९)

श्री

यादी सोनार का। पुणे आपण गोतपत करावयास जातो तेव्हा ज्याचो गोतपत आसती त्याजपासी सरकारचा कागद आसतो तो आपण आपल्याजवल घेऊन त्याचे कार्य करितो ऐसे आसता साल मजकुरी सदासिव सोनार भिवरीकर याचे गोतपतीस गेलो तेथे रघू सोनार सासवडकर याने सरकारचे कागद आपल्याजवल ठेविले आम्हा-जवल दिल्हे नाहीत हाली सखोजी सोनार आंबलेकर याचे गोतपतीस जावे लागते तेथे सासवडकर फिरोन खटखट करितील याजकरिता सासवडकर सोनारास पत्र की पुणेकर सोनार सरकारचे पत्र ठेवीत आले त्याप्रो ठेवतील भिवरीकराचा कागद तुम्ही घेतले ते पुणेकराचे हवाली कर्णे म्हणोन सासवडकर सोनार याचे नावे आज्ञापत्र

+ मूळ पत्र बालबोधींत असल्यानें येथें मुळांतीलच शुद्धलेखन कायम ठेविलें आहे.

अभिषेक यथासांग व्हावा

ले. २०६ (२९६) श्री { श. १६८२ / इ. १७६० पूर्वी

असीर्वाद उपर श्री अभिषकास ब्राह्मण तिवरात्रीचे दिवसी लावावे यैसे होते परंतु वेदमूर्ति राजश्री तात्यानी सांगितले की दुसऱ्या दिवसापासून करावा त्यावरून दुसरे दिवसी लाविले म्हणून लिहिले तर त्रिवरात्रीचे दिवसी लावावे हे आमच्या चितात होते परंतु तात्यानी मागितले तरी बरे त्याच्याच विचारे जे करणे ते करावे सूर्योदयाचे पूर्वीपासून सूर्येअस्तपर्यंत येक सततधारा खडण न होता अभि (ष) क करावा येविसी तपसिले तुम्हापासी कुरकुंबी सागणे ते सागितले आहे व जेजुरीस राधो निबाजीपासीाह सागितले आहे तरी लक्षा गोस्टीची गोस्ट की उदये पूर्वापासून अस्तांगतपर्यंत धारा देवावरील न तुटे यैसे करणे म्हणजे केल्याचे सार्थक नाहीतर अवघे व्यर्थ होईल यास्तव पाहाटेच्या सा घटका रात्रा गंध उगा [ळ] णार ब्राह्मण त्याणे श्नान करून अग्रोदक पाणी आणून पाण्यात हात न घालता सधेचे पळीने पाणी घालून गधांत कापूर नित्य तोलाभर घालून उगालावे ब्राह्मणानी दो घटका रात्री श्नान करून सर्योदयाप्वीं अरुणोदई देवावर आभिष्क होये ते करणे प्रस्तुत तुम्ही अभिषक करविता त्यास पहाटे उठोन गंध कोणत्या ब्राह्मणापासून उगालविना व प्राथकाली अभिषक कोण करिते व दो प्रहराउपर कोण करिते व कापूर गंधात किती घालिता व गंध किती लागते व देवास दहीभाताचा नवेद्य पैसा दक्षणा व विडा याप्रमाणे वाहावयासी सागितले होते ते वाहता की नाही ते लिहिणे चंदन नित्य किती लागतो मृगापर्यंत किती लागेल ते लिहिणे त्यासारिखा येथे विकत घेऊ तरी लिही- ल्याप्रमाणे अभिषक करऊन उतर तपसीलवार तुम्ही लिहिणे मोगऱ्यास फुले येत असिली तरी श्रीवटेश्वर यासी साईकाली वाहावेयासी सागणे कापूर तिकडे रुपयासी किती तोले मिलतो ते लिहिणे इकडे बारा तोले मिलतो यापेक्षा तिकडे सवग मिलत असिला तर तिकडे घेणे नाहीतर लेहून पाठवणे येथे विकत घेऊन पाठऊ कलले पाहिजे वरकड नवल विशेष वर्तमान लिहिणे लोभ असो दीजे हे आसिर्वाद राजश्री राघो निबाजी व राजश्री नागोजीपंत यासी नमस्कार चिरंजीवास लिल्याप्रमाणे देवाच्या कार्यात अतर पडल्याने तुम्हास शब्द लागेल तरी सावधपणे वर्तणूक करणे हे विनंति * पौ छ ८ माहे जिलकाद

\+ पत्र महादाजी अंबाजी पुरंदरे यांचें असून तें सर्व स्वदस्तुरचें आहे.

* अक्षर भिन्न.

शत्रु-पराजयार्थ अनुष्ठान करा

ले. २०७ (१७९) श्री {शक १६८५ माघ शु. १ / इ. १७६४ फेब्रु. २

चिरंजीव राजश्री नीलकंठ माहादेव यासि प्रती माधवराव बलाल प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष प्रां पुणे येथे आश्रित ब्राह्मण आहेत ज्यास वर्षासन व नख्त रुपये धर्मादाव व जमीन इनाम व गांव इनाम सेभर रुपयावरी यैवज पावेत असेल त्यास बोलाऊन आणून सांगावें कीं खासा स्वारी कर्नाटक प्रांती मसलतीवर जाहाली आहे तरी तुम्ही अनुष्टान शत्रुपराजयार्थ आपले घरीं स्वकष्टार्जित येजमान कल्याणार्थ करावे म्हणौन सांगोन अनुष्टान करवणे जाणिजे छ २९ रजेब सुा आर्बा सितैन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे[1] आसिर्वाद
मो छ ११ साबान

आंघोळ करण्याचा आग्रह

ले. २०८ (९०) श्रीशंकर {श. १७०७ / इ. १७८५ पूर्वी

* चिरजीव धोडो मल्हार आसिरवाद उपेरी तुम्ही आघुली करीत नाहीस म्हणऊन कलो आले तरी आता घटकाभर राती आहे तो आघुल करीत जाणे आणि फराल करून जाणे ब्राह्मणाचे तीर्थ घेत जाणे बारा न मिलत तरी जे मिलतील त्यास दक्षणा देऊ [न] आघूल करीत जाणे देसमुखाच्या पाटीलाच्या घरास जात जाणे त्याणी सिव्या सिधल्या तरी त्यास जाब देत न (जाणे) बरा माणूस बराबर घेऊन जाणे (पुढील दोन ओळी फाटल्या आहेत) हसा न करणे तुला पाघरूणे लागतील ते विकत घेत जाणे आणि आम्हासहि सागोन पाठवणे आम्ही पाठऊन देऊन परतु तू आपली आबदा करू नको येथली खासनसी दोरवा येक जोट पाठविला आहे व धुवट घेणे आणिक काये पाहिजे ती विकत घेत जाणे चिरंजिव बाबाजी मुखवचनें सागेल त्यावरून कलो येईल बहुत काये लिहिणे हा आसिरवाद

चिरंजीव राजश्री रामचंद्र नारायेण आसिर्वाद उपेरी तुम्ही ++++ डोमल्हार ....अनमान सहसा न करणे देशमूख पाटिलाच्या घरास

---

[1] ' हे आसिर्वाद ' हा मजकूर खुद्द माधवराव यांचे हातचा.

हीं माधवरावांची कर्नाटकांतील पहिली स्वारी. माधवराव एकटा असा प्रथमच ह्या स्वारीस जात आहे.

* सबंध पत्र अंबाजीपंतांच्या हातचे आहे.

जात जाणे + + + याचे दुख मानू नका परतु अवघीयाच्या घरास जात जाणे हा आसिरवाद

राजश्री विठावा नाईक स्वामीस सा नमस्कार विनति उपेरी चिरजीव धोडो मल्हार आघूल करीत नाहीत तरी सौ गोधूस व राघोबास सागोन पाहाटे पाणी देऊन आघूल करवीत जाणे न करी तरी तोडावरी मारणे तुमचा भरवसा आहे त्या........ चिरगूट पा (पुढील तीन चार ओळी फाटण्यात गेल्या आहेत)

सौ चिरजीव गोधूस आसिरवाद चिरजिव धोडो मल्हार यास पाहाटे आघुलीस पाणी देत जाणे खायापेयाची त्याची निगा करीत जाणे घर तुझ्या भरवसीयावरी आहे श्री देवाची पुजा घरच्या चागली करीत जाणे नवेद दाखवीत जाणे हा आसिरवाद

रा राघो निवाजी लिाप्रमाणे वर्तणूक करणे रा विठावा नाई याचेहि काम करीत जाणे हे + + +

लग्नांतील हरकतीचें निवारण

ले. २०९ (४०) श्री {श. १७१० / इ. १७८८}

ता मोकदम मौजे कोढीत बुा काा सासवड सुा तिसा समानीन मया व आलफ संभाजी पठारा चाकर किले पुरंदर याणे विदित केले कीं मौजे मााराचा कासी बडधा याची ध्वाडी सिदोजी काल्हाणा धालेवाडीकर यास दिल्ही आहे त्यास दादजी बडधा याचा लेक जानोजी याणे लग्नाचे समई चाभारवाड्यात येऊन बोलला की आपला बाप किल्यावर कैदत वारला त्याची क्रिया जाली नाही तुम्ही लग्न कसे लाविता म्हणोन गावचे जोशापासी बोलला त्याजवरून लग्नास दिकत पडली तेव्हा गावकरीयाणी आपल्यापासून कागद लेहून घेतला की याची दिकत पडल्यास आपण वारूं याप्रो करून काल फालगून वाा ५ पंचमीचे दिवसी लग्न लाविले येविसी गावकरी यास ताकीद जाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हे पत्र सादर केले आसे तरी संभाजी पठारा याजपासून तुम्ही कागद लेहून घेतला आहे तो माघारा देणे लग्न करावयाचे ते केले हाली कोणे विसी दिकत न करणे जाणिजे छ १९ +जाखर मोर्तब

सुद

राखीच्या लेकाचें सुतक

ले. २१० (२२३) श्री { श. १७१६ आषाढ वद्य ४
इ. स. १७९४ जुलै १६ }

श्रीमत रो नानासाहेब पुरधरे साहेबाचे सेवेसी

......आजंदास सेगीकर मोकदम मौजे राजवाडी दडवत विनंति विज्ञापना ऐसी जे माहादजी पा कुजांर मौजे वाघापूर यास आज्ञा केली की राखीचे लेकास पाणी पाजून सुतक धरावे कि काय म्हणून भोवरगावच्या सडी घेऊन येणे त्यावरून साहेबाकडे लेहून पाठविले आहे की राखीचे लेकाचं सुतक आम्ही धरतो व पाणी पाजितो कळावे सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना मिती सके १७१६ आनंदनाम सवछरे आशाढ वद्ये ४

पूर्वीची चाल पाळण्याबद्दल करार

ले. २११ (२१) श्री { श. १७५४ ज्येष्ठ शुा ५
इ. स १८३२ जून ३ }

श्रीमंत माहाराज राजश्री मानंड व श्री अस्वथनारायेण व समस्त देव कुलस्वामी साहबाचे शेवेसी

चरणज नारो बलाल पुंदरे चरणावर मस्तक ठेऊन सिर साां नमस्कार विज्ञापना ऐसी जे आम्ही दर साल देवाचा कुलधर्म व नारसिव्ह याचे ब्राह्मण पाच श्रावणमास घालित जावे असी चाल पूर्वीपासून आहे त्याप्रो आज ताा आम्हाकडून जाले नाहीं म्हणून आम्हापासून करार करून घेतला त्यास पूर्वीचे चालीप्रो घालित जाऊ यास अंतर करणार नाही अंतर करू तर आम्हास कुलस्वामीची शफेत असे मिाा शके १७५४ नदननाम सवछरे जेष्ठ शुाा ५ बहुत काये लिाा शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना

द्वितीय विवाह केव्हा करावा : पित्याचें व पत्नीचें वर्षश्राद्ध

ले. २१२ (१) श्री {

यादी पुणियात शास्त्री पंडित जोतिषी याचे विचारें शास्त्रार्थ निघाला तो

१ स्त्रीचे प्रथम वर्षी वर्ष श्राध्ध जाहाल्यापूर्वी लग्न करावे हा उतम मार्ग परंतु तीर्थरूपाचे वर्षश्राध्ध पुढे होणे आहे व तीर्थरूपाचे वर्षश्राध्धापूर्वी आपला लग्न विवाह होऊ नये हा पुत्रधर्म शास्त्रार्थ खरा आहे तेव्हा जेष्टमास गेल्यानंतर पेस्तर लग्न करणे येते घरात बायको नाही अडचणीचा पर्याय त्याअर्थी विनायेक शांत लहानसी आहे ती करून तीर्थरूपाचे वर्षश्राध्धापूर्वी प्रथम वर्षी पुत्राने लग्न करावे स्त्रीचे द्वितीय वर्षाचा दोष या लग्नास नाही संम वर्षात विषम मासात लग्न करावे व आपुत्रिका स्त्री रजदर्शनापूर्वी वारली तिचा द्वितीय

वर्षीचा दोष नाही माघ मासी आस्ताचे उद्याचे दिवस व ग्रहण खग्रास आहे याचे दिवस व वर्षश्राध्धाचे माघ वा। दशमी अलीकडील दिवस याप्रो शास्त्रार्थाचे दिवस टाकून निर्वेध तीथ माघ मासात तुम्हास मिलत नाही व अशा अडचणीचे तिर्थास तुंम्हीहि करु नये फालगून मासी लग्न करावे कलम

१ फालगून मासी स्त्रीचे द्वितीय वर्षाचा विषम मास होतो त्यापेक्षा तीर्थरूपाचे वर्षश्राध्धाचे पूर्वी लग्न करण्याचा दोष आहे याजबदल विनायेकशात करून फालगून मासी लग्न करावे याप्रो येथे सांगण्यात आहे कलम

१ कन्येच लग्न करण्यास वैशाख मासी करावे संवत्सर भेद होतो आथवा तीर्थरूपाचे वर्षश्राध्ध जाहाल्यावर पेस्तर मार्गसिर्ष माघ मासी करावे हा उत्तम मार्ग कलम

१ तीर्थरूपाचे वर्षश्राद्ध जाल्यावर द्वितीय वर्षी पुत्राने आपले लग्न करावे हाच मुख्य शास्त्रार्थ परंतु निदानपक्ष आडचणीस्तव शांती करून वर्षश्राध्धापूर्वी लग्न करावे कलम

—
४

धुळाक्षराचें ज्ञान

ले. २१३ (२२)

यादि कृष्णास धूल आक्षरे येत ते

१ श्रीगणेशायन
१ वो
१ क का
१ बाराखड्या पाच बालबद
१ शेभर आख
१ पाऊणकी
१ सवाकी
१ दीडकी
१ आडीचकी
१ सेर
१ सिरदे (!)
१ पायेल्या
१ मण
१ रुके
१ टाक
१ पाडे
१ आकरकी
१ येकोत्री
१ आणे
१ निमकी
१ आवटकी आर्धी

(उरफट्या बाजूनें) ॥ १५ कुजीर ·।· जागो ८७॥ हैबुवराव असें लिहिलेलें आहे.)

(कागद पांच बोटें रुंद व आठ बोटे लांब असा लहान आहे.)

एका मुहूर्ताबद्दल एक हें मत

ले. २१४ (६२) श्रीमार्तंड

शुक्रवारचे मुहुर्ता करावे त्यास तोपर्यंत स्वस्थ पुण्यात आसावे चिंता नाही वाकडे तिलप्राय होणार नाही ही चिठी आज्ञाप्रमाण

आणि दुसरें हें मत

ले. २१५ (२१०) श्रीमार्तंड

शुक्रवारचा मुहूर्त चागला नाही पुढे करावे पुण्यात राहू नये ही चिठीच आज्ञाप्रमाण

गंगाधर भारती स्वामींचें पत्र

ले. २१६ (८३) श्री

श्री॰विद्या

शंकर

श्रीमत्परमहंस परीव्राजीकाचार्यवर्य पदवाक्यप्रमाणे पारावारपारीणय यमनियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यान धारण समाधयष्टांग योगानुष्ठान- निष्ठ गरीष्ठ तपश्चक्रवर्य नाद्य विछिन गुरुपरंपराप्राप्त पडदूरूशन स्थापनाचार्य व्याख्यानसिंव्हासनाधीस्वर सकल वेदार्थ प्रकासिका सांख्यत्रई प्रतिपालका सकल निगमागमा सार ह्रदय वैदिकमार्ग प्रवर्तक सर्वतंत्र स्वतंत्रादि माहाराजधानी श्रीविद्यानगर माहाराजधानी कर्नाटक सिंव्हासन प्रतिष्ठापना- चार्य श्रीमद्राजाधिराजगुभूमंडलाचार्य तुंगभद्रातीरवास रुप्य श्रीरंग पूरव राधीस्वर श्री श्रींगेरी श्री शारदांबा श्री विद्याशंकर स्वामी याचे श्री श्रिंगेरीश्री- शंकर भारथीनां करकमळ संजात श्री श्रिंगेरीश्रीसिवगंगा गंगाधर भारथी स्वामी नां करकमल संजात श्री श्रिंगेरीश्रीसिवगंगा श्रीमद्भीनवश्रीगंगाधर भारथी स्वामीयानी

अस्मदत्यंत प्रिय मुख्य सिष्य राजेश्री लक्ष्मणपंत यास त्रिकालानुष्ठान समही कृतानेक श्री नारायण स्मरण पूर्वककडून लिहून पाठविले ते श्रीमुख अम्ही सर्वदा तुमचे श्रेयोभिवृधी व्हावे म्हणौन तप करीत असो प्रकुत राजकार्य प्रसत्ककडून सिवगंगेत राहायास होत नाही याकरिता बात्लापूर पंचनदी तीर अर्कावती क्षेत्र म्हणौन राजेश्री महिमाजीराव याणी सर्व प्रकार परामृश करून जागा देखील करून देखोल करिता चातुर्मांश्य संकलपास येथच नेमक करून व्यासपूजाहि केलो आता मठचे ब्राह्मणाबराबरी व्यासाक्षिता विभूती प्रसाद वस्त्रसहीत पाठविले आसे ते पाहून घेणे चातुर्मांश्य धर्मास काही साहित्य करून समर्पणा केलेया तुम्हास अनेक धर्म सुकृन येत असे श्रीसद्‌गुरुदेवता कटाक्ष विक्षणाकडून सकल वेद्राहस्य धर्मंहि कळून अचरणकडून चालणारास लेखनमुखी विस्तारपूर्वक लिहिंगे काय असे हे नारायाण स्मरणे

एक टिपण

ले. २१७ (११७) श्री {

यादी बाबासाहेब याणी जावयांचे ते

१ नारायणशास्त्रीबावा थते

१ बालासाहेब रास्ते

१ आबासो ढंढरे

१ आणासाहेब विचूरकर

१ आबासोशास्त्री पटवर्धन

१ रामरावजी ताडपत्री

१ मोरोपंत तात्या सहस्त्रबुध्धे

१ रावसो नातू

रु १ भिमरावजी जाहालकर (?)

१ गणपतराव पटवर्धन

रु १ कोंडोपंत बापू सहस्त्रबुध्धे

---

१ क अधिक पडला आहे.

आजारी बाईस कोकणांत नेण्याचा दृष्टांत

ले. २१८ (२९५) श्री {

श्रियासह चिरंजीवीत राजश्री नारोपंत याप्रती सिवाजी भास्कर आनेक आसीर्वाद उपरी श्रावण शुध दशमी रविवार पावेतो मुकाम सातारा सुखरूप आहो व घरीची माणसे समस्त सुखरूप आहेत आम्ही शुक्रवारी संध्याकाली आलो सौभाग्यवती लक्षुमीबाईस काही आनुनात्र उतार आहे तुम्ही काही चिता न करावी गावीच्या देवाची व श्रीमाहाकालीची प्रार्थना करून आलो आहो देवानी सांगितले की कोकणांत घेऊन चावी म्हणजे आठा पंनधरा रोजात चोखोट बरी होईल वरती आसिली तर महिनिया आलीकडेस बरी होईल ऐसा विचार आहे या गोस्टीचा निच्चय करून येथे ठेवावी की कोकणात न्यावी हा निचय करून लिहोन पाठविले पाहिजे आपले पत्राची वाट पाहात आहो आपले पत्र आल्यानतर लिहिल्याप्रमाणे वर्तनूक करू तुमची भेट जाहाली आसती तर उतम गोस्ट होती पनरा रोजा आलीकडेस आपले येणे होईसारिखे आसिले तर तसेच लिहिणे महिना दोन महिने लागत सारिखे आसिले तर तैसेच लिहिणे सारांश गोस्ट की कोकणात नेल्यानंतर लवकर बरी होईल याकरितां आपणास लिहिले आहे सुज्ञाप्रती बहुत काय लिहि (णे) सूचनार्थ लिहिले आहे हे आसिर्वाद

कठीण शब्दांचे अर्थ

लेखांक

१ मोईन–नेमणूक

२ राडी–रंग तयार करण्याची कुंडी

५ कबज–पावती

११ मुजाहीम–हरकत करणारा

१२ शेरी–सरकारच्या किंवा जहागिरदाराच्या खाजगी मालकीची जमीन. येथील जमीन-महसुलावर मणास दोन शेरप्रमाणें कमाविसदाराचा हक्क असतो.

शेरीकर–शेरीची जमीन करणारा

बखेर–हकीकत

हिमातदार–आश्रित होऊन दांडगाई करणारा

कोठी–दाणागोटा साठविण्याची जागा

मवास–लुटारू, स्वतंत्र

१७ पायेमाली–पायाखाली तुडविल्यानें नुकसान झाल्याची नुकसान भरपाईसाठीं नोंद

१९ हर्फ–अक्षर

२२ पोवई–पाणपोई

२८ दिलग्र (दिलगीर)-उदास

३७ मेहेतरे–(मेहेतरचें अनेकवचन) जातींतील धर्मनिर्बंध सांगणारे जात-प्रमुख

४० चोल्या (चोळीचें अनेकवचन)– (प्रसंगीं) खास इनाम दिलेली जमीन

४१ फसकी–पसाभर धान्य घेण्याचा हक्क

४६ अटफला–कांबळीचा एक पट्टा

लवेचा महार–निरोप सांगणारा महार

५३ सात–शांत

पेढ्याची घागर-पांढरीभोवतीं प्रसंगीं पाणी घालण्याचा हक्क

५४ वर्तक–ग्रामपंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी करणारा – भविष्य वर्तविणारा

लाहारी–चार पाच आणे किंमतीचें चांदीचें नाणें

५५ हरताल पाडली–रद्द केली

५९ गाठ्या–खंडोबाच्या भक्ताच्या गळ्यांतील रुप्याची हसळी.

६५ नाहीहरी [न्याहारी ?]

मालवे-मळ्यांतील भाजीपाला जिन्नस

७२ फरा–खांद्याचें किंवा मांडीचें हाड

७३ तिवट–कोरें पागोटेंविशेष

जाफरखानी–शालजोडी किंवा शेलार

जामेवार–अंगरखा

किमखाप (किनखाप)–मखमल

७४ बगाडाचे गळ टोचणें-(एक नवसविधि)

७५ बयेदा–वाद, अनिर्णित प्रश्न

९० दरुनी माहाल–अंतःपुरांतील, अधिकारी दिवाणजी

नंदाची पासोडी–अंतरपाट

दूरदराज जाऊ देणें–प्रकरण लांब धरावर नेणें

९३ मोहूर्त–मोहोतूर, पाट

९४ यादी–टाचण, स्मरण

फेरीस्त–सूचि, नोंदकागद

९७ पाल–यात्रेंतील दुकान
९९ फसकी–(४१ पहा)
सेव–भाजीपाल्यावरील हक
१०३ उबरा (उबारा)–अधिक
१०३ गौडकी–प्रमुखता
११२ आवटे–वजनामापावर देखरेख ठेवणारा अधिकारी
१२२ निरख–बाजारभाव
१३१ काहार–भोई
लांझ्या–असमाप्त व्यवहार
वारला–संपविला
गोही–साक्ष
१७२ पोमान– ?
२०९ ध्वाही–पुतणी
अग्रवादी–वादी
पश्चिमवादी–प्रतिवादी
सडपत्र–साक्षी पत्र

पत्रांतील सह्यांच्या निशाण्या

कांकण–स्त्री
पालखी–भोई
तीरकमठा–रामोशी
नांगर–शेतकरी व पाटील
पहार–तेली
त्रिशूळ–गोसावी
कात्री–शिंपी
कट्यार–नाइकवाडी (गांवांतील सरकारी शिपाई)
तागडी–व्यापारी
चाक–कुंभार
पावडी (फावडे)–
(ले. १२५ पहा)

व्यक्ति-स्थळ-सूची

नांवापुढील कंसांतील आकडा कालनिर्देशक आहे आणि कंसानंतरचा आंकडा किंवा नुसता कंसाशिवाय आकडा असेल तो लेखांकाचा आहे.

ख

ग

घ

ल

श

स

मंडळवृत्त

३७ वें वार्षिक संमेलन–कार्यक्रम

दिवस १ ला–शनिवार ज्येष्ठ शु. १०, दि. २७ मे १९५०

प्रास्ताविक व स्वागत — श्री. चिं. ग. कर्वे, चिटणीस

ऐतिहासिक समालोचन — म. म. द. वा. पोतदार, कार्याध्यक्ष

निबंध—

श्री. रा. म. आठवले— पागोटें व पगडी यांचा उगम
कवि वामनपंडिताचे विद्यागुरु

रा. सा. पां. ज्ञा. कुलकर्णी–तत्त्वसागचा कर्ता कोण ?

श्री. रु. वा. पुरंदरे — धावतें संशोधन – मौजे – बेल्हे.

प्रदर्शन—

जमशेटजी जीजीभाई यांचा लाखाचा चेक — श्री. चिं. ग. कर्वे

जलयुद्धाचा नकाशा व इतर — श्री. ग. ह. खरे

संध्याकाळ ६–८

व्याख्यान चर्चा—

महानुभावीय वाङ्मय व तत्त्वज्ञान — प्रा. ह. ना. नेने (उमरावती),
श्री. रा. म. आठवले

दिवस २ रा–रविवार, ज्येष्ठ शु. ११, दि. २८ मे १९५०

सकाळ ८—१०॥

निबंधवाचन—

प्रा. प. रु. गोडे — History of the Spittoon in India (B. C. 200 and A. D. 1900)

प्रा. भ. द. वर्मा — Customs & Manners in the Court of the later Mughals.

डॉ. रा. ग. हर्षे — नाथ सांप्रदायांतील एक अप्रसिद्ध ग्रंथ – ' घटचक्र '

श्री. य. ग. फफे (मनोहर)– पिंगलाच्या छंदःशास्त्रांतील प्रक्षेप व पाठभेद

श्री. सि. वि. चित्रावशास्त्री— कात्यायनाची विवेचनपद्धती.

श्री. ह. ना. नेने — मूर्तिप्रकाश, केशिराजव्यासकृत, (तेराव्या शतकांतील ज्ञानेश्वर समकालीन ग्रंथ);
ज्ञानेश्वरींतील 'उपलविला' ह्या शब्दावर अधिक प्रकाश

श्री. ग. ह. खरे — वाई – राजाज्ञाकडील कागद

व्याख्यान — श्री. स. आ. जोगळेकर, (वकील)— हालाची सप्तशती

दिवस ३ रा–सोमवार सकाळ ८—१०॥

निबंधवाचन

श्री. रा. म. आठवले -- श्रीमंत नानाराव पेशवे यांचा तराईतील बनावट मृत्यु.

संध्याकाळ ६—८

श्री. शं. ना. जोशी -- राघोबादादाचा दत्तक पुत्र अमृतराव, याचा तोतया

व्याख्यान सदीप प्रो. वा. रा. तळवलकर -- Buddhist Motifs in Byzantine Architecture.

श्री. य. रा. गुप्ते -- लेण्यांच्या कलेंतील कऱ्हाड येथील लेण्यांचें स्थान.

पाक्षिक सभा

शक १८७१ मधील पहिल्या दोन सभांचें वृत्त मागील अंकांत दिलें आहे. त्यापुढील पा. स. ३ पासूनचें वृत येथें दिलें आहे.

पा. स.	लेखक	निबंध
३	श्री. शं. ना. जोशी	(१) सर लष्करचे मुजुमदार पुरंदरे
,,	,,	(२) सदाशिव राम व विसाजी रघुनाथ यांस पत्र
,,	,,	(३) चिमणराव पांडुरंग यांचें पत्र
,,		(४) दारुबंदी
,,	श्री. द. वा. पोतदार	कृष्ण ज्योतिषि शिवाजीबरोबर
,,	श्री. गो. रा. राजोपाध्ये	कोरेगांवच्या बोकीलांची अर्धा चाहूर जमीन चालविण्याबद्दल कंपनी इंग्रज बहादरचें पत्र.
४	डॉ. वि. त्र्यं. गुण्ये	देवी पद्मावति–पंढरपूर–देवालयांतील रंगशिलेवरील शिलालेख
,,	श्री. शं. ना. जोशी	सुरापूरच्या लढाईसंबंधीं पत्र.
,,	श्री. वि. अं. कानोले	एकनाथकृत भावार्थ रामायणाच्या उत्तर कांडाचा कर्ता मुक्तेश्वर
,,	श्री. चिं. ग. कर्वे	पर–दरबार खर्च
७	श्री. श. ना. जोशी	किल्ले पटणची शिबंदी व मैराल यशवंत
,,	श्री. ग. रा. वाळिंबे	हैदरास पेशव्यांचें पत्र
,,	श्री. चिं. ग. कर्वे	ललितासंग्रह

पा. नं.	लेखक	निबंध
९	श्री. भी. ल. परतुडकर	मराठींतील पहिला गद्यग्रंथ
,,	,,	नवीन श्रीधर व त्याचा नवीन जैमिनी अश्वमेध
,,	श्री. शं. ना. जोशी	सोनार मंडळींचा जोस-कुलकर्णीबद्दल वाद व त्यांचें आपसांतील समापत्र
,,	,,	मायाजी पगीट-तकरीर
१०	श्री. शं. ना. जोशी	शिवापूरकर देशपांडे यांजकडलि कागद कर्जखत.
११	डॉ. मो. गं. दिक्षित	खंबायत येथील मूल्य काचमण्यांचा धंदा

शक १८७१ मधील पाक्षिक सभा संकलित वृत्त—

ह्या शकवर्षी एकंदर व्हावयाच्या सभा १७. पैकीं ६ सभा सुट्टी व इतर कारणें ह्यामुळें झाल्या नाहींत. एकूण सभा ११ झाल्या. त्यांत ३ सभा भाषणाच्या व ८ सभा निबंध वाचनाच्या झाल्या. भाषणाच्या सभा ३ झाल्या त्यांत २ दुखवट्याच्या (मोडकशास्त्री व, देव इंजिनियर-प्राध्यापक) होत्या; व १ लिपीचर्चेची होती. निबंधवाचनाच्या झालेल्या ८ सभांमधून **एकंदर ३२** निबंध वाचले गेले. त्यांचे लेखक व निबंध संख्या पुढीलप्रमाणें— एकंदर लेखक १२

श्री. वाळिंबे	२	प्रा. पोतदार	२	श्री. गहलोत	१
श्री. कर्वे	४	श्री. पिंगळे	१	श्री. परतुडकर	२
श्री. खरे	२	श्री. राजोपाध्ये	१		
डॉ. दीक्षित	२	श्री. कानोले	१		
श्री. शं. ना. जोशी	१३	डॉ. गुण्ये	१		
	२३		६		३ = ३२

अध्यक्ष—श्री. ज. स. करंदीकर सभा ५
द. वा. पोतदार २
वा. रु. भावे १
वि. सी. चितळे १
शं. गो. साठे १
निरध्यक्ष— १ १०

उपस्थिति— १२ सरासरी ८ सभासद
१५ १ पाहुणे

पुणें-नगर संशोधन पाक्षिक सभा

शक १८७१ मधील पहिल्या तीन सभांची माहिती मागील अंकांत दिली. येथें ह्यापुढील सभावृत्त दिलें आहे.

पा. स.	लेखक लेखक	निबंध
४	चिं. ग. कर्वे	(४) बाळाजी नारायण नातू यांचें काशी वास्तव्यांतील व्यवस्थापत्र
,,		(५) बाळाजीपंत दादा यांचें संस्कृत चरित्र श्लोकबद्ध.
,,		(६) स. माधवराव मृत्यूची लगेच बातमी
,,		(७) पत्रावळी वरून सदाशिव दाजिबा वैद्य यांचें लग्न.
,,		(८) नजराणा-पिकले आंबे
५	शं. ना. जोशी	(९) दयाराम मृदंगी याचीं पत्रें
५, ६	संचार	ओंकारेश्वर पाहणी, घाशीराम तळें
७	चिं. ग. कर्वे	(१०) डाकेची व्यवस्था
		(११) संकीर्ण-शेखसल्यास वर्षासन, तळ्यांतला नवलोबा व धरण, ओंकारेश्वरीं शपथ-क्रिया

श. १८७१ मध्यें नगरपाहणीच्या संचार सभा ४ व निबंध वाचनाच्या ३ सभा झाल्या. त्यांत एकंदर श्री. कर्वे, श्री. जोशी यांचें १० + १ असे ११ निबंध वाचले गेले.

प्रदर्शन—फतेचंद जैन विद्यालय चिंचवड, पार्वतीबाई अध्यापिका शाला-हिंगणें, कँप. ए. सो. हायस्कूल-पुणें, माडर्न हाय० चे प्रा. वि. मंदीर-पुणें, म. फुले अध्यापक विद्यालय-सातारा, गांधी ट्रे. कॉ.-पुणें, ज. ए. इ. चे प्रा. टी. ट्रे. इ. दादर ट्रे. कॉ— दादर, मुंबई, श्रीशाहु-शिक्षण विद्यालय रुकडी जि. कोल्हापूर, ह्या शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांना श्री. शं. ना. जोशी यांनीं मंडळाची माहिती देऊन प्रदर्शन दाखविलें.

—शं. का. घाणेकर, श्री. घोलप-पुणें, श्री. ज. बा. फडणीस पुणें, कॅ. दबडघाव, श्री. पारखी; श्रीमंत व्हायकौंट वा. आ. देशप्रभु-पेडणे गोंवा, युनैटेड थिऑलॉजिकल कॉलेज-श्री. भडकमकर, श्री. पुजारी—नरसोबावाडी, श्री. पाटील वकील-उमरावती, श्री. जोशी-नाशिक, श्री. सहस्रबुद्धे-काशी, इत्यादि मंडळी मंडळ प्रदर्शन पाहून गेली.

प्रचार—श्री. शं. ना. जोशी यांची विजापूर, वसई, पुणें, औंध या गांवीं महाराष्ट्र विद्यालय, ज्ञानेश्वर मंडळ, ज्ञान-प्रसार-व्याख्यानमाला, नू. म. विद्यालय, म. ए. सो. हायस्कूल, अ. वि. गृह हायस्कूल येथें इतिहासकालीन शिक्षण, साधन ग्रंथावरून इतिहास कसा व कां शिकवावा, इतिहासाच्या अभ्यासाची नवी दिशा, तुकारामाचें

शिवाजीस अभंगात्मक पत्र, परमार्थापुढें इतर सर्व मूलभूतच पराभव पावणारे विषय होत, शिवाजी चरित्रांतील नवी भर, ह्या विषयांवर व्याख्यानें झालीं. श्री. ग. ह. खरे हे अक्कलकोट, सातारा, रोपळे, वरकुटे, परांडे, बांदिवडें, कटक, भुवनेश्वर, पुरी इत्यादि ठिकाणीं संशोधनार्थ गेले. व्याख्यानें दिलीं. नाणीं तपासिलीं, ऐ. कागद पाहिले.

समारंभ—या सालांत कार्यक्रम बरेच झाले व मोठमोठी मंडळी यासाठीं उपस्थित होती. (१) मोरोपंत पुण्यतिथि चैत्र शु. १५ शक १८७१ दिनांक १-४-४९ रोजीं प्रा. सौ. सरोजनीबाई शेंडे यांचें डॉ. कमळाबाई देशपांडे यांचे अध्यक्षतेखालीं 'कवि मोरोपंत' या विषयावर व्याख्यान झालें. रात्रीं ह. भ. प विष्णु पुरुषोत्तम राहाळकर यांचें कीर्तन झालें. (२) पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या वेळीं मंडळ सभागृहांत मराठी भाषेची वाढ दाखविणारें शिलालेख-ताम्रपटांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. हें प्रदर्शन अपूर्व व उद्‌बोधक होतें. साहित्य संमेलनाच्या प्रतिनिधींना पानसुपारी देण्याचा कार्यक्रम ता. १७ मे १९४९ रोजीं श्रीमंत सौ. राणीसाहब लक्ष्मीदेवी निंबाळकर, फलटण यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. सदर वेळीं प्रा. फाटक, संमेलनाध्यक्ष जावडेकर, प्रा. ओतुरकर वगैरेंचीं भाषणें झालीं. (३) बाजीराव पेशवे स्मृतिदिनीं श्री. वि. शि. चितळे यांचें 'श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचेवरील दोन आरोप' या विषयावर व्याख्यान झालें. (४) श्री. भा. वि. धारपुरे (क्युरेक्टर, रे इंडस्ट्रियल म्युझिअम पुणें) यांचें 'परदेशांतील प्रदर्शनें' या विषयावर दिनांक १४ सप्टेंबर १९४९ रोजीं सुंदर व्याख्यान झालें. (५) मुंबईचे पंतप्रधान ना. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखालीं रियासतकार रा. ब. नानासाहेब सरदेसाई यांचा सत्कार व प्रो. त्र्यं. शं. शेजवलकर यांनीं देणगी म्हणून दिलेल्या रा. ब. नानासाहेब सरदेसाई यांच्या छायाचित्राचें अनावरण दिनांक ८ आक्टोबर १९४९ रोजीं मोठ्या थाटांत झालें. या प्रसंगीं श्री. शं. ना. जोशी, प्रा. फाटक, प्रा. पोतदार, श्री. कर्वे यांचीं भाषणें झालीं. (६) रा. ब. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं कै. बाबासाहेब इचलकरंजीकर यांचा ६ वा स्मृतिदिन साजरा झाला (दिनांक १५–१०–४९). या प्रसंगीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें व्याख्यान व श्री. ग. ह. खरे 'संपादित ऐतिहासिक फारसी साहित्य खंड ४ था' श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक ग्रंथ म्हणून प्रसिद्ध झाला. (७) श्री. अ. वा. वालावलकर (मुंबई) यांचें 'भारतीय लिपिसुधारणा' या विषयावर २१–१०–१९४९ 'रोजीं व्याख्यान झालें. (८) भारतसरकारचे मंत्री ना. काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालीं मंडळाचे एक जुने कारभारी व वैद्यदप्तराचे संपादक श्री. शं. ल. वैद्य यांचा सत्कार व वैद्यदप्तर भाग ४ था यांचें प्रकाशन १ जानेवारी १९५० रोजीं झालें. यावेळीं रा. ब. नानासाहेब सरदेसाई यांचें शंकरराव वैद्यांच्या गौरवपर व श्री. शं. ना. जोशी यांचें वैद्य दप्तर भा. ४ था या पुस्तकाच्या परिचयपर अशीं भाषणें झालीं (९) कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे

स्मृतिदिन १८ डिसेंबर १९४९ रोजीं म. म. पां. वा. काणे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. सदर वेळीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें व्याख्यान 'इंग्रजी अमदानींतील धार्मिक व सामाजिक चळवळी' या विषयावर झालें. (१०) वरील प्रसंगीं कै. गो. कृ. मोडकशास्त्री यांच्या चिरंजिवांनीं मंडळास देणगी दिलेल्या तैलचित्राचें अनावरण म. म. पां वा. काणे यांच्याकडून करविण्यांत आलें. (११) कटकच्या इतिहास परिषदेस गेलेल्या प्रतिनिधींची म. म. प्रा. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखालीं दिनांक १७ जानेवारी १९५० रोजीं तेथें घडलेली माहिती देणारीं भाषणें झालीं.

नवीन सभासद यादी

माहे आषाढ शक १८७१ ते फाल्गुन शक १८७१ अखेर

स. नं.	सभासद नांव	गांव	वर्ग
२४८१	श्री. जनार्दन मोरेश्वर चाफेकर	पुणें २	वार्षिक वर्ग ४
२४८२	श्री. वीरेंद्र कुमार श्रीवास्तव, B. A., L. L. B.	पुणें २	,, ४
२४८३	श्री. दिगंबर बाळकृष्ण मोकाशी	पुणें २	,, ४
२४८४	श्री. रामचंद्र नारायण नातू, M. A.	पुणें २	आजीव वर्ग ४
२४८५	श्री. विठ्ठल रामचंद्र जोग	पुणें ४	वार्षिक वर्ग ४
२४८६	श्री. शंकर बाजीराव भोसले	पुणें २	,, ४
२४८७	श्री. कृष्णाजी रामचंद्र देशपांडे, B. A. B. E.	पुणें २	,, ४
२४८८	श्री. सर्जेराव आबासाहेब जगताप	पुणें २	,, ४
२४८९	श्री. भीमराव लक्ष्मीकान्त परतुडकर साहित्य प्राज्ञ	फूलकळस	,, ४
२४९०	प्रो. श्रीधर भिकाजी बोंडाळे, M. A.	पुणें २	,, ४
२४९१	कु. यमुना दिनकर जोगळेकर	पुणें २	,, ४
२४९२	श्री. वीरेश्वर त्र्यंबक चितळे	पुणें ४	आजीव वर्ग ४
२४९३	श्री. बाळकृष्ण धोंडोपंत थत्ते	पुणें २	वार्षिक वर्ग ४
२४९४	श्री. विनायक कृष्ण जोशी	मुंबई २८	आजीव वर्ग ४
२४९५	श्री. यादव लक्ष्मण मुळे	पुणें २	वार्षिक वर्ग ४
२४९६	श्री. माधव बळवंत बहुळकर	पुणें २	वार्षिक वर्ग ४
२४९७	श्री. अच्युत रंगनाथ शिरवाडकर, M. A.	पुणें २	,, ४
२४९८	श्रीमंत सरदार मोरेश्वर चिंतामण ओंकार	पुणें २	,, ४
२४९९	श्री. हरि श्रीधर शेणोलीकर	पुणें २	,, ४
२५००	श्री. सदाशिव केशव नेऊरगांवकर	पुणें २	आजीव वर्ग ४
२५०१	श्री. रामकृष्ण नारायण साने	पुणें २	,,

ग्रंथालय

(ज्येष्ठ १८७२ अखेर)

ग्रंथकार–संपादक	ग्रंथनाम	दाता
Yule H. & Burnell	A glossary of colloquial Anglo-Indian words & phrases (Hobson Jobson)	विकत
Anklesaria B. T.	Paholavi Vendidad	कामा. सी. आर.
Sen Surendranath	Indian Travels of Thevenot and Careri	खरेदी
Dange S. A.	India from primitive communism to slavery	लेखक
	Proceedings: I.H.R.C. Silver Jubilee Session Delhi, 1948	Secretry I. H. R. C.
	Summaries of papers: 25th session of the All India Oriental Conference Bombay, 1949	जोशी शं- ना.
	Quinquennial Administrative Report of the Archaeological Department Gwalior state for the years 1942-46.	Archaeological Dept. Gwalior,
Ewing Ritohie J	Life and Times of William Ewart Gladstone vols. I & II	केतकर श्री. द.
	F. B. I. Register of British Manufacturers 1949-50	Iliffe & Sons, London
Jain J. D.	Constitution of India	खरेदी
T. Chandrasekharan	Alphabetical Index of Marathi Manuscripts Government Oriental Manuscripts Library, Madras. part 1	Govt.of Madras
Majumdar Raychaudhari Datta	An Advanced history of India	खरेदी
Burn Sir R.	Cambridge History of India vol. IV	खरेदी

ग्रंथकार–संपादक	ग्रंथनाम	दाता
Toynbee A. J.	Study of History vols I to VI (Abridgement)	खरेदी
	Chinese Stone Sculpture	Mayuyama and Co
	Ganjifa	R. & N. Von Lyden
	Report on the Modern Indian Architecture	दीक्षित हे. वि.
Banerji R. D. (Rd).	Memoirs of the Archæological Survey of India No. 23 Mediaeval Temples of the Dakhan	,,
Hamid M.	List of Ancient Monuments, Bihar & Orissa.	,,
Chamanlal	Hindu America	,,
Yazdani	Mandu the City of Joy	,,
Buchan J.	Nelson's History of the War vol I–III, V–VIII, X–XIII, XV–XX, XXII & XXIV	,,
Patil D. R.	Monuments of the Udayagiri Hill	Arch-Dept. Gwalior
Mahtab H.	History of Orissa	खरेदी
	Orissa Review (Special 1949)	,,
	Annual Report of the Librarian of Congress June 30, 1947 – Do – June 30, 1948	Govt. of P & S. Office Bombay
	Annual Bibliography of Indian Archaeology vol. XV 1940–47	Kern Institute, Lyden
खरे य. वा.	ऐतिहासिक लेख संग्रह भाग १५	
	काळांतील निवडक निबंध भाग १ ते १०	खरेदी
ओतूरकर रा. वि.	पुणें विद्यापीठ	मेढेकर के. रं.
खरे ग. ह.	शनवारवाडा	लेखक
चितळे शं. दा. व ओतूरकर रा. वि.	हिंदुस्थानचा साधनरूप इतिहास	,, / ,,

ग्रंथकार संपादक	ग्रंथनाम	दाता
लेले मु. ह.	लेले कुलवृत्तान्त	पेंडसे रु. वि.
कणगली एम्. एम्.	पुण्याचा माहितगार	खरेदी
खरे य. वा.	नाना फडनवीसांचें चरित्र	,,
शेंडे शं. रा.	१९५१ ची शिरगणती	लेखक
आवचल गो. ग.	विश्वव्यापी वैदिक संस्कृति भाग १	,,
	पुरी माहात्म्य	पोतदार द. वा.
गोखले वा. दा.	अहल्याबाई होळकर	लेखक
वैद्य शं. ल.	वैद्य दप्तरांतून निवडलेले कागद खंड ४	संपादक
काणेकर ब.	बुरुजावरील सूड रहस्य	पआी. मा. अ.
बापट ग. त्र्यं.	विश्रामबाग वाड्याचा इतिहास	खरेदी
	नामदेवरायाची सार्थ गाथा भाग १ ला	,,
सरंजामे रु. वि. (प्रका.)	श्री गायत्री पंचरत्न	प्रकाशक
सोवनी शं. वि. (संपा.)	सोवनी–सोहनी कुलवृत्तान्त	संपादक
जोशी प्र. न.	दिनविशेष	लेखक
जयचंद्र विद्यालंकार	भारतीय इतिहास की रूपरेखा जिल्द १	दीक्षित हे. वि.
दाते य. रा. व कर्वे चिं. ग.	महाराष्ट्र शब्द–कोश पुरवणी विभाग अ–ज्ञ	खरेदी

संतोषोद्गार

मैं ने आज भारत इतिहास संशोधक मण्डल में उपस्थित होकर यहां पर दीर्घ काल के अन्दर किए गए महान परिश्रम के फलस्वरूप अत्यन्त बहुमूल्य और इतिहास विषयक खोज में परम सहायक सामग्री के संग्रह का दर्शन करके अति संतोष को प्राप्त किया। श्री. गणेश हरि खरे व श्री. शङ्कर नारायण जोशी जिस उत्साह तथा निष्ठा के साथ मण्डलद्वारा सम्पन्न किए जा रहे कार्यक्रम मे लग रहे हैं वह नितांत सराहनीय एवं दूसरी संस्थाद्वारा अनुकरणीय है। योग्य तथा निष्ठावान् कार्यकर्ता ही संस्था के कार्य में सफलता लानेवाला मुख्य अंग है। मुझे यह जान कर अति हर्ष एवं संतोष होता है कि इस मण्डल के कार्यकर्ताओं की लगन व निष्ठा सार्वजनिक विश्वास व पात्रकी प्रेमपात्र प्रमाणित हुई है और अनेक लोगो ने बहुमूल्य पदार्थ मण्डल को अर्पण करके अपने हार्दिक विश्वास का परिचय दिया है। अब अपनी सरकार से आशा करनी चाहिए कि मण्डल ऐसी उपयोगी संस्था को भले प्रकार आर्थिक साहाय्य प्रदानद्वारा पुष्ट करेंगे

विश्वबन्धु शास्त्री

ता. १५–११–४९ } अध्यक्ष दयानंद कॉलेज अनुसंधान विभाग, विश्वेश्वरानंद वैदिक संस्थान, होश्यारपूर

I was extremely pleased to visit the Bharata Itihasa Samshodhaka Mandala with Mahamahopadhyaya D. V. Potdar, when I visited the Tilak Vidyapeeth, of which he is the Vice-Chancellor. Potdarji took me round to all the valuable exhibits, and I would say without reservation that this is indeed a great historic treasure, which any country would be proud to exhibit. I feel that it is the duty of every well wisher of the country to do his utmost to encourage Mahamahopadhyaya D. V. Potdar the moving spirit behind the Mandala. So that still greater and valuable work could be undertaken by him. Our Government also should fully encourage such efforts. Potdarji is devoting his time and energy for this great national work for past forty years and even at this old age of his, the zeal for work has never slackened and from my study I saw him impatient at the progress of work, for he desires still greater progress and completion in his life time. I wish him and the Mandala all the success in this laudable cause.

13 th October 1949.

Ramniranjan Anandilal Poddar
Bombay

Thanks to prof. Oturkar, I had an opportunity of visiting this famous institution. It would be presumptous on my part to offer remarks on the academic work, that is being done here. But the museum and the collection of paintings is most interesting and unique in its own way. The Mandala is doing magnificent service to the cause of histoty in bringing to light the past achievement of this part of the country and I wish it every success.

17 th October 1949

Raghavendra Rao P. V. (I. C. S.)
Secretry to the Govt. of Bombay
Educataion Dept.

I was exteremly glad to visit this Institution and see its rich collections of and paintings beautifully arranged and exhibited. The Institution is doing splendid work and deserves special encouragement and financial support form the Govt. and the public.

Poona, 10-11-49

H. R. Rangaswami Iyangar
Supdt. Govt. Oriental
Research Institute, Mysore.

I was particularly struck by the rich collection of paintings and MSS which incidentally do not receive the attention they deserve, I learn, for lack of funds. I am thankful to the seceretary and the curator for taking me round and wish the Institution every success, particularly in the matter of financial support from the national government and the enlightened public.

10-11-49 } N Sivarama Sastry
Central College
Bangalore.

I had the pleasure of visiting the Bharata Itihasa Sanshodhaka Mandala. Mr. Khare the curator was good enough to show me round the various sections of this Institution. It is well known what valuable work the mandala has been doing in connection with all the periods of our history. Much that we know about the early Chalukyas and the Rastrakutas who ruled our western India we owe to the discovery of many important copper-plate inscriptions by the Institution. The indefatiguable curator has done excellant work in bringing their contents to light. I hope the government would give more generous grants so that the Institution may carry on the work unhampered,

20-11-49 } N. Lakshminarayanrao
Govt. Epigraphist for India

अनेक महापुरुषांची तपस्या खर्ची पडून प्राचीन इतिहाससाधनांचा जेथें संग्रह करण्यांत आला आहे त्या या संस्थेबद्दल मी काय लिहावें ! येथील प्राचीन अवशेष व अस्सल कागदपत्र यांच्या दर्शनानें ऐतिहासिक काळाशीं समरस होण्याचा अपूर्व आनंद मी अनुभविला. ता. ३।४।५० **बाळशास्त्री हरदास**

ही संस्था सर्वत्र हिंडून पहात असतां क्षणोक्षणीं आश्चर्य करीत होतों. दहावीस जण, सारखे आयुष्यभर खपले असले पाहिजेत, तेव्हां हा सारा संग्रह एकत्र झाला असावा. संस्थेचा चालू घटकेचा व्याप पाहून व भावी कार्यांची कल्पना करून माझे मनांत आलें कीं, या संस्थेला प्रतिवर्षी पन्नास हजारांचीहि देणगी, न जाणों अपुरीच होईल. या संस्थेला प्रस्तुतचें स्वरूप ज्यांच्या प्रयत्नानें आलें आहे, त्यांची धन्य होय. मी चकित झालों आहे. दिनांक १५-४-१९५० **शंकर श्रीकृष्ण देव, धुळें.**

आज यह संस्था देखकर मनमें आया कि जैसे कई शतकों और पीढियोंकी कृतियोंका यह संग्रह है। उसी प्रकार न मालूम कितनी पीढियोंने इसके संग्रह में जीवन दान किया है और कर रही है। यह आप और कर रही है। यह आप और अध्यवसाय यदि उत्तर भारतमें उत्पन्न हो तो इतिहासकाही नहीं परंच अपनी संस्कृतिका ही अपूर्व लाभ होगा।

संस्था देखते समय चित्त विचलित हुए विना नहीं रहा। जो सेकडों वर्ष पहिले हो गये और जिनके कारण आज हम है उनके चिन्ह पाकर व्यवहृत पदार्थ देखकर जिसका हृदय आन्दोलित नहीं होगा उसके रक्तमें कोई विकार अवश्य है। मैंने यह संग्रह देखकर इधर के विद्वानो और इतिहासशोधकोंके जिस अध्यवसाय और श्रमका परिचय पाया वह सारे देशमें अनुकरणीय है। इसके वर्तमान संचालकोंने मुझे संस्था दिखाने की जो कृपा की उसके लिये सदा कृतज्ञ रहूंगा।

२५–५–१९५० बा. वि. पराडकर

अमोल देणगी

तळेगांवचे सरदार वीरधवलराव दाभाडे (सेनापति) यांनीं आपल्या बहुमोल ऐतिहासिक कागद-पत्रांचा संग्रह भारत-इतिहास-संशोधक मंडळास दिला हें कळविण्यास संतोष वाटतो.

चिटणीस.

ग्रंथविक्री शाखा

रा. ब. सरदेसाई संपादित पेशवे दप्तर व पूना रेसिडेन्सी रेकॉर्ड यांचे भाग किरकोळ किंवा एकदम मंडळांत विकत मिळतील. मंडळाच्या सभासदांना बरीच सवलत देण्यांत येईल. चौकशी कचेरीकडे करावी.

चिटणीस
भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें २.

४६३

५४ पुणें नगर संशोधन-वृत्त खंड १ रु. १
५४ (अ) ऐ. सं. सा. खं. ३ रु. ३
५५ शिवचरित्रसाहित्य खंड ८ १८८
५५ (अ) शि. च. सा. खं. ५ रु. ३॥
५६ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ४ २
५७ ऐ.संकीर्ण वाङ्मय साहित्य खं.१, १८८
५८ शिवकालीन दंडनीति वा. सि. चेंद्रे ४
५९ पुणें नगरसंशोधन वृत्त खं.२ १८८
६० ऐ. संकीर्ण निबंध खंड १ ला १८८
६१ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ५ वा १८८
६२ शिवचरित्र साहित्य खंड ९ वा १८८
६३ खरे ग. ह. हिंगणे दप्तर, खंड १ पृ. १९२ रु. ३
६४ ऐ. सं. सा. खं. ६ पृ. १०१ रु.१८८
६५ ऐ. सं. निबंध खंड ३ पृ. ७६ रु. २
६६ कर्वे, पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ पृ. ८५ रु. १८८
६७ डॉ. दीक्षित महाराष्ट्रांतील ताम्रपट शिलालेख पृ. १३३ रु. ३
६८ ऐ. संकीर्ण साहित्य खं. ७ पृ. ९१ रु. २
६९ ऐ. संकीर्ण निबंध खंड२ पृ. ८९ रु. ३
७० खरे, हिंगणे दप्तर, खं. २ पृ. १२७ रु. ३
७१ अवळसकर आंग्रेकालीन पत्रव्यवहार पृ. ९२ रु. ३
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ४ पृ. ८९ रु. २॥
७३ चितळे, पेठे दप्तर, भाग १ पृ. ८८ रु. ३
७४ Explorations at Karad Rs. 5
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली श्री. शं. ना. जोशी पृ. १७५ रु. ३
७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इति. साधनें खंड ३ पृ. १३३ रु. ३
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य चौथा खंड
७८ पेठे दप्तर भाग २ रा. रु. ३

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला

(१) मठगांवचा शिलालेख (रा. ब. चांदोरकर पृ. २४३) रु. २
(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (स. म. दिवेकर पृ. ५०) रु. ०१०
(३) श्री शिवभारत (मूळ व मराठी भाषांतर पृ. ५८८) रु. ६
(४) शिवचरित्र (पृ. ३२५-कागदी व कापडी.) रु. ३॥ व ४
(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला. (रु. वि. वझे पृ. २००) रु. ३
(६) शिवकालीन जंत्री शके १५५१-१६५०- (ग. स. खरे पृ. २००) रु. ५
(७) साधन-चिकित्सा (वा. सि. बेन्द्रे पृ. ३२०) रु. ४
(८) ऐतिहासिक पोवाडे (य. न. केळकर पृ. ६१५) रु. ३
(९) वाठारकर निंबाळकर-इतिहास (पृ. ३००) रु. १॥
(१०) भूतेश-आख्यान (पृ. ७५) रु. ०१२
(११) कऱ्हाड, (य. रा. गुप्ते-पृ. ५४) रु. ०८
(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (वि. का. राजवाडे-पृ. ६००) रु. ३
(१३) राजवाडे यांचे संकीर्ण निबंध (श्री. शं. ना. जोशी पृ. २९१) रु. ३

(१४) राजवाडे संकीर्ण निबंध भाग ३ रा. (श्री. शं. ना. जोशी पृ. २८०) रु. २
(१५) (१६) प्रकाशित व्हावयाचे आहेत.
(१७) पुरंदरे–दप्तर, भाग २ रा. उत्तर पेशवाईतील पत्र व्यवहार रु. ३
(१८) The Escape of Shivaji from Agra (रावसाो देशपांडे) रु. ३
(१९) लोककथा, पुस्तक १ लें (शं. ग. दाते कापडी, कागदी) रु. १॥
(२०) पानसे घराण्याचा इतिहास (रा. ब. पानसे) रु. ३
(२१) कै. वासुदेवशास्त्री खरे–चरित्र (दा. मो. भट) रु. २॥
(२२) लोककथा भाग २ रा. (शं. ग. दाते) रु. १०८
(२३) संपूर्ण भूषण (रा. गों. काटे–पृ. २३०) रु. १०८
(२४) शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा (शं. ना. जोशी व ग. ह. खरे पृ. २८२) रु. ३
(२५) राजधानी रायगड (वि. वा. जोशी–पृ. १६४) रु. १
(२६) Shivaji (C. V. Vaidya pp. 410) Rs. 3
(२७) आळंदी (ग. ह. खरे–पृ. २०) ०२
(२८) मठगांवचा शिलालेख : कुडाळप्रांतेतिहास (वाळावलकर पृ. १६५) रु. १०२
(२९) पुरंदरे दप्तर भाग ३ रा (कृ. वा. पुरंदरे पृ. २५०) रु. ३
(३०) मध्वमुनीश्वराची कविता (प्र. व्यं. गुर्ची–पृ. २५८) रु. ३
(३१) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (डॉ. वि. गो. दिघे–पृ. ९०) रु. १
(३२) वेदस्तुति आणि स्फुट कविता (कृष्णदयार्णवकृत) कि. रु. ०१२
(३३) ज्ञानप्रदीप (द. वा. पोतदार–पृ. १२५) रु. १
(३४) पेशवाईच्या सावलींत (ना. गो. चापेकर–पृ. ४००) किं. रु. ४
(३५) मूर्तिविज्ञान (ग. ह. खरे पृ. १५०, ९४ चित्रें) रु. ३०८
(३६) आठल्ये घराण्याचा इतिहास–(वि. वा. आठल्ये पृ. ४४०) रु. ३॥
(३७) किल्ले पुरंदर (कृ. वा. पुरंदरे पृ. १६२) किं. रु. १०१४
(३८) किल्ले विशाळगड (पं. बा. शिरवळकर पृ. ९३)–किं. रु. १
(३९) श्रीशिवकाव्य (प्रकाशक ह. वा. भावे, विवेचन शं. ना. जोशी) रु. २॥
(४०) गुण्ये घराण्याचा इतिहास (वि. त्र्यं. गुण्ये) रु. १०
(४१) वैद्य दप्तर खंड १ (शं. ल. वैद्य) रु. २॥
(४२) वैद्य दप्तरांतून निवडलेले कागद पुरवणी खंड १–२ किं. रु. ३
(४३) खेड (य. रा. गुप्ते पृ. २२) रु. ०८
(४४) हरिहरेश्वर वर्णन (मो. वि. परांजपे पृ. ५६) रु. १
(४५) वैद्य दप्तरांतील कागद खंड २ (शं. ल वैद्य पृ. १३२) रु. ३
(४६) वैद्य द. कागद खंड ३ रा. (शं, ल. वैद्य–पृ. ८२) रु. ३
(४७) चिमाजी आपा (कृ. वा. पुरंदरे पृ. १४८) रु. २
(४८) पोंक्षे कुलवृत्तांत (भा. सि. पोंक्षे) रु.
(४९) वैद्य दप्तर खं. ४ (शं. ल वैद्य) रु. ८
(५०) नाना फडणविस शकावलि रु. ३